**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विक्रम काळे)**

**तालिका सभापती** : काल नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु होती. आता आपण तीच चर्चा पुढे सुरु करीत आहोत. काल सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत ऑनलेग होते. परंतु ते आज गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे. आपल्याला नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा उत्तरासह संपवायची आहे. आपण सहकार्य करावे. सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी ५ मिनिटांचा वेळ देण्यात येणार आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडावा.

असुधारित प्रत

## युक्रेनमधून भारतामध्ये परत आलेल्या विद्यार्थ्यांच्या संदर्भातील पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन असा आहे की, युक्रेन व रशिया यांच्यामध्ये युध्द सुरु आहे. युक्रेनमध्ये भारतातील २० हजार विद्यार्थी होते. खारकिव्ह, किव ही युक्रेनमधील दोन शहरे अशी आहेत की, तेथे एज्युकेशनल हब मोठ्या प्रमाणात आहेत. नीट परिक्षेमध्ये कमी गुण मिळायचे ते विद्यार्थी देखील अशाप्रकारच्या देशांत शिक्षण घेण्यासाठी जायचे. दुसरी गोष्ट म्हणजे नीट परिक्षेमध्ये जरी क्वॉलिफाय झाले तरी पैशाअभावी आपल्या भारतामध्ये काही सरकारी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. मात्र तेथे कमी फीज असते. त्यामुळे चीन, रशिया, फिलिपाईन्स, जॉर्जिया, युक्रेन अशा सर्व देशांत मोठ्या प्रमाणात आपले विद्यार्थी शिकण्यासाठी जातात. आता युक्रेन व रशिया यांच्यामध्ये युध्द सुरु झाले आहे आणि युक्रेन डिस्ट्रॉय झाल्यासारखे आहे. त्यामुळे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात परत आले आहेत. २० हजार विद्यार्थ्यांतील जवळपास पाच ते साडे पाच हजार विद्यार्थी महाराष्ट्रातील आहेत. आमच्या नागपूरमधील देखील विद्यार्थी आहेत.

सभापती महोदय, माझी विनंती आहे. अजुनपर्यंत नॅशनल मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने कोणत्याही प्रकारची गेट वे पॉलिसी जाहीर केलेली नाही. आपल्या सरकारच्या वतीने आपल्याला नॅशनल मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची परवानगी घ्यावी लागते, कारण ती अपेक्स बॉडी आहे, तरी या संदर्भात काही तरी तोडगा काढला पाहिजे आणि तशाप्रकारचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला पाहिजे. या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये. सदर बाबतीत असा समज आहे की, नीट परीक्षा क्वॉलिफाय न होणारे विद्यार्थीच तिकडे जातात. मात्र असे नाही. २ वर्षांपूर्वी आपल्या देशात नॅशनल मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने नीट परीक्षा बंधनकारक केली होती. बाहेरच्या देशात जाताना सुध्दा नीट परीक्षा क्वॉलिफाय केली पाहिजे, म्हणून त्यांनी मागच्या वर्षीपासून पहिल्या वर्षात, दुसऱ्या वर्षात ज्यांचा प्रवेश होतो, त्यांचा विचार केला होता. आता त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये. त्यामुळे त्यांचा आपण

श्री. अभिजीत वंजारी ....

सहानुभूतीपूर्वक विचार केला पाहिजे. त्यामुळे आपण या मुद्यावर तसा प्रस्ताव तयार करुन नॅशनल मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाला द्यावा, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. ही केंद्र सरकारच्या अखत्यारितील बाब आहे. केंद्र सरकारने याची दखल घेऊन तातडीने उपाययोजना करायला हवी. परंतु त्याची वाट न पाहता राज्य सरकारच्या वतीने काय करता येईल याबाबत राज्य सरकारच्या वतीने अधिवेशन संपण्यापूर्वी यावर निवेदन करण्यास सांगू.

श्री. सुनील केदार : सभापती महोदय, नोंद घेतली आहे.

----

असुधारित प्रत

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यास सुरुवात करावी. आपण आज माननीय सभापती यांच्या दालनात उपस्थित होता. आपण सहकार्य करावे. मी देखील साक्षीदार म्हणून चर्चेच्या वेळी उपस्थित होतो. आपल्याला प्रस्तावावरील चर्चा उत्तरासह संपवायची आहे. त्यामुळे वेळेचे नियोजन करणे गरजेचे आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना ५ मिनिटे वेळ मिळेल. आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात, आपल्याला १० मिनिटे वेळ मिळेल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपण काल अजून १ तास सभागृहाचे कामकाज चालविले असते तर बरे झाले असते, सर्वांची तयारी होती. आज माननीय मंत्र्यांना उत्तर देण्यासाठी सुरुवात करता आली असती.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

**पृ.शी.** : महाविकास आघाडी सरकारने राबविलेल्या कल्याणकारी योजना

**मु.शी.** महाविकास आघाडी सरकारने राबविलेल्या कल्याणकारी योजना या विषयावर सर्वश्री शशिकांत शिंदे, दिवाकर रावते, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री विक्रम काळे, रवींद्र फाटक, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, नरेंद्र दराडे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री विप्लव बाजोरिया, मोहनराव कदम, अनिकेत तटकरे, विलास पोतनीस, राजेश राठोड, अमोल मिटकरी, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अभिजित वंजारी, संजय दौंड, अंबादास दानवे, जयंत आसगावकर, दुष्यंत चतुर्वेदी, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे आणि अन्य सर्व सन्माननीय सदस्य यांनी नियम २६० अन्वये जो प्रस्ताव दिला आहे, त्यावर मी माझे मत व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, प्रस्तावात अनेक विषय आहेत. पण मी सर्व विषयांवर बोलणार नाही. परंतु ३-४ महत्त्वाच्या विषयांवर काही सूचना मात्र निश्चितपणे करणार आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेपासून पंतप्रधान ग्रामसडक योजनेपर्यंतचे अनेक विषय आहेत, रस्त्यांची कामे आहेत. पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत एकूण ६५५० कि.मी. रस्त्यांचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात जवळपास ३ हजार कि.मी. बांधकामाला मान्यता प्राप्त झाली आहे आणि २०१७७ कोटी रुपये खर्च होत आहे. हा खर्च पंतप्रधान ग्रामसडक योजनेसंदर्भात केंद्र सरकारचा आहे. आपण राज्यातील रस्ते पाहिले असतील. केंद्र सरकारचे, राज्य सरकारचे, जिल्हा परिषदेचे, ज्याला क्रमांक नाही असे खूप रस्ते आहेत. माननीय मंत्री श्री. संदिपान भुमरे साहेबांनी मातोश्री पाणंद रस्त्यांची योजना आणली आहे. अतिशय

श्री. विनायक मेटे ....

अमुद्रित प्रत

चांगली गोष्ट केली आहे. महाराष्ट्रामध्ये मोठे रस्ते आहेत, हायवे आहेत, अन्य रस्ते आहेत, पंतप्रधान ग्रामसडक योजनेतील रस्ते आहेत, यांमध्ये जरा बऱ्यापैकी क्वॉलिटीचे काम दिसते. आपल्याला हे मान्य करावे लागेल. सरकार कोणते किंवा काय आहे हा मुद्दा येथे नाही. आपल्याकडे जे रस्ते होत आहेत, मग ते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत असतील, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असतील, जिल्हा परिषरेचे तर बोलायलाच नको, या माध्यमातून जे रस्ते तयार होत आहेत, त्याची गुणवत्ता तपासण्याची वेळ आलेली आहे. आज राज्यात गुणवत्ता शिल्लक राहिलेली नाही.

सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून रस्ते होत आहेत. ते सर्व रस्ते मी म्हणत नाही, मेजर रस्ते आहेत. जिल्हा परिषदेचे सदस्यच ठिकठिकाणचे गुत्तेदार झाले आहेत. होऊ द्यावे. अडचण नाही. आता असे होत आहे की, रस्त्याची कामे बिलोमध्ये मोठ्या प्रमाणात घेण्याचे प्रमाण वाढले आहे. कामे जवळपास २५ टक्के बिलो जात आहेत. आपल्याला हे माहीत आहे. आपल्याकडे खूप टॅक्सेस आहेत. ठेकेदाराचा हिस्सा ५-१० टक्के तो ठेवेल. कारण तो फुकट काम करणार नाही. अधिकाऱ्यांची टक्केवारी १० टक्क्यांपर्यंत जाते. एकूण ५० टक्क्यांपर्यंत पैसे वर जातात. ५० टक्क्यांमध्ये कामाचा दर्जा काय राहणर आहे ? त्यामुळे प्रत्येक वर्षी केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषद हजारो कोटी रुपये घालतात, ते पाण्यामध्ये गेल्यासारखे आहे.

सभापती महोदय, डांबरीकरण, खडीकरण करावे, ते केल्यानंतर दुसऱ्या वर्षी पाऊस झाल्यानंतर तेथे काहीही राहत नाही. गावातील लोक लोकप्रतिनिधींच्या मागे लागतात की, आमच्या गावात रस्ता पाहिजे, आम्हाला हे पाहिजे, ते पाहिजे. मुळामध्ये आपण जे रस्ते करतो, त्यामध्ये गुणवत्ता आणणे फार गरजेचे आहे. टेंडरींगमध्ये देखभाल व दुरुस्ती असा ५ वर्षांचा करार असतो, पण कोणीही पाळत नाही. मोठ्या रस्त्यांच्या बाबतीत पाहतात नाही तर आजिबात पाहत नाही. एक मात्र आहे की, माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेबांच्या माध्यमातून राज्यात जे रस्ते झाले आहेत, ते सुपर आहेत. औरंगाबाद ते

श्री. विनायक मेटे ....

सोलापूर असा रस्ता जातो, पुणे रस्ता आहे, अनेक रस्ते आहेत, या सर्व रस्त्यांवर किती तरी चांगल्या दर्जाची कामे होत आहेत. त्याचे कारण त्यावरील देखरेख असेल किंवा अन्य काळजी घेणे असेल. राज्य सरकार, जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून असेच काम होण्याची नितांत आवश्यकता आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये सर्व टेंडर मॅनेज होतात, मग कागदपत्रे असो किंवा नसो. गुत्तेदार ठरलेले असतात. ऐकत नसेल तर अधिकाऱ्यांना हाताशी धरुन कसे बाद करायचे हे माहीत आहे. गेवराई, बीडमध्ये असे प्रकार झाले आहेत. अनेक ठिकाणी असे आहे. खूप ठिकाणी आपल्याला हे पहायला मिळेल. चांगल्या कामाकरिता याची कोणी तरी दखल घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, महिला स्वयंसहायता बचत गटाबाबत उल्लेख आहे. ५,४२,९४४ महिला स्वयंसहायत्ता बचत गट कार्यरत असून ५५,३५,४३२ कुटुंबे यामध्ये आहेत.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे...

बचत गटामध्ये महाराष्ट्र राज्य खूप पुढे हे मला मान्य आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मंडळी नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेमधून बचत गटांची बांधणी करतो. त्यांना निधीचा पुरवठा केला जातो. या बचत गटांना ११,१४० कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले, ही रक्कम थोडी नाही. यामध्ये बचत गटामार्फत, लोणचे,पापड असे अनेक पदार्थ तयार केले जातात त्यांच्या विक्रीसाठी मार्केट उपलब्ध नाही. मार्केटच्या रचनेचा विचार सरकार कधी करते काय ? तसा विचार अद्यापपर्यंत करण्यात आलेला नाही. बचत गटामार्फत मालाचे उत्पादन करण्यात येते परंतु तो माल कोठे विकायचा, कोणी विकायचा, त्यासाठी ठिकाण कोणते, याबाबत शासनाचे विचार केलेला नाही याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मागील काळात मी अशी सूचना केली होती की, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी बचत गटासाठी मार्केट तयार केली पाहिजेत. आपल्याकडे खूप ठिकाणी जमिनी आहेत, १०० गाळे तयार करायला पाहिजेत. प्रत्येक शहरात भाजीमार्केट आहे. महिला बचत गटासाठी १०० गाळे बांधून त्यांचे वाटप रोटेशन पध्दतीने करावे. समजा एका जिल्ह्यात एक हजार बचत गट असतील किंवा त्यापेक्षा जास्त असतील तर त्यांना हे गाळे ८-१५ दिवस रोटेशन पध्दतीने दिले तर त्या सर्व बचत गटांना माल विकता येईल. ही कामे शासनामार्फत व्हायला पाहिजेत. जे मूळ दुखणे आहे ते शोधून त्यावर उपाययोजना करण्याचे काम सरकारने केले पाहिजे, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून ५,३९,५२,२६८ इतके मनुष्यबळ निर्मिती झाली आहे. बजेटवरील चर्चेवर मी बोलत असताना त्यावेळी सांगितले होते की, यासाठी व्यवसाय कर लावण्यात आलेला आहे. तो दोन टक्के कर आहे. सन २००७-२००८ मध्ये त्या कराची रक्कम शासनाच्या एकत्रित गंगाजळीमध्ये घेण्यात आली. पूर्वी ही रक्कम वेगळी ठेवण्यात आली होती. ती रक्कम याच कामासाठी वापरण्यात येत होती. सन २००८ पासून आतापर्यंत हा कर एकत्रित निधीत जमा करण्यात येत आहे. हा निधी रोजगार हमी योजनेसाठी घेण्यात आलेला आहे. तो निधी दान दिल्यासारखे त्या विभागाला देण्यात

श्री.विनायक मेटे...

येत आहे. तो विभाग किंवा आयुक्त कार्यालयामार्फत जसे जमेल तसे त्या निधीचे वाटप करण्यात येते. त्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर अन्याय होत आहे. आता जो एकत्रित निधी आहे तो पूर्वीसारखा वेगळा ठेऊन रोजगार हमी योजनेसाठी देणे गरजेचे आहे. आता जवळपास २६ हजार कोटी रुपये एकत्रित निधीत जमा झाले आहेत. त्यातील १२ ते १३ हजार कोटी रुपये रोजगार हमी योजनेसाठी दिले असून इतर पैसा शासनाच्या एकत्रित निधीत जमा आहे. हा सर्व पैसा या विभागाला कधी देण्यात येईल त्याशिवाय या योजनेची कामे कशी होतील. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार कसा उपलब्ध करुन देणार हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदय, श्री.संदीपान भुमरे व मंत्री महोदय, श्री. अब्दुल सत्तार हे शिवसेना पक्षाचे आहेत. आपण भूमिपूत्रांना न्याय देण्याच्या गोष्टी करतात. त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन द्या. रोजगार दिला तर त्याचे पैसे त्यांना वेळेत द्या. हा निधी देण्यासाठी त्या खात्याला निधीचा पुरवठा करायला पाहिजे. जो हक्काचा निधी आहे तो तुम्ही देत नाही. त्यांचा निधी त्यांना दिला तर खूप मोठी कामे होऊ शकतील. सन १९७२ मध्ये शेतात नालाबंडींगची कामे करण्यात येत होती. त्यावेळी पाणी अडवा व पाणी जिरवा ही योजना राबविण्यात आली होती. मागील काळात नदी,नाले व ओढ्यांचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यात आले. पूर्वीसारखा हा प्रयोग शेतात केला तर त्याचा उपयोग होईल. शेतकऱ्यांनी आपापल्या शेतीची बांधणी केली तर माती व पाणी वाहून जाणार नाही. शेतीसाठी त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. कोकणात रोजगार हमी योजनेतून फळबागांची लागवड करण्यात येते. महाराष्ट्रात अशा अनेक लागवडी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करता येतील. त्यामुळे शेतकरी समृध्द होऊ शकतो त्याच्या घरात चार पैसे येऊ शकतील. या सर्व बाबी करणे अत्यंत गरजेच्या आहेत.

सभापती महोदय, माननीय श्री.सुनील केदार हे क्रीडा मंत्री उपस्थित आहेत. मागील क्रीडा मंत्री महोदयांनी असा निर्णय घेतला होता की, प्रत्येक तालुक्यात क्रीडा स्टेडियम उभारण्यात येईल. त्या निर्णयाचे काय झाले, घोषणा केल्यावर आतापर्यंत

श्री.विनायक मेटे...

असुधारित प्रत

किती क्रीडा संकुले तयार झाली त्याचा आढावा घेतला आहे काय ? जे मोठे तालुक्ये आहेत व जे लोकप्रतिनिधी चांगले ॲक्टीव आहेत त्यांनी शासनाच्या मागे लागून आपल्या जिल्ह्यात वा तालुक्यात क्रीडा संकुल तयार करुन घेतले अशाच ठिकाणी क्रीडा संकुले तयार झाली आहेत. अद्यापही अनेक जिल्ह्यांना क्रीडा स्टेडियम नाही तर तालुक्याच्या ठिकाणी करण्याचा विषय येत नाही. त्यामुळे मंत्री महोदय, कर्तबगार, तरुण व तडफदार आहेत. काही तरी करुन दाखविण्याची आपली इच्छा आहे. या निमित्ताने प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुल कसे तयार होईल याचा विचार करावा. माजी उप मुख्यमंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांनी प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकुले उभारण्याची घोषणा केली होती. त्यांनी व मी दोन तालुक्याच्या ठिकाणच्या क्रीडा संकुलाचे भूमिभूजन केले होते. ती संकुले पूर्ण झाली नाहीत हा भाग वेगळा आहे. तेव्हापासून आतापर्यंत याबाबत काहीही झाले नाही. आता मंत्री महोदयांनी या योजनेला चालना द्यावी अशी माझी मागणी आहे. क्रीडा क्षेत्रात ग्रामीण भागात मोठे टॅलेंट आहे. ऑलिम्पिक व इतरांचा आपण मोठा गवगवा करतो त्यांचे कौतुक करतो. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांच्या बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात मोठे पैलवान आहेत. तेथील लोक महाराष्ट्र केसरी झाले आहेत. तेथे अनेक वेगवेगळे कुस्ती पट्टू झाले आहेत. बीड जिल्ह्यातील अनेक मुले पुण्यात येतात ते वेगळ्या पध्दतीची कुस्ती खेळण्यास तयार असतात. तो भाग वेगळा आहे. मुद्दा असा आहे की, बीड जिल्ह्यात कुस्ती खेळणारे जे पैलवान आहेत ते कोल्हापूर किंवा पुणे येथे जातात. बीडमध्ये त्यांच्यासाठी काही सोई सुविधा तयार करता येतील काय, त्यासाठी शासन काही मदत करणार काय, बीड येथील क्रीडा संकुलात साधे पाणी मिळत नाही. तेथे शौचालयाची नीट व्यवस्था नाही. त्यासाठी निधी येतो तो कोठे जातो त्याची माहिती मिळत नाही. तेथे अत्यंत वाईट पध्दतीचा कारभार सुरु असून जिल्हाधिकारी त्याचे अध्यक्ष आहेत. त्याचा कोणी आढावा घेत नाही, मुलांना तेथे खेळायला मिळत नाही अशी अत्यंत वाईट अवस्था त्या क्रीडा संकुलाची झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज या नावाचे स्टेडियम आहे. काल शिवसेना पक्षाची शिवजयंती झाली. महाराष्ट्र राज्यात एक मोठी गंमत आहे. मुख्यमंत्री म्हणून १९ फेब्रुवारी रोजी

श्री.विनायक मेटे....

असुधारित प्रत

तारखेप्रमाणे शिवजयंती साजरी करण्यात आली. पक्ष म्हणून काल शिवजयंती साजरी करण्यात आली आहे. दोन दोन तारखा कशा चालतात याची मला माहिती नाही. आजचा माझा तो विषय नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने बीड येथील क्रीडा संकुल आहे. त्या स्टेडियमचे नाव बदलून टाकण्यात आले आहे. तेथे आंदोलन होणार होते. आम्ही असे म्हटले की, शिवाजी महाराजांचे भक्त क्रीडा मंत्री आहेत. त्यांच्याकडे हा विषय घेऊन जाऊ व पुन्हा ते नाव त्यांना देतील त्यासाठी मी एक पत्र आपणाला दिले आहे. कोणत्याही परिस्थिती बीड जिल्ह्यातील क्रीडा संकुलाचे नाव छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल असेच राहिले पाहिजे. अशी अनेक लोकांची भावना आहे. काही लोक ते नाव पुसून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे तसे न होता आहे ते नाव कायम ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, दुधाचा धंदा पाहिला तर लातूर, बीड, उस्मानाबाद या मराठवाड्यातील फक्त अर्धे जिल्हे दुधाचे उत्पादन करतात. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे व अहमदनगर येथील दूध संपूर्ण महाराष्ट्राला पुरविण्यात येते. महाराष्ट्रातील पाच ते सहा जिल्हे दुधाचे उत्पादन करीत असून ते संपूर्ण महाराष्ट्राला दूध पुरवितात. विदर्भातील भंडारा येथे फक्त एक लाख लीटर दूधाचे उत्पादन होते. मंत्री महोदयांनी पश्चिम महाराष्ट्रासारखे दूधाचे उत्पादन विदर्भात कसे वाढेल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. गुजरात राज्याचे दूध महाराष्ट्रात येते त्यांच्या नावाने बोटे मोडून उपयोगाचे नाही. ते काय करतात ते पाहणे महत्वाचे आहे

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे......

गुजरात राज्यातील दूध मुंबई व संपूर्ण महाराष्ट्र राज्यात विकले जाते. महाराष्ट्रातून इतर राज्यात दूध का जाऊ शकत नाही याबाबत आपण विचार केला पाहिजे. केवळ टीका करुन उपयोग नाही. आपण त्यांचे अनुकण करण्याचा प्रयत्न करावा तरच राज्य चांगल्या प्रकारे चालू शकेल. पश्चिम महाराष्ट्राबरोबरच इतर जिल्ह्यात दुधाचा व्यवसाय कसा वाढेल आणि दुधाला चांगला भाव कसा मिळेल यासाठी शासनाने प्रयत्न करावा, अशी विनंती करुन मी वेळेअभावी माझे दोन शब्द संपवितो.

--------

असुधारित प्रत

**तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) :** मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सत्ताधारी पक्षातर्फे सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण बोलणार आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे गैरहजर आहेत. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सर्वश्री सदाभाऊ खोत, महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे गैरहजर आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य ॲड.निलय नाईक व श्री.रमेशदादा पाटील हे दोनच सदस्य नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलतील. आता सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी नियम २६० अन्वये प्रस्तावावर आपले विचार मांडावेत.

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आपण मला नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी तालुका क्रीडा संकुलाबाबत मुद्दा मांडला. माझ्याकडे तालुका क्रीडा संकुलाविषयी माहिती आहे. माननीय क्रीडा व युवक कल्याण मंत्री श्री.सुनील केदार साहेबांनी या संदर्भात आढावा घेतला पाहिजे. महाराष्ट्रात एकूण किती तालुका क्रीडा संकुल पूर्ण झाले, किती क्रीडा संकुल सुरु आहेत याबाबत माहिती घेतली पाहिजे. माझ्याकडे गंगापूर व खुलताबाद येथील क्रीडा संकुलाची माहिती आहे. सन २०१४ मध्ये गंगापूर येथे क्रीडा संकुल मंजूर झाले. सव्वा कोटी रुपयांची वर्क ऑर्डर देण्यात आली. परंतु अद्याप ते काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे त्या क्रीडा संकुलाचा कोणताही उपयोग होत नाही. संबंधित कॉन्ट्रॅक्टरला एक कोटी रुपयांचे देयक अदा केलेले आहे. आम्ही त्या कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याची बाब वारंवार शासनाच्या निदर्शनास आणून दिली. परंतु शासनाने या संदर्भात कोणतीही ॲक्शन घेतली नाही. मग क्रीडा विभागाचे नियंत्रण आहे किंवा नाही ? केवळ पैसे देणे एवढेच क्रीडा विभागाचे काम आहे काय ? आपण या संदर्भात आढावा घ्यावा, अशी माझी विनंती आहे. तसेच, खुलताबाद येथे सन २००१ पूर्वी क्रीडा संकुल झाल्याचे सांगितले जाते. परंतु तेथे क्रीडा संकुलाची एक विटही नाही. माननीय महसूल राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार साहेब नेहमी खुलताबाद येथे जातात.

श्री.सतीश चव्हाण.........

असुधारित प्रत

तेथे जागेचा वाद आहे. शासनाची जिल्हा परिषदेची जागा क्रीडा विभागाला वर्ग करण्यासाठी २०-२० वर्षे लागतात काय ? आपण या संदर्भात चौकशी करावी. मी यापूर्वी सुद्धा सांगितले होते की, कन्नड सारख्या ठिकाणी विटी दांडू सुद्धा नाही. मग प्रशिक्षक तर खूपच लांबची गोष्ट आहे. आपण या संदर्भात सखोल चौकशी करावी. मी आपल्याला दोन उदाहरणे दिलेली आहेत. महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी अशा गोष्टी असतील. सिल्लोड येथे काय परिस्थिती आहे याची मला माहिती नाही. माननीय महसूल राज्यमंत्र्यांचे काम चांगले आहे.

सभापती महोदय, श्री.राजवर्धन हंगर्डेकर नावाच्या क्रीडापटूला चेन्नई संघाने आयपीएल खेळण्यासाठी दीड कोटी रुपये देऊन विकत घेतले. त्याच्या वयाचा वाद होता. मागील दोन महिन्यात क्रीडा संचालकांनी दोन-तीन चुकीच्या गोष्टी केल्याचे मला आढळून आलेले आहे. त्यांनी श्री.राजवर्धन हंगर्डेकर यांना तुझे वय जास्त आहे अशी नोटीस पाठविली. शासनाने याबाबत चौकशी केली असता क्रीडा संचालकांचे म्हणणे चुकीचे आढळून आले. श्री.हंगर्डेकर यांनी जे वय नोंदविले ते बरोबर होते. त्यामुळे या संदर्भात कारवाई झाली पाहिजे. यामुळे श्री.हंगर्डेकर यांची कारकीर्दच धोक्यात आली होती. "तब्बल ८६ लाख रुपयांचा गंडा घालणाऱ्या संस्थेला क्रीडा विभागरने दिले मैदान" अशी बातमी वर्तमानपत्रात छापून आलेली आहे. आगरा येथे स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया यांनी यजमान महाराष्ट्र क्रीडा विभागाची ८६ लाख रुपयांची फसवणूक केली अशी बातमी आहे. माझ्याकडे या संदर्भात जी माहिती आहे ती मी आपल्याकडे देतो. आपणही या संदर्भात माहिती घ्यावी. त्यांनी खेळाडुंकडून पैसे जमा केले. परंतु खेळाचे आयोजनच केले नाही. आपण आगरा येथील संस्थेला बालेवाडी येथील क्रीडा संकुल सरावासाठी उपलब्ध करुन दिलेले आहे. माझ्याकडे या संदर्भात माहिती आहे. मी ती माहिती आपल्याकडे देतो. आपण या संदर्भात चौकशी करावी. क्रीडा संचालक काय करतात याची आपल्याला माहिती असली पाहिजे. माननीय क्रीडा मंत्री महोदयांना जी माहिती दिली त्याबाबत त्यांनी ताबडतोब

श्री.सतीश चव्हाण........

असुधारित प्रत

ॲक्शन घेतली असा माझा आजवरचा अनुभव आहे. मी आपल्याला दोन-तीन उदाहरणे दिलेली आहे. संपूर्ण राज्यात अशा गोष्टी असतील. क्रीडा विभाग महाराष्ट्राची शान आहे. आपण जबाबदारीने याकडे लक्ष द्यावे, अशी विनंती करुन मी वेळेअभावी माझे दोन शब्द संपवितो.

----------

असुधारित प्रत

ॲड.निलय नाईक (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी काल नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलताना काही गोष्टींचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, केंद्र शासनाने एसडीआरएफमधून ३२२२ कोटी रुपये, एनडीआरएफमधून ४२० कोटी रुपये, केंद्र सहाय्यक अनुदानातून ५२८३३ कोटी रुपये, केंद्रीय करातील हिस्सा ३६४९८ कोटी रुपये, जीएसटी नुकसान भरपाईचा परतावा १७४२३ कोटी रुपये असे एकूण १ लाख १० हजार ३९६ कोटी रुपये दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत राज्य शासनाला दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या अशा अनेक योजनांच्या माध्यमातून राज्याला निधी मिळालेला आहे. केंद्र शासनाने भेदभाव न करता निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. काही ठिकाणी निधी कमी जास्त प्रमाणात मिळाला असेल. (...अडथळा...) मी माननीय महसूल राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार साहेबांचे अभिनंदन करतो. बंजारा समाजाच्या तांड्याला विशेष निधी व विशेष दर्जा देण्याबाबत सकारात्मक विचार केलेला आहे त्यामुळे मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शासनाने स्ट्रीट लाईट संदर्भात जो निर्णय घेतलेला आहे त्याचा पुनर्विचार केला पाहिजे. स्ट्रीट लाईटचे पूर्वीचे बिल थकीत असेल तर नव्याने निवडून आलेल्या सरपंच यांचा त्यामध्ये काय दोष आहे ? यामुळे सरपंच यांच्यावर अन्याय होईल असे मला वाटते. सरपंच यांच्यावर अन्याय होऊ नये. शासनाने ती रक्कम भरुन विजेचे बिल नियमित करावे. त्यानंतर शासनाने अध्यादेश काढावा, अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्यांनी अनेक गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. ज्या चांगल्या गोष्टी झालेल्या आहेत त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी यांनी काही गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. शासनाने पिण्याच्या पाण्याच्या योजनेबाबत तातडीने निर्णय घेतला पाहिजे. एप्रिल, मे महिन्यात पिण्याच्या पाण्याच्या योजनेला मंजुरी दिली तर त्याचा उपयोग होणार

ॲड.निलय नाईक.........

असुधारित प्रत

नाही. वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आम्ही काही मागण्या केलेल्या आहेत. आपण पिण्याच्या पाण्याच्या योजनांबाबत विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पोलिसांसाठी तालुका स्तरावर निवारा उपलब्ध करुन दिला पाहिजे, अशी माझी विनंती आहे. मी माननीय पशुसंवर्धन मंत्री श्री.सुनील केदार साहेबांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी पशुसंवर्धन विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आढावा घेण्यास सुरुवात केली. आपण गायीच्या बाबतीत नवीन योजना लागू केलेली आहे. प्रत्येक तालुक्यात किती गायी आहेत याचा आढावा घेतला पाहिजे. मघाशी गुजरात राज्यातील दूध महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर येते असे सांगण्यात आले. पूर्वी प्रत्येक घरात एक-दोन गायी असत. परंतु आता ती स्थिती राहिलेली नाही, ती स्थिती पुन्हा निर्माण व्हावी यासाठी आपण जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठक घेतली पाहिजे. माननीय पशुसंवर्धन मंत्री विदर्भाचे प्रतिनिधी आहेत. विदर्भातील पुसद येथे पश्चिम महाराष्ट्र, नगर येथून दूध येते. एका बाजूला ही गोष्टी अभिमानास्पद आहे. परंतु दुसऱ्या बाजूला या संदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.सांगळे.....

असुधारित प्रत

ॲड. निलय नाईक....

आपण क्रीडा मंत्री म्हणून सातत्याने आढावा घेतात. परंतु काही ठिकाणी अतिशय वाईट परिस्थिती आहे. क्रीडा अधिकारी क्रीडा संबंधी असलेल्या चांगल्या योजना शेवटपर्यंत पोहोचवत नाहीत हे मला दुर्दैवाने सांगावे लागत आहे. यामुळे आपण क्रीडा अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन चर्चा केली पाहिजे अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये एस.सी. तसेच एस.टी. संवर्गाकरिता विहिरींचे नियोजन केले जाते. परंतु व्हीजेएनटीमधील लोकांना विहिरी मिळत नाहीत. विदर्भ तसेच मराठवाडयातील भागामध्ये कोरडवाहू शेतकरी आहेत. त्यांच्याकडे २ ते ८ एकरपर्यंत कोरडवाहू शेती असते. परंतु त्यांच्याकडे पाण्याची कोणतीही सोय नसते. अशा परिस्थितीत त्यांना शासनाकडून विहिरी मिळू शकत नाहीत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, शासनाने व्हीजेएनटीमधील लोकांना विहिरी उपलब्ध करुन देण्यासाठी शेतकऱ्यांच्या हितासाठी बजेटमध्ये वेगळा निर्णय घ्यावा. मी माननीय महसूल राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांना सांगू इच्छितो की, आपण काल महसूल मंत्री यांच्यासमवेत चर्चा केली होती. काल सदनात विधेयकासंबंधी चर्चा झाली होती. त्यात एनए करण्यासंबंधी उल्लेख करण्यात आला होता. विहिरी किंवा रस्त्यांकरिता १ ते २ गुंठे जागा मागायची असल्यास त्याकरिता संपूर्णपणे ५ ते १० एकर क्षेत्राचे एनए करणार आहात का ? ही बाब विचारात घेता ग्रामीण भागामध्ये रस्ता किंवा विहिरीकरिता तुकडे पाडण्यासंबंधी शासनाने वेगळा अध्यादेश काढणे आवश्यक आहे. तसेच यासंबंधी जिल्हाधिकारी तसेच एसडीओ यांना तसे निदेश देणे आवश्यक आहे. एनएच्या बाबतीत काल २-३ सन्माननीय सदस्यांनी विषय उपस्थित केला होता. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण या संदर्भात निश्चितपणे विचार करावा.

सभापती महोदय, आपण मला माझे विचार व्यक्त करण्यासाठी वेळ दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो व याच ठिकाणी माझे मनोगत पूर्ण करतो.

-----------

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण मला या प्रस्तावावर माझे म्हणणे मांडण्यासाठी संधी दिली मी त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. राज्यातील रस्त्यांची दुरावस्था व त्यांच्या दर्जासंबंधी हा प्रस्ताव आहे. ग्रामसडक योजनेतून येत्या २ वर्षांमध्ये ग्रामीण भागांमध्ये १० हजार कि.मी. लांबीचे रस्ते तसेच पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून ६५०० कि.मी. लांबीचे रस्ते बांधण्याची शासनाची योजना आहे. याकरिता शासनाने ७५०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आमचे मित्र असलेल्या विरोधी पक्षामधील काही सन्माननीय सदस्यांनी काल यासंबंधी असा उल्लेख केला होता की, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना ही राज्य शासनाची अत्यंत चांगली योजना आहे. माननीय ग्रामविकास मंत्री श्री.हसन मुश्रीफ यासंबंधी चांगले काम करीत आहेत. दुसऱ्या बाजूला त्यांनी असा उल्लेख केला की, शासनाकडे निधी नसल्यामुळे रस्त्यांची कामे झालेली नाहीत. बीड जिल्हयातील रस्त्यांसंबंधी मी २ दिवसांपूर्वी सदनामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मागील ५ वर्षांमध्ये कामे मंजूर झाली असताना सदरहू कामे अद्यापपर्यंत पूर्ण झाली नाहीत. तसेच पूर्ण झालेल्या कामांचा दर्जा देखील चांगला नाही. अशा प्रकारे मागील काळात रस्त्यांची कामे चांगली झालेली नसताना आता सत्तेवर असलेल्या महाविकास आघाडी शासनाला नावं ठेवण्याचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, शासनाने वाईनसंबंधी निर्णय घेतला. विरोधक याबाबत वेळोवेळी टीकाटिप्पणी करीत आहेत. मराठवाडयातील अनेक भागांमध्ये अनेक शेतकरी वाईनरीची शेती करतात. त्यामुळे त्यांच्या शेतावर आपण नांगर फिरवायचा का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पांदन रस्ते योजनेसंबंधी मी महाविकास आघाडीला मनापासून धन्यवाद देतो. रोजगार हमी योजनेतून शासनाने सदर कामांसाठी १७५४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ग्रामीण भागातील

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड ....

शेतकऱ्यांसाठी सदर योजना ही रक्तवाहिनी असल्याचे माझे स्पष्ट मत आहे. ग्रामीण भागांमधील पांदण रस्त्यांची अतिशय दुरावस्था झालेली आहे. दरवर्षी पाऊस पडल्यानंतर पांदण रस्त्यांवरुन शेतकऱ्यांमध्ये वादविवाद व भांडणे होत असतात. त्यामुळे महाविकास आघाडी शासनाने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पांदण रस्त्यांसंबंधी अतिशय चांगली योजना जाहीर केलेली आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत शासनाने अनेक पांदण रस्त्यांच्या कामांसाठी मंजुरी दिलेल्या आहेत. ज्या ठिकाणी ३३ फुटांच्या साखळया आहेत तेथे पांदण रस्त्यांची कामे अतिशय चांगल्या प्रकारे होतील व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे या माध्यमातून प्रश्न सुटू शकतील.

सभापती महोदय, काल ऊर्जा खात्यासंबंधी तत्कालीन ऊर्जा मंत्री यांनी सदनामध्ये अशी माहिती दिली की, ऊर्जा खात्यामुळे मंत्री महोदयांना फिरणे मुश्कील झाले आहे. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी काल सदनामध्ये असा उल्लेख केला होता की, ऊर्जा खात्याकडे जवळपास ४२ हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. सभापती महोदय, मी या संदर्भात सदनाला सांगू इच्छितो की, मार्च, २०१४ मध्ये १४,१५४ कोटी रुपयांची असलेली थकबाकी ही मार्च, २०२० मध्ये ५४,७८४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. याचाच अर्थ भारतीय जनता पक्षाच्या काळात दरवर्षी ७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त थकबाकी राहिल्यामुळे त्याचा भार महावितरण कंपनीवर पडला आहे. अशा प्रकारे ५ वर्षांमध्ये ३७ हजार कोटी रुपयांची थकबाकी वाढली आहे. अशा परिस्थितीत महाविकास आघाडीचे शासन चांगले काम करीत असून शासनाने २ वर्षांमध्ये राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना ३ लाख ५१ वीज जोडण्या दिलेल्या आहेत. याउलट भाजपाच्या काळात ५ वर्षांमध्ये ५ लाख ३६ हजार वीज जोडण्या देण्यात आल्या होत्या. शासनाने यावर्षी २ लाख ४० हजार प्रलंबित असलेल्या वीज जोडण्यांपैकी ६० हजार शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज जोडण्या देण्यासंबंधी आश्वासन दिलेले आहे.

श्री.संजय दौंड ...

सभापती महोदय, करोना काळात मयत झालेल्या कुटुंबांना कोणती मदत करण्यात आली ? असा प्रश्न काल उपस्थित करण्यात आला होता. मी सदनाला सांगू इच्छितो की, करोना काळात ज्यांचे आई-वडील मयत झाले अशा मुला-मुलींना शासनाकडून ५ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. करोना काळात मयत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना शासनाकडून प्रत्येकी ५० लक्ष रुपयांची मदत करण्यात आली. तसेच मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. राज्यामध्ये एक लाखापेक्षा जास्त मयत झालेल्या नातेवाईकांच्या नावावर शासनाने ५०५ कोटी रुपयांची रक्कम बँकांमध्ये जमा केली आहे.

सभापती महोदय, महाविकास आघाडी शासनाची राज्यात बळीराजा एक्सप्रेस सुरु आहे. नियमित कर्ज फेडणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्येकी ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याचे काम शासनाने केलेले आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शासनाने यावर्षी ४३,९०० विहिरी करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शेततळयांसाठी ७५ टक्के अनुदान त्याचप्रमाणे भूविकास बँकेच्या ३४,७८८ शेतकऱ्यांना सरासरी ९६५ कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, मराठवाडा वॉटर ग्रीड योजना रद्द करण्यात आल्यासंबंधी काल सदनामध्ये वक्तव्य करण्यात आले. मी सदनाला सांगू इच्छितो की, या संदर्भात मराठवाडा भागामधील लोकांची दिशाभूल करुन सदर वक्तव्य करण्यात आले आहे. मागील ५ वर्षांच्या काळात तुमच्या पक्षाचे शासन सत्तेवर असताना तुम्ही या संदर्भात कोणती कार्यवाही केली ? बीड जिल्हयामध्ये मागील ५ वर्षांच्या काळात जलसंधारण खात्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला. त्यात जवळपास २५ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले व अनेक अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली.

अग्रिम प्रत

श्री.संजय दौंड ...

सभापती महोदय, पशुसंवर्धन खात्याचे मंत्री महोदय सदनामध्ये उपस्थित आहेत. मला त्या संदर्भात काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करायचे आहेत. मंत्री महोदयांनी स्वत: शेतकरी असल्याचे सांगितले होते. त्याप्रमाणे मी देखील शेतकरी असून माझ्याकडे देखील ६० जनावरे आहेत. सध्या जर्सी गायीच्या दुधाला प्रती लिटर २५ रुपयांचा दर मिळतो. परंतु तेच दूध मार्केटमधून घेतल्यास त्याकरिता ४० रुपये लिटर प्रमाणे दर द्यावा लागतो. तसेच म्हशीच्या दुधाला डेअरीमध्ये प्रती लिटर ४० रुपयांचा दर मिळतो. परंतु तेच दूध मार्केटमधून घेतल्यास त्याकरिता ६० रुपये लिटर प्रमाणे दर द्यावा लागतो. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, राज्यातील पशुधनाकरिता पशुधन योजनेअंतर्गत पशुपालकांना विमा कवच देण्याकरिता पशुधन योजना सुरु करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच प्रत्येक दवाखान्यामध्ये सेक्स सॉर्टेड सीमेन डोसेस उपलब्ध करुन देणे, कृत्रिम रेतन निशुल्क करणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रत्येक पशुपालकाकडून ४१ रुपये घेतले जातात.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड .....

हे निशुल्क करण्याचा विषय शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. मराठवाडयात लाल कंधारी, देवणी तसेच पश्चिम महाराष्ट्रात खिल्लार या बैलाच्या जाती आहेत. या जातींच्या पशुधनाच्या संवर्धनासाठी वळूमाता प्रक्षेत्र निर्माण करण्यासाठी साकोड येथे मागील सरकारच्या काळात जागा आरक्षित केलेली आहे पण हे करणे अतयंत गरजेचे आहे असे मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, राज्यातील मराठवाडा, विदर्भ, कोकण, उत्तर पश्चिम महाराष्ट्र, मुंबई या सर्व भागातील ज्या गरींबांना पोटभर अन्न मिळत नाही, ज्याला शिक्षण मिळत नाही, राहण्यास घर नाही, नोकरी नाही, मालमत्ता नाही, कोरोना महामारीमध्ये आई-वडीलांचा आधार राहिला नाही अशा सर्वांसाठी तसेच राज्यातील शेतकरी, शेतमजूर, शासकीय नोकरदार या सर्व घटकांना दिलासा देणारे व त्यांची काळजी घेणारे हे सरकार आहे हे या निमित्ताने येथे सांगू इच्छितो व थांबतो.

------

असुधारित प्रत

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांचे दोन वेळा नाव पुकारले होते. तेव्हा ते सभागृहात गैरहजर होते. त्यांना बोलू द्यावे अशी आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून सूचना आलेली आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत हे बाहेर आंदोलनात होते. या प्रस्तावावर ते ऑनलेग होते, त्यांना भाषण कंटीन्यू करण्याची परवानगी देण्यात यावी ही विनंती.

**तालिका सभापती** : ठीक आहे, मी त्यांना चार मिनिटे बोलण्याची परवानगी देत आहे.

-----

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम २६० अन्वये बोलत असताना माननीय क्रीडा मंत्री यांना मी सूचना करु इच्छितो. आपण चांगल्या प्रकारे व सकारात्मक पध्दतीने काम करीत आहात. क्रीडा क्षेत्रात प्राथमिक शिक्षणापासून क्रीडा प्रशिक्षण राज्यातील विद्यार्थ्यांना द्यावे लागेल तरच चांगले खेळाडू या राज्यात तयार होऊ शकतील. अनेक पारंपारीक खेळ या राज्यात व ग्रामीण भागात आहेत. लांबउडी, उंचउडी, भालाफेक, तलवारबाजी, गोळाफेक, हॉकी, आर्चरी, टेनीस, फुटबॉल इत्यादी खेळाच्या सुविधा तालुका व जिल्हास्तरावर आहेत. ग्रामीण भागातील मुले शाळा शिकत असताना तालुका व जिल्हयाच्या गावी जाऊ शकत नाहीत. मी महत्वाची सूचना करतो की, या राज्यात आपण स्पोर्ट स्कूलकरीता परवानगी द्यावी. हा ऐतिहासिक निर्णय होईल. जेथे शाळा सुरु आहेत, ज्यांच्याकडे ५-१० एकर जमीन आहे, ज्यांच्याकडे क्रीडांगणाची सुविधा उपलब्ध ओह अशा शाळांना स्पोर्ट स्कूल म्हणून क्रीडा खात्याकडून मान्यता देण्यात यावी. हरियानामध्ये अशा प्रकारच्या मान्यता दिलेल्या आहेत. या स्पोर्ट स्कूलला आपण सर्व योजना लागू कराव्यात. आमदार निधीतून क्रीडा साहित्याला किमान २५ लाख रुपये देण्यास शासनाने मान्यता द्यावी. कारण क्रीडा साहित्याला मोठा खर्च येत असतो. आर्चरीचा धनुष्यबाण घ्यायचा असेल तर अडीच-तीन लाख रुपये लागतात. रायफल शुटींगची एक रायफल घेण्यास तीन लाख रुपये लागतात. अशा प्रकारे शाळेतून ग्रामीण भागात क्रीडा शिक्षणाला प्रोत्साहन दिले तर इतर देशांना आपण मागे टाकू. आपले विद्यार्थी जगात चमकतील याकरीता आपण निर्णय करावा अशी माझी अपेक्षा आहे. पुण्यातील बालेवाडी येथे क्रीडा विद्यापीठांची घोषणा आपण केलेली आहे. तेथे कोणते कोर्सेस शिकविले जाणार आहे, त्याचा तेथील विद्यार्थ्यांना कसा फायदा होणार आहे हे सांगावे. खेळाडूंना भविष्यात कोणत्या संधी मिळणार आहेत, ते नॅशनल स्पोर्टशी संलग्न असणार का याबाबत आपण भविष्यात निर्णय घ्यावा. मला माहिती आहे की, आपल्याकडे कमी बजेट आहे. ४००-५०० कोटी बजेट आहे. मला वाटते की, ५ ते १० हजार कोटी बजेट आपणाकडे असणे गरजेचे आहे. तर आपण राज्यात चांगले खेळाडू निर्माण करु शकू. त्याकरीता आपण निश्चित प्रयत्न करावा.

श्री.सदाभाऊ खोत .....

सभापती महोदय, नियम २६० अन्वये प्रस्तावामध्ये मला कोठे शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार दिसला नाही. ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, प्रधानमंत्री घरकुल आवास योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, सौभाग्य योजना या सर्व योजना माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या आहेत. रस्त्यांचे जाळे केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांनी येथे उभे केलेले आहे. तुम्ही डोंगरमाथा, धनगरवाडयांना रस्ते करावेत. डोंगरमाथ्यावर अनेक गावे आहेत, तेथे जायला रस्ते नाहीत. सातारा जिल्हयात विद्यार्थी होडीतून शाळेत जात आहेत. सातारा जिल्हयातील कांदाटी खोऱ्यातील झोरे कुटूंब होडीतून लेकरांना शाळेत पाठवत आहेत. मला वाटते की, दऱ्याखोऱ्यातून लोकांसाठी रस्त्याची योजना शासनाने करावी. राधानगरी तालुक्यातील मार्सूली या परिसरात १०-१२ धनगरवाडया आहेत. पण तेथे वीज व पाणी नाही. बाळंतीण बाईला डोलीत घालून खाली आणावे लागते, हीच परिस्थती शाहूवाडी, पाटणमध्ये आहे. अशा डोंगराळ भागातील रस्त्यांकडे आपण लक्ष द्यावे व ते काम सरकारने करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो, धन्यवाद.

---------

असुधारित

श्री.अनिकेत तटकरे (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्था.प्रा.सं.) : सभापती महोदय, नियम २६० अन्वये प्रस्तावावर मी बोलण्यास उभा आहे. ग्रामविकास विभागाने प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन अन्वये १० हजार किलोमीटर रस्ते ग्रामीण भागात उपलब्ध करुन देत आहेत याबद्दल मी जरुर अभिनंदन करतो. मात्र मंत्री महोदयांना विनंती करतो की, आधीच्या टप्पा १ मध्ये अपूर्ण राहिलेली मुख्यमंत्री ग्रामसडक योजना किंवा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत ठेकेदार नेमले आहेत, मात्र कोकणातील अनेक रस्त्यावर दोन तीन वर्षापासून डांबर किंवा खडी पडलेली नाही त्यामुळे याकडे आपण लक्ष द्यावे अशी विनंती करतो. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा निधी व आपला हिस्सा आपण उपलब्ध करुन देत आहोत. मात्र केंद्र सरकारचा हिस्सा व निधी दुर्दैवीरित्या येत नाही. प्रत्येक खासदाराला १५० किलोमीटरचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये सुचविण्याचे सांगितले आहे. मात्र केंद्र सरकारकडे याचे अनेक प्रस्ताव गेलेले असतानासुध्दा ते का मंजूर होत नाही याची वाच्यता होणे गरजेचे आहे. योजना जाहीर करुन आश्वासन देतो मात्र त्याची पूर्तता होताना दिसत नाही याची खंत दुर्दैवीरित्या व्यक्त करावी वाटते. दुसरी एक योजना महिला सक्षमीकरणाकरीता आपण आणत आहोत. महिला सुरक्षेकरीता धोरणाचा राज्य शासन अवलंब करीत आहे, मुलींच्या संरक्षणासाठी, शारीरीक विकासासाठी निधी उपलब्ध करुन देत आहोत. त्याचबरोबर त्यांना कशा पध्दतीने समाजात अंतर्भूत करता येईल, शिक्षणासाठी कसे प्रवृत्त करता येईल. यासाठी खरे तर योजना आणल्या पाहिजेत. ग्रामीण भागातील मुली शाळेपासून लांब राहतात, त्यांना सायकली किंवा अन्य साधनांनी कशा प्रकारे शाळेपर्यंत पोहचविता येईल यासाठी प्रयत्न शासनाने करावेत. अंगणवाडी साहित्यासाठी ५० हजार निधी देण्याची योजना आपण आणली आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीसांचे मानधन वाढविण्यासाठी मागणी केली जात आहे, सध्या त्या अल्प मानधनावर कार्यरत आहेत. कोविड काळात सर्वच कामे अंगणवाडी सेविका करीत आहेत. लोकसंख्या जनगणना करायची असली तरी त्यांच्यावर कामाचा लोड येतो. मुलांना शिकविण्याबरोबर शासनाच्या योजनाही त्यांच्यामार्फत राबविल्या जातात. त्यामुळे त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा शासनाने विचार करावा अशी

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे.....

विनंती करतो. जलजीवन मिशन अंतर्गत ७ लक्ष ३६ हजार नळजोडण्या करण्याचे लक्ष ठेवले आहे. प्रत्येक घराला नळाने जोडण्याची शासनाची योजना आहे, सर्वात जास्त व अतिवृष्टी कोकणात होते. पावसाचे पाणी थेट अरबी समुद्राला मिळते. या पाण्याचा किती वापर होतो. कोकणात होळीच्या निमित्ताने लोक आलेले आहेत, त्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, त्यामुळे चाकरमान्यांची वणवण थांबविण्यासाठी जलजीवन मिशनचे कार्यक्रम नियोजनबध्द काळात पूर्ण करणे गरजेचे राहील. कोकणाचा भौगोलिक विचार केला तर पाण्याचे स्त्रोत दूरवर असतात.

यानंतर श्रीमती नाफडे

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे.......

सभापती महोदय, क्रीडा खात्या संदर्भात मला काही मुद्दे मांडावयाचे आहेत. माननीय क्रीडा खात्याचे मंत्री देखील सभागृहात उपस्थित आहेत. शासनाने क्रीडा खात्याकरिता भरीव निधी दिलेला आहे, त्याबद्दल मी शासनाचा आभारी आहे. तालुका क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल, विभागीय क्रीडा संकुल याकरिता देखील शासनाने निधी वाढवून दिलेला आहे. मात्र अपूर्ण राहिलेले जी क्रीडा संकुले आहेत, ती लवकरात लवकर पूर्ण होतील, याकरिता प्रयत्न करण्यात यावेत, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय,बऱ्याच वेळा एका ठिकाणी दोन-तीन असोसिएशन्स आपल्याला पाहायला मिळतात. ते असोसिएशन्स अनरेकग्नाईज्ड असतात, त्यातून जर कोणते खेळाडू कोणत्या खेळाकरिता गेले असता, बऱ्याच वेळा ते खेळाडू शासनाच्या योजनेपासून वंचित राहतात. अशा वेळी शासनाने त्यामध्ये मध्यस्थी करावी. ज्या ज्या ठिकाणी दोन-तीन असोसिएशन्स असतील, त्यांनी एकत्र अर्ज केला तर कोणत्याही खेळाडूंवर अन्याय होणार नाही, याकरिता शासनाने प्रयत्न करावा. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी चांगला मुद्दा मांडलेला आहे, तो म्हणजे शाळांना क्रीडा साहित्य थेटपणाने पोहोचविले तर त्याचा निश्चितपणे फायदा विद्यार्थ्यांना निश्चितपणे होईल. याकरिता खेळाचा दर्जा शालेय जीवनापासून वाढविण्यामध्ये शासन यशस्वी झाले तर बरे होईल. जिल्हापरिषदेच्या शाळा असो किंवा शासकीय शाळांना हे साहित्य थेटपणाने देण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी मी विनंती करतो. आज मला या प्रस्तावावर माझे विचार मांडण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो.

---------------------

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या वतीने नियम २६० अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, खरे तर हा प्रस्ताव जो सत्ताधारी पक्षाने सभागृहात मांडलेला आहे, त्याप्रमाणे राज्यात अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. केंद्र शासनाच्या अनेक योजना या प्रस्तावामध्ये उल्लेखिलेल्या दिसून येत आहे. याचा अर्थ असा होतो की, केंद्र शासनाचे किती मोठे काम आहे, याला एका दृष्टीने राज्यातील सत्ता पक्षाने संमती दिल्यासारखे आहे, याकरिता मी सत्ता पक्षाचे अभिनंदन करत आहे.

सभापती महोदय, ग्रामीण विकास खात्यामार्फत मुख्यमंत्री सडक योजना व इतर विषयावर सभागृहात चर्चा झालेली आहे. मागील अधिवेशनातही ज्या वाडया-वस्त्या, आदिवासी पाडे, धनगरवाडयांपर्यंत रस्ते गेलेले नाहीत. यांच्यासाठी रस्त्यांची फार मोठी अडचण आहे. आम्ही मागणी केली होती की, याकरिता एक वेगळे मंडळ करुन या सर्व पायाभूत सुविधा तेथे कशा निर्माण करता येतील, याचा विचार करावा. माननीय महसूल मंत्री यांनी यावर उत्तरही दिले होते की, याबाबत विचार करु. माझी हात जोडून विनंती आहे की, या आदिवासी पाडयांमध्ये, तांडयांमध्ये रस्त्यांच्या खूप अडचणी आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी देखील याबाबत विषय मांडला होता. बाळंतपणाकरिता एका महिलेला चार जणांना झोळी करुन आणावे लागले होते, अशी परिस्थती कोकण आणि कोल्हापूरच्या धनगरवाडयांमध्ये आहे, त्यांच्याकरिता शासनाने काहीतरी ठोस निर्णय करावा. यांच्याकरिता ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येची अट आहे, ती अट काढून सरकारने विशेष बाब म्हणून या भागात रस्त्यांकरिता शासनाने तातडीने लक्ष घालावे. शासनाला जर येथे रस्ते बांधणे जमत नसेल तर "नाम फाऊंडेशन" समवेत याबाबत माझी बोलणी झालेली आहे. ते याकरिता २२ पोर्कलेन देण्याकरिता तयार आहेत. याकरिता लागणाऱ्या तेलाचा खर्च शासनाने उचलावा. "नाम फाऊंडेशन" आणि सरकार यांच्या माध्यमातून कोकणातील सर्व धनगरवाडे, आदिवासी पाडे, लमाण, तांडे, यामधील रस्ते करुन घ्यावे, अशी मी मागणी करत आहे.

श्री.गोपिचंद पडळकर......

कारण आमच्या तालुक्यातील ज्या गावांना पाणी सरकारच्या माध्यमातून देता येत नव्हते, अशा १८ गावांना कॅनॉल काढून "नाम फाऊंडेशन"चे पोर्कलेन वापरुन लोकवर्गणीतून तेल भरुन जवळपास १८ कि.मी.चा कॅनॉल आम्ही काढलेला आहे. यामुळे जवळपास २० गावांना शेतीचे पाणी दिलेले आहे. शासनाने रस्त्यांच्या बाबत देखील या पध्दतीचे नियोजन करावे.

सभापती महोदय, क्रीडा विषयाच्या बाबत मी बरीच चर्चा ऐकलेली आहे. आपले क्रीडा मंत्री महोदय सकारात्मक काम करीत आहे. तालुक्या-तालुक्यामध्ये क्रीडा संकुल आहेत. काही काही क्रीडा संकुलांकडे फंड आहे. परंतु तो फंडच खर्ची होत नाही. मी ज्या आटपाडी तालुक्यात राहतो, त्या तालुक्यामध्ये २०१२ मध्ये एक कोटी रुपये सरकारने दिले होते. सन २०१२ मध्ये ०१ कोटी रुपये दिल्यानंतर त्यापैकी २८ लाख रुपये खर्च झालेले आहेत. यापैकी ७२ लाख रुपये शिल्लक आहेत. याचे व्याज ३८ लाख रुपये इतके झालेले आहे. १.१० कोटी रुपये खात्यावर असून तेथे एक रुपयाचे काम झालेले नाही. शासनाचा याबाबतचा नियम काय म्हणत आहे की, एका विधानसभा मतदारसंघामध्ये जर दोन आमदार असतील तर म्हणजे एक विधानसभेचा आणि एक विधानपरिषदेचा याप्रमाणे असेल आणि दोन तालुके असतील तर एका तालुक्यावर विधानसभा सदस्यांना अध्यक्षपदी नेमावे आणि दुसऱ्या तालुक्याला विधानपरिषदेच्या सदस्याला अध्यक्ष पद द्यावे. मी याबाबत क्रीडा अधिकाऱ्यांना पत्र लिहिले. क्रीडा अधिकाऱ्यांनी जे पत्रक काढलेले आहे, त्याबाबत मला त्यांची कीव येत आहे. त्यांनी त्या पत्रकामध्ये असे नमूद केलेले आहे की, मी त्या आमदारांची सहमती घ्यायला गेलो. अरे काय दस्त काढायचा आहे का जमिनीचा! सरकारचा जो कायदा आहे, त्याप्रमाणे तुम्ही चाला ना! मी त्या आमदारांकडे गेलो, त्या आमदाराने फाईल फेकून दिली. काय घरचं आहे का तुमच्या! परत पालक मंत्रीमहोदयांनी काय सूचना केल्या, "अमुक अमुक आमदाराला तेथेही नियुक्त करा", अरे! ही लोकशाही आहे. हा कायदा काय पालकमंत्री महोदयांच्या घरात लिहिला नाही.

श्री.गोपिचंद पडळकर.....

सभापती महोदय, मी क्रीडा मंत्री महोदयांकडे विनंती करतो की, आम्ही सर्व विधानपरिषदेचे सदस्य आहोत. जर एखाद्या मतदारसंघामध्ये दोन तालुके असतील तर त्यांची तेथे नियुक्ती केली पाहिजे. असे पैसे जर पेण्डिंग पडत असतील तर ते आपल्याकरिता हिताचे नाही.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, सांगली जिल्हयामध्ये जे खेळाडू खूप चांगल्या पध्दतीने वेगवेगळया क्षेत्रात आले, त्यापैकी आमचे हिंदकेसरी मारुती माने ज्यांनी कुस्तीमध्ये खूप मोठे नाव कमाविले. आमचे माजी आमदार संभाजी अप्पा पवार जे बिजलीमलला होते. ज्यांनी या सभागृहामध्ये चार वेळा नेतृत्त्व केलेले आहे. माननीय वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना ते या सभागृहात पहिल्यांदा आले होते. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, आमच्या जिल्हा क्रीडा संकुलाला पै.संभाजी पवार अप्पा यांचे नाव देण्यात यावे.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, ज्या खेळाडुंना राष्ट्रीय पातळीवर कास्यपदक सुवर्ण पदक मिळालेली आहेत, अशा खेळाडूंची यादी मी मागील वेळी सभागृहाला दिली होती. त्या खेळाडूंना नियुक्ती पत्र द्यायचे राहिलेले आहे. असे खेळाडू जवळपास २७ इतके आहेत. दिव्यांग खेळाडूंच्या यादीतील असे खेळाडू १० इतके आहेत. या खेळाडूंना नियुक्ती पत्र देणे गरजेचे आहे. ते नियुक्ती पत्र त्या खेळाडूंना ताबडतोब शासनाने देणे आवश्यक आहे. तालुक्यातील गावा-गावांमध्ये पूर्वी तालीम होत्या, त्या तालीम आता मोडकळीस आलेल्या आहेत. कुस्ती क्षेत्रात जर परत उर्जितावस्था आणायची असेल तर गावागावातील त्या तालीम दुरुस्त करण्याचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. त्यांना मॅटही दिले गेले पाहिजे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

श्री.रमेशदादा पाटील ( विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी नियम २६० अन्वये जो प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

असुधारित प्रत

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

सभापती महोदय, सन्माननीय श्री.शशिकांत शिंदे साहेबांनी अनुसूचित जमातींचे बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर करुन इतर जातीच्या उमेदवारांनी शासकीय नोकरी मिळविलेली असणे, असे आरोप या चर्चेदरम्यान केलेले आहेत. परंतु अधिसंख्य पदे निर्माण करुन त्यांना नोकरीत कायम करण्याचा निर्णय माननीय श्री.देवेंद्र फडणवीस सरकारने २०१९ मध्ये घेतला होता. जरी सर्वोच्च न्यायालयाचा त्या लोकांना नोकरीवरुन कमी करण्याचा निर्णय असेल तरीही शासनाने हा निर्णय घेतला होता. २५-३० वर्षे झाली ती लोक शासनामध्ये काम करीत आहेत. परंतु त्यांचा विचार माननीय श्री.देवेंद्र फडणवीस सरकारने केला होता. याकरिता त्यांनी अधिसंख्य पदे निर्माण केली होती. अधिसंख्य पदे निर्माण केल्यानंतर त्यांना कायम स्वरुपात ठेवायचे असे ठरले होते. परंतु या सरकारने भुजबळ कमिटी नेमली. भुजबळ कमिटी नेमल्यानंतर जे अनुसूचित जमातीचे लोक आहेत, ज्यांच्याकडे व्हॅलिडिटी नाही, त्यांना नोकरीवरुन काढण्याचा विचार भुजबळ कमिटीने केलेला आहे. त्यांनी परवानच हा अहवाल आदिवासी विभागाला सबमिट केलेला आहे. खरे म्हणजे या समाजावर अन्याय होत आहे. अनुसूचित जमातीच्या समाजावर हा तर अन्याय होत आहे. महादेव कोळी, टोकरी कोळी, मल्हार कोळी, पानकोळी, कातकरी, वारली, भिल्ल, मन्नुनवारु, कोकणा हे सर्व अनुसूचित जमातीचे आदिवासी लोक आहेत. परंतु यांना मुद्दाम टार्गेट करुन अनुसूचित जमातीचे फायदे दिले जात नाहीत.

यानंतर श्री.सोनावणे....

असुधारित प्रत

श्री. रमेशदादा पाटील.....

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये ही सर्व लोक एसटीमधील असल्याबाबतची मान्यता दिलेली आहे. परंतु, महाविकास आघाडीचे सरकार त्यांना मुद्दामून डावलत आहे. माननीय श्री. छगन भुजबळ यांच्या कमिटीने चुकीचा अहवाल माननीय आदिवासी विकास मंत्री महोदयांकडे पाठविलेला आहे. त्याची पुनश्च एकदा पडताळणी करुन घेण्यात यावी, अशी आमची विनंती आहे. शासन त्यांना एकीकडे संरक्षण देते तर दुसरीकडे त्यांना कामावरुन कमी करुन टाकत असल्यामुळे हा कोणता न्याय आहे. एखाद्या समाज बोगस किंवा बनावट आहे असे आक्षेपार्ह विधान करुन त्यांना बेईज्जत केले जाते. ही शासनाची चुकी आहे. माननीय श्री. भुजबळ समितीने ओबीसी समाजावर असा अन्याय केला असता तर आपण गप्प बसला असता काय ? ओबीसीचा डाटा तयार करण्यासाठी कायदे तयार करण्यात आले. मध्यप्रदेशच्या धर्तीवर राज्यात कायदा लागू केलेला आहे. माननीय श्री. छगन भुजबळ साहेब हे ओबीसी समाजाचे नेतृत्व करीत आहेत. त्यांचे आदिवासी कर्मचाऱ्यांकडे, लोकांकडे लक्ष नाही. माननीय श्री. छगन भुजबळ साहेबांना विनंती आहे की, अनुसूचित जमातीमध्ये जे महादेव कोळी, टोकरे कोळी, मल्हार कोळी आहेत. वारली, कातकरी, भिल्ल आणि कोकणात जसे संरक्षण दिले जाते त्याच धर्तीवर त्यांना संरक्षण दिले पाहिजे. कारण ते एसटीमध्ये आहेत. घटनेप्रमाणे आहेत. त्यांना नियमानुसार चौकटीत बसविले असल्यामुळे त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले आहे की, सर्वांना कामावरुन कमी करु नये. ज्यांनी व्हॅलिडीटी दिली नाही, अशा अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करावे. परंतु, शासनाने सरसकट १२ हजार ५०० लोकांना बडतर्फ केलेले आहे. हे शासनाने त्वरित थांबविले पाहिजे. यापूर्वी माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने सन २०१९ मध्ये असा निर्णय घेतला होता की, या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शासनाने संरक्षण दिले पाहिजे. कारण अशा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तब्बल २५ ते ३० वर्षे शासनाची सेवा केलेली आहे. अशा प्रकारे शासनाने एखाद्या समाजावर अन्याय करु नये. त्यांना टारगेट करु नये.

श्री. रमेशदादा पाटील.....

सभापती महोदया, शबरी घरकुल योजनेमध्ये राज्यातील भंडारा, यवतमाळ, नाशिक येथे अनुसूचित जमातीचा दौरा केला असता त्या ठिकाणी असे आढळून आले की, ज्या लाभार्थ्यांना घरकुलासाठी पैसे मिळणे अपेक्षित होते, अशा लाभार्थ्यांना पैसे मिळाले नाही. इतर लोकांनी त्याचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे शबरी घरकुल योजनेतील घरे अर्धवट अवस्थेत पडून आहेत. त्यामुळे या प्रकरणी शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. यामध्ये दोषी लोकांच्या विरोधात करावाई करावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

सभापती महोदया, माननीय ग्रामविकास राज्यमंत्री श्री. अब्दुल सत्तार यांच्या सिल्लोड मतदारसंघात महादेव कोळींचे वास्तव्य आहे. त्यांनी अशा समाजाला संरक्षण दिले पाहिजे. आमदार आणि मंत्री महोदयांच्या मतदारसंघात महादेव कोळी आणि टोकरी कोळी आणि मल्हार कोळी समाजाचे वास्तव्य आहे. ते अनुसूचित जमातीमध्ये आहे. माननीय मंत्री महोदयांनी हा प्रश्न वारंवार सदनापुढे मांडलेला आहे. परंतु, सरकार त्याचा विचार करीत नाही. माननीय मंत्री महोदयांनी माननीय श्री. छगन भुजबळ यांना "आपण जसे ओबीसी समाजाला संरक्षण देता तसेच संरक्षण अनुसूचित जमाती, महादेव कोळी, टोकरे कोळी समाजाला देखील देण्यात यावे" असे सांगण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये जे आम्हाला दिलेले आहे, तेच आम्ही मागत आहोत. दुसरे काही मागत नाही.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. अनिकेत तटकरे यांनी त्यांच्या भाषणातून कोकणाचा विषय उपस्थित केलेला आहे. कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. ही खरी गोष्ट आहे. कोकणाचा बॅकलॉग दूर केला पाहिजे. कोकणासाठी नवनवीन योजना आणल्या जात आहेत. नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार आहे. मुंर्बतील विमानतळावर आज मोठा लोड आलेला आहे. मुंबई आणि आजुबाजूच्या जिल्ह्यात लोकसंख्या वाढलेली आहे. महाविकास आघाडी सरकारने १५ वर्षापूर्वी निर्णय घेतला होतो की, नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ होणे गरजेचे आहे.

श्री. रमेशदादा पाटील.....

त्यामुळे डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई आणि पनवेलमध्ये मोठमोठ्या वसाहती निर्माण झालेल्या आहेत. त्या लोकांना सुविधा मिळाव्यात म्हणून नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधले जात आहे. महाविकास आघाडीचे सरकारला आहे. आज दोन वर्षापासून नवी मुंबई येथील विमानतळाचे काम बंद आहे. ज्या लोकांनी आपल्या जमिनी दिलेल्या आहेत, गावच्या गावे स्थलांतरित केलेली आहेत ते आज उद्ध्वस्त झालेली आहेत. नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ झाले तर आम्हाला नोकऱ्या मिळतील या आशेवर तेथील लोक बसलेली आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार आहे. नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम लवकरात लवकर सुरु करावे एवढी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

--------

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी सत्ताधारी पक्षातर्फे म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, गेल्या दोन वर्षात राज्यावर कोरोना महामारीचे आवाहन समोर होते. तसेच वादळ, अतिवृष्टीमुळे राज्याचे अतोनात नुकसान झालेले आहे. कोरोना महामारीच्या काळात सरकारने न खचता अनेक कामे केलेली आहेत. त्या काळात विकास दर वाढविता आला नसला तरी पण अनेक कामे केलेली आहेत. गेल्या दोन वर्षाच्या काळात २ कोटी ६ लाख ३५ हजार रुपयांचा विशेष निधी या कामासाठी मंजुर केलेला आहे. अतिवृष्टीमुळे बरेच रस्ते आणि पूल खराब झालेले आहेत. सन २०२० आणि सन २०२१ या दोन वर्षात ६ हजार ४८२ कोटी रुपयांच्या राजमार्गाची १४ हजारांपेक्षा अधिक कामे केलेली आहेत. राज्यात रेल्वे रुळ ओलांडताना प्रसंगी अनेक वेळा अपघात झालेले आहेत. यामध्ये मनुष्यहानी आणि जनावरहानी होते. राज्यात आतापर्यंत ५७ उड्डाणपुलांचे काम प्रगतीपथावर असून त्यासाठी २ हजार ११३ कोटी रुपये खर्च राज्य सरकार करणार आहे. गेल्या दोन वर्षाच्या काळात राज्यात अनेक प्रशासकीय इमारती नव्हत्या किंवा शासन ते भाडेतत्वावर घेत होते. दोन वर्षात जवळ जवळ २६० प्रशासकीय इमारतींचे काम प्रगतीपथावर आहे तर काही ठिकाणी उद्घाटनाचे काम झालेले आहे. पालघर जिल्ह्यात मोठी प्रशासकीय इमारत अतिशय दिमाखदार पध्दतीने बांधलेली आहे. त्यासाठी ८७१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. कोस्टल रोडचे देखील काम सुरु केले जात आहे. मुंबई-नागपूर असा "हिंदूहृदय बाळासाहेब ठाकरे" समृध्दी महामार्गाचे जवळ जवळ ७० टक्के काम पूर्ण झालेले आहे. ही खरोखर प्रशंसनीय बाब असल्यामुळे मी शासनाचे मनापासून अभिनंदन करीत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शरद पवार ग्राम समृध्दी योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली व त्या योजनेतील लाभार्थ्यांना गाय व म्हशीसाठी पक्का गोठा बांधणे, शेळी पालन, कुक्कुट पालनासाठी शडे बांधले जाणार आहे. पूर्वी ठराविक

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे....

जनावरांसाठी गोठे बांधण्यासाठीची परवानगी मिळत होती. आता अगदी एक किंवा दोन जनावरे असली तरी देखील शासनाकडून त्यांना अनुदान दिले जात आहे. महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळामार्फत राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळाच्या सहकार्याने ब्राझीलमधून गीर वंशांचे दहा वळू जागतिक निविदा काढून खरेदी करण्यात येणार आहे. दुधाची समस्या निर्माण झाल्यामुळे शासनाने दुधाची भुकटी तयार केली होती. शासकीय दूध योजनेंतर्गत १३७.९३ लक्ष लिटर दुधाचे भुकटीमध्ये रुपांतर करुन झालेल्या विक्रीतून गेल्या दोन वर्षामध्ये २०७.१४ कोळी रुपयांचा महसूल प्राप्त झालेला आहे. ही अतिशय उल्लेखनिय बाब आहे. सन २०२० मध्ये टोकियो, जपानमध्ये झालेल्या ऑलम्पिक स्पर्धेत राज्यातील दहा खेळाडूंना प्रशिक्षण व सराव आणि त्यांना ५० लाख रुपये या प्रमाणे ५ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना दिलेले असून, ती अतिशय प्रशसंनीय बाब आहे. राज्यातील पर्यावरण आणि पर्यटन आणि कमी नावलौकिक असलेली मंदिरे आहेत किंवा आतापर्यंत त्यांना महत्व प्राप्त झालेले नाही अशा मंदिरांसाठी विशेष निधी राखून ठेवलेला आहे. समुद्रकिनारे व त्यावरील पर्यटन आणि वॉटरवेज, आतापर्यंत पाण्यावरुनचा प्रवास हा ठराविक ठिकाणी होता. तो सुध्दा मोठ्या प्रमाणात सुरु केला जात आहे.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे.....

तो प्रवास सुद्धा आता मोठ्या प्रमाणावर सुरु करीत आहोत. तसेच नवीन जेट्टी बांधणे व इतर सर्व तदानुषंगिक गोष्टींवर चारही बाजूला लक्ष ठेवून महाविकास आघाडी सरकार काम करीत आहे. या बरोबरच लोकांना ज्या ज्या ठिकाणी गरज असेल त्या त्या ठिकाणी या महाविकास आघाडी सरकारने जमेल तशी कामे केलेली आहेत.

सभापती महोदया, सत्ताधारी पक्षाकडून नियम २६० अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावाला पुनश्च एकदा पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपविते.

धन्यवाद.

--------

**उप सभापती** : मला वाटते या प्रस्तावावर अनेक मंत्री महोदय उत्तर देणार आहेत. प्रत्येक मंत्री महोदयांना उत्तर देण्यासाठी किमान १५-२० मिनिटे लागतील. सभागृहाची विशेष बैठक ११.४५ वाजतेपर्यंत आहे. मला वाटते गरज पडली तर आपण विशेष बैठकीची वेळ वाढवू या.

आता सर्वप्रथम माननीय मंत्री श्री.सुनील केदार यांनी उत्तराला सुरुवात करावी.

असुधारित प्रत

श्री.सुनील केदार (पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी नियम २६० अन्वये प्रस्ताव चर्चेला आणला व या प्रस्तावावरील चर्चेमध्ये सभागृहातील जवळजवळ सर्वच सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगल्याप्रकारे भाग घेतला. माझ्याकडे असलेल्या विभागांवर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्यांनी शासनाच्या योजनांचे कौतुक केले आणि या योजनांचा सामान्य माणसाला अधिक लाभ होऊन, राज्याला कसा नावलौकीक मिळेल या बाबतीत भावना व्यक्त केल्या. याबद्दल मी सर्वच सन्माननीय सदस्यांचे या विभागांचा मंत्री म्हणून मनापासून स्वागत व अभिनंदन करतो.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सर्वप्रथम पशुसंवर्धन विभागावर आपले मत व्यक्त केले. वास्तविक पाहता दुधाची उत्पादकता आणि ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था या बाबी एकमेकांशी संबंधित आहेत. ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था आतापर्यंत पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून सांभाळली जाते असे चित्र असून ते सत्य आहे. शेती हा एक विषय आहेच. परंतु शेतीला जोपर्यंत पशुसंवर्धन विभागाच्या जोडधंद्याची जोड दिली जात नाही तोपर्यंत ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था दुरुस्त होऊ शकत नाही. माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे सरकार कारभार करीत असताना ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था नीट व्हावी, पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून कष्टकऱ्यांना चांगल्या प्रकारची मदत व्हावी ही भूमिका समोर ठेवून आम्ही काम करीत आहोत. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून दूध उत्पादनात वाढ होणे आवश्यक आहे. महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर सरकारने सर्वात पहिला अर्थसंकल्प मार्च, २०२० मध्ये सादर केला. अर्थसंकल्पाचा निधी देण्यास सुरुवात करीत असतानाच कोरोनाचे संकट आले आणि राज्यात लॉकडाऊन लागला. लॉकडाऊनमध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने दूध खरेदी करुन त्यापासून भुकटी तयार करुन घेतली. या माध्यमातून मागणी व पुरवठा यामध्ये समतोल ठेवून दुधाचे दर सांभाळण्याचा प्रयत्न केला आणि त्यात सरकारला मोठे यश देखील प्राप्त झाले आहे.

श्री.सुनील केदार.....

सभापती महोदया, बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी दुधाच्या उत्पादनासंबंधी आणि गायी वा जनावरांच्याबाबत आपले मत व्यक्त केले. ही गोष्ट खरी आहे की, जवळजवळ ३०-३२ वर्षांपूर्वी आपल्या देशातील गीर नावाची ब्रीड ब्राझिल सरकार त्यांच्या देशात घेऊन गेले होते. ब्राझिल सरकारने गीर जातीची ब्रीड अत्यंत चांगल्या पद्धतीने अपडेट केली. आज आपल्या देशात असलेली गीर जातीची ब्रीड ही १४-१५ लीटरपेक्षा जास्त दूध देत नाही. परंतु ब्राझिलमध्ये नेण्यात आलेली गीर जातीची ब्रीड जवळजवळ ३५ लीटर दूध देते. मी या विभागाचा मंत्री झाल्यानंतर बऱ्याचदा या विषयी त्या ठिकाणी बैठका घेतल्या, कोरोना काळात माननीय केंद्रीय मंत्र्यांबरोबत बैठक घेतल्या. तसेच एनडीडीबीची सुद्धा या कामी मदत घेतली. ब्राझिलची ब्रीड महाराष्ट्रात आणून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ती ब्रीड उपलब्ध करुन देण्याबाबत आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत आणि तसा प्रस्ताव सुद्धा दिला आहे. आम्ही या संदर्भात तीन पर्याय दिले असून त्यात आम्हाला अजून यश आलेले नाही. परंतु यामध्ये लवकरच यश येईल असा माझा विश्वास आहे. आम्ही सांगितले की, लाईव्ह ॲनिमल आणू द्या, त्याचे सिमेन आणू द्या किंवा एम्ब्रीओ आणू द्या. या तीनपैकी कोणताही एक पर्याय आम्हाला मिळाला तर आम्हाला आमचे ब्रीडींग सुरु करता येईल. परंतु अजूनही आपण प्रतिक्षेत आहोत. सभागृहातील विविध पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना मी या विभागाचा मंत्री म्हणून विनंती करतो की, आपण सुद्धा आपापल्या परीने या बाबतीत मागणी केली तर ती पूर्ण होऊ शकेल आणि लवकरच ती ब्रीड शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देता येईल. सभापती महोदया, या बरोबरच आपल्याकडे शाहीवाल आणि राठी या दोन ब्रीड आहे. या दोन्ही ब्रीडचा अभ्यास केला तर या ब्रीडच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे दुधाचे उत्पादन होऊ शकते.

असुधारित प्रत

श्री.सुनील केदार.....

सभापती महोदया, काही सन्माननीय सदस्यांनी दुधाच्या दरांबाबत मत व्यक्त केले. मी पुन्हा सांगू इच्छितो की, हा संपूर्ण विषय मागणी व पुरवठ्यावर अवलंबून आहे. आज दुधाचा सरासरी दर प्रती लीटर ३२-३५ रुपये आहे. अशा प्रकारची व्यवस्था ग्रामीण भागात उभी झालेली आहे. परंतु केवळ शासनाने दुधाचे दर वाढविल्यामुळे प्रश्न निकाली निघणार काय ? उदाहरणार्थ शासनाने दुधाचे दर वाढविले तर ग्राहकांची त्या दरात दूध खरेदी करण्याची व्यवस्था निर्माण होऊ शकेल काय, याचाही विचार केला पाहिजे. या विभागाचा मंत्री या नात्याने मी सर्वंकष विचार करुन त्या पद्धतीने कामाला लागलो आहे. जोपर्यंत दुधाची मोठी प्रोसेसिंग सिस्टीम उभी करणार नाही तोपर्यंत या व्यवसायातून ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था मजबूत होऊ शकणार नाही. कारण दुधाची शेल्फलाईफ कमी आहे. परंतु दुधावर प्रोसेस केली तर दुधाची शेल्फलाईफ वाढते. आपण फ्रीजरमध्ये दूध जास्तीत जास्त ८ दिवसांच्या वर ठेवू शकत नाही. परंतु दुधावर प्रक्रिया करुन त्याचे प्रॉडक्टस् तयार केले तर कित्येक महिने ते साठवून ठेवू शकतो. परिणामी, दूध उत्पादक शेतकऱ्यांना दोन पैसे मिळू शकतात. एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ग्रामीण भागात ३०-३५ रुपये लीटरप्रमाणे दूध विकले जाते आणि शहरात मात्र ८० रुपये लीटरप्रमाणे मिळते. मी त्यांना सांगू इच्छितो की, यातील जी तफावत आहे ती दूर करण्यासाठी दुधावर प्रोसेसिंग केले पाहिजे. या दृष्टीने सरकार कामाला लागले आहे. दुधाच्या प्रोसेसिंगसंदर्भातील इन्फ्रास्ट्रक्चर मोठ्या प्रमाणात उभे होत असून येणाऱ्या काळात त्याचे चांगले परिणाम आपल्याला बघावयास मिळतील. अशा प्रकारचे प्रयत्न झाल्यानंतर या प्रश्नामध्ये कायमस्वरुपी तोडगा निघेल. मी सांगू इच्छितो की, तात्पुरती व्यवस्था ही केव्हाही कोलमडू शकते, परंतु कायमस्वरुपी व्यवस्था केली तर ती दीर्घकाळ टिकू शकते. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला कायमस्वरुपी व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून अशा प्रकारचा उपक्रम करण्यासाठी महाविकास आघाडीचे सरकार कटीबद्ध आहे. सभापती महोदया, माझे मित्र श्री.चंदशेखर बावनकुळे सभागृहात उपस्थित नाहीत. ते उपस्थित असते तर

असुधारित प्रत

श्री.सुनील केदार.....

त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांना मी उत्तरे दिली असती. पण नागपूरमध्ये मी त्यांना नक्की उत्तरे देईन.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत हे क्रीडा विभागावर बोलले. सभापती महोदया, या विभागाचा मंत्री झाल्यानंतर माझ्या लक्षात आले की, तालुका क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल किंवा विभागीय क्रीडा संकुल असो, यावर पाहिजे त्या प्रमाणात लक्ष देण्यात आले नाही. पूर्वी जिल्हा क्रीडा समितीचे अध्यक्ष हे जिल्हाधिकारी होते. या विभागाचा मंत्री झाल्यानंतर मी त्या संदर्भातील शासन निर्णय बदलून पालकमंत्र्यांना जिल्हा क्रीडा समितीचे अध्यक्षपद बनविले. जोपर्यंत लोकप्रतिनिधी सिस्टीमध्ये येत नाहीत तोपर्यंत त्या सिस्टीमच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजना व्यवस्थित राबविल्या जात नाहीत. आपण आपल्या देशात लोकशाही मान्य केली आहे. लोकांचा जोपर्यंत योजनांच्या अंमलबजावणीमध्ये सहभाग होत नाही तोपर्यंत यश मिळत नाही. माननीय पालकमंत्र्यांना जिल्हा क्रीडा समितीचे अध्यक्ष केल्यानंतर त्याचा फायदा असा होतो की, जिल्हा नियोजन समितीतील निधीचे वाटप किंवा माननीय पालकमंत्र्यांना त्यांचे आमदार आपल्यासोबतच सहजासहजी राहिले पाहिजे अशी त्यांची जी धारणा असते त्या धारणेच्या माध्यमातून या विभागाला चांगल्याप्रकारे न्याय मिळू शकतो. त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्याऐवजी पालकमंत्र्यांना जिल्हा क्रीडा समितीचे अध्यक्ष केले. अशा प्रकारचा बदल केल्यामुळे चांगले काम होत आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी उपस्थित केलेल्या बीड क्रीडा संकुलाबाबत मी माहिती घेतली आहे. बीडच्या क्रीडा संकुलाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्याची त्यांची मागणी आहे. त्या क्रीडा संकुलाला अधिकृत नाव दिलेले नव्हते. कारण अधिकृत नाव देण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया असते. ती प्रक्रिया जोपर्यंत पूर्ण होत नाही तोपर्यंत त्या संकुलाला अधिकृत नाव देता येत नाही. मी आपणास सांगू इच्छितो की, हे राज्यच छत्रपतींचे आहे.

असुधारित प्रत

श्री.सुनील केदार.....

त्यांच्या आशीर्वादामुळेच तुम्ही-आम्ही या ठिकाणी आहोत. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणी प्रकरणी रितसर प्रक्रिया पूर्ण करुन क्रीडा संकुलाच्या नामकरणाच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सुद्धा तेथे बोलविण्यात येईल. परंतु त्या क्रीडा संकुलाला छत्रपतींचे नाव देण्यापूर्वी तेथील क्रीडा संकुल सुस्थितीत आहे की नाही, हे मला पहावे लागेल. नाही तर क्रीडा संकुलाला छत्रपतींचे नाव द्यायचे आणि ते क्रीडा संकुलच सुस्थितीत नसेल तर ती बाब महाराष्ट्राला शोभणारी नाही. मी लवकरच त्या ठिकाणी येईन आणि सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सुद्धा तेथे बोलवीन. आपण तेथील पाहणी करुन या विषयात पुढे जाऊ या.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. सुनील केदार ....

आम्ही तेथे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करु, आम्ही तेथे ग्राऊंड तयार करु, हॉल बांधू, ट्रॅक तयार करु. पण समजा तेथे कोचेस नसतील तर ते कोण चालविणार आहे हा प्रश्न आहे. रिकरिंग एक्सपेंडिचर म्हणजे मेंटेनन्स एक्सपेंडिचर हा मोठा विषय आहे. सैनिक विभाग आहे, रिटायर्ड मिलिटरी पर्सन्स आहेत, त्यांच्याकडून आम्ही यादी मागितलली आहे. जिल्ह्यामध्ये मिलटरीमधून रिटायर्ड झालेले लोक असतील तर त्यांना कोचेस म्हणून नेमण्याची आमची प्रक्रिया सुरु करतो, जेणेकरुन त्यांना तेथे चांगले काम करता येईल आणि त्यांच्या माध्यमातून चांगले काम होईल. मिलिटरी व स्पोर्ट्स डिपार्टमेंट यांचे अनुशासनाचे नाते आहे. त्यांचे अनुशासन असते. त्यामुळे आम्ही त्यांना तेथे नेमत आहोत. आम्हाला तेथे मोठे संकुल उभे करायचे आहेत. आम्ही त्या संदर्भात नवीन पॉलिसी ॲडॉप्ट करीत आहोत. आम्ही ते पीपीए मॉडेलवर तयार करण्याचा ड्राफ्ट करीत आहोत. विभागीय संकुल आहेत. सर्वच संकुलांना एकदम राज्य शासनाला आपल्या कोषातून इतके पैसे देणे शक्य होत नाही. आपल्याला हे माहीत आहे. आपण देखील एवढे देऊ शकलो नाही. आपण त्यासाठी किती दिवस वाट पाहणार आहोत ? त्यामुळे आम्ही पीपीए मॉडेलमध्ये येत आहोत. ३३ टक्के कमर्शिअल युजसाठीच्या जागेसाठी परवानगी देत आहोत, त्यातून निधी उभा करायचा आहे आणि त्या माध्यमातून ती संकुले उभी करायची आहेत.

सभापती महोदय, महाविकास आघाडी सरकार राज्यातील तरुण पिढीला स्पोर्ट्सच्या प्लॅटफॉर्मवर उभे करण्यासाठी कटिबध्द आहे. आजपर्यंत देशात इतर राज्यांना झाले नाही ते आज महाराष्ट्राने केले आहे. आपण आतंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाची नुसती घोषणा केली नाही तर ते स्थापन केले. कायदा तयार केला. कायदा करताना सभागृहातील सर्व सन्माननीय नेत्यांनी म्हणजे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांपासून सर्व सन्माननीय गटनेत्यांनी मदत केली. तुम्हीच बहुमताने नव्हे तर एकमताने कायदा मंजूर करुन दिला. याची नोंद महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये राहील. कायदा मंजूर झाल्यानंतरचा अजून एक महत्त्वाचा भाग आहे.

असुधारित प्रत

श्री. सुनील केदार ....

सभापती महोदय, केंद्र सरकारची युजीसी संस्था आहे, त्या संस्थेने आपल्या विद्यापीठाच्या कोर्सेसचे नॉमिन कल्चरसुध्दा मंजूर करुन पाठविले आहे. संपूर्ण देशातील हे पहिले विद्यापीठ आहे, ज्यामधून डिग्री, डिप्लोमा, पोस्ट ग्रॅज्युएशन यांच्या प्रमाणपत्रांना सर्व ठिकाणी मान्यता राहील. आपल्याला हे मिळाले आहे. आपण यावर्षी हे सुरु करीत आहोत. मागच्या दोन वर्षांमध्ये आम्ही सुरु करु शकलो नाही. कारण कोराना काळ होता. त्यामुळे आपण हे काम हळू केले. मी आपल्याला या संदर्भात विश्वास देतो. सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत यांनी सांगितले की, तेथे स्पोर्ट्स स्कूल द्यावे. बरोबर आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत यांचे म्हणणे मान्य करतो. आता विद्यापीठ एस्टॅब्लिश झाल्यानंतर स्पोर्ट्स स्कूल देण्यासंबंधी नवीन धोरण आखू आणि त्या पध्दतीने तशाप्रकारे देऊ.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी काही गोष्टी लक्षात आणून दिल्या आहेत. एका स्पोर्ट्समनच्या बाबतीत चुकीची तक्रार झाली. आमच्या विभागाच्या माध्यमातून त्यासंबंधी पूर्ण शहानिशा करुन घेण्याअगोदर आततायीपणा दाखविला. मी त्या खात्याचा मंत्री या नात्याने आपल्याला नक्की विश्वास देतो की, अशाप्रकारे एखाद्या स्पोर्ट्समनचे संतुलन बिघडविण्याचे काम आमच्या खात्याकडून झाले असेल तर खात्याच्या अधिकाऱ्यांची देखील जिम्मेदारी येईल, त्या संदर्भात नक्की त्यांच्यावर कारवाई करु. मी आपल्याला असा विश्वास देतो. ....(अडथळा).... बीडच्या सर्व पैलवानांची व्यवस्थित काळजी घेईन. तालुक्याचे क्रीडा संकुल आहे. मी सांगितले आहे की, महाविकास आघाडी सरकारने यासंबंधीची योग्य दखल घेऊन सर्वांचा निधी वाढविला आहे. पहिल्यांदा तालुक्यासाठी १ कोटी रुपये होते, आता आम्ही तालुक्याला ५ कोटी रुपये केले आहेत, जिल्हा स्तरावर २५ कोटी रुपये केले आहेत आणि विभागीय स्तरावर ५० कोटी रुपये केले आहेत. ....(अडथळा).... जुन्या क्रीडा संकुलाला, पूर्ण झाले आहे त्याला देखील त्या रेश्योमध्ये ६० टक्के देणार आहोत. महाविकास आघाडी सरकार

श्री. सुनील केदार ....

असुधारित प्रत

आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे साहेबांचे सरकार आहे. राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार आहेत. एखाद्या वेळी, एखाद्या तालुक्यात, एखाद्या परिस्थितीत सर्व गोष्टी लक्षात घेता, तेथे असणाऱ्या खेळांडुंची गरज लक्षात घेता, अनेक परिस्थिती लक्षात घेता, खास बाब म्हणून करु अशी आमची भूमिका राहील, एवढेच मी आपल्याला सांगतो. ....(अडथळा)....

सभापती महोदय, विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने सांगितले आहे की, त्यांना अधिकचे मार्क द्यावेत. आपल्या सजेशनवर नक्की अभ्यास करतो. योग्य प्रकारे नवीन पॉलिसी तयार करतो. आम्हाला अभ्यास करण्यासाठी थोडा वेळ द्यावा. ....(अडथळा).... क्रीडा शिक्षकांबाबत सांगितले आहे. ही गोष्ट खरी आहे. आपण विद्यापीठ निर्माण करीत आहोत. हा त्याचा पाया आहे. येथून झाल्यानंतर चांगल्या प्रकारचे क्रीडा शिक्षक देऊ. कोरोनामुळे काम थांबले होते. एकदा विद्यापीठाचे काम होऊ द्यावे. एक वर्ष जाऊ द्यावे. राज्य देशात अत्यंत दिशा देणारे राहणार आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांचा मनापासून आभारी आहे. त्यांनी आमचा बैलगाड्याच्या विषयी कमी शब्दांत का होईना पण कौतुक केले. मी त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो. हे स्पोर्टिंग स्पिरिटी सभागृहाच्या माध्यमातून राज्यात नक्की जाईल असा विश्वास व्यक्त करतो आणि आपल्या शब्दांना विराम देतो.

----

असुधारित

**उप सभापती** : मला सभागृहाला विनंती करायची आहे. माझ्या माहितीप्रमाणे ४ माननीय मंत्र्यांची उत्तरे आहेत. माननीय मंत्री श्री. संदिपानराव भुमरे, माननीय राज्यमंत्री श्री. अब्दुल सत्तार, माननीय राज्यमंत्री श्रीमती आदिती तटकरे यांची उत्तरे आहेत. प्रत्येकाने प्रश्न विचारल्यानंतर तुमचे वाटणे स्वाभाविक आहे की, आपणही तेथेच प्रश्न विचारावा. मात्र आपण माननीय मंत्र्यांची उत्तरे ऐकून घ्यावीत आणि आपले प्रश्न लिहून ठेवावेत. माननीय मंत्री तसेच करतात. आपण प्रश्न लिहून ठेवावेत आणि राईट टू रिप्लायमध्ये विचारावेत. सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव असल्यामुळे मला त्यांना पहिल्यांदा संधी द्यावी लगोल. मी आपल्याला देखील थोडया वेळासाठी संधी देईन.

असुधारित प्रत

श्री. संदिपानराव भुमरे (रोजगार हमी मंत्री) : सभापती महोदय, नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी चांगली सूचना केली आहे. नालाबंडिंग पूर्वी सुरु होते. आताही तसे चालू असले पाहिजे असे सांगण्यात आले. तशापध्दतीने चालू आहे. त्यात आणखी काय सुधरणा करता येतील हे पाहून त्या पध्दतीने सुधारणा करु. फळबागेच्या बाबतीत विषय उपस्थित केला. राज्यात यावर्षी जवळपास ४२ हजार हेक्टर फळलागवड केली आहे. येत्या वर्षात जवळपास १ लाख हेक्टर मनरेगामार्फत फळलागवड करायची आहे. बऱ्याच सन्माननीय सदस्यांची मागणी होती की, केळी, द्राक्षे, ड्रॅगन फ्रुट, फुलशेती यांचा समावेश मनरेगामध्ये करावा. फुलशेती, केळी, द्राक्षे ड्रॅगन फ्रुट यांचा समावेश केला आहे. मला निश्चित खात्री आहे की, यावर्षी जशी ४२ हजार हेक्टर फळलावगड झाली तशीच पुढील वर्षी निश्चितपणे १ लाख हेक्टरपर्यंत ही लागवड झाल्याशिवाय राहणार नाही. अनेक चांगले निर्णय शेतकऱ्यांसाठी घेतले आहेत.

सभापती महोदय, बऱ्याच वर्षांपासून मागणी होती की, अंगूर, हळद मनरेगामध्ये आले पाहिजे. केळी, फुलशेतीबाबत देखील सांगण्यात आले. हा एक चांगला बेसिक निर्णय घेतला आहे आणि आपण सर्वांनी त्याचे स्वागत केले आहे. आपण हे सर्व निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचे घेतले आहेत. सर्वांना रोजगार उपलब्ध करुन द्या असे सांगितले आहे. मला एकच बाब सांगायची आहे की, गेल्या वर्षी राज्याचा २११८ कोटी रुपये खर्च झाला होता. मात्र यावर्षी निश्चितच अडीच हजार कोटी रुपये खर्च झाल्याशिवाय राहणार नाही. कारण यामध्ये सर्वांचे सहकार्य आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दौड यांनी एक बाब सांगितली. मातोश्री पाणंद रस्ता योजना आणली. शेतकऱ्यांसाठी ही रक्तवाहिनी आहे. मला खात्री आहे की, शेताला जाणारे पक्के रस्ते असल्याशिवा आता आपण शेती करु शकत नाही. त्यामुळे आपण मनरेगा, ईजीएसची जोड देऊन या रस्त्यांची योजना आणली आहे.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.संदीपान भुमरे....

जवळपास १५ ते १६ हजार किलोमीटर रस्ते तयार करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मला खात्री आहे की, महाराष्ट्रात चांगले व दर्जेदार रस्ते तयार होतील. सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांनी गुरांचे गोठे, कुक्कुट पालन, शेळी पालन यासाठी शरद पवार ग्रामसमृधी योजना आणली असल्याचा उल्लेख केला आहे. त्यातून शेतकऱ्यांना गुरांचे गोठे, कुक्कुट पालन, शेळी पालन यासाठी मदत देण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी ज्या चांगल्या योजना आणता येतील त्याचा नक्की विचार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी ज्या चांगल्या सूचना केल्या आहेत, त्यांचे पालन करण्यात येईल. इतके बोलून मी माझे भाषण संपवितो.जयहिंद.

---------

असुधारित प्रत

श्री.अब्दुल सत्तार (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदया, नियम २६० अन्वये सत्ताधारी पक्षाने आणलेल्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत

शिंदे, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे, सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी, सन्माननीय सदस्य श्री. अरुण लाड, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी, सन्माननीय सदस्य श्री.किरण सरनाईक, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत, सन्माननीय सदस्य ॲड.निलय नाईक, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर, सन्माननीय सदस्य श्री.रमेशदादा पाटील, सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे, सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

सभापती महोदया, ग्रामीण भागात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे एकूण उद्दिष्ट ३० हजार किलोमीटर रस्ते तयार करण्याचे आहे. एकूण झालेल्या कामांची लांबी १८३०८ किलोमीटर आहे. प्रगतीपथावर ११४४१ किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. निविदा प्रक्रिया सुरु असलेल्या रस्त्यांची लांबी ६३२ किलोमीटर आहे. योजनेचे एकूण दायित्व १९,९७२ कोटी रुपये आहे. दिनांक ३०/०३/२०२० पासून एकूण खर्च १३,१११ कोटी रुपये आजपर्यंत झाला आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांची भावना अशी होती की, निधी मिळत नाही. शासनाकडून देयके देण्यासाठी जवळपास ६८६०.२० कोटी रुपयांचा निधी येणे बाकी आहे. याबाबत अर्थमंत्री महोदयांसोबत माझी दोन वेळा बैठक झाली. सन २०२१-२२ मधील पुरवणी मागणीद्वारे २०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून आणखी १४४७ कोटी रुपये उपलब्ध होण्याची शक्यता आहे. सन २०२२-२३ मध्ये प्रस्तावित तरतुदीनुसार ३५५० कोटी रुपयांचा निधी भविष्यात मिळणार आहे. कोरोना माहामारीच्या काळातील कामाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यामध्ये अनेक कामांचे टेंडर झाले असून उर्वरित कामे झाली नाहीत. काही कामे एक ते दीड वर्षापासून बंद आहेत, या कामांना चालना देण्यासाठी ज्या कंत्राटदारांनी कामे सुरु केली नाहीत त्यांना कामे सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्या कामासाठी निधीची व्यवस्था करण्यात येत आहे. काही कंत्राटदार हेतुपुरस्सर काम सुरु करीत नाही हे देखील खरे

श्री.अब्दुल सत्तार....

अप्रकाशित प्रत

आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत व पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत जी कामे अपूर्ण आहेत किंवा काही कंत्राटदारांनी कामे सुरु केली नाहीत असा विषय उपस्थित केला. ज्या कंत्राटदारांनी वेळेवर कामे सुरु केली नसतील त्यांना नोटीसा देण्यात येतील. गरज लागली तर अशा कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्यात येईल. शासनाच्या निधी अभावी काही कंत्राटदारांना कामे सुरु करता आली नाहीत. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा अर्थ असा आहे की, ज्या ग्रामस्थांना रस्त्यांची आवश्यकता आहे. त्या कामासाठी टेंडर काढले तर त्याची कामे वेळेवर होणे गरजेचे आहे.

सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी असा मुद्दा मांडला की, कर्जाशिवाय अन्य योजना महिला बचत गटांना देणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने अनेक योजना केल्या आहेत. यामध्ये सर्वात महत्वाची योजना स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने कृषी व्यवसाय ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्प ही योजना आहे. वर्धा, यवतमाळ, सोलापूर या जिल्ह्यातील कृषी प्रक्रिया उद्योगासाठी गोडाऊन बांधणे यासाठी या योजनेच्या माध्यमातून चार उप प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. त्यांची किंमत ४ कोटी १५ लक्ष रुपये इतकी आहे. पुढील काळात ही योजना ग्रामीण भागात महिलांसाठी राबविण्यात येणार आहे. महिलांना फक्त चूल व मूलामध्ये गुंतून न राहता पुरुषांच्या खाद्याला खांदा लावून भविष्यात काम करावे यासाठी अनेक योजना आणल्या आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी बचत गटांना मार्केट कोठे उपलब्ध होईल असा प्रश्न उपस्थित केला. जेथे जिल्हा परिषदेच्या मोक्याच्या जागा आहेत तेथे गाळे बांधून महिला बचत गटांनी स्वत: तयार केलेल्या मालाची विक्री करण्यासाठी धोरणात्मक निर्णय लवकर जाहीर करण्यात येणार आहे. यापेक्षा मला असे वाटते की, जिल्हा परिषदेचे गट असतात. त्या गटात काही गावे मोठी असतात. तेथील लोकसंख्या १० हजार असते, अशा ठिकाणी दीड दिवसाचे मार्केट आणता येईल काय याचा विचार करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये महिलांसाठी शौचालये बांधण्यात येतील. त्या शाळेची दुरुस्ती करण्यात येईल.त्या

श्री.अब्दुल सत्तार....

असुधारित प्रत

शाळेत शनिवारचा अर्धा दिवस व रविवारचा पूर्ण दिवस मार्केट भरविता येईल. महिला बचत गटांना एक जबाबदारी देण्यात येईल की, रविवारी जाताना तेथील साफसफाई करण्यात यावी. जेणेकरुन सोमवारी सकाळी मुलांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. काही गावात छोटे महिला बचत गट साहित्य व वस्तू तयार करतात त्यासाठी ती जागा उपलब्ध करुन देण्यासाठी मंत्री महोदयांबाबत माझी चर्चा झाली आहे. मंत्री महोदय याबाबत सकारात्मक आहेत. अशी योजना राबविताना शाळेतील मुलांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य ॲड.निलय नाईक यांनी ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी जी लोकसंख्या लागते त्यामध्ये सूट देण्याचा विषय उपस्थित केला आहे. त्यासाठी तांडे, वाडी, वस्त्या यांना काही सवलत देता येईल काय ? याबाबत सन २००४ चा शासन निर्णय आहे, ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याच्या काही जुन्या अटी आहेत त्या शिथिल करता येतील काय, या संदर्भातील प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. हा विषय ग्रामविकास विभागाचा आहे. जी छोटी गावे आहेत, छोट्या वस्त्या आहेत त्यांची लोकसंख्या २५०,३००,५०० च्या आत आहे, अशा ठिकाणी विभाजन करुन नवीन ग्रामपंचायत कार्यालयासह देता येईल काय याचा विचार ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी तांड्याचा व धनगरवस्तीचा विषय मांडला. ही बाब खरी आहे, माझ्या मतदारसंघात अशा अनेक वस्त्या आहेत, धरगर बांधव छोट्या वस्त्यांवर राहतात. तांड्यात राहणारा बंजारा समाज आहे. आदिवासी पाड्यांच्या जोडणीसाठी तांडा वस्ती सुधार योजना वेगळी आहे, त्या रस्त्यांसाठी ग्रामीण विकासाच्या माध्यमातून काही सूचना मांडण्यात आल्या. यामध्ये काही नवीन योजना घेता येतील काय याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. धनगर समाजाबाबत आपण जी भावना मांडली ती बरोबर आहे. अनेक लोक छोट्या वस्त्यांमध्ये राहतात

श्री.अब्दुल सत्तार.....

असुधारित प्रत

त्यांना पायाभूत व मुलभूत सुविधा मिळायला पाहिजेत. त्यांना चांगला रस्ता मिळाला पाहिजे. त्यांना पाण्यापासून रस्त्यांपर्यंत चांगल्या सोईसुविधा देता येतील काय अशी सूचना केली आहे. याबाबत विभाग सकारात्मक विचार करीत असून याअनुषंगाने शासन निर्णय काढायचा आहे, त्यामध्ये कोणतीही चूक होणार नाही, कोणताही भेदभाव होणार नाही याची दक्षता निश्चित घेतली जाईल.

या नंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

श्री.अब्दुल सत्तार........

सभापती महोदया, मी काल ३ तास सभागृहात उपस्थित राहून नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चा ऐकून घेतली आणि आज सभागृह सुरु झाले तेंव्हा पासून मी सभागृहात उपस्थित आहे. मी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची उत्तरे देणार आहे. आता माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सांगितले की, सीएमजेएसवाय अंतर्गत तयार करण्यात आलेल्या रस्त्यांची गुणवत्ता तपासली पाहिजे. आपण ५० टक्क्यामध्ये कामाचा दर्जा चांगला राहत नाही असेही सांगितले. आपण रस्त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी सिस्टीम ठरवू. त्या सिस्टीमच्या माध्यमातून जे अधिकारी कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी नियुक्त कले जातील ते क्रॉस चेक करतील. संबंधित जिल्ह्यातील अधिकारी नाही तर दुसऱ्या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना तेथे पाठवून तंतोतंत माहिती घेऊन चुकीचे आढळून आले तर संबंधितावर कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी महिला बचत गट कर्जबाजारी झाले असून त्यांना मदत करणे आवश्यक असल्याचे सांगितले. मी सांगू इच्छितो की, ग्रामीण जीवन अभियान उन्नती अंतर्गत बँकेच्या माध्यमातून ८ लाख ९ हजार रुपये सहाय्यता निधी वितरित करण्यात आलेला आहे. ७,८२,२८६ समुहांनी नियमित कर्जफेड केलेली आहे. आपण सांगितले की, ते कर्जाची परतफेड करीत नाहीत. मी आपल्याला खात्रीने सांगतो की, ७,८२,२८६ समूह गटांनी नियमित कर्जफेड केलेली आहे. आपण पार्श्वभूमी बघितली तर कोरोना काळात काही बचत गट कर्ज फेडण्यासाठी पाहिजे तेवढे सक्षम नव्हते. २,१७,९८४ सहायता समूह गटांनी २२ कोटी केंद्र शासनाचे व्याज अनुदान अदा करता... १,३४,२६० समूह गटांना २६ कोटी ४८ लाख रुपये व्याज अनुदान सुमतीबाई सुरळकर योजनेंतर्गत अदा करण्यात आले आहे. (...अडथळा...) फायनान्स कंपन्यांच्या कर्जाची माहिती शासनाकडे येत नाही. आपण ती मागवून घेऊ आणि प्रायव्हेट फायनान्सचे कर्ज असेल तर त्याचाही

श्री.अब्दुल सत्तार........

असुधारित प्रत

विचार सरकार करु शकते. महिला बचत गटांना सक्षम करण्याची शासनाची भूमिका आहे. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात सूचना केलेली आहे. महिला बचत गटांनी प्रायव्हेट फायनान्स घेतले असेल आणि आपण त्याची माहिती दिली तर शासन त्याबाबत विचार करु शकते.

सभापती महोदया, अनेक ठिकाणी वाड्या, वस्त्या, बचत गटांचा प्रश्न वेगळा आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री सतीश चव्हाण, चंद्रशेखर बावनकुळे यांनी सीएमजेएसवाय व पीएमजेएसवाय संदर्भात उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत युसी न दिल्यामुळे निधी प्राप्त झाला नाही असे सांगितले. आपण जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत मी माहिती घेतलेली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागात....

**उप सभापती :** मंत्री महोदयांचे उत्तर व राईट टू रिप्लाय संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत युसी न दिल्यामुळे निधी प्राप्त झाला नाही असे सांगितले. मी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्या समवेत चर्चा केली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत कोणतेही उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. कदाचित तुमच्या व आमच्या माहितीमध्ये फरक असेल तर आपण या संदर्भात बैठक आयोजित करुन चर्चा करु. परंतु मला जी माहिती मिळाली त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत कोणताही हप्ता केंद्र शासनाकडे थकीत नाही. आपण पाहिजे तर या संदर्भात बैठक आयोजित करुन चर्चा करु शकतो. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामाचे ६ महिन्यांपासून कॉन्ट्रॅक्टरचे देयक मिळाले नाही हे बरोबर आहे. मी मघाशी सांगिले की, शासनाकडून विभागाला ६८६० कोटी रुपये येणे बाकी आहेत. कोरोना काळात राज्याचा महसूल कमी झालेला आहे. मी सांगू इच्छितो की, आम्ही येणाऱ्या काळात यासाठी चालना देणार आहोत. मी माननीय वित्तमत्री श्री.अजित पवार

श्री.अब्दुल सत्तार........

साहेबांसमवेत चर्चा केलेली आहे. त्यांनी सांगितले की, आपण पुढील अधिवेशनात वाढीव निधी उपलब्ध करुन देऊ. निधी नसल्यामुळे ६ महिन्यांपासून देयके देण्यात आली नाहीत, हे बरोबर आहे. सन २०१५-१६ पासून प्रस्तूत योजना राबविण्यात येत असून सदर योजनेत ३०३७१ किलो मीटर लांबीच्या रस्त्यांचा समावेश आहे. दर्जा उन्नती उद्दिष्ट यापैकी १७५१८ किलो मीटर लांबीचे रस्ते पूर्ण झाले असून १२८५३ किलो मीटर लांबीच्या रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर योजनेंतर्गत विविध स्त्रोतातून पैसे उपलब्ध करुन देण्यासाठी १३१११ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. शासन कर्ज घेते किंवा विविध योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जातो.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीच्या दिव्यांचे विजेचे बिल भरले नाही तर सरपंच यांना अपात्र करण्यात येईल. शासनाने असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. मी राज्यमंत्री म्हणून जबाबदारीने सांगू इच्छितो की, सरपंच यांच्यावर अशा प्रकारची कारवाई केली जाणार नाही. मी हे खात्रीने बोलत आहे. आपण जो मुद्दा मांडला त्यामुळे राज्यातील सरपंच अस्वस्थ झाले असतील की, आपण दिव्यांचे विजेचे बिल भरले नाही तर आपले पद जाईल (...अडथळा...) आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपया सभागृहात शांतता ठेवावी. आपण मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदया, मी जबाबरीने बोलत आहे. कदाचित त्या पत्राचा अर्थ वेगळा असू शकतो. मी आपल्याला पत्र वाचून दाखवितो. राज्यातील ग्रामपंचायतीमधील पथदिवे आणि पाणीपुरवठा योजनांवरील थकित वीज देयकाबाबत आढावा घेण्याबाबत असा पत्राचा विषय आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांवरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची रक्कम भरण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान ३०४३२५ या

श्री.अब्दुल सत्तार........

लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात येऊन सदर अनुदान थेट महावितरणला शासनाकडून अदा करण्यात येते. तसेच, १४ व्या वित्त आयोगातून यासाठी महावितरणला निधी वितरित करण्यात आला आहे. याशिवाय महावितरणने मार्च २०२१ पर्यंत ग्रामपंचायतींच्या रस्त्यांवरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची थकित रक्कम अदा करण्याची मागणी शासनास केली आहे. महावितरणच्या मागणीच्या अनुषंगाने थकबाकीच्या रकमेबाबत संपूर्ण ताळमेळ घेणे आवश्यक असल्याने मा.अपर मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. सदर समिती मार्फत संपूर्ण थकबाकीबाबत ताळमेळ घेऊन राज्यातील ग्रामपंचायतीमधील पथदिवे आणि पाणीपुरवठा योजनांवरील थकित वीज देयकांबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. वरील थकबाकी संदर्भात निर्णय होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

यानंतर श्री.सांगळे........

असुधारित प्रत

श्री.अब्दुल सत्तार....

तूर्तास ग्रामपंचायतींनी पथदिवे, पाणी पुरवठा योजनांच्या चालू विद्युत देयकांचा भरणा स्वनिधीतून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे करावा. त्या संदर्भात काही दिरंगाई झाल्यास संबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक व सरपंच यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची नियमित विद्युत देयके (पथदिवे, पाणीपुरवठा योजना) वेळेवर भरावीत अशा सूचना संबंधितांना देण्यात याव्यात. अशा प्रकारे सदर पत्रामध्ये उल्लेख करण्यात आला आहे. सभापती महोदया, अशा प्रकारे सूचना देणे हे आदेश किंवा नियम नाहीत.... (अडथळा).. सभापती महोदया, मी सदनाला नम्रपणे माहिती देऊ इच्छितो की, अशा प्रकारे शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. मी सदनामध्ये जी माहिती देत आहे, ती शासन म्हणून देत आहे. त्यामुळे आपण कागदाऐवजी सरकारवर विश्वास ठेवावा अशी माझी सदनाला विनंती आहे.

श्री.सतीश चव्हाण ( खाली बसून ) : जय महाराष्ट्र !

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदया, सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारायचे व त्यानंतर त्यांनीच जय महाराष्ट्र ! करायचा. ही बाब योग्य नाही. या संदर्भात विरोधी पक्षामधील सन्माननीय सदस्यांकडून अशी कृती झाली असती तर ठीक आहे. परंतु हा सत्ताधारी पक्षाकडील प्रस्ताव असल्यामुळे सत्ताधारी पक्षाकडील सन्माननीय सदस्यांना जय महाराष्ट्र ! बोलण्याचा अधिकार नाही. सभापती महोदया, या प्रस्तावासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार व्यक्त केलेले आहेत. या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांची नावे सांगायची झाल्यास सदनाला वेळ वाढवून द्यावी लागेल. मी वेळेअभावी सर्व सन्माननीय सदस्यांची नावे घेऊ शकत नाही. मी सदनामध्ये दिलेली सर्व माहिती सत्य आहे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून यादी आल्यानंतर आपण त्यासंबंधी सविस्तर चर्चा करु. मी या संदर्भात माननीय सभापती तसेच सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमवेत प्रत्यक्ष चर्चा करु शकतो. सरपंच तसेच ग्रामसेवकांमध्ये कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये याकरिता मी विशेष खुलासा करीत

अग्रिम प्रत

श्री.अब्दुल सत्तार....

आहे. परंतु सन्माननीय सदस्य ज्या भावनेने बोलले आहेत त्याबाबत त्यांच्याकडे निश्चितपणे माहिती आली असावी. किंवा त्यांच्या पीएने चुकून त्यांना माहिती दिली असावी. मी देखील आमदार म्हणून या सदनामध्ये ६ वर्षे काम केलेले आहे. एखाद्या वेळी पीएकडून माहिती देत असताना त्यातील काना, मात्रा चुकल्यास त्या माहितीचा अर्थ वेगवेगळा निघू शकतो. ही बाब आपल्या सर्वांना माहीत आहे. सभापती महोदया, महिला बचत गटांच्या कर्जासंबंधीचा विषय गंभीर आहे. त्या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी अशी विचारणा केली आहे. आशाताई वर्करचे मानधन वाढविणार आहात का ? हा देखील महत्त्वाचा प्रश्न विचारण्यात आला आहे. अंगणवाडी सेविकांचा देखील प्रश्न आहे. अशा प्रकारे ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याबाबत माननीय उप सभापती यांना सर्व माहिती आहे. महिलांच्या संदर्भात सदनामध्ये जे विषय उपस्थित करण्यात आलेले आहेत त्या संदर्भात आम्ही सचिवांसमवेत एकत्रित चर्चा करु. तसेच त्यांना सकारात्मक दृष्टीने जेवढी मदत करता येईल तेवढी मदत केली जाईल.

सभापती महोदया, टप्पा क्रमांक २ मध्ये काही सन्माननीय सदस्यांनी अशी शंका व्यक्ती केली होती की, आम्हाला काही निधी मिळणार आहे की नाही ? आमचा त्यासंबंधी कोणताही विचार केला जात नाही. सभापती महोदया, विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांना जरुर निधी मिळत असतो. आपण त्यांचा देखील विचार करु. हे वरिष्ठ सभागृह आहे....(अडथळा).... "मुझे बिच्छू के मंतर मालूम है, तुम नाग के बिल में हाथ डालने के बारे में बोल रहे है. वह मंत्र भी सीखना पड़ेगा."

सभापती महोदया, डीपीसीच्या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे धोरणात्मक निर्णय घेऊ शकतील. मला या संदर्भात एवढा मोठा अधिकार नाही. मी सन्माननीय सदस्यांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देणार आहे. मी आपल्यासारखा एक सहकारी असून या सदनामध्ये २० वर्षांपासून काम करीत आहे. मला त्याचा थोडा अनुभव आहे. खरे सांगायचे झाल्यास विधानसभेला निधीच्या संदर्भात काही

असुधारित प्रत

श्री.अब्दुल सत्तार....

मर्यादा असतात. परंतु विधानपरिषदेला निधीसंबंधी काही मर्यादा नसतात. कोणी विभागातून, कोणी राज्यातून निवडून जात असतो. सर्व सन्माननीय सदस्यांना अपेक्षा असते की, आपल्याला निधी मिळाला पाहिजे. या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांच्या असलेल्या भावना मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्याकडे मांडतो. शासनाला त्या माध्यमातून काही धोरणात्मक निर्णय घेता येईल का ? हे आपण बघू. सत्ताधारी पक्षाकडून सदरहू प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. या प्रस्तावाला मान व सन्मान देऊन निधी वितरित करीत असताना जिल्हा नियोजन मंडळापासून ते महाराष्ट्र शासनापर्यंत आपलाही विचार व्हावा. याबाबत सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना बरोबर आहेत. त्यात कोणतीही चूक नाही. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत असलेली कामे करण्यासंबंधी असलेल्या समितीमध्ये पालक मंत्र्यांना अध्यक्ष करण्यात आलेले आहे. त्यात आपला देखील समावेश करण्यात यावा. अन्यथा आपल्या मागण्या पूर्ण होणार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांचा मतदारसंघ पाहिल्यास ५ वर्षांच्या काळात आपण त्या जिल्हयांमधील गावांमध्ये जाऊ शकत नाहीत, अशी हजारो गावे आहेत. परंतु निधी मागणाऱ्यांची संख्या जास्त असते. माननीय उप सभापती यांनी आमच्या मतदारसंघाकरिता मदत केली होती. त्यांनी त्यांच्याकडील विकास निधी सिल्लोड तालुक्यातील विकास कामांकरिता दिला होता. सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना लक्षात घेता ग्रामविकास विभाग नव्हेतर सर्व खात्यांनी थोडा खारीचा वाटा दिल्यास आपण ती खारी गोरगरिबांच्या विकासाकरिता चालना देऊ शकेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

डॉ.वजाहत मिर्झा : सभापती महोदया,.....

**उप सभापती** : आपण कृपया खाली बसावे. मी आपल्याला नंतर बोलण्याची संधी देईन.

असुधारित प्रत

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी एक महत्त्वाचा विषय उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्यांनी मुन्नरवार, डोगरा, महादेव, मल्हार अशा कोळी समाजासंबंधी उल्लेख केला आहे. अनेक विभागांमध्ये कोळी समाज राहतो. कोळी समाजाने जातीच्या रकान्यामध्ये आपापल्या पद्धतीने जातीची नावे नमूद केलेली आहेत. नांदेड विशेषत: कोकणमध्ये कोळी समाजाचे लोक राहतात. हा मोठा व महत्त्वाचा विषय आहे. आपल्याला या संदर्भात माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे बैठक आयोजित करावी लागेल. राज्यातील आदिवासींच्या लहान जाती त्या समाजापासून वंचित आहेत. त्यात विशेषत: कोळी समाजासंबंधी सन्माननीय सदस्यांनी केलेला उल्लेख बरोबर आहे. केंद्र सरकारकडून जो निधी दिला जातो... राज्य शासनाकडून आदिवासी बांधवांकरिता लोकसंख्येनुसार निधी दिला जातो. परंतु नंतर तो निधी लोकसंख्येनुसार वितरित होत नाही. त्यात जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र वगैरे अनेक अडचणी आहेत. सभापती महेदया, सन्माननीय सदस्य डॉ.वजाहत मिर्झा यांचे नाव सदर प्रस्तावामध्ये नाही. त्यामुळे त्यांना कोणता मुद्दा उपस्थित करायचा आहे याची मला माहिती नाही...

डॉ.वजाहत मिर्झा : सभापती महोदया, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे...

**उप सभापती** : आपला पॉईंट ऑफ ऑर्डर कोणत्या विषयासंबंधी आहे, त्याबाबत आपण माझ्याकडे चिठ्ठी पाठवावी. त्यानंतर आपल्याला बोलण्यासाठी परवानगी द्यावयाची किंवा नाही ? याबाबत मी निर्णय घेते.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.अब्दूल सत्तार : मला सभापती महोदयांनी बोलण्याचे आदेश दिलेले आहेत म्हणून मी बोलत आहे असे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

**उप सभापती** : मी इतर सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली नाही, कोणाला कोणत्या विषयावर बोलायचे आहे त्यांनी मला चिठ्ठी द्यावी व त्यावर बोलाण्यास परवानगी द्यायची की नाही ते मी ठरवते. आता मंत्री महोदयांना भाषण आटोपते घ्यावे, इतर सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता राखावी.

श्री.अब्दूल सत्तार : सभापती महोदया, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये विधान परिषद सदस्यांच्या सूचनांचा विचार पालकमंत्री महोदयांनी करावा. निधी वितरीत करण्यामध्ये काही अडचणी आहे, टप्पा क्रमांक २ अजून बाकी आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मला उत्तर पूर्ण करु द्यावे. त्यानंतर तुमचे काही प्रश्न राहिले असतील तर त्याचे उत्तरही मी पुन्हा देईन, मी पुन्हा बोलायला उभा राहीन.

सभापती महोदय, सर्वांच्या भावना लक्षात घेऊन मी सांगितले आहे की, काही निर्णय धोरणात्मक आहेत, त्यावर राज्याचे प्रमुखच बोलू शकतात. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील हे पूर्वी राज्यमंत्री होते, त्यांना या बाबी माहिती आहेत. राज्यमंत्री व कॅबिनेट मंत्री यांचे अधिकार किती असतात हे त्यांना माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड, डॉ.मनिषा कायदे यांनीही काही चांगल्या सूचना मांडल्या आहेत. माननीय उप सभापती महोदयांकडून ज्या सूचना केल्या जातील त्याचीही अंमलबजावणी केली जाईल. जयहिंद, जय महाराष्ट्र.

**उप सभापती** : नियम २६० अन्वये प्रस्ताव सत्ताधारी पक्षाचा असल्याने अगोदर त्यांना राईट टू रिप्लायवर बोलण्याची संधी देणार आहे. बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी बोलण्यासाठी हात वर केलेले आहेत. दिवसभर हीच चर्चा करायची का, मी एक एक मिनिट बोलण्याची संधी देईल पण सर्व सदस्यांनी शिस्तीने बोलावे.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरावर काही सूचना करु इच्छितो. राष्ट्रीय खेळाडू तयार करण्याच्या दृष्टीने मंत्री महोदयांना

श्री.शशिकांत शिंदे.....

असुधारित प्रत

विनंती केली होती. जिल्हा क्रीडा कार्यालयाकडे राष्ट्रीय स्तरावर किंवा एशिया ऑलंपीक खेळण्याची पात्रता असलेले गरीब विद्यार्थी असतात, त्यांना खेळासाठी मदत व अनुदानाची पॉलीसी आपण जाहीर केलेली नाही. त्याबाबत निर्णय घेतला तर महाराष्ट्रातून चांगले खेळाडू निर्माण होतील. पाणंद रस्त्याबाबत एक अडचण आहे, पाणंद रस्त्यांबाबत काही ठिकाणी बऱ्याच तक्रारी आहेत. पाणंद रस्त्याला परवानगीसाठी निकष केले आहेत त्याप्रमाणे तहसिलदारांनी तत्काळ निर्णय घ्यावेत. तरी सुध्दा बरेच निर्णय प्रलंबित राहात आहेत. कोर्टाचा असेल तर तो विषय बाजूला ठेऊ. परंतु कोर्टात नसताना आडकाठी येऊ नये. एक व्यक्तीमुळे बाकीच्यांना पाणंद रस्त्याबाबत अडचण येत असेल तर  अशा प्रकरणी निर्णय घेण्याची कालमर्यादा सरकारने निश्चित करावी अशी विनंती करतो. मुख्यमंत्री व पंतप्रधान योजनेत वन विभागातील रस्त्यांचा विषय येतो, त्यास परवानगी मिळत नसल्याने ते रस्ते तसेच अर्धवट राहतात व मागेपुढे होतात. त्याबाबत आता जिल्हाधिकारी यांना अधिकार मिळालेला आहे. वन विभागाकरीता कालमर्यादा निश्चित करावी. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत विधानसभेचे दोन प्रतिनिधी आहेत, त्यात विधान परिषदेचा एक प्रतिनिधी असावा अशी सूचना केली तर काही रस्ते घेता येतील. बजेटमध्ये आपण सांगितले आहे की, साडेसहा हजार कोटी रुपये येणे बाकी आहे. नवीन मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा मागील प्रस्ताव येत नसेल. मागे आपण ॲन्युएटीचा प्रस्ताव आणला होता. कोणताही कंत्राटदार हा पैसेवाला नसतो. त्याला कर्ज काढावे लागते, व्याज आपण देणार आहात का? पैसे मिळत नाही तोपर्यंत नवीन प्रस्ताव मंजूर करणार का हा विषय आहे. गाळ्याबाबत आपण चांगला निर्णय घेतला आहे. बाजारपेठ निर्माण करताना ११ महिन्याचा निकष बदलून पाच पाच महिन्याचा केला तर बचट गटांना तेथे गुंतवणूक करुन काम करता येईल. याबाबत निर्णय घ्यावा. आपण स्वतंत्र बैठक बोलवावी. सभापती महोदयांनी याकरीता पुढाकार घ्यावा. ॲमेझॉन,  डिमार्ट, रिलायन्स अशा मोठया कंपन्यांना बोलावून बचत गटाचा माल विक्रीचा धोरणात्मक निर्णय झाल्यास चांगले होईल. त्यांना उत्पादन करण्यास वेळ मिळेल. मंत्री महोदयांनी याबाबत उत्तर द्यावे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाने आणलेल्या प्रस्तावावर बोलताना ४-५ विषयावर मी सरकारचे लक्ष वेधू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांचे आभार व्यक्त करतो की, केंद्र सरकारच्या योजनांचा या प्रस्तावात उल्लेख केलेला आहे. ग्रामीण भागातील रस्ते, आदिवासी भागातील रस्त्यांची दुरावस्था आहे. नंदूरबारमधील प्रकाशा हा सीमेवरील तालुका आहेत, आजही ५-५ किलोमीटर डोलीतून जावे लागते. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी सांगलीबाबत उल्लेख केला आहे. कोकणातही धनगरवाडया आहेत. याकरीता आपण विशेष कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. असणाऱ्या रस्त्यावर पुन्हा डांबर किंवा काँक्रीट केले जाते. पण रस्ते नाही असे शेकडो वाडया, वस्त्या, तांडे आहेत, ते कनेक्ट करण्याची मागणी आहे.

सभापती महोदया, ग्रामविकास विभागाच्या २५:१५ निधीबाबत माझा आक्षेप आहे, यामध्ये विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारकडे निधीची मागणी केलेली असून ते दिलेले नाही, त्यामध्ये सरकारने दुजाभाव करणे योग्य नाही. मागील काळात मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांना जास्त निधी दिलेला आहे. असे विशेषत: सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांना मी सांगू इच्छितो. आता तुम्ही निधी देणार नसाल तर देऊ नका. उणेदुणे काय काढता. त्यामुळे हा दुजाभाव होत आहे. ग्रामविकास राज्यमंत्री अशा कामात काही वैयक्तिक मदत करतात, विरोधी पक्ष नेत्याचा थोडा सन्मान ते ठेवतात.

सभापती महोदया, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका आंदोलन करीत आहेत. त्यांच्याकरीता केवळ सहानुभूतीपूर्वक उत्तरात बोलून चालणार नाही. त्यांचे मानधन वाढविणे व इतर सुविधा तत्काळ देण्याची आवश्यकता आहे. स्वच्छ भारत मिशनमध्ये शौचालये बांधण्याचा उल्लेख आहे. मुंबईत वन जमीन आहे. उपनगरात गोरेगाव, मालाडपासून दहिसर चेक नाक्यापर्यंत तसेच ठाण्यातही वन जमीन आहे. या जागेवर आजही टॉयलेट बांधता येत नाही. मला वाटते की, याबाबत आपण निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. ते लोक वन जमिनीवर ४०-४० वर्षापासून राहात आहेत पण त्यांना टॉयलेट बांधण्यास परवानगी देत नसाल तर ते योग्य नाही. याबाबत

श्री.प्रवीण दरेकर.....

सरकारने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तालुका क्रीडा भवनचे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत.

**उप सभापती** : मंत्री महोदय त्यासंबंधी बैठक घेणार आहेत. अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी केवळ सूचनाच करीत आहे. तालुका क्रीडा भवनचे प्रस्ताव प्रलंबित आहेत ते मार्गी लावावेत असे मी सुचवत आहे. कांदिवली पूर्व येथे सलीम कंपाऊंड आहे, महसूल विभागाची ही जागा क्रीडांगणासाठी आरक्षित असूनही कार्यवाही झाली नाही. याबाबत मी सातत्याने मागणी करीत असून ती मार्गी लावावी.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

दुधाच्या बाबतीत देखील मागील सरकारने दुध उत्पादकांना अनुदान दिले होते. माननीय मंत्री श्री.सुनील केदार यांनी तर एफआरपी देण्याची चांगली भूमिका घेतलेली आहे. एफआरपी देणार तेव्हा द्या, परंतु तोपर्यंत सरकारने दुध उत्पादकांना वाढीव अनुदान द्यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.अमरनाथ राजुरकर : सभापती महोदय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा क्रमांक ०२ या अंतर्गत जे रस्ते निवडले जातात, त्याकरिता जी समिती गठित केलेली आहे, त्या सगळया समित्यांमध्ये विधानसभा सदस्यांची नियुक्ती केलेली आहे. त्यामध्ये एकाही विधानपरिषद सदस्यांची नियुक्ती केलेली नाही. काही लोक विधानपरिषदेमध्ये डायरेक्ट निवडून येतात. विधानसभा सदस्य ज्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेमधून आलेले असतात, त्याप्रमाणे विधानपरिषदेत देखील अनेक सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडून आलले असतात. निधी मिळाला नाही तर ५५०-६०० नगरसेवक, जिल्हापरिषद सदस्य निधी दिला नाही म्हणून अंगावर धावून येतात. हे तुम्हा-आम्हाला माहिती आहे. यामुळे विधानपरिषद सदस्य यांना या समितीमध्ये नेमले पाहिजे, यात सुधारणा करुन याबाबत एक नवीन जी.आर. काढावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, आपल्याही मतदारसंघामध्ये आदिवासी समाज भरपूर आहे. आमच्या नांदेड जिल्हयातही आदिवासी समाज भरपूर आहे. काही लोक बारा-पंधरा वर्षांपासून नोकरीवर लागलेले आहेत. त्यावेळी एसडीओ यांना जात प्रमाणपत्र देण्याचा अधिकार होता. त्यानंतर हा अधिकार व्हॅलिडिटी कमिटीकडे आलेला आहे. बारा-पंधरा वर्षांपासून नोकरीवर असलेले लोक अधिसंख्य पदावर शासकीय कर्मचारी म्हणून काम करीत आहे. या लोकांना शासन कायमस्वरुपी नोकरीत ठेवणार आहे का ? मन्नेरवारलू आणि महादेव कोळी या समाजाची लोक देखील यामध्ये आहेत.

**उप सभापती :** बरं आता असे आहे की, इतर सन्माननीय सदस्यांना देखील यावर बोलण्याची संधी मी देणार आहे. खरेतर हे नियमात बसत नाही. अन्यथा मलाच असे म्हणण्यात येईल की, तुम्हीच सर्वांना बोलण्याची संधी दिली. मी एक-एक मिनिट सर्वांना बोलण्याची संधी देणार आहे. सभागृहात मंत्रीमहोदय उपस्थित आहेत. सभागृहाने देखील तसे संकेत दिलेले आहेत. ही मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत जी समिती आहे, त्यामध्ये विधानसभेचे सदस्य नेमलेले आहेत. विधानपरिषदेचे सदस्य त्या समितीवर नेमलेले नाहीत. याबाबत मी आता येथून निर्देश देत आहे. ते आपण कशा पध्दतीने नियमात बसवायचे, याकरिता मुख्य सचिव यांच्याशी बोलून घ्यावे, आमच्या सभागृहातील अनेक सदस्य अनेक कमिटयांवर काम करीत आहेत. त्यामुळे प्रत्येक समितीवर दोन-दोन विधानसभेचे सदस्य नेमलेले आहेत. ज्या ठिकाणी एकापेक्षा अधिक जास्त सदस्य असतील तेथे दोन सदस्य नेमावे. एखाद्या ठिकाणी तीन सदस्य असतील तेथेही दोनच नेमण्यात यावे. एखाद्या जिल्हयात काही कारणाने कोणी नसेल तेथे विधानसभेतून विधानपरिषदेत निवडून गेलेले जे सदस्य आहेत, त्यांना जर का कोणत्या जिल्हयामध्ये स्थान नसेल तर त्यांना सामावून घ्यावे, असे मी निर्देश देत आहे.

श्री.विनायक मेटे ( खाली बसून ) : हे अधिवेशन संपण्याच्या आत याबाबतची घोषणा करण्यास सांगावे.

**उप सभापती :** हे अधिवेशन संपण्याच्या आत माननीय मंत्रीमहोदयांना यावर बैठक घेऊन त्याबाबत नियमात बदल करणे शक्य होणार नाही. माझे याबाबतचे निर्देश आहेत, म्हटल्यानंतर सरकारला ते स्वीकारावे लागतील. याबाबत माननीय मंत्रीमहोदय त्यांच्या उत्तरात शेवटी बोलतील.

आता मी यावर बोलण्याकरिता सन्माननीय सदस्यांना संधी देत आहे. एका बाबतीत तर सन्माननीय सदस्यांचे समाधान झालेले आहे. आता सन्माननीय सदस्यांनी यावर प्रश्न विचारताना अर्ध्या-एक मिनिटात सारांशाने आपले म्हणणे मांडावे.

असुधारित प्रत

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, ग्रामपंचायतींना ५०,२५,१५ लाख रुपयांची बक्षीस जाहीर करण्यात आलेली आहे, हा निर्णय चांगला व कौतुकास्पद आहे. बक्षीस केवळ जाहीर करुन उपयोगाचे नाही. मागील सरकारच्या काळात स्मार्ट गाव योजना जाहीर केली गेली होती. त्याकरिता ४० लाख रुपये जिल्हा आणि १० लाख रुपये तालुका याप्रमाणे बक्षीस जाहीर केली गेली होती. आता मात्र या योजनेचे नाव आघाडी सरकार आल्यानंतर बदलले गेले. आता हा पुरस्कार स्व.आर.आर.पाटील यांच्या नावाने ठेवलेला आहे. परंतु हा पुरस्कार केवळ नावापुरताच ठेवलेला आहे. पुढे या नावाचा व या पुरस्काराचा विसर या सरकारला पडलेला आहे. हे अतिशय दुर्दैवी आहे. आबासारख्या माणसाचा ज्यांनी ग्रामविकास खाते ज्यांनी अतिशय उत्तमरित्या सांभाळले होते. संत गाडगे बाबा आणि संत तुकडोजी महाराजांचा आदर्श ठेवत त्यांनी ग्रामविकास खाते अतिशय उत्तम रित्या सांभाळले होते. आबांच्या नावाने योजना जाहीर करुन त्याकरिता १६ फेब्रुवारी,२०२१ रोजी गावे देखील निवडलेली होती. आजतागायत त्यांना एक पैसाही दिला गेलेला नाही. आबांच्या नावाने जो पुरस्कार आहे, त्याचे वितरण ताबडतोब करावे, ही माझी मागणी आहे.

सभापती महोदया, बचत गटांबाबत मी सरकारचे अभिनंदन करतो. शासनाने मार्केट सुरु करण्याचा निर्णय जाहीर केलेला आहे. जिल्हयाच्या ऐवजी तालुक्यामध्ये जरी बचत गट मार्केट उभे राहिले तर सगळया भगिनींना त्याची मदत होईल. तालुका स्तरावरील निर्णय शासनाने त्वरित घ्यावा.

सभापती महोदया, बीडच्या पैलवानांकरिता अत्याधुनिक पध्दतीचे तालीम आणि इतर सोयी खास बाब शासनाने उभे करावे. सन्माननीय मंत्री श्री.संदिपान भुमरे बीड पंचायत समितीत १६ कोटी रुपयांची बोगस कामे केलेली आहेत, ती अपलोड देखील केलेली आहेत. त्याची चौकशी सुरु आहे, ती पूर्ण होत नाही. ती चौकशी पूर्ण करण्यात यावी, एवढी मी मागणी करीत आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, ग्रामविकास मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये ब्रिफींगप्रमाणे सांगितलेले आहे. चुकीचे ब्रिफींग करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. चुकीच्या ब्रिफींगमुळे माननीय मंत्रीमहोदयांवर हक्कभंग येईल, अशी स्थिती निर्माण केलेली आहे. ०६.०८.२०२१ चे जे पत्र आहे. श्री.प्रवीण जैन हे उप सचिव आहेत. त्यांनी यात म्हटलेले आहे की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावा. मी पूर्ण पत्र वाचत नाही, त्यातील काही ओळी वाचतो. त्या संदर्भात काही दिरंगाई झाल्यास संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व सरपंच यांना व्यक्तिगतरित्या जबाबदार धरण्यात येईल. काहींना तर अपात्र च्या नोटीसेस दिलेल्या आहेत. मंत्रीमहोदयांना मी या बाबत पूर्ण माहिती द्यायला तयार आहे. शासनाने असे पत्रक काढलेले आहे. "व्यक्तिगतरित्या जबाबदार म्हणजे काय आहे ! ग्रामपंचायत सरपंचाला व्यक्तीगत जबादार म्हणणे म्हणजे काय अपात्रच आहे !दुसर काय करणार आहे ! सरपंचाला व्यक्तीगत जबाबदार धरणे म्हणजे अपात्रच समजणे होय. सभापती महोदया, महाराष्ट्राच्या सरपंचाचा प्रश्न सुटला पाहिजे, आपल्यामार्फत हा प्रश्न सुटला पाहिजे.

**उप सभापती :** आपण त्यावर वेगळी चर्चा करु. आपण याबाबत बैठक घेऊ.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, आतापर्यंतच्या राज्याच्या इतिहासामध्ये कधीही रस्त्यावरील लाईटचे बिल हे कोणत्याही ग्रामपंचायतीने भरलेले नाही. माननीय मंत्री यांनी या वेळी सरकारकडून बजेट घेऊन जेवढे रस्त्यावरील स्ट्रीट लाईटची बिले प्रलंबित आहेत, ते सरकारने भरले पाहिजे, याची घोषणा सरकारने केली पाहिजे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदया, राज्यात मोठया प्रमाणात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना इत्यादि या सर्व योजना राज्यात सुरु आहेत. त्याचा जो अनुदानाचा दुसरा टप्पा कधी मिळणार आहे, असे मला शासनाला विचारायचे आहे. शासनाने म्हटलेले आहे की, हे अनुदान दिलेले आहे. हा दुसरा टप्पा कधी मिळणार आहे, हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे, हे सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

असुधारित प्रत

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, मी तीनही मंत्रीमहोदयांचे खरे तर विशेष अभिनंदन करतो. कारण सविस्तर चर्चा या विषयांवर सभागृहात झालेली आहे. माननीय सभापती महोदयांचेही मी या चर्चेबाबत अभिनंदन करतो. अन्यथा ज्यावेळी आम्ही विषय मांडतो, त्यावेळी आमच्याकडे शत्रुसारखे पाहिले जाते.

सभापती महोदया, क्रीडा मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे की, मी चुकून यापूर्वी नियुक्त्यांच्या बाबतीत २७ जागा असा उल्लेख केला होता. तो तसा नसून ५४ खेळाडूंचा नियुक्त्यांचा विषय आहे. दिव्यांगांमध्ये २० खेळाडूंच्या नियुक्तीचा मुद्दा आहे. आज मंत्रीमहोदयांनी त्यांच्या नियुक्त्यांच्या बाबतची घोषणा करावी.

सभापती महोदया, पशुसंवर्धन संदर्भात बोलायचे झाले तर गायीच्या बाबत येथे चर्चा झाली. आपल्याकडे देशी गायी देखील खूप आहेत. अडचण अशी झालेली आहे की, गायरान जी आहेत, त्या गायरानामध्ये जनावरांना सोडू दिले जात नाही. वन खात्यासमवेत मंत्रीमहोदयांनी याबाबत बैठक घ्यावी. मेंढपाळ आणि गायी चारणाऱ्यांना कुरणामध्ये जनावरांना सोडू दिले जात नाही. चराई कुरणाचा पास दिला जात नाही. जर आपण त्यांना तेथे सोडू दिले नाही तर ती जनावरे तेथे कशी राहतील. याबाबत वन खात्यासमवेत मंत्रीमहोदयांनी बैठक घ्यावी. एकदा रोपे लावल्यानंतर ती पाच वर्षानंतर खुली करणे अपेक्षित आहेत, याबाबत शासनाने निर्णय घ्यावा.

माननीय ग्रामपविकास मंत्रीमहोदयांकडे विनंती आहे की, धनगरवाडयांच्या बाबत वारंवार सभागृहात विषय मांडत आहे. मी शासनाला हात जोडून विनंती करतो की, सरकार जर याबाबत निर्णय घेणार नसेल तर नाम फाऊंडेशनच्या समवेत टाय-अप करावे.

यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

श्री. गोपिचंद पडळकर.........

शासनाने त्यांची जबाबदारी घेण्याची गरज आहे. नाम फाऊंडेशनला विनंती केल्यानंतर ते पोकलन उपलब्ध करुन देतील आणि गावात, वाडे आणि वस्त्यांवरील जे लमान तांडे, आदिवासी पाडे आणि धनगर वाडे असतील तर त्यांच्या बाबतीत शासनाने धोरण निश्चित करावे.

सभापती महोदया, पंतप्रधान आवास योजनेंतर्गत केंद्र शासन असे म्हणतात की, सन २०२४ पर्यंत देशातील एकही माणूस बेघर होणार नाही. ज्याला घर नाही त्या घर आणि ज्याला घर बांधायला जागा नाही त्याला ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. आतापर्यंत शासनाने एकालाही ५० हजार रुपयांचे अनुदान दिलेले नाही. गावातील सरपंचांना शासनाने निर्देश देण्याची गरज आहे. ज्या लोकांना घरे बांधण्यासाठी जागा नाही अशा लोकांचा ग्रुप करुन त्यांच्यासाठी ग्रुपवर जमीन खरेदी करण्याची आवश्यकता आहे. शासनाकडून ज्याला घर बांधायला जागा नाही त्याला ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. म्हणजे एकरी २० लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. असे केले तर गावील प्रश्न सुटण्यास एक प्रकारे मदतच होणार आहे.

सभापती महोदया, माननीय रोजगार हमी योजना मंत्री महोदयांना अशी विनंती करतो की, त्यांच्याकडे असलेल्या विभागामुळे गाव-वाड्यातील लोकांमध्ये प्रचंड परिवर्तन होणार आहे. त्यांनी आतापर्यंत खूप चांगले निर्णय घेतलेले आहेत. जुनी जॉब कार्ड आहेत. कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढलेली आहे. अनेक कुटुंबे विभक्त झालेली आहेत. माननीय रोजगार हमी योजना मंत्री महोदयांनी जॉब कार्ड नूतनीकरणासाठीचा आदेश तहसीलदारांना द्यावा. सर्व जानिहाय शेतकऱ्यांना......शेतकऱ्यांना जात कशी काय असू शकते ? म्हणून मी अशी विनंती करीत आहे की, जातीची अट काढून टाकण्यात यावी आणि सर्व शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल अशा पध्दतीचे निर्देश द्यावे.

असुधारित प्रत

सभापती महोदया, कोविड महामारीमुळे आता ग्रामसभा होत नाहीत. आपले लेबर बजेट ग्रामसभेत तयार केले जाते. म्हणून ग्रामसभेची अट काढून टाकण्यात यावी. असे लोकांचे म्हणणे आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांना सांगू इच्छिते की, आपण उपस्थित केलेल्या विषयासंदर्भात माननीय मंत्री महोदयांना बैठक घेण्यास सांगितले जाईल.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, सरपंच अमुक पार्टीचा असल्यामुळे मुळ लाभार्थी लाभापासून बाजूला राहत आहे. त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी संबंधितांना निर्देश द्यावेत, अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदया, दुष्काळी तालुक्यात ५ एकरावरील अट असून, ती अट शिथिल करुन टाकण्याची गरज आहे. जेणेकरुन जास्तीत जास्त निधी या कामावर खर्च होणार आहे. या जाचक अटी काढण्याची घोषणा माननीय मंत्री महोदय करतील काय असा माझा प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधिमंडळाच्या कामकाजात हे मी पहिल्यांदाच पहात आहे की, हा सत्ताधारी पक्षाने दिलेला प्रस्ताव आहे. त्यावर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले असून, ते समाधानकारक असेल किंवा नसेल तर हा मुद्दा वादाचा असू शकतो. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर त्यावर विरोधी पक्षातील आणि सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारुन आतापर्यंत अर्धातासाचा वेळ घेतलेला आहे. ही पध्दत नाही. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे सदरहू प्रस्तावासंबंधी समाधान झाले नसेल तर त्यांनी दुसऱ्या आयुधांचा वापर करुन प्रश्नाची सोडवणूक करावी. सत्ताधारी पक्षाने दिलेला प्रस्ताव आहे. त्यावर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले असून, त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते प्रश्न विचारु शकतात आणि तो त्यांचा अधिकार आहे. मी मघासपासून पहात आहे की, दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारत आहेत. मी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना दोष देणार नाही. कारण ते संधीचा फायदा घेणार. सदरहू प्रस्तावासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर तो समाप्त झाला

होता. त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दोन ते तीन प्रश्न विचारले असून, तो त्यांचा अधिकार आहे. इथपर्यंत ठीक आहे. माननीय सभापती महोदयांनी या प्रस्तावासंदर्भातील चर्चा थांबविली पाहिजे, एवढेच मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सदनाच्या कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे, ज्ञान आहे याविषयी आमचे काहीच दुमत नाही. सभागृहात कामकाज करीत असताना सभागृहाचा सेन्स लक्षात घेतला जातो. अशा वेळी वेळा माननीय सभापती महोदयांनी नियमाला बगल दिलेली आहे. अशा वेळी माननीय सभापती महोदयांनी विशेष अधिकारामध्ये सभागृहातील सनमाननीय सदस्यांच्या भावना बघून निर्णय घेतल्याबद्दल आम्ही अभिनंदन करीत आहे. पुन्हा अभिनंदन करतो. त्यामुळे कट टू कट नियमावर जाण्याची आवश्यकता नाही. ग्रामविकास विभागातील वाडे, वस्त्यांवरील रस्त्यांचा विषय आहे. सदरहू प्रस्तावात पशुसंवर्धन, रोजगार हमी योजनेचा समावेश आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना अशा वेळी पाच ते दहा मिनिटे दिली आणि अशा वेळी त्यांच्या प्रश्नाला न्याय मिळत असेल तर ते खूप चांगले आहे. कायद्यावर बोट ठेऊन सभागृहाचे कामकाज चालविता येणार नाही. माननीय सभापती महोदयांनी दिलेल्या संधीचे मी समर्थन करतो, आभार व्यक्त करतो. कारण शेवटी सन्माननीय सदस्यांचे समाधान होणे हा त्यांचा अधिकार आहे आणि त्या अधिकाराचे जतन केले जाते असून, त्याला कायद्याच्या चौकटीत बसविण्याची आवश्यकता नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. याबद्दल त्यांचा अभ्यास, अनुभव, प्रघात याची त्यांना पूर्णपणे कल्पना आहे. आपण अनेक वेळेला सत्ताधारी पक्षाने उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना त्यांची मते व्यक्त करण्यासाठी संधी देतो. अनेक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळत नाही. पण माझ्याकडून तो प्रमाद घडला असे मी गृहीत धरते. परंतु, सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव अनेक दिवसानंतर आलेला असून, त्यामध्ये पाच ते ते सहा विभागाचा अंतर्भाव आहे. आपण कुठे ही असलो तरी जनतेची कामे करणे हे प्रत्येक सन्माननीय सदस्यांचे

असुधारित प्रत

कर्तव्य आहे. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना राईट टू रिप्लायची परवानगी दिलेली आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस यांनी शेवटचा प्रश्न विचारावा आणि त्यानंतर माननीय मंत्री महोदय उत्तरे देतील आणि त्यानंतर सभागृहाची विशेष बैठक स्थगित केली जाणार आहे.

श्री. सुरेश धस : सभापती महोदया, माननीय ग्रामविकास मंत्री महोदयांना मी एक प्रश्न विचारला होता. ज्या हद्दीत नगरपंचायती झालेल्या आहेत. नगरपालिका आणि नगरपरिषदा आहेत. त्याबाबतीत ग्रामविकास विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. परंतु, त्याला १९९९ ची अट टाकलेली आहे. ही अट रद्द करुन या सर्व प्रॉपर्टीज....त्या त्या नगरपंचायतीकडे विशेषत: .... कारण या नगरपंचायती होत असताना तालुक्याच्या ठिकाणचे गाव म्हणून नगरपंचायती झालेल्या आहेत आणि मराठवाडा आणि विदर्भात मेजॉरिटी पाहिली असता यासंदर्भातील शासन निर्णय तातडीने निर्गमित केला जाईल काय ?

सभापती महोदया, माननीय पशुसंवर्धन मंत्री महोदयांना विचारला होता की, एम्ब्रीओ ट्रान्सप्लान्टच्या बाबतीत... याबाबत समिती असून, ती मुख्य सचिव आणि सचिवांच्या अध्यक्षतेखाली आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदय सहकारी संस्थांना तातडीने कोणती मदत करणार असा माझा प्रश्न आहे.

श्री. सुनील केदार : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेले आहेत.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांनी राज्यात चांगले खेळाडू निर्माण करावयाचे असतील तर त्यांना प्रॅक्टिस करण्यासाठी तसेच त्यांना आर्थिक सहाय्य देण्याची आवश्यकता आहे. मी याबाबतीत त्यांना सांगू इच्छितो की, राज्यात प्रबोधनी नावाची एक योजना ऑलरेडी सुरु आहे. या व्यतिरिक्त बालेवाडीमध्ये हॉस्टेलची व्यवस्था आहे. त्या ठिकाणी खेळाडूंना प्रॅक्टिस करता येईल आणि शिक्षणही घेता येईल. या व्यतिरिक्त आणखी काहीही असल्यास शासन म्हणून त्यांची जबाबदारी स्वीकारण्यास मागे पुढे पाहणार नाही.

असुधारित प्रत

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री प्रवीण दरेकर यांनी राईट टू रिप्लायमध्ये काही प्रश्न विचारले आहेत. याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, मी आजच त्याला मंजुरी दिली आहे असे त्यांनी गृहीत धरावे आणि एका महिन्याचा आत...

श्री. सुनील केदार.....

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी अपंग मुलांच्या भरतीच्या संदर्भातील विषय उपस्थित केलेला आहे. याचा मी आलेख घेणार आहे. असे असले तरी रिक्रुटमेंट हा कलाकारीचा विषय असल्यामुळे आमचा विभाग नियम बदलत आहे. पूर्वी मी हे सदनाला अवगत केलेले आहे. खेळाडूंचे शिक्षण खूप झालेले असते. कोणी ग्रॅज्युएट असते तर कोणी पोस्ट ग्रॅज्युएट असते. त्यांना मिळणाच्या मेडलच्या धर्तीवर नोकरी दिली जाते. कोणाला शिपाईची नोकरी दिली जाते. पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या खेळाडूने शिपाईची नोकरी केली तर त्याची अवहेलना होते आणि त्याला एक प्रकारे मानसिक त्रास होतो. त्यामुळे ती सिस्टिम लवकरात लवकर बदलली जात आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी वन विभागासमवेत बैठक आयोजित करण्यासाठी विनंती केली होती. तशी बैठक लवकरच आयोजित केली जाईल.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस यांनी एम्ब्रीओ ट्रान्सप्लंटचा विषय उपस्थित केलेला आहे. हा नागपूर आणि पुण्यात सुरु आहे. एखादी संस्था पुढे आली तर आम्हाला तपासून..... कारण एम्ब्रीओबाबत दक्षता घ्यावी लागेल. कारण हा सायंटेफिक विषय आहे. एम्ब्रीओ ट्रान्सप्लंटचा विषय उपस्थित केला आणि ते चुकीचे झाले तर शेतकऱ्याचे कायमस्वरुपी नुकसान होते. व्यवस्थित नियमावली करुन योग्य तो निर्णय घेतला जाईल. मी दिलेल्या उत्तराने सन्माननीय सदस्यांचे समाधान झालेले असेल असे गृहीत धरतो.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी बीड जिल्ह्यातील तालीम बाबत सांगितलेले आहे.....बीड जिल्ह्यातील पैलवानांची सन्माननीय सदस्यांना खूपच चिंता

असुधारित प्रत

आहे.....तसेच तालीमची माहिती घेऊन आणि ज्या ठिकाणी नितांत आवश्यकता असेल अशी एखादी शिफारस केली तर त्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**उप सभापती** : माननीय मंत्री श्री.संदिपानराव भुमरे, या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्यांची आपण नोंद घेतली असे मी गृहीत धरते.

माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार, आपण उत्तर देताना अनेक मुद्यांचा उल्लेख केला. आपण महिला बचत गटांच्या बाबतीत बैठक घेण्याचे ठरविले आहे. ज्यांनी या विषयी मुद्दे उपस्थित केले त्या सन्माननीय सदस्यांना आणि महिला सदस्यांना उक्त बैठकीसाठी बोलविण्यात येईल. तसेच पत्राच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीच्या जबाबदारीबाबत जो वाद निर्माण झालेला आहे तो सभागृहात थांबेल असे मला वाटत नाही. त्यामुळे या विषयी अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीला माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे आणि आपणास बोलाविण्यात येईल. तसेच अपात्र ठरविण्याबाबतच्या नोटीसेस आलेल्या आहेत असे आपण सांगितले आहे. आपण त्या नोटीशीच्या प्रती बैठकीला येताना सोबत घेऊन याव्यात. त्यातील एक-दोन प्रकरणांवर बैठकीत चर्चा करु या. मंत्री महोदय, आपण या विषयी थेट बैठक बोलाविली तरी चालेल. जर माझी आवश्यकता असेल तर आमच्याकडून बैठक आयोजित करण्यात येईल. या खेरीज जे मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत त्याची आपण नोंद घेतल्याचे सारांशरुपाने सांगावे, जेणेकरुन ही चर्चा संपविता येईल.

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अमरनाथ राजूरकर यांनी जी भावना मांडली त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी १९९९ च्या निर्णयानुसार सर्व मालमत्ता नगर पंचायतीकडे हस्तांतरित करण्याच्या बाबतीत मुद्दा मांडला आहे. जिल्हा परिषदेचा देखील उल्लेख केला आहे. या बाबतीत दोघांशी चर्चा करुन कार्यवाही करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी धनगर समाज आणि बंजारा समाजाच्या बाबतीत ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या बरोबर आहे. या विषयी आपल्यासोबत चर्चा करण्यात येईल. तसेच नाम फाऊंडेशन आणि शासनाच्या माध्यमातून काही करार करता आला आणि त्या ठिकाणी सरकारच्या वतीने

श्री.अब्दुल सत्तार.....

असुधारित प्रत

डिझेलची व्यवस्था करता आली तर निश्चितपणे चांगले होईल. माननीय मंत्री आणि मुख्य सचिव यांच्याशी चर्चा करुन या विषयी एक बैठक आयोजित करण्यात येईल.

माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिले आहेत की, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा प्लान तयार होतो त्या समितीमध्ये केवळ विधानसभेचे सदस्य आहेत, त्या समितीमध्ये विधानपरिषदेच्या सदस्यांचा समावेश असावयास पाहिजे. माननीय सभापती महोदयांच्या आदेश वा निर्देशांचा सन्मान करण्यात येईल. या विषयी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री महोदय, मंत्री महोदय व मुख्य सचिव यांच्याशी चर्चा करण्यात येईल. त्यावेळी उप सभापती महोदया यांना सुद्धा आमंत्रित करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या सूचना सरकारच्या कायद्यामध्ये, नियमामध्ये कशा समाविष्ट करता येतील ते बघितले जाईल. या बाबतीत दोन नियम असून, एका नियमाप्रमाणे सूचना समाविष्ट करता येते आणि दुसऱ्या नियमाप्रमाणे करता येत नाही. एक नियम असा आहे की, या बाबी नियमामध्ये बसवून करता येतात. सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना मांडल्या आहेत त्या अनुषंगाने अंमलबजावणी करताना सरकार निश्चित..... आर.आर.पाटील ऊर्फ आबा यांच्या नावाच्या पुरस्काराच्या बाबतीत मी अगोदरच सांगितले आहे. तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर, विभागीय स्तरावर किंवा राज्य स्तरावर स्मार्ट गावाला जे पारितोषिक दिलेले आहे, त्या बाबत लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात येईल.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.४५ वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.३३ ते १२.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : प्रश्नोत्तरे ....

**<u>एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाच्या</u>**

**<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत</u>**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा पाईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सभागृहात गेल्या आठवड्यात ३ वेळा प्रश्न उपस्थित केले. आपण एसटी कर्मचाऱ्यांबाबत निर्णय घेतला. आपण पुढाकार घेऊन येथे चर्चा केली. चर्चेमध्ये काय बोललो ते येथे सांगण्याचा आम्हाला अधिकार नाही. परंतु त्याबाबतचा प्रश्न मिटला असे समजून आम्ही बाहेर पडलो. आम्ही घरी आल्यावर लोकांना सांगितले की, तुमचा प्रश्न मिटलेला आहे. आम्ही होळीच्या अगोदर प्रश्न मिटवा असे सांगितले होते. सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत हे देखील सभागृहात उपस्थित आहेत. काल पुन्हा ३ लोकांनी आत्महत्या केल्या. गांभीर्य नाही का ? विधीमंडळाचे कामकाज चालू असताना या काळात ८ ते १० कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत ही गंभीर बाब आहे. आता या संदर्भात कोणता तरी निर्णय झाल्याशिवाय हे सभागृह आम्ही चालू देणार नाही. सदर बाबतीत निर्णय झाला पाहिजे. आपल्याकडून आम्हाला न्याय मिळाला पाहिजे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, अत्यंत गंभीर विषय आहे. अधिवेशन सुरु असताना रोज २-३ कर्मचारी आत्महत्या करीत आहेत. मी आपल्याला धन्यवाद देईन की, आपण या विषयाचे गांभीर्य समजून येथे चर्चा घडवून आणली. आपण येथील चर्चेनंतर समिती केली. आपल्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली. बैठकीला माननीय परिवहन मंत्र्यासोबत सर्व पक्षांचे माननीय प्रमुख नेते होते. बैठकीला सन्माननीय सदस्य सर्वश्री. शशिकांत शिंदे, भाई गिरकर, विनायक मेटे असे आम्ही सर्वजण उपस्थित होतो. बैठकीत निर्णय झाला. १६ मागण्या होत्या. विलिनीकरण

श्री. प्रवीण दरेकर ....

नको अशी मानसिकता सन्माननीय सदस्य सर्वश्री. सदाभाऊ खोत, गोपिचंद पडळकर यांनी सर्व कर्मचाऱ्यांशी बोलून केली. आम्ही राज्यातील विविध डेपोंमध्ये २ दिवस सर्वांशी बोललो. माननीय परिवहन मंत्री आणि आपल्याला शब्द दिला होता की, २-३ दिवसांत ९० टक्के लोक कामावर येतील. आम्ही मेहनत घेतली. लोक मरत आहेत. आपण विलिनीकरण करु नका.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती महोदय, सरकारच्या एवढ्या संवेदना का गोठल्या आहेत ? माझी आज मागणी आहे. मी टोकाचे सांगत आहे. आपण परिवहन खात्यातील कर्मचाऱ्यांचा प्रश्न मिटविला नाही तर आम्ही सभागृहाचे कामकाज अजिबात चालू देणार नाही. तुमचा, सभागृहाचा अवमान आहे. माननीय परिवहन मंत्र्यांची भावना प्रामाणिक आहे, त्यांनी प्रयत्न केले आहेत. मात्र गाडी कुठे अडली आहे ? त्यांनी सांगितले होते की, ३ दिवसांनी येऊन येथे निवेदन करतो. मात्र त्यांनी निवेदन केले नाही. आम्हाला निर्णय हवा आहे. आम्हाला उत्तर पाहिजे. संप मिटला पाहिजे. विलिनीकरण करा किंवा करु नका. मात्र लोक रोज मरत आहेत.

**सभापती** : अशा गोंधळाच्या परिस्थितीमध्ये सदनाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.४८ ते दुपारी १२.५८ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)**

**तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) :** सभागृहाची बैठक १० मिनिटे स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १२.५८ ते ०१.०८ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती :** माननीय परिवहन मंत्र्यांनी शासनाच्या वतीने ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या संदर्भात ते प्रतिक्रिया देणार आहेत. आपण त्यांचे म्हणणे ऐकून घेऊ.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत जो मुद्दा उपस्थित केला त्यावर मी यापूर्वी सविस्तर निवेदन केले होते. एसटी कर्मचाऱ्यांचा संप मिटणे जनतेच्या व एसटी कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहे. या संदर्भातील प्रकरण कोर्टात आहे. कोर्टाने राज्य शासनाला त्रिसदस्यीय समितीचा अहवाल मंजूर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. परंतु त्यासाठी मंत्रिमंडळाची मंजुरी घ्यावी लागते. आज, उद्या किंवा परवा मंत्रिमंडळाची बैठक होईल. त्या बैठकीत तो ठराव सादर केला जाईल. आर्थिक तरतुदी असल्यामुळे त्याची जबाबदारी राज्य शासनाने घेणे गरजेचे असल्यामुळे त्यासाठी मंत्रिमंडळाची मंजुरी घेणे आवश्यक आहे आणि तशा प्रकारची मंजुरी पुढील दोन दिवसात घेतली जाईल.

**सभापती :** परिवहन मंत्री महोदयांनी निवेदन केलेले आहे. आता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माननीय परिवहन मंत्री यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. अहवाल स्वीकारला म्हणजे राज्य शासन आर्थिक भार उचलण्यासाठी तयार आहे असा त्याचा अर्थ आहे. माझी विनंती आहे की, दोन दिवसांनी अधिवेशन संपल्यानंतर हा विषय बासनात गुंडाळून ठेवला जाईल.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर......

हा महत्त्वाचा विषय असल्यामुळे या संदर्भात आज कॅबिनेट बैठक घ्यावी. राज्यात रोज लोक मरत आहेत. राज्यात यापेक्षा दुसरा महत्त्वाचा विषय राहू शकत नाही. सभापती महोदय, माझी आपल्याला व परिवहन मंत्र्यांना विनंती आहे. हा तातडीचा विषय असल्यामुळे आज माननीय मुख्यमंत्री येणार असल्यास आजच्या आज कॅबिनेट बैठक घ्यावी. जेणेकरुन जनतेचा आपल्यावर विश्वास राहील. २-३ दिवसानंतर अधिवेशन संपणार आहे. त्यामुळे सर्व लोकांचे अधिवेशनाकडे लक्ष लागलेले आहे.

**सभापती** : मंत्री महोदय, आज शक्य झाल्यास आज अन्यथा उद्या कॅबिनेटची बैठक घ्यावी.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री थोडयाच वेळात येणार आहेत. मी त्यांना यासंबंधी विनंती करुन लवकरात लवकर शक्य झाल्यास आज अन्यथा उद्या कॅबिनेटची बैठक घेऊ.

**सभापती** : ठीक आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**सभापती** : आता दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक १२७१५ घेण्यात येईल.

(प्रेस : सोबत जोडलेला राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक १२७१५ छापावा.)

------------

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. १२७१५

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. दिनांक २८ मार्च, २०२० रोजी तत्कालीन सन्माननीय सदस्य शरद रणपिसे यांच्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना अल्पसंख्याक विकास मंत्री श्री.नवाब मलिक यांनी एक घोषणा केली होती की, राज्यातील मुस्लीम समाजातील लोकांना शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षण देण्याची तरतूद करणारा अध्यादेश लवकरच काढण्यात येईल. मुस्लीम समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकार कटीबद्ध आहे. मुस्लीम समाजाच्या आरक्षणासाठी लवकरच अध्यादेश काढण्यात येईल. मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण लागू व्हावे व मुस्लीम समाजाला आरक्षण मिळावे हा सरकारचा प्रयत्न आहे. सभापती महोदय, संविधानामध्ये धर्माच्या आधारे आपण आरक्षण देऊ शकत नाही. तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत घटनेतील तरतुदी तपासून निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे. एका बाजूला संविधानामध्ये धर्माच्या आधारे आपण आरक्षण देऊ शकत नाही. तसेच सद्यस्थितीत आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्यामुळे मुस्लीम समाजास आरक्षण देणे शक्य नाही. सदर आरक्षणामुळे इतर आरक्षणावर त्याचा कसा परिणाम होणार आहे याबाबत मी सदनाला माहिती देतो. आपण धर्माच्या आधारे आरक्षण दिल्यास ओबीसी, एससी किंवा एसटी तसेच मराठा आरक्षणावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. एससी तसेच एसटी समाजाला लोकसंख्येच्या आधारावर आरक्षण दिलेले आहे. उर्वरित आरक्षणामध्ये ५० टक्क्यांपर्यंत ओबीसी तसेच इतर समाजांना आरक्षण मिळते. त्यामुळे अधिकचे आरक्षण दिल्यास आपल्याला तेवढा आरक्षणाचा टक्का कमी करावा लागेल. तसेच त्यामुळे मराठा आरक्षण देखील अडचणीत येईल. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण दिले जाऊ शकत नाही. विशेष बाब म्हणून मराठा समाजाला अतिरिक्त आरक्षण देण्यात आले होते. सभापती महोदय, माझे ३ स्पेसिफिक प्रश्न आहेत. दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी अल्पसंख्याक मंत्री यांनी मुस्लीम आरक्षणाचा अध्यादेश काढण्याबाबत विधान परिषदेत घोषणा करण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री यांची परवानगी घेतली होती का ?

अस्वाधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. १२७१५

श्री.प्रवीण दरेकर....

नसल्यास माननीय मुख्यमंत्री अल्पसंख्याक मंत्री यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहेत ? मुस्लीम आरक्षणाला शिवसेनेचा पूर्ण विरोध आहे. आम्हाला याची कल्पना आहे. त्यामुळे आज राज्यात शिवसेनेचे मुख्यमंत्री आहेत. सदर आरक्षणासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांची भूमिका काय आहे ? याबाबतची माहिती राज्यातील जनतेला समजली पाहिजे.

श्री.विश्वजीत कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी एका महत्त्वाच्या विषयावर तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून सदनाचे लक्ष वेधलेले आहे. महाराष्ट्रातील मुस्लीम समाजाच्या आरक्षणाच्या बाबतीतील घटनाक्रम मी आपल्या परवानगीने सदनाला सांगू इच्छितो. आपल्या सर्वांना माहीत आहे की, दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी तत्कालीन राज्य शासनाने एसबीसी(अ) या माध्यमातून मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता...(अडथळा)... त्यानंतरच्या कालावधीत झालेला घटनाक्रम मी सदनाला सांगत आहे. त्यावेळी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसारच एसटी, ओबीसी तसेच एसबीसी अशा भटक्या जमाती प्रवर्गातील मुस्लीम जातींना आरक्षण देण्यात आले होते. दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी मुस्लीम समाजातील ५० मागास जातींना ५ टक्के आरक्षण देण्यासंबंधी अल्पसंख्याक विभागाचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी उच्च न्यायालयाने मुस्लीम समाजाच्या आरक्षणासंबंधी आदेश दिलेले आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी ज्या गोष्टींचा उल्लेख केला होता, ती वस्तुस्थिती आहे. धर्माच्या आधारे समाजाला आरक्षण देणे ही बाब संविधानाच्या घटनेप्रमाणे संयुक्तिक नाही असे उच्च न्यायालयाने मत व्यक्त केले होते. तसेच ५० टक्क्यांच्या वर आरक्षण जाऊ नये याकरिता संविधानाच्या आधारे उच्च न्यायालयामध्ये निर्णय झालेला आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी उल्लेख केल्याप्रमाणे ओबीसी समाजातील बांधव, मराठा आरक्षणाचा प्रश्न तसेच ओबीसी आरक्षणासंबंधी उच्च

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. १२७१५

श्री.विश्वजीत कदम....

न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका आपल्या सर्वांना माहीत आहे. अशा परिस्थितीत ५० टक्क्यांवर आरक्षण जाऊ नये. तसेच ५० टक्क्यांच्या आत असलेल्या आरक्षित समाजातील जाती, जमातींच्या आरक्षणाला कोणताही धक्का लागू नये अशी राज्य शासनाची भूमिका आहे. परंतु मुस्लीम समाजातील बांधवांना आरक्षण मिळावे, त्यांना न्याय मिळावा याकरिता संयुक्तपणे सकारात्मक दृष्टीने पावले टाकण्यासंबंधी तत्कालीन शासनाने दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी अध्यादेश काढून निर्णय घेतला होता. मध्यंतरीच्या काळात दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी उच्च न्यायालयाने निर्णय दिला होता. त्याचे कायद्यात रुपांतर झाले होते. मध्यंतरीच्या काळात उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे शासनाने काढलेला अध्यादेश लॅप्स झाला. त्यामुळे शासनाला मुस्लीम समाजाकरिता आरक्षण देता आले नाही. ही बाब आपल्या सर्वांना माहीत आहे. अशा परिस्थितीत मंत्री महोदयांनी मागील अधिवेशनाच्या कालावधीत मुस्लीम बांधवांच्या आरक्षणासंबंधी जे वक्तव्य केले होते, त्यासंबंधी मी सदनाला सांगू इच्छितो की, राज्य सरकार सकारात्मक आहे. उच्च न्यायालयामध्ये सदर आदेश आल्यामुळे सध्या त्याला स्थगिती आहे. ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये जी सकारात्मक भूमिका मांडायची आहे. ती मांडण्याकरिता शासनाकडून प्रयत्न केला जाईल. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे भविष्यकाळात याबाबतीत राज्य शासनाकडून निर्णय घेतला जाईल.

श्री.अब्दुल्लाह खान दुर्राणी : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, माननीय उच्च न्यायालयाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी या प्रकरणी अंतरिम निर्णय दिलेला आहे. सदर अंतरिम आदेशाद्वारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार आतापर्यंत किती विद्यार्थ्यांना सदर आरक्षणाचा लाभ मिळाला आहे तसेच किती विद्यार्थ्यांनी सदर आरक्षणाचा लाभ घेतला आहे ?

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. १२७१५

श्री.अब्दुल्लाह खान दुर्राणी ....

सभापती महोदय, ओबीसीकरिता २७ टक्के आरक्षण राखीव आहे. त्यात ओबीसीमधील मुस्लीम समाज देखील येतो. माझी शासनाला विनंती आहे की, ओबीसी समाजाकरिता असलेल्या २७ टक्के आरक्षणातून ओबीसी मुस्लीम समाजाकरिता वेगळे ४ टक्के आरक्षण देता येईल का व त्यासंबंधी शासन सकारात्मक आहे का ?

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. १२७१५ .....

डॉ.विश्वजीत कदम : मी सांगितल्याप्रमाणे एससी, ओबीसी, एसबीसी, भटक्या जाती व जमातीमधील ज्या मुस्लीम जातींना आरक्षण देण्यात आलेले आहे ते पूर्वीप्रमाणे सुरु राहील. मुस्लीम समाजबांधवांच्या ज्या ५० पोटजाती आहेत, ज्या गॅझेटमध्ये नोटीफाईड आहेत त्या सर्वांना शासनाच्या आदेशान्वये पूर्वीप्रमाणे कायम राहतील. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, किती मुस्लीम विद्यार्थ्यांना या आरक्षणाचा फायदा मिळाला आहे, मध्यंतरी शासन निर्णय झाला, कोर्टात वेगवेगळया केसेस दाखल झाल्या, कोर्टात स्टे मिळेपर्यंत ४ ते ६ महिन्याचा कालावधी होता, यानुसार मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळाले. त्या सर्वांना त्याचा लाभ मिळालेला आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर दुटप्पी आहे. त्यांनी सांगितले की, घटनेतील तरतुदीनुसार धर्माच्या आधारे आरक्षण देता येत नाही. ५० टक्के आरक्षणाची मर्यादाही ओलांडली जात आहे. याचा अर्थ ५० टक्केच्या वर आपणास जाता येणार नाही. एका बाजूला मराठा व ओबीसी समाज आरक्षणासाठी झगडत आहे. पुन्हा २७ टक्केमधून ओबीसीचे ४ टक्के आरक्षण देण्याची मागणी होत आहे. मी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी बगल दिली आहे. मागे एकदा दिवंगत शरद रणपिसे यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात मंत्री महोदयांनी सांगितले की, होय हे आरक्षण देत आहे. त्यावेळी वर्तमानपत्रात शिवसेनेची भूमिका आली होती की, आम्ही त्याच्याशी सहमत नाही. राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांची भूमिका महत्वाची आहे की नाही. मुस्लीम समाज आमचेही बांधव आहेत, ते केवळ काँग्रेसचेच बांधव नाहीत. शेवटी कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करता येणार नाही.

**सभापती** : राज्यमंत्री महोदयांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. धर्माच्या आधारावर आरक्षण देता येते की नाही हा प्रश्न ज्यांना कोणाला पडत असेल त्यांनी तेथे हा प्रश्न उपस्थित करावा. देता येईल की नाही ते न्यायालय ठरवेल. ****

---

**** शब्द मागे घेण्यात आले.

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. १२७१५ .....

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मुख्यमंत्री पदावर असताना त्यांनी तसे स्टेटमेंट केलेले आहे.

**सभापती** : ठीक आहे. माझे शब्द मी मागे घेतो, याबाबत धोरण निश्चित होणारच आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपणच एका बाजूला म्हटले आहे की, मुस्लीम समाजाला धर्माच्या आधारावर आरक्षण देता येत नाही. बोलताना वेगळे सांगितले जाते व उत्तरामध्ये खरे आहे असे सांगितले जाते. मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याची तयारी सुरु आहे असे सांगितले आहे.

सभापती महोदय, आरक्षण दिल्यानंतर नोव्हेंबर २०१४ मध्ये यास स्थगिती आली, तेव्हा दोन गोष्टी होत्या. मुस्लीम समाजाच्या नोकरीतील आरक्षणास स्थगिती आली पण शिक्षणातील ५ टक्के आरक्षण कंटीन्यू ठेवले व दिले. शिक्षणातील ५ टक्के आरक्षणाकरीता अध्यादेश काढणार किंवा अधिवेशनात घोषणा करणार का. हे आरक्षण देण्याची हिंमत होत नाही, तोपर्यंत ओबीसी, धनगर, मराठा समाजाला सोयीसवलती दिलेल्या आहेत तशा सवलती आपण मुस्लीम समाजासाठी देण्याची घोषणा करणार का ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, मुस्लीम समाज आरक्षणाबाबत ज्या घटना न्यायालयात घडत गेल्या त्या सर्व ज्ञात आहेत. हे सरकार मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याकरीता सकारात्मक आहे. ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण देता येत नाही हे देखील न्यायालय म्हणते.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला बोलायचे आहे.

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. १२७१५ .....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इचिछतो की, तुम्हाला सर्व माहिती आहे पण आम्हाला समजून घ्यायचे आहे.

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ५ टक्के शिक्षणातील आरक्षण देण्याबाबतची शासनाची भूमिका आहे. ३५४ विद्यार्थ्यांना या आरक्षणाचा फायदा मिळालेला आहे व पुढे मिळत राहील. मराठा, ओबीसी, धनगर समाज बांधवांना न्याय मिळावा, पण ५० टक्के आरक्षणाचा संविधानिक विषय न्यायालयाचा आहे. न्यायालयाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करुन सर्व सुविधा दिल्या जातील.

डॉ.वजाहत मिर्झा : सभापती महोदय, मुस्लीम समाजाला धर्माच्या आधारावर आरक्षण देण्यात आलेले नाही हे मी येथे सांगू इच्छितो. ते विशेष मागास प्रवर्गामध्ये ५० पोटजातींना मुस्लीम आरक्षण देण्यात आले होते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी धर्माच्या आधारावर आरक्षण दिल्याचे सांगितले आहे पण ते चुकीचे आहे. उच्च न्यायालयाने ५० पोटजातींना आरक्षण देण्याची बाब मान्य केलेली आहे. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाने नोकरीत नव्हे तर शिक्षणामध्ये आरक्षण कायम ठेवले आहे, हे आरक्षण आपण पुढे कायम चालू ठेवणार का. तसेच मागासवर्गीयांसाठी बार्टी, सारथी, महाज्योतीप्रमाणे स्वतंत्र संस्था स्थापन करणार का ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, मुस्लीम आरक्षणाबाबत व सुविधांबाबत न्यायालयाकडून देण्यात येणाऱ्या आदेशाचे पालन तंतोतंत केले जाईल असे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मुस्लीम समाजाला धर्माच्या आधारावर आरक्षण देता येत नाही. पण आंध्रप्रदेश सरकाराने या प्रकारे ५ टक्के आरक्षण दिलेले आहे. २०१४ मध्ये सांगितले त्यावेळी युतीचे सरकार नव्हते ते आघाडीचे सरकार होते त्यांनी त्यावेळी आरक्षण दिले होते. मुख्यमंत्री म्हणत होते की, धर्माच्या

श्री.भाई गिरकर .....

आधारावर देता येत नाही. अल्पसंख्यांक मंत्री महोदयांनी घोषित केले होते, त्याबाबत आपले मत काय आहे. सर्वोच्च न्यायालय म्हणते धर्माच्या आधारावर मुस्लीम समाजाला आरक्षण देता येत नाही. हे आरक्षण देता येते की नाही यावर शिवसेनेचे काय मत आहे.

**सभापती** : मी पुढील प्रश्न पुकारत आहे.

-----

असुधारित प्रत

**सभापती** : आता राखून ठेवलेला ता.प्र.क्र. ११८०६ चर्चेला घेण्यात येईल.

(प्रेस : येथे सोबत जोडलेला राखून ठेवलेला प्रश्न छापावा.)

-----

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र. ११८०६ .....

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, दिनांक १.१.२०१६ रोजीपासून महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू झाला. पण राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तो दिनांक १.११.२०२० पासून लागू झाला आहे. यांच्याशी आपण दुजाभाव का करीत आहात, तसेच दिनांक १.१.२०१६ पासून दिनांक १.११.२०२० पर्यतची थकबाकी आपण देणार का ?

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.११८०६.....

श्री.सतीश चव्हाण......

यामध्ये आश्वासित प्रगती योजनेच्या बाबतचा हा प्रश्न सहा वर्षापासून सभागृहात मांडला जात आहे. असे असतानाही प्रत्येक वेळी शासन याबाबत तेच तेच उत्तर देत आहे. शिक्षण खात्याने वित्त विभागाची परवानगी न घेतल्यामुळे ही मंजुरी मिळाली नाही. ते परिपत्रक रद्द करण्यात आले. माझा प्रश्न असा आहे की, ज्या अधिकाऱ्याची यामध्ये चूक असेल त्याच्यावर कारवाई शासन करणार आहे का वित्त विभागाची परवानगी घेऊन परत ही योजना लागू करण्यात येईल का ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एकूण दोन प्रश्न विचारलेले आहेत. या दोन्ही प्रश्नासंदर्भात अनेक वेळा माननीय अर्थमंत्री तथा उप मुख्यमंत्री यांच्या दालनात बैठक झालेली आहे. कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग इतके वर्षे देण्यात आलेला नव्हता, तो देण्याची सुरुवात महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर केलेली आहे. परंतु त्याची जी थकबाकी आहे, ती थकबाकी ज्या दिवशी सातवा वेतन आयोग लागू होईल, तेव्हापासून तो लागू ठेवावा, थकबाकी देऊ नये, असे वित्त विभागाचे म्हणणे आहे. दुसरा प्रश्न आश्वासित प्रगती योजनेचा मांडण्यात आलेला आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग आश्वासित प्रगती योजना सुरु करण्याकरिता संपूर्णत: तयार आहे. अनेक वेळा मी सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांना देखील याबाबत सांगितलेले आहे. या दोन्ही मुद्द्यांच्या बाबत अर्थमंत्री महोदयांच्या दालनात बैठक लावण्यासंदर्भात मी स्वत: मंत्री म्हणून विनंती करेल. या सर्व बाबी वित्त विभागाशी निगडित आहेत. वित्त विभागाच्या मान्यतेनंतरच हे निर्णय होऊ शकतील. सदर बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांना बोलाविण्यात येईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या राज्यात अनेक खाती आहेत. सर्वच खात्यातील शासकीय कर्मचारी, निम शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू झाला. त्यावेळी त्यांना पूर्वलक्ष प्रभावाने देणी, एरियर्स दिलेले आहे. महावितरण तृतीय-चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांबाबतच का वित्त विभाग निर्णय घेते की,

असुधारित प्रत

राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.११८०६.....

डॉ.रणजित पाटील......

अमुक तारखेपासून पुढे त्यांना लाभ देण्यात येईल. महावितरण हे एकच असे खाते आहे की, सातवा वेतन आयोग लावताना दुजाभाव केलेला आहे. महावितरण कर्मचारी शासनाचे कर्मचारी नाहीत का ? वित्त विभाग एकाच खात्याकरिता असा निर्णय का घेत आहे ? सभापती महोदय, याबाबत आपण निर्देश द्यावेत. एकही खाते असे नाही की, ज्यांना सातवा वेतन आयोग लागू झाले नाही. महावितरण तृतीय-चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग इतरांप्रमाणे लागू नाही, हे योग्य नाही.

सभापती महोदय, आश्वासित प्रगती योजनेबाबतचा प्रश्न देखील विचारला गेला होता. आश्वासित प्रगती योजना देखील सर्वच खात्यांना लागू आहे. १०-२०-३० असो किंवा १२-२४ चे सुत्र असो ही आश्वासित प्रगती योजना सर्वच खात्यांना लागू आहे. याकरिता पुन्हा वित्त विभागाच्या परवानगीची गरज का भासते ? केवळ अपवाद होऊ शकत नाही, या सर्व प्रश्नांची सकारात्मक उत्तरे मिळावीत, अशी माझी अपेक्षा आहे. सभापती महोदय, आपण निर्देश द्यावेत.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच असे सांगितले की, आमच्या विभागाकडून सातवा वेतन आयोग, थकबाकी, आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासंदर्भातील प्रश्न असेल याबाबत कुठेही आम्ही नकारात्मक भूमिका घेतलेली नाही. अनेक संघटना, अनेक आमदार महोदयांशी आमची याबाबत चर्चा झालेली आहे. कदाचित कोविडच्या पार्श्वभूमीवर थकबाकी दिली गेली नसेल, यासंदर्भात पुन्हा एकदा राज्याच्या उप मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुन त्यांच्या दालनामध्ये बैठक लावण्याची विनंती केली जाईल. आश्वासित प्रगती योजनेच्या बाबतीतील तांत्रिक बाब जी आहे, ती आपल्या सर्वांनाच माहिती आहे. आश्वासित प्रगती योजना ही खरोखरच चांगली योजना आहे. याबाबत आमचे कोणाचेही दुमत नाही. परंतु जर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सन २०१०-२०११ च्या जी.आर.नुसार याकरिता वित्त विभागाची परवानगी नव्हती.

श्री.उदय सामंत......

असुधारित प्रत

असे वित्त विभागाचे म्हणणे होते. म्हणूनच मी हे म्हटले होते. अर्थमंत्रालयाचे जे प्रमुख आहेत, त्यांच्याकडे या बैठकीचे आयोजन केले जाईल.

ज्यांनी आता या संदर्भातील मुद्दे मांडलेले आहेत, जे सर्व आमदार या संबंधित यंत्रणेशी निगडित आहेत, त्यांना दालनात बैठकीकरिता बोलाविले जाईल.

----------------

असुधारित प्रत

**राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थी संख्येमागे शिक्षकांच्या नियुक्तीसंदर्भातील सुधारित संच मान्यतेच्या निकषांबाबत**

(१) * १२१३५ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१० पासून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ लागू करण्यात आला असून त्यातील तरतुदींनुसार इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतच्या ६० विद्यार्थ्यांकरीता २ शिक्षक, ६१ ते ९० विद्यार्थ्यांकरीता ३ शिक्षक, ९१ ते १२० विद्यार्थ्यांकरीता ४ शिक्षक, १२० ते २०० विद्यार्थ्यांकरीता ५ शिक्षक याप्रमाणे तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतच्या प्रत्येक वर्गाला किमान १ शिक्षक तसेच ३५ विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक देय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ८ जानेवारी, २०१६ अन्वये विहित केलेल्या संच मान्यतेच्या सुधारित निकषान्वये शाळेतील इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतचे सर्व विद्यार्थी मिळून ६० विद्यार्थ्यांकरीता २ शिक्षक व त्यानंतर वाढ होणाऱ्या प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे १ अतिरिक्त शिक्षक तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी मधील एकूण विद्यार्थी संख्येच्या ३५ विद्यार्थ्यांकरीता १ शिक्षक असे सुधारित निकष विहित करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अध्यापनाची प्रक्रिया व अभ्यासक्रम इयत्ता निहाय असताना शाळेतील एकूण विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षक संख्या निश्चित करणे अशैक्षणिक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त संच मान्यतेच्या सुधारित निकषामुळे काही शाळेत वर्गतुकड्यांच्या संख्येपेक्षा शिक्षकांची संख्या कमी तर काही शाळेत वर्गतुकड्यांच्या संख्येपेक्षा शिक्षकांची संख्या जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संच मान्यतेच्या सुधारित निकषाला विद्यार्थी हिताच्या आधारावर सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून, सदरहू प्रकरण प्रलंबित

ता.प्र.क्र.१२१३५

श्री.नागोराव गाणार......

असुधारित प्रत

असल्याने प्रकरण प्राधान्याने निकाली काढण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड : (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४), (५) व (६) शासन निर्णय दिनांक २८/०८/२०१५ अन्वये संचमान्यतेचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. यामध्ये शासन निर्णय दिनांक ०२/०७/२०१६ व दिनांक ०१/०१/२०१८ अन्वये आवश्यकतेनुसार सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर संचमान्यतेचे निकष नव्याने निश्चित करुन सुधारित निकष लागू करण्याची मागणी होत आहे. त्यानुषंगाने संच मान्यतेचे सुधारित निकष निश्चित करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

श्री.नागोराव गाणार : सभापती महोदय, शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंधित हा प्रश्न आहे. विद्यार्थ्यांना चांगले गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या उद्देशाने विद्यार्थी – शिक्षक प्रमाण ठरविण्यात येते. या तात्त्विक भुमिकेला मुठ-माती देऊन दिनांक २८.७.२०१५ च्या अशैक्षणिक शासन निर्णयाद्वारे संच मान्यतेचे तांत्रिक स्वरुपाचे निकष निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर फार मोठा दुष्परिणाम झाला. म्हणून शासनाने आता त्यात बदल करण्याचे ठरविलेले आहे, ही समाधानाची बाब आहे. हे समाधान पूर्ण व्हावे, या दृष्टीने मी दोन प्रश्न विचारु इच्छितो. माझा पहिला प्रश्न असा आहे की, संच मान्यतेचे सुधारित निकष निश्चित करण्याच्या कार्यवाहीत शिक्षक प्रतिनिधींचा सहभाग घेतला जाईल का ? कारण प्रशासनावर हा विषय सोडता येत नाही. प्रशासनिक अधिकारी ज्यावेळी शाळेत

ता.प्र.क्र.१२१३५

श्री.नागोराव गाणार......

असुधारित प्रत

शिकत होते, त्यावेळी शाळेतील वातावरण त्यांना कळत होते. याकरिता यामध्ये शिक्षक प्रतिनिधींचा समावेश केला जाईल का ? शैक्षणिक सत्र २०१४-२०१५ पासून संच मान्यतेच्या विरोधात जी अपिले करण्यात आली, ती सर्व स्तरावर प्रलंबित आहेत. ती तत्काळ निकाली काढली जातील का ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी सन्माननीय श्री.नागोराव गाणार आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानते. कारण या संदर्भात आमच्या खूप बैठका झाल्या. त्यात ज्या सूचना प्राप्त झाल्या, त्याच्यामध्ये ही संच मान्यता बदलली गेली पाहिजे, यावर खूप मोठया प्रमाणात चर्चा झालेली आहे. संच मान्यता बदलत असताना अधिक बोजा येऊ नये, आपल्याला कशा तऱ्हेने व्यवस्थित संच मान्यता करता येईल, या संदर्भात मला सांगायला पाहिजे की, खरोखर आमची याबाबत बैठक होती, काल विधानसभेमध्ये अर्थसंकल्पावर चर्चा असल्याकारणाने ती बैठक होऊ शकली नाही. या पंधरा-वीस दिवसांमध्ये या संदर्भातील पाच महत्त्वाच्या विषयांवर आम्ही चर्चा करणार होतो, त्यापैकी हा देखील एक महत्त्वाचा विषय होता. माननीय आयुक्त यांच्याकडे याबाबत बैठकीत ठरले होते की, याबाबत आता एक शेवटची बैठक घेऊन अंतिम निर्णय घेण्यात घेईल. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील व इतर अनेक प्रतिनिधी यांच्यासमवेत चर्चा करुन निर्णय घेण्यात येणार होता. या संदर्भातील दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मी होय असे देते. याबाबत सन्माननीय शिक्षक आमदारांसमवेत याबाबत चर्चा करुन शेवटची बैठक घेऊन संच मान्यता मंजूर करुन टाकू. याबाबत लवकरच नवीन संच मान्यता घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणाले की, काही प्रकरणे प्रलंबित आहेत, त्या संदर्भात देखील लवकरात लवकर ती प्रकरणे कशी निकाली काढता येतील, या संदर्भात आवश्यक ते निर्देश दिले जातील.

ता.प्र.क्र.१२१३५

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, संच मान्यतसंदर्भात महत्त्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.नागोराव गाणार यांनी उपस्थित केलेला आहे. कोविड

असुधारित प्रत

पार्श्वभूमीवर गेली दोन वर्षे याकरिता तरतूद नव्हती, हे सभागृहाला मान्य आहे. आता जेव्हा अर्थव्यवस्थित सुरळित झालेली आहे. राज्यातील अनेक घटकांना शासन न्याय देत आहे. या अर्थसंकल्पामध्ये ते दिसून आलेले आहे. शेतकरी, कामगार व इतर घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. छोटया व्यापाऱ्यांचा विचार करुन एक विधेयक आज पारित केले जाणार आहे. या विधेयकानुसार छोटया व्यापाऱ्यांना जी.एस.टी.पूर्वी ज्या पेनॉल्टीज होत्या, त्या देखील विधेयक पारित करुन माफ करण्यात येणार आहेत.

सभापती महोदय, सोळा वर्षांपासून शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, हे कुठेतरी आता थांबले पाहिजे. यासंदर्भात केवळ औपचारिकता म्हणून उत्तर देऊन चालणार नाही. सभापती महोदय, आपणही अनेक वेळा या संदर्भात हस्तक्षेप केलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी देखील याबाबत भूमिका मांडलेली आहे. त्रुटीपुर्तता, संच मान्यता, अघोषित यांचा देखील कधीतरी सोक्षमोक्ष लावणे आवश्यक आहे. एका ठिकाणी आझाद मैदानावर याकरिता धरणे धरले जात आहेत. काल रोजी आमचे नेते माननीय श्री.नाना पटोले यांच्या बंगल्यावर शिक्षक प्रतिनिधी.....( अडथळा)....

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मला वाटते की, शिक्षण विषयावर खूप प्रश्न असतात. आजही एक नियम ९३ अन्वये एक प्रश्न सन्माननीय आमदारांना मांडलेला आहे. एक मोठी चर्चा याबाबत सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी मांडलेली आहे. सातत्याने शासन उत्तर देत आहे की, तरीही याबाबत सांगायला पाहिजे की, त्रुटीपुर्ततेचा अघोषित प्रश्न आता नाही. या ठिकाणी आता संच मान्यतेचा प्रश्न आहे. संच मान्यतेच्या बाबत खूप बैठका घेण्यात आल्या. विधानपरिषद सदस्यांना या बैठकांमध्ये शासनाने बोलाविले होते. शेवटची बैठक झाली, त्यावेळी ठरले होते की, संच मान्यता काल रोजी मंजूर

ता.प्र.क्र.१२१३५

प्रा.वर्षा गायकवाड .....

असुधारित प्रत

करायची, परंतु असे ठरल्यानंतर देखील काल रोजी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पावर चर्चा असल्यामुळे कालची बैठक दोन दिवस पुढे ढकलण्यात आली. माननीय आयुक्तांना मी याबाबत सांगते. त्यांच्याबरोबर सन्माननीय सदस्यांची शेवटची बैठक होऊन संच मान्यतेबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाईल. त्या व्यतिरिक्त जे जे विषय आहेत, त्याबाबत पैशांचे बंधन वा आवश्यकता नाही, त्या एकूण पाच विषय जे आम्ही निश्चित केलेले आहेत, त्याबाबत येणाऱ्या काळात निर्णय घेतले जातील.

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदय, संच मान्यतेसंदर्भातील प्रश्नाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. शाळेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे नाव स्कूल रेकॉर्डमध्ये राहील. त्यांचे नाव जरी त्या यु-डायसवर किंवा शाळेच्या प्रवेश प्रणालीशी आधार-कार्डने जोडले गेले नसेल, ऑनलाईन लिंक झाले नसेल तरी देखील त्या विद्यार्थ्यांचे पटसंख्येमधून नाव वगळण्यात येणार नाही. त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. याची काळजी घेण्याचे सर्वांना आश्वासन दिलेले आहे. विद्यार्थी प्रवेशित आहेत. परंतु संच मान्यता करताना जे विद्यार्थी आधार कार्डच्या समस्येमुळे शाळेच्या प्रवेश प्रणालीसाठी ऑनलाईन लिंकअप झालेले नाहीत, ते विद्यार्थी संच मान्यता करताना ग्राहय धरण्यात येणार नाहीत, असे शासनाने सांगितलेले आहे.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१३५......

श्री. किरण सरनाईक.....

अन्यथा शाळेतील शिक्षक आणि शिक्षीका...हे अतिरिक्त.... प्रवेशित विद्यार्थी शाळेच्या रेकॉर्डवर जे आहेत ते संच मान्यतेसाठी ग्राह्य धरण्यात यावे किंवा मान्य केले जातील काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण सरनाईक यांनी सूचना केलेली आहे. कोविडच्या महामारीमुळे शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेत शिक्षणास आणण्यासाठी शिक्षण विभागाला खूप प्रयत्न करावे लागणार आहेत. शिक्षण विभागाला त्याची पूर्णपणे कल्पना आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे, ती सजेशन फॉर ॲक्शनला घेतली जाईल. आधारकार्डशी लिंकप व्हायला पाहिजे. कारण पीजे इंडेक्समध्ये आधारकार्ड नसल्यामुळे गुण मिळत नाही. त्यामुळे आधार क्रमांकाला महत्व दिले पाहिजे असे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, शिक्षण विभागाशी संबंधित सन्माननीय सदस्य श्री. नागोराव गाणार यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. सभागृहात अनेक सन्माननीय सदस्य हे शिक्षक आमदारांचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. त्यांच्या मला निदर्शनास असे आणून द्यावयाचे आहे की, सांगली जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जितेंड डुडी यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हापरिषदेच्या माननीय अध्यक्ष श्रीमती प्राजक्ता कोरे आणि माननीय उपाध्यक्ष श्री. शिवाजी डोंगरे यांनी चांगल्या विषयाकडे लक्ष वेधलेले आहे. जिल्ह्यात १७० मराठी शाळा आहेत. त्या मॉडेल स्कूल म्हणून चांगल्या पध्दतीने विकसित केलेल्या आहेत. यामध्ये जिल्हा नियोजन मंडळाचा निधी, आमदार, खासदारांचा निधी, जिल्हापरिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि पंधराव्या वित्त आयोगातून निधी खर्च करुन सांगली जिल्ह्यातील १७० मराठी शाळा मॉडेल स्कूल म्हणून चांगल्या पध्दतीने विकसित

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१३५......

श्री. गोपिचंद पडळकर.....

केलेल्या आहेत. त्यामध्ये इमारत बांधणे, वाचनालय बांधणे, फर्निचर, कॉम्पुटर लॅब, प्रयोगशाळा, सुशोभिकरण आणि क्रीडांगण उभी केली जातात. सांगली जिल्हापरिषदेने जो मॉडेल स्कूलचा कार्यक्रम राबविलेला आहे, तो राज्यभरात राबविणार आहात काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, काही जिल्ह्यांमध्ये डीपीडीसीच्या माध्यमातून.... कारण हा खूप महत्वाचा प्रश्न आहे. कारण हा शाळांच्या दर्जावाढीच्या संदर्भातील प्रश्न आहे. आपण अनेक वेळा शिक्षकांचे प्रश्न उपस्थित करतो. सांगली, जळगाव, हिंगोली किंवा इतर काही जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारची कार्यवाही केली जाते. त्या ठिकाणच्या डीपीडीसीच्या माध्यमातून आणि आमदार, खासदार महोदयांच्या माध्यमातून.... सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे, तशा प्रकारचे खूप सारे मॉडेल अनेक जिल्ह्यांनी केलेले आहेत. काही ठिकाणी संरक्षक भिंती बांधलेल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्याने सांगली जिल्हापरिषदेच्या धर्तीवर कार्यवाही केलेली आहे. शाळेतील शौचालय, नवीन बांधकाम, बेंचेस, क्रीडांगण, संरक्षक भिंत, पाण्याची सुविधा यावर चर्चा होणे अपेक्षित आहे. शासनाने पुढील अर्थसंकल्पात ३०० कोटी रुपयांचा निधी आदर्श शाळेसाठी दिलेला आहे. तसेच यावर्षीच्या अर्थसंकल्पात ५४ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमध्ये निजामकालिन शाळा असून, त्यासाठी शासनाने १६० कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. यामधील ८० कोटी रुपयांचा निधी शिक्षण विभागाला प्राप्त झालेला आहे आणि १२ कोटी रुपये मिळून शासनाने निजामकालिन शाळेसाठी निधी दिलेला आहे. शिक्षण विभागाकडू भौतिक सुविधा देण्याचे आणि अभ्यासक्रम बदलण्याचे काम केले जात आहे. भविष्यात राज्यात मोठ्या प्रमाणावर आदर्श शाळा निर्माण होतील.

श्री. अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी सांगली जिल्हापरिषदेने कशा प्रकारे

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२१३५......

श्री. अमरनाथ राजूरकर.....

मॉडेल स्कूलचा कार्यक्रम राबविलेला आहे. सांगली जिल्ह्यातील माझ्या जत मतदारसंघात ३६ जिल्हापरिषदेच्या शाळा या कनार्टक सरकारच्या आहेत. आपल्या नाहीत. त्या कन्नडी शाळा आहेत. मराठी शाळा नाहीत. आपल्या जिल्हापरिषदेच्या शाळा नाहीत. तरी त्या आपल्या शाळा आपल्या जिल्हापरिषदेच्या अंतर्गमत येतील काय ?

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी सदरहू बाब तपासून पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सदरहू प्रश्नावरील चर्चा संपलेली आहे. त्यामुळे आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

**करडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील धान**
**खरेदी केंद्रावर कारवाई करण्याबाबत**

**(२) * १२४६८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील जय किसान बहुउद्देशीय सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या बोरी येथील धान खरेदी केंद्रात वजनमापात तफावत येत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, भंडारा, पणन अधिकारी, तहसिलदार व करडी पोलीस ठाणे, यांचेकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करडी पोलीस ठाण्याच्या आवारात निरीक्षक वैधमापनशास्त्र विभाग, तुमसर व साकोली यांनी केलेल्या तपासणीत वजनमापे नुतनीकरण केले नसल्याचे, तसेच ४० किलो वजनात ४०० ग्रॅमची तफावत आढळून आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धानाची चोरी व शेतकऱ्यांची फसवणूक करणारे करडी येथील धान खरेदी केंद्र काळ्या यादीत टाकून कायमचे बंद करुन केंद्राच्या संचालकावर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊन नवे धान खरेदी केंद्र सुरु करण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विश्वजीत कदम, श्री.छगन भुजबळ, यांच्याकरिता :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

अप्रकाशित

ता.प्र.क्र. १२४६८.......

डॉ. विश्वजीत कदम........

(४) जय किसान बहुउद्देशिय सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या केंद्राचा धान खरेदी परवाना रद्द करण्यात आला असून खरेदी केंद्र बंद करण्यात आलेले आहे. तसेच वैधमापन शास्त्र यंत्रणेमार्फत सदर प्रकरणाची दखल घेऊन सदर संस्थेविरुध्द वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ चे कलम २४(१) व ३०(सी) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. परिणय फुके : सभापती महोदय, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी धान खरेदीच्या होणाऱ्या भ्रष्टाचारासंबंधी अनेक तक्रारी केलेल्या आहेत. धान खरेदीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि घोटाळे होत आहेत. प्रती क्विंटलमागे ५ ते ८ किलोची चोरी या पारंपारिक वजन काट्याच्या माध्यमातून धान खरेदी केंद्रावर होत आहे. धान खरेदीच्या वाटपाचा अधिकार हा पूर्वी जिल्हाधिकारी यांच्याकडे होता. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर हा अधिकार माननीय पालकमंत्री महोदयांना दिलेला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु झालेला आहे. धान खरेदी केंद्रवाला शेतकऱ्याकडून प्रती क्विंटल १०० रुपये घेतले जात आहे. धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात धान खरेदी केले जात आहे. यामध्ये केंद्र शासनाचा निधी आहे. नोडल एजन्सी म्हणून राज्य सरकार त्यामध्ये काम करीत आहे. धान खरेदीच्या वाटपाचा अधिकार हा पूर्वी जिल्हाधिकारी यांच्याकडे होता, तो काढून माननीय पालकमंत्री महोदयांकडे दिलेला आहे. त्यामुळे पालकमंत्री महोदयांकडील अधिकार काढून तो पुनश्च जिल्हाधिकारी यांना दिला जाईल काय असा माझा प्रश्न आहे. यामधील होणाऱ्या घोटाळ्याची चौकशी सीबीआयच्या माध्यमातून केली जाईल काय असा माझा प्रश्न आहे.

**सभापती** : सीबीआयकडे किती चौकशी सोपविणार ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४६८........

डॉ. विश्वजीत कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके करडी तालुका, मोहाडी, जिल्हा भंडारा येथील जय किसान बहुउद्देशीय सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थेमध्ये गैरप्रकार झालेला असून, त्यासंदर्भात त्यांनी प्रश्न विचारलेला आहे. त्यावर कारवाई केलेली आहे. धान खरेदी केंद्राचे लिगल मेटोलॉजी डिपार्टमेंटवर कारवाई केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांनी इतर प्रश्न उपस्थित केलेले असून, ते मुळातच स्कोपच्या बाहेरील आहेत. तरी पण मी त्यांना उत्तर देणार आहे. सन २०१९ पर्यंत भंडारा आणि गोदिया जिल्ह्यातून महाराष्ट्रात आणि देशात मोठ्या प्रमाणावर धान उत्पादन आणि पुरवठा केली जातो. सन २०१९ पर्यंत धान खरोदी केंद्राची जी संख्या होती त्यासाठी धोरणात्मक साचा निर्माण करुन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जी धान खरेदीची संख्या आज केवळ ५० पर्यंत होती ती जवळ जवळ २०० पर्यंत नेलेली आहे आणि त्याचा फायदा तेथील स्थानिक शेतकर, धान उत्पादक आणि मिलिंग करणाऱ्या लोकांना झालेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांनी इतर प्रश्न उपस्थित केलेले असून, ते मुळातच स्कोपच्या बाहेरील असल्यामुळे ती माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

धन्यवाद.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांनी प्रश्न उपस्थित केलेला असून, तो बरोबर आहे. ही योजना केंद्र शासनाची आहे आणि केंद्र शासनाच्यावतीने ती योजना राज्य शासनाकडून राबविली जाते. मार्केटिंग फेडरेशनला एजन्सी म्हणून नेमणूक केलेली आहे. त्या ठिकाणी गेल्या १५ वर्षापासून प्रशासकामार्फत काम सुरु आहे. मी देखील त्या ठिकाणी २५ वर्षे काम केलेले आहे. हे काम माननीय पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांचे नाही. प्रत्येक ठिकाणी जिल्हाधिकारी का हवा आहे हेच मला काही समजत नाही. कृषी विभागाच्या माध्यमातून सर्व्हे केला जात आहे. जिल्हा बँकेच्या अध्यक्षतेखाली एक समिती होती. सर्व समित्या आणि चेअरमनपद जिल्हाधिकाऱ्यांना देत आहात. जिल्हाधिकारी यांच्याकडे कामाचा बोजा असल्यामुळे त्यांना बोलण्यासाठी देखील वेळ मिळत नाही. जिल्हाधिकारी हे या संदर्भात कधीच बैठका आयोजित करीत नाहीत. माननीय

असुधारित प्रत

पालकमंत्री महोदयांना जे अधिकार दिलेले आहेत, ते अधिकार काढून घेतले पाहिजे. गडचिरोली जिल्ह्याचा माननीय पालकमंत्री हा ठाणे जिल्ह्याचा आहे. माननीय पालक मंत्री महोदयांचा त्यावर अभ्यास आहे काय ? विदर्भ आणि कोकणात भात खरेदी केली जाते आणि भात खरेदीचा हा विषय आहे. माननीय मंत्री महोदयांकडे वेगळा विषय आहे. आम्ही ऊसाच्या विषयी बोलतो काय ? हा विषय खूपच महत्वाचा आहे. केंद्र देण्यामध्ये एक प्रकारचा धंदा झालेला आहे. हा मुळ प्रश्न असून, सन्माननीय सदस्यांना तो व्यवस्थितपणे मांडता आला नाही. ते कॉऑपरेटीव्हचे सदस्य नाहीत. या विषयासंदर्भातील पॉलिसी पूर्वत करण्यासाठी राज्य शासनाकडून विचार केला जाईल काय ? मी गांभीर्याने बोलत आहे.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२४६८.....

श्री.जयंत प्र.पाटील....

ज्या ठिकाणी बेकायदेशीर धान खरेदी केंद्रे देण्यात आलेली आहेत त्यांची राज्य सरकार चौकशी करणार काय ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, मी पुन्हा सांगू इच्छितो की, भंडारा, गोंदिया आणि कोकणात भात उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने आहेत. कोकणातील भात उत्पादक शेतकरी बांधवांच्या भावनांची सुद्धा आम्ही कदर करतो. भंडारा, गोंदिया जिल्ह्यात धान खरेदी केंद्रांची संख्या वाढवावी अशी स्थानिक शेतकऱ्यांची आणि लोकप्रतिनिधींची सातत्याने मागणी होती. सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांना या बाबतची चांगली कल्पना आहे. कोरोनाच्या काळात सुद्धा राज्य सरकारने जिल्हाधिकारी व लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेऊन जिल्हा स्तरावर चांगले धोरण आखले. पूर्वी भंडारा जिल्ह्यात सरासरी ५० धान खरेदी केंद्र असायचे. परंतु आता धान खरेदी केंद्रांची संख्या सरासरी १७५-२०० पर्यंत पोहचली आहे. यातून एकप्रकारे शेतकऱ्यांना फायदाच झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी या विषयी जे मुद्दे मांडले आहेत त्या बाबत माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

--------

असुधारित प्रत

**राज्यातील अंशत: अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेचे खाते उघडण्याबाबत**

**(३) * ११९२७ श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक १०४७८ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त शिक्षकांना परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू केली असून, नव्याने २० टक्के अनुदान तसेच ४० टक्के अनुदान घेणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतरच्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० टक्के अनुदान घेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे कोणतेच निधीचे खाते नसल्याने, त्यांचे परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेचे खाते उघडण्याबाबत मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेतील शिक्षक कर्मचाऱ्यांची जिल्हानिहाय संख्या किती आहे, सर्वांची परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेची खाती उघडली आहेत काय व खाती उघडण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय, तसेच, त्यांच्या खात्यावर वेतनातून कपात झालेली रक्कम व शासनाचा देय हिस्सा जमा करुन त्यांना पावती देण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेचे खाते उघडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे अंशत: खरे आहे.

नव्याने २०% व ४०% अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू नाही. सदर पदांना १००% अनुदान मंजूर झाल्यानंतर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू होईल.

(२) हे खरे नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११९२७....

प्रा.वर्षा गायकवाड ....

(३) व (४) परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजनेंतर्गत ६५१६५ प्राथमिक व ६०३३२ माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची खाती उघडण्यात आली आहेत. तसेच राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत ५०४९७ प्राथमिक व ६०११८ माध्यमिक खाती उघण्यात आली असून या सर्व खात्यांवर शासन हिश्श्याची रक्कम जमा करुन संबंधितांना पावत्या देण्याची कार्यवाही संबंधित वेतन पथक स्तरावरुन सुरु आहे.

तथापि, डीसीपीएस योजनेविरुध्द मा.न्यायालयात दावे दाखल असल्यामुळे काही कर्मचाऱ्यांनी डीसीपीएस/ एनपीएस खाती उघडण्यास विरोध केला आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांची डीसीपीएस/ एनपीएस खाती उघडता आलेली नाहीत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नव्याने २० टक्के आणि ४० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन मिळणार नाही आणि एनपीएस सुद्धा लागू नाही असे नमूद केले आहे. मी विचारु इच्छितो की, यामध्ये शिक्षकांचा काय गुन्हा आहे ? एनपीएसमध्ये १४ टक्के हिस्सा शासनाचा आणि १० टक्के हिस्सा संबंधित शिक्षकाचा किंवा कर्मचाऱ्याचा असतो. मुळात त्या शिक्षकांना किंवा कर्मचाऱ्यांना पगार २० टक्के मिळणार असेल तर त्यातून किती हिस्सा कापला जाणार आहे ? मुळात शासनाने अगोदरच लेखी उत्तरात नमूद केले आहे की, ही योजना शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना लागू नसल्यामुळे त्यांच्या पगारातून हिस्सा सुद्धा कापून घेतला जाणार नाही. अनुदान देण्याची जी गती सध्या सुरु आहे त्यानुसार शाळा १०० टक्के अनुदान तत्त्वावर येण्यास अजून १०-१५ वर्षे लागतील. तोपर्यंत या शाळांतील कर्मचारी सेवानिवृत्त होऊन जातील व त्यांच्या हातात काहीच मिळणार नाही. ते काम करीत असताना त्यांना पूर्ण पगारही मिळत नाही आणि निवृत्तीवेतन सुद्धा मिळणार नाही. मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, या सर्व शिक्षकांच्या एनपीएसची व्यवस्था राज्य सरकार करणार काय, त्यामध्ये राज्याच्या हिश्श्याबरोबरच शिक्षकांचा हिस्सा सुद्धा जमा करेल काय ?
ता.प्र.क्र.११९२७....

असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, केंद्र सरकारनेच राज्य सरकारला सांगितल्यानुसार प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जोपर्यंत १०० टक्के अनुदानावर येत नाहीत तोपर्यंत डीसीपीएस लागू करता येत नाही. आता केंद्र सरकारने डीसीपीएसचे कन्व्हर्जन एनपीएसमध्ये केलेले आहे. त्यामुळे या शाळा १०० टक्के अनुदानावर येत नाही तोपर्यंत या संदर्भातील कार्यवाही करता येणार नाही. या विषयात काय मार्ग काढला पाहिजे या बाबत शिक्षक आमदारांनी बसून अभ्यास करावा. गरज पडली तर या बाबतीत केंद्र सरकारला विनंती करुन सांगता येईल की, यामुळे या कर्मचाऱ्यांवर कुठे ना कुठे अन्याय होत असून, शाळा १०० टक्के अनुदानावर येण्यास वेळ लागतो. आपण सर्वजण एकत्र बसून यावर प्रॅक्टीकल सोल्यूशन काढू या. कारण नियमानुसार शाळा जोपर्यंत १०० टक्के अनुदानावर येत नाहीत तोपर्यंत आपल्याला या अनुषंगाने कार्यवाही करता येणार नाही. आम्ही पुन्हा एकदा या विषयी अभ्यास करतो. तसेच केंद्र सरकारकडे सुद्धा विनंती करण्यात येईल की, केंद्राच्या निर्णयामुळे खूप कर्मचारी लाभापासून वंचित राहत आहेत. उद्या काही अनुचित घटना घडली तर त्यांना पेन्शन आणि इतर लाभ सुद्धा मिळत नाहीत. त्यामुळे या बाबतीत एकत्र बसून विचार करण्यात येईल.

श्री.जयंत आसगावकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, शासन हिश्श्याची रक्कम जमा करुन संबंधितांना पावत्या देण्याची कार्यवाही संबंधित वेतन पथक स्तरावरुन सुरु आहे. परंतु गेल्या तीन-चार वर्षांपासून शिक्षक कर्मचाऱ्यांना पावत्या मिळाल्या नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, शिक्षकांना या पावत्या कधीपर्यंत मिळतील ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, पावत्या देण्यासंदर्भात मागील अधिवेशनात आणि आज देखील चर्चा झाली. तातडीने पावत्या दिल्या गेल्या पाहिजेत या संदर्भात शासनाच्या माध्यमातून आज आदेश निर्गमित करण्यात येतील.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी अतिशय गोलगोल उत्तर दिले. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी स्पेसिफिक विचारले होते की, टप्प्यात असलेल्या शाळांना २० टक्के अनुदान मिळत असले तरी त्यात त्यांची काय चूक आहे, २० टक्के

ता.प्र.क्र.११९२७....

डॉ.रणजित पाटील....

अनुदानातून ते आपल्या हिश्श्याची रक्कम कशी देणार ? एखाद्या आस्थापनेवर, मग त्यामध्ये खाजगी आस्थापना असली तरी २० कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त कर्मचारी असतील तर त्या ठिकाणी त्यांच्या ईपीएफ, जीपीएफची रक्कम जमा करावी लागते. त्यांना पगार १०-१२ हजार रुपये असतो. त्यातून ते आपल्या हिश्श्याची रक्कम जमा करतात. परंतु या ठिकाणी तर शासनाचे कर्मचारी आहेत. शासनाकडे पैसे नसल्यामुळे त्यांना केवळ २० टक्के अनुदान मिळते. त्या शाळा १०० टक्के अनुदानावर कधी येतील याचा भरवसा नाही. आज आझाद मैदान येथे निवृत्त झालेले कर्मचारी आंदोलन करीत आहेत. त्यांची सेवानिवृत्ती टप्प्यात आलेल्या अनुदानातच झाली आहे. मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, २० टक्के अनुदानित शाळांतील कर्मचाऱ्यांना हे शासन पूर्ण वेळ समजत नाही काय ? अंशदायी पेन्शन योजनेत कर्मचारी स्वत:च्या हिश्श्याची रक्कम जमा करतो. मग शासनाला आपल्या हिश्श्याची रक्कम जमा करण्यात काय अडचण आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या प्रश्नाला गोलगोल उत्तर दिलेले नाही. फॅक्ट आणि कायद्यातील तरतुदीनुसार मी बोलले आहे. आपण कायद्याच्या पलीकडे जाऊन काही बोलू शकत नाही. जर कायद्यात बदल करावयाचे असतील तर सन्माननीय सदस्यांनी त्या बाबत सूचना द्याव्यात. आपल्या सर्वांना माहीत आहे की, १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एक समिती घटित केली होती. त्या समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. परंतु १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांसाठी डीसीपीएस लागू झाली, नंतर पुढे त्याचे एनपीएसमध्ये कन्व्हर्जन झाले आहे. मी सांगू इच्छिते की, शाळा जोपर्यंत १०० टक्के अनुदानावर येत नाही तोपर्यंत कार्यवाही करता येणार नाही. परंतु या बाबतीत विचार करुन त्या संदर्भात निर्णय घ्यावा लागेल. या विषयाच्या बाबतीत कशा पद्धतीने पुढे गेले पाहिजे या बाबतीत संबंधितांशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी एक सकारात्मक पाऊल उचलले आहे. त्यांनी आणखीन दोन पावले उचलावीत यासाठी मी प्रश्न विचारत आहे. २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची खाती उघडण्यात आली



असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील....

होती. परंतु त्यातील काही कर्मचाऱ्यांची खाती एकाएकी बंद करण्यात आली. त्यातील काही कर्मचाही निवृत्त होऊन त्यांना पेन्शन सुद्धा मिळत आहे. जर त्या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळत असेल तर बाकीच्या कर्मचाऱ्यांची खाती बंद होण्याचे कारण नाही. किमान २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या ज्या शिक्षक किंवा कर्मचाऱ्यांची खाती उघडण्यात आली होती, तसेन नंतर ज्या शाळा १०० टक्के अनुदानावर आलेल्या आहेत त्यांची खाती कायम ठेवून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात येईल काय ? तसेच आता जे १०० टक्के अनुदानापर्यंत आलेले आहेत त्यांची खाती दोन्ही ठिकाणी उघडण्यात आली होती. डीसीपीएसचे कन्व्हर्जन आता एनपीएसमध्ये झाले आहे. अशा कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्यांना संरक्षण दिले तर मोठा घटक वाचू शकेल. तसेच तिसरी बाब अशी की, ज्यांना नकार देण्यात आलेला आहे त्यांना न्याय देण्याबाबत राज्य सरकारला केवळ केंद्र सरकारवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यांच्या बाबतीत राज्य सरकारला स्वत:ला भूमिका घ्यावी लागेल. मी स्पेसिफिक विचारतो की, शासन अशा प्रकारची भूमिका घेणार काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या तिन्ही विषयाबाबत मी त्यांच्यासोबत चर्चा करीन. सन्माननीय सदस्यांना सुद्धा हा विषय माहीत आहे. तसेच सर्व शिक्षक आमदारांचा या बाबतीत अभ्यास आहे. सम्यक समितीने परिपूर्ण अभ्यास करुन अहवाल तयार केला आहे. मी ब्रिफींग घेतांनाच या विषयी कार्यवाही का करता येत नाही, अशी विचारणा केली. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार २००५ पूर्वीच्या लोकांना असे वाटते की, सेवानिवृत्तीनंतर जुनी पेन्शन योजना लागू होईल म्हणून काही लोकांनी खाती उघडली नाही आणि जिल्हा परिषदेच्या काही शिक्षक मंडळींना असे वाटते की, आमचे भविष्यात काय होईल. मी सांगितले आहे की, आपण एक मोहीम हाती घेऊन त्यांची खाती कशी उघडता येतील हे पाहू. सन्माननीय सदस्यांनी तीन गोष्टींमध्ये वर्गीकरण केले आहे. ते बरोबर आहे. आम्ही त्या तिन्ही वर्गीकरणाचा आम्ही अभ्यास करतो. तद्नंतर त्या



असुधारित प्रत

प्रा.वर्षा गायकवाड ....
अनुषंगाने निर्णय घेण्यात येतील.  यामध्ये केंद्र सरकारबरोबरच राज्य सरकारची जरी भूमिका असली तरी सर्व शिक्षक आमदारांनी येऊन आम्हाला मार्गदर्शन करावे.

---------

असुधारित प्रत

**राज्यातील ग्रामीण भागातील द्रारिद्रयरेषेखालील विद्यार्थीनींच्या उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत**

**(४) * ११७६८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अरुण लाड, श्री.कपिल पाटील, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थीनींचे उपस्थितीचे प्रमाण वाढावे यासाठी शासनाने दिनांक ३ जानेवारी, १९९२ रोजीपासून सुरु करण्यात आलेल्या उपस्थिती भत्ता योजनेनुसार जिल्हा परिषद, नगरपालिका व नगरपरिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या आदिवासी उपयोजन क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजन क्षेत्राव्यतिरिक्त राज्याच्या अन्य भागातील अनुसूचित जाती व जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील दारिद्रयरेषेखालील इयत्ता १ ली ते ४ थी मधील विद्यार्थीनींना शाळेतील उपस्थितीच्या प्रत्येक दिवसासाठी मागील २८ वर्षांपासून केवळ १ रुपया याप्रमाणे उपस्थिती भत्ता देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ३० वर्षानंतरही ७५ टक्के उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थीनींना दररोज १ रुपये याप्रमाणे दरवर्षी रुपये २२० उपस्थिती भत्ता दिला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले, तसेच, कोरोना काळात शिक्षणाचा खर्च वाढल्याने, पालकांना विद्यालयीन खर्च परवडत नसल्याने मुलींवर शाळा सोडण्याची वेळ आली असून शासनातर्फे देण्यात येणारा १ रुपया उपस्थिती भत्ता अत्यंत कमी असल्याची भावना पालक व्यक्त करीत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रक्कमेत वाढ करण्यात यावी यासाठी विद्यार्थीनींच्या पालकांनी शासनाकडे अनेकदा मागणी करुनही उपस्थिती भत्त्याच्या रक्कमेत वाढ करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राथमिक शिक्षण विभागाने सदर उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत प्रशासनास पत्रव्यवहार केला असून ग्रामीण भागातील मुलींच्या शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढवुन त्यांना आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्याकरीता इतर कोणत्या योजना राबविण्याचे शासनातर्फे विचाराधीन आहे,

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७६८....

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुर्गम भागातील मागास विद्यार्थीनींची शासकीय शाळांमध्ये उपस्थिती वाढविण्याच्यादृष्टीने देण्यात येणाऱ्या उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) उपस्थिती भत्ता या योजनेनंतर म्हणजे १९९२ नंतर मुलींची उपस्थिती वाढविण्यासाठी केंद्र/ राज्य पुरस्कृत विविध नवीन योजना उदा. मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना, मोफत गणवेष योजना, विविध शिष्यवृत्त्या, वाहतूक भत्ता, मुलींसाठी वसतिगृह व आश्रम शाळा, कस्तुरबा गांधी विद्यालय, शौचालय/ स्वच्छतागृहे अशा अधिक प्रभावी नवीन योजना सुरू करण्यात आल्या. तसेच मानव विकास मिशनमार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना व मोफत ST प्रवास योजना राबविण्यात येते. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे. त्यामुळे ही योजना आता कालबाह्य झाली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, ग्रामीण भागातील शाळांमध्ये मुलींच्या उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने दि.३ जानेवारी, १९९२ रोजी जिल्हा परिषद, नगर परिषदेच्या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीतील दारिद्र्यरेषेखालील मुलींसाठी उपस्थिती भत्ता योजना सुरु केली. दिवसाला १ रुपये प्रमाणे उपस्थिती भत्ता दिला जात आहे. सदर योजना सुरु करुन ३० वर्षे होऊनही ७५ टक्के उपस्थिती असलेल्या विद्यार्थीनींसाठी प्रती दिन १ रुपये प्रमाणे वर्षाला केवळ २२० रुपये उपस्थिती भत्ता दिला जातो. मी स्पेसिफिक विचारतो की, आताची वाढलेली महागाई लक्षात घेता, प्रती दिन १ रुपये असलेल्या उपस्थिती भत्त्यात वाढ करण्यात येईल काय ?

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७६८....

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, शाळांत पहिली ते चौथी इयत्तांमध्ये जाणाऱ्या आदिवासी क्षेत्र आणि त्या व्यतिरिक्त अनुसूचित जाती, भटक्या जमाती, भटक्या विमुक्त जाती यांतील दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थींनी यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बिलकुल बरोबर आहे की, सन १९९२ ला ही योजना सुरु होती. त्यामध्ये १ रुपया भत्त्याप्रमाणे वर्षभराचे २२० रुपये मिळतात. ही योजना कालबाह्य झाली आहे. त्यामुळे ही योजना बंद केली पाहिजे असे शालेय शिक्षण विभागाचे मत झाले आहे आणि त्याप्रमाणे ही योजना आम्ही बंद करण्याचा निर्णय घेत आहोत. शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून खूप नवीन योजना केल्या आहेत. आपण मुलींसाठी खूप योजना केल्या आहेत.

सभापती महोदय, मला सांगितले पाहिजे की, आपण गणवेष व लेखन साहित्य मोफत देतो. शालेय पोषण आहार योजना आहे. आपण त्या व्यतिरिक्त ज्या शाळांत मुलींसाठी शौचालय नसतील तेथे शौचालय बांधण्यासाठी या निधीचा वापर करता येईल का, सायकल वाटपामध्ये या निधीचा वापर करता येईल का हे पाहत आहोत. आपण असाही विचार केला आहे. आम्ही या योजनेचे पूर्ण स्वरुप बदलून नव्याने योजना आणू आणि त्यामधून मुलींची संख्या कशी वाढेल हे पाहू. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात देखील हा मुद्दा आलेला आहे. येणाऱ्या काळात ही योजना बदलावी लागेल. भविष्यात काळानुसार योजना ठरविल्या जातील.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी खरोखर चांगला प्रश्न विचारला आहे. आपण उत्तरात या संदर्भात लिहिले आहे. या जिल्हा परिषदा, नगरपालिका, नगरपरिषदा यांच्या शाळा आहेत. या शाळांत शिकणाऱ्या मुली आदिवासी, अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गाच्या आहेत. आपण या सर्व मुलींना एक रुपया देत होतो. आता एक रुपया त्या मुली देखील घेणर नाहीत. मुली बिकट आर्थिक परिस्थितीमध्ये राहतात.

ता.प्र.क्र.११७६८....

श्री. सतीश चव्हाण ....

शक्यतो त्या शाळांतच येत नाहीत. मराठवाड्याच्या ग्रामीण भागात खुल्या प्रवर्गातील मुली, शेतकऱ्यांच्या मुली यांचा देखील हा प्रश्न आहे. त्या मुली शाळांत येतच नाहीत. आपण चौकशी केली तर असे निदर्शनास येईल की, त्या बाहेर नोकरीला जातात, घरकाम, मजुरी करतात. त्यामुळे आईवडील त्यांना शाळांत पाठवित नाहीत. दहावी होण्याच्या आत त्यांचे लग्न लावून दिले जाते. आजही भयावह परिस्थिती आहे.

सभापती महोदय, माझी विनंती आहे. आपण भत्ता देण्याऐवजी विविध योजना लागू केल्या आहेत. आपण त्यावर हजारो कोटी रुपये खर्च करता, मग या मुलींना भत्ता देण्यासाठी फक्त १०-१२ कोटी रुपये लागणार आहेत. तुम्ही याला उपस्थिती भत्ता म्हणा किंवा निर्वाह भत्ता म्हणा. नुसता एक रुपया नाही तर महिन्याला किमान पाचशे रुपये तरी त्यांना दिले पाहिजेत आणि तरच त्या मुली शाळांत येतील. आपण पाचशे किंवा एक हजार रुपये असे काहीही ठरवावे. हा निर्णय लगेच होईल अशी शक्यता नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी फार चांगला प्रश्न विचारला आहे. माझी या संदर्भात विनंती आहे. आपण हा उपस्थिती भत्ता परत चालू करणार का आणि त्यामध्ये भरीव वाढ करणार का ?

**सभापती** : माननीय मंत्र्यांनी "नाही" असे सांगितले आहे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, आताचा काळा थोडा बदलला आहे. आपल्याला काळानुसार काही योजना कराव्या लागतील. आपण ही एक रुपयाची योजना बंद करुन काय योजना केल्या पाहिजेत हे पाहत आहोत. आम्ही खूप गोष्टी नव्याने करीत आहोत. मी तुम्हाला सांगितले की, आपण प्राधान्य पाहिले पाहिजे, शाळांमध्ये मुलींची गळती का होत आहे हे पाहिले पाहिजे. शाळांत शौचालय नसेल तर मुलींची गळती होते, बाकीचे व्यवस्थापन नसेल तर मुलींची गळती होते. आपण त्यांना आहार दिला पाहिजे. बाकीच्या सुविधा दिल्या पाहिजेत. आपण त्या संदर्भात एक अभ्यासपूर्ण चांगली योजना आणू. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, त्यांना

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७६८....

प्रा. वर्षा गायकवाड ....

मजुरीला पाठविले जाते. आपण त्या संदर्भात बैठक घेऊन चर्चा करु या.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, काही मागासवर्गीय विद्यार्थी मध्यान्ह भोजन मिळते म्हणून येतात. सर्व चांगले झाले आहे म्हणून मध्यान्ह भोजन बंद करा असे आपण करणार आहोत का ? इतर योजनांपेक्षा जर त्यांना रोख पैसे मिळाले तर त्यांच्या घरांमधील जे लोक त्यांना बाकीच्या कामांना पाठवितात ते येथे जा असे म्हणतील. त्यामुळे आमची या संदर्भात विनंती आहे. शासनावर यामुळे मोठा भार पडणार नाही. आपण त्यांना सायकल किंवा इतर बाबी देणार आहात. ज्यावेळी हा भत्ता चालू होता त्यावेळी किती मुली येत होत्या आणि आता काय स्थिती आहे याचा आपण सर्व्हे देखील करावा. माझी शासनाला पुन्हा या संदर्भात विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी मुद्दा उपस्थित केला आहे की, त्या मुली कामाला जातात, त्यांचे लवकर लग्न होते, त्यांचे जीवन खंडित होते असे चालले आहे. मध्यान्ह भोजनसाठी त्या येतात त्याप्रमाणे हाही भत्ता पुन्हा सुरु करावा आणि त्यांना योग्य परवडेल हे पाहून त्यांच्या आईवडीलांच्या हाती पैसे पडतील असे आपण करणार का ? कारण त्यांचे आईवडील तरच त्यांना शाळांत पाठवतील.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, आपण या सर्व सूचना तपासू या. आपण म्हणत आहात की, पैसे देण्याने किंवा उपस्थिती भत्ता देण्याने फायदा होईल. त्यामुळे जर जास्त फायदा होत असेल तर तसे काम करु, नाही तर, मुलींची संख्या वाढू शकेल यासाठी काही योजना करता येईल का ते पाहू आणि आपण मुलींना ज्या बाकीच्या सुविधा अपेक्षित करीत आहोत, त्या सुविधा दिल्यानंतर मुलींची संख्या वाढेल का ते पाहू. आपण अशा दोन्ही गोष्टींवर एकत्रितपणे अभ्यास करु.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७६८....

प्रा. वर्षा गायकवाड ....

सभापती महोदय, आपण या संदर्भातील अभ्यास करु. सूचना चांगली आहे. त्यांना हप्ता वाढवून दिला पाहिजे याबाबत दुमत असण्याचे काही कारण नाही. मात्र येणाऱ्या काळात रक्कम किती वाढविली पाहिजे आणि कशातऱ्हेने दिले पाहिजे याबाबत अभ्यास करुन ठरवू.

**सभापती** : माननीय मंत्री सकारात्मक आहेत.

श्री. सदाभाऊ खोत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न मांडला आहे. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी देखील त्यांचे मत मांडले आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील मुली किंवा वेगवेगळ्या अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती यामधील मुलींचे शाळांमध्ये येण्याचे प्रमाण कमी आहे. हे प्रमाण वाढायचे असेल तर नवीन योजना करीत आहात, त्यामध्ये एक योजना करुन त्या मुलींच्या नावावर २५ हजार रुपये किंवा ५० हजार रुपये अशी रक्कम फिक्स डिपॉजिटमध्ये ठेवावी, जेणेकरुन त्याचे व्याज त्यांना मिळेल आणि १८ वर्षांनंतर ती रक्कम त्या मुलींना मिळेल. आपल्याला अशी योजना करता येईल का ? आपण त्या दृष्टीने योजना करावी, जेणेकरुन मुलींची संख्या शैक्षणिक क्षेत्रात चांगल्या पध्दतीने राहील. आपण अशा पध्दतीचे धोरण आणावे अशी मी सूचना करतो.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सूचना चांगली आहे. या सुचनेचाही विचार करता येईल. आपण सर्वजण एकदा बैठक घेऊ आणि त्यामध्ये चांगल्या सुचनांचा विचार करु.

----

असुधारित प्रत

## टी.सी.कॉलेज, बारामती (जि.पुणे) येथील प्रबंधकावर कारवाई करण्याबाबत

**(५) * ११७५९ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टी.सी.कॉलेज, बारामती (जि.पुणे) येथील प्रबंधक कॉलेजमधील प्राध्यापक महिला, शिक्षकेतर कर्मचारी तसेच कॉलेजमधील मुलींचा लैंगिक छळ करत असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी कॉलेजमधील शिक्षकवृंद यांनी निवेदनाद्वारे संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, पुणे यांचेकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टी.सी.कॉलेजच्या प्रबंधकाच्या गैरकृत्याबाबतच्या तक्रारी बारामती पोलीस स्टेशन येथे करण्यात आल्या असून, प्रबंधकाकडून प्रकरण बंद करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचा आरोप कॉलेजमधील शिक्षकवृंद यांनी शासनाकडे केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रबंधकाला सहकार्य करणाऱ्या दोषी संस्थाचालकांवर व प्रबंधकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

टी.सी.कॉलेज, बारामती, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार त्यांच्या महाविद्यालयातील प्रबंधक यांच्याविरूध्द महाविद्यालयातील महिला कर्मचाऱ्यांकडून कोणतीही लेखी वा तोंडी स्वरूपातील तक्रार महाविद्यालयाकडे प्राप्त झालेली नाही. मात्र काही निनावी व्यक्तींनी संस्थेचे अध्यक्ष, सचिव, पोलीस यांच्याकडे महाविद्यालयातील प्रबंधक यांच्याविरूध्द लैंगिक शोषणाचे आरोप करून चौकशीची मागणी केलेली आहे.

(३) याबाबत संबंधित पोलीस निरीक्षक, बारामती शहर पोलीस स्टेशन यांनी सखोल चौकशी करून सदरचे निनावी पत्र बोगस असल्याचे व पूर्णत: चुकीच्या गृहीतकावर आणि खोटया माहितीवर आधारलेले व बदनाम करण्याच्या उद्देशाने लिहिल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याबाबतचा स्वतंत्र गोपनीय अहवाल त्यांच्या वरिष्ठांना सादर केला आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७५९ ....

श्री. उदय सामंत ....

तसेच पोलीस खात्याकडे प्राप्त उक्त तक्रारीची दखल घेऊन महाविद्यालयातील विशाखा समितीने देखील स्वतंत्रपणे चौकशी करून त्यांचा अहवाल सादर केला असून त्यांच्याकडेही अशा प्रकारची कोणतीही तक्रार आल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदय, प्रश्नाच्या क्रमांक २ मध्ये, टीसी कॉलेजच्या प्रबंधकांच्या गैरकृत्याबाबतच्या तक्रारी बारामती पोलीस स्टेशनला दिल्या होत्या का, असे विचारले आहे आणि त्यास आपण हे अंशत: खरे आहे असे म्हणत आहात. सदर विषयामध्ये वारंवार अशा तक्रारी येत असतील आणि त्या प्रबंधकांचा जर दबाव असेल तर, या विषयामध्ये गोपनियता पाळून या सर्व संबंधाची चौकशी करण्यासाठी एखादी समिती गठीत करावी एवढीच आपल्याकडे माझी मागणी आहे. आपण ती समिती गठीत करणार का ? मी माननीय मंत्र्यांना या संदर्भात विनंती करतो.

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, या प्रकरणातील सविस्तर माहिती घेणे आवश्यक आहे. कारण या तक्रारीमध्ये दोन बाबी आहेत.

**सभापती** : मी जे उत्तर वाचले आहे त्यावरुन मला असे वाटत आहे की, अर्जतक्रारच निनावी आहे. त्यामुळे त्याला काही अर्थ नाही.

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, एक तक्रार निनावी आहे आणि एक तक्रार श्रीमती एस.एम.पाटील यांची दाखविली आहे. पोलीस अहवाल आणि सर्वच विभागांचा अहवाल असा आला आहे की, श्रीमती एस.एम.पाटील या तेथे नोकरीलाच नाहीत. एक तक्रार निनावी असल्यामुळे, एक तक्रार बोगस असल्यामुळे आणि असा अहवाल आल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा काही प्रश्नच येत नाही.

----

असुधारित प्रत

## मराठवाड्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांना व्यावसायिक दराऐवजी घरगुती दराने वीज पुरवठा करण्याबाबत

**(६) * ११८७५ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील ग्रामीण भागात जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या १२६४५ शाळांपैकी ५२७९ शाळांचे थकीत वीज देयक रुपये ९८२ लक्ष असून, त्यातील २४३ शाळांच्या थकीत देयकांमुळे वीज जोडणी तोडण्यात आल्याचे तसेच सदर शाळांचे मिटरही वीज मंडळाने काढून नेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील शाळांना वीज पुरवठा होत नसल्याने विद्युत उपकरणे व संगणक देखील बंद अवस्थेत असून, शाळांना व्यावसायिक दराने वीज जोडणी दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांना व्यावसायिक ऐवजी घरगुती दराने वीज पुरवठा करण्याबाबतचा निर्णय घेऊन थकीत वीज देयके तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मराठवाड्यातील ४२७४ जिल्हा परिषद शाळांचे वीज बिल थकीत असल्याने वीज जोडणी तोडण्यात आली आहे.

(३) शाळांना वीज पुरवठा दरात सवलत देण्याबाबत मा.मंत्री (ऊर्जा) यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात येत आहे.

सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात सादील अनुदानातून मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील २६५७ जिल्हा परिषद शाळांचे कायम स्वरुपी बंद (Permanently Disconnected) वीज देयकांची थकीत रक्कम एकूण रुपये ३२०.५९ लक्ष अदा करण्यात आली आहे.

तसेच, सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात अनुदान निर्धारण पूर्ण झालेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांकरीता रुपये २२५०.०० लक्ष इतके सादील अनुदान वितरित करण्यात आले आहे. त्यामधून, थकीत वीज देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८७५....

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी आधीच याचे उत्तर दिले असल्यामुळे मी यावर फार प्रश्न विचारणार नाही. मी एकच पश्न विचारतो की, सादील अनुदान कशासाठी दिले जाते आणि त्यामधून वीज देयक भरणे अपेक्षित आहे का ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, किरकोळ खर्च असतात. दैनंदिन कामामध्ये खर्च करावा लागतो. दैनंदिन, भौतिक, शैक्षणिक असे खूप साहित्य लागते, त्यावर खर्च करण्यासाठी सादील अनुदान दिले जाते. शाळांत विद्यार्थीनी असतात. त्यामुळे तेथे वीज असणे हाही महत्त्वाचा भाग आहे. मी मागच्या वेळी उत्तर दिले होते की, आपण जवळपास ६ कोटी रुपये मागच्या वर्षी दिले होते. आपल्याला यावषी सादील अनुदानपोटी जी रक्कम मिळाली आहे, त्यातील ३४.५० कोटी रुपयांपैकी २२.५० कोटी रुपये आपल्याकडे आहेत, त्यामधून यावर्षी ते देत आहोत.

सभापती महोदय, माझी कालच माननीय उप मुख्यमंत्री व माननीय ऊर्जामंत्री यांच्याशी चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजे जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषदा यांच्या शाळा आहेत, त्यांच्या बिलाच्या बाबतीत मी त्यांना सांगितले की, तत्संदर्भात एक धोरण केले पाहिजे. घरगुती दराने न करता यांना कमी दराने कशी वीज दिली जाईल हे पहावे आणि बिलाचे एकदा सेटलमेंट करावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळांमध्ये लाईट असलीच पाहिजे आणि त्यासाठी नवीन धोरण केले पाहिजे. आमच्या तिघांची काल या संदर्भात बेठक झाली. येणाऱ्या काळात त्या संदर्भातील एक धोरण आणणार आहोत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये घरगुती न करता कमी दराने कसे करता येईल यासाठी पावले उचलणार आहोत. पुढील अधिवेशनाच्या आधी आम्ही हे धोरण आणू.

श्री. शशिकांत शिंदे : माननीय मंत्र्यांनी स्पेसिफिक उत्तर दिले आहे. सदनात सातत्याने हा विषय चर्चेला आला होता. आपल्याला कल्पना आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की, वीज बिलाच्या आकारणीचे धोरण ठरत नाही तोपर्यंत वीज बिल त्याच कमर्शिअल, इंडस्ट्रियल दराने आकारले जाते.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११८७५....

श्री.शशिकांत शिंदे....

त्यामुळे अशी अडचण निर्माण झाली आहे की, वीज देयक भरली नाही तर वीज कट करण्यात येते. ऊर्जा मंत्री असताना चर्चा झाली होती व त्यांनी असे आश्वासन दिले होते की, याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. हे अधिवशेन संपण्याच्या आत शासकीय शाळा, जिल्हा परिषदांच्या शाळा, नगरपरिषदांच्या शाळांसाठी धोरणात्मक निर्णय शासन घेणार आहे काय ? असा निर्णय झाला तर शाळा सुरु होतील त्यामुळे असे धोरण ठरवून निर्णय घेण्यात येईल काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सोमवारी आम्ही ऊर्जा मंत्री महोदयांना सांगून एमएआरसीकडे अर्ज सादर करणार आहोत. तेथे सुनावणी घेऊन असे सांगण्यात येणार आहे की, घरगुती दरापेक्षा आणखी काही दर कमी आहेत ते दर शाळांना लावले पाहिजे. तसेच ज्या सरकारी शाळा आहेत त्यांच्यासाठी वेगळी पॉलिसी तयार केली पाहिजे. म्हणून याबाबत धोरणात्मक निर्णय येणाऱ्या काळात घेण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-------

**पृ.शी./मु.शी.** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

असुधारित प्रत

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक-दोन वर "कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे" या शीर्षकांतर्गत दर्शविण्यात आलेली पुढील कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करतो.

(क) मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे पन्नासावा व एकावन्नावा वार्षिक अहवाल.

(ख) सातारा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या वर्षांचे अनुक्रमे एकवीसावा, बावीसावा व तेवीसावा वार्षिक अहवाल.

(ग) दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस् लेबर बोर्ड, मुंबई यांचे सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे चाळीसावा, एकेचाळीसावा, बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल.

(घ) कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल.

(ङ) औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल.

(च) बीड जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा तेवीसावा वार्षिक अहवाल.

(छ) धुळे - नंदुरबार जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २००९-२०१०, सन २०१०-२०११, सन २०११-२०१२, सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या वर्षांचे अनुक्रमे एकवीसावा, बावीसावा, तेवीसावा, चोवीसावा, पंचवीसावा, सव्वीसावा, सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल.

**सभापती.....**

अप्रकाशित प्रत

(ज) अमरावती जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठावीसावा व एकोणतीसावा वार्षिक अहवाल.

(झ) कापूस बाजार कामगार मंडळ, (बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यांकरीता) यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल.

(ञ) धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळ यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल.

(ट) मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल.

(ठ) नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे सत्तावीसावा व अठ्ठावीसावा वार्षिक अहवाल.

(ड) कोल्हापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल.

(ढ) नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल.

(ण) रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांचे सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे तेरावा, चौदावा व पंधरावा वार्षिक अहवाल.

(त) क्लिअरींग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल.

**सभापती....**

असुधारित प्रत

(थ) अकोला-वाशिम-बुलडाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल.

(द) माल वाहतूक कामगार मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल.

(ध) चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचा अनुक्रमे पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा व सहावा वार्षिक अहवाल.

(न) अहमदनगर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल.

(प) सांगली जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

(फ) सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा चाळीसावा वार्षिक अहवाल.

(ब) नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल.

(भ) धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्हे) यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचा वैधानिक लेखापरिक्षण व कामकाज अहवाल.

(म) कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१८-२०१९, सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल.

-------

**पृ.शी./मु.शी.** : वस्तू व सेवाकर विभागात वर्षानुवर्षे कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेणे याबाबत ॲड.निरंजन

असुधारित प्रत

डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

श्री.शंभूराज देसाई (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक १५ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, वस्तू व सेवाकर विभागात वर्षानुवर्षे कंत्राटी तत्वावर जे कर्मचारी काम करीत आहेत त्या कर्मचाऱ्यांना मार्च २०१९ मध्ये सेवेतून काढून टाकल्यामुळे ते बरोजगार झाले आहेत. कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत

सामावून घेण्याबाबत राज्य शासन काही धोरण आखणार आहे काय ? या कर्मचाऱ्यांनी शासनाची कामे केली आहेत, म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या कर्मचाऱ्यांना प्रश्न सोडविण्यासाठी बैठक घेतली तर चर्चा होऊन सकारात्मक निर्णय होऊ शकेल.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदय, वस्तू व सेवाकर विभागात कंत्राटी तत्वावर काही कर्मचाऱ्यांना कामावर घेतले होते. नियुक्ती पत्र देताना इतक्या कालावधीपुरती व कंत्राटी तत्वावर आपली नियुक्ती करण्यात येत आहे असे नमूद केले होते. वस्तू व सेवाकर विभागात रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. सन २०१९ मधील पहिली यादी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मान्य केली आहे. नियुक्ती देण्याबबात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस करण्यात आलेली नसल्यामुळे पद भरती झालेली नाही. सन २०२० मध्ये कोविडमुळे परीक्षा होऊ शकल्या नाहीत. रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला दोन वेळा स्मरणपत्रे देण्यात आली आहेत. आणखी एक वेळा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे विनंती करुन रिक्त पदे भरण्यात कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** : बैठक घेऊन कार्यवाही करण्यात यावी.

श्री.शंभूराज देसाई : सभापती महोदय, कंत्राटी तत्वावर घेतलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेणे शक्य नाही. सभापती महोदय, आपण निर्देश दिले व सन्माननीय सदस्यांनी बैठक घेण्याची विनंती केली त्यानुसार बैठक घेण्यात येईल.

--------

**पृ.शी./मु.शी.** : १०० टक्के अनुदानित शाळांमधील १३५८ विशेष शिक्षकांची सामान्य शाळेतील रिक्त पदांवर समायोजित करण्याच्या नियुक्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणे याबाबत सर्वश्री नागोराव गाणार, प्रवीण

असुधारित प्रत

दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

प्रा.वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक १४ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.नागोराव गाणार : सभापती महोदय, गैरप्रकार व भ्रष्टाचारासंदर्भातील हा विषय आहे, शिक्षकांकडून ३० ते ४० हजार रुपये गोळा करुन मंत्रालयातील पवार नावाचे अधिकारी व समग्र शिक्षा योजनेतील काकडे नावाचे अधिकारी यांनी एक कोटी पेक्षा जास्त पैसा लुबाडला आहे. त्यांच्या अधिकारात नसतांना शिक्षकांना पुनर्स्थापना देण्यात आली. मुख्यमंत्री महोदयांच्या व न्यायालयाच्या निर्णयाचा

अवमान केला आहे. याबाबत मी दस्तावेजासह १४ मार्च २०२२ रोजी तक्रार केली आहे. त्याबाबत चौकशी करुन किती दिवसात ही बाब निकाली काढण्यात येईल.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या अपंग समावेशक शिक्षण माध्यमिक स्तरीय केंद्र पुरस्कृत योजनेबाबत हा प्रश्न आहे. यामध्ये जवळपास १३०० कर्मचारी आहेत त्यांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. ६३३ शिक्षकांच्या पदस्थापनेचा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जी पत्राद्वारे तक्रार केली त्याबाबत सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन १५ दिवसांच्या आत चौकशी करण्यात येईल.

**सभापती** : सूचना क्रमांक १२ ला उत्तर देण्यासाठी मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे ही सूचना नंतर घेण्यात येईल.

------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : भुसावळ नगरपरिषदेमध्ये रस्ते विकासाची कामे, अतिक्रमण निष्कासित करणे अशा अनेक कामांमध्ये होत असलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणे याबाबत सर्वश्री चंदूभाई पटेल, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस,वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

श्री.प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक १३ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.चंदूभाई पटेल : सभापती महोदय, भुसावळ नगरपरिषदेमध्ये १२ कोटी रुपयांची कामे सुरु असताना कंत्राटदाराला मुरुम व कच्चे कामे देण्यात आले यामागे काय कारणे आहेत. १२ कोटी रुपयांचे रस्ते मंजूर असताना तीन वर्षे देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असते. तरी देखील भ्रष्टाचार करण्याच्या उद्देशाने मुख्याधिकारी भुसावळ नगरपालिका यांनी अशी मुरुमाची कामे काढली आहे. अभियंता श्री.बावीस्कर यांनी आपल्या भाच्याला सदर कामे देण्याचा ऊहापोह केला आहे. याबाबत तक्रार करण्यात आल्यानंतर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. जो कच्चा मुरुम काढण्यात आला त्याच्या रॉयल्टीचा तपशील उप विभागीय

अधिकारी यांच्याकडे देण्यात आला नाही. त्यामुळे त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात यावा. शासनाची फसवणूक केली म्हणून त्यांना काळ्या यादीत टाकून कंत्राटदारावर फौजदारी कारवाई करावी.तसेच भुसावभ नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांना निलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी उप जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, १२ कोटीच्या रस्त्यांची कामे असताना पुन्हा ६ कोटी रुपयांची मुरुमाची कामे केली आहेत. याबाबत मुख्याधिकारी यांच्याकडून माहिती घेण्यात आली असून जी १२ कोटी रुपयांची कामे होती त्याच्या व्यतिरिक्त जो मुरुम टाकण्यात आला तो तेथे टाकण्यात आलेला नाही. पावसामुळे इतर रस्ते खराब झाले आहेत, खड्डे पडले आहेत तेथे मुरुम टाकण्यात आला आहे. गौण खनिजाची रक्कम ५७ लाख रुपये तहसील कार्यालयात जमा केली आहे. प्रथमदर्शी यामध्ये कोणताही गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही.

-------

**पृ.शी./मु.शी.** : नगरपरिषद कळमेश्वर-ब्राम्हणी अंतर्गत सिटी सर्वेकरिता निविदा काढून खाजगी संस्थांकडून सिटीसर्वेचे काम चुकीचे झाल्यामुळे सवेक्षण रद्द करणे याबाबत श्री.चंद्रशेखर बावनकुळे वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे

असुधारित प्रत

आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी सूचना क्रमांक १६ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, नगरपरिषद कळमेश्वर व राज्यातील ६० नगरपालिकांचा सिटीसर्व्हे खाजगी कंत्राटदारांकडून करुन घेतला आहे. शासनाच्या धोरणाप्रमाणे ते करण्यात आले. मी स्वत: असे पाहिले आहे की, यामध्ये ९० टक्के नागरिकांच्या तक्रारी आहेत. हा कंत्राटदार खाजगी होता. त्यांनी एका कार्यालयात बसून थातूरमातूर हा सिटीसर्वे केला. हा सिटीसर्वे जाहीर झाला तर कोणाच्या प्रापर्टी कोणाकडे जातील असा मोठा घोळ यामध्ये झालेला आहे. त्यामुळे यामध्ये प्रचंड नुकसान होणार आहे. मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, या सर्व शहरांचे पुन्हा सिटी सर्वेक्षण करुन तेथील लोकांना न्याय देण्यात येईल काय ?

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, राज्यातील ६१ नगरपालिकांच्या हद्दीचे नगरभूमापन क्षेत्र तयार झाले नव्हते. भूमापन करण्याचा धोरणात्मक निर्णय सन २०११ मध्ये झालेला आहे. त्यामध्ये कळमेश्वर नगरपालिकेचा समावेश आहे. सन २०१२ मध्ये जमावबंदी आयुक्तांनी निविदा काढली होती. विभागीय आयुक्त नागपूर यांनी त्यासाठी कार्यारंभ आदेश दिला. अक्षय इंजिनिअरिंग या कंपनीला कन्सलटंट म्हणून जबाबदारी देण्यात आली. याचे सर्वेक्षण सन २०१३ मध्ये झाले. त्यांनी जो सर्वे केला त्याची तपासणी उप अधिक्षक भूमी अभिलेख हे १०० टक्के करतात. त्यातील एसएलआर रॅन्डमली १० टक्के चेक करतात.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात..........

रॅन्डम पद्धतीने एसएलआर १० टक्के व डेप्युटी डायरेक्टर २ टक्के तपासणी करतात. त्यामध्ये काही चूक आहे काय हे तपासले जाते. ही संपूर्ण तपासणी झालेली आहे. काम पूर्ण झाल्यानंतर प्रसिद्धी, हरकती, दुरुस्ती करण्याची तरतूद आहे. एकूण ५४२० मिळकती असून ९० हरकती प्राप्त झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, ९० टक्के तक्रारी आहेत. आपण सांगितल्यामुळे आम्ही पुन्हा हे तपासून घेऊ. परंतु मी सांगितल्याप्रमाणे ९० हकरती प्राप्त झालेल्या आहेत आणि त्या ३ महिन्यात निकाली काढण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही आपली तक्रार तपासून घेऊन त्यावर योग्य तो निर्णय घेऊ.

--------

असुधारित प्रत

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**सभापती :** आज सकाळी १०.०० वाजता सभागृहाचे कामकाम सुरु झालेले आहे. आजचे सभागृहापुढील कामकाज लक्षात घेता आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत. विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहेत. तसेच, म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा पुढे ढकलण्यात येत आहेत. आजच्या कामकाजपत्रिकेत म.वि.प. नियम २६० अन्वये २ प्रस्ताव दर्शविण्यात आलेले आहेत. मागील आठवड्यात गुरुवारी सभागृहाची बैठक होऊ न शकल्यामुळे आपल्याला विरोधी पक्षाचा प्रस्ताव घेता आला नाही. त्यामुळे आपण आज दुपारी ३.०० वाजता विरोधी पक्षातर्फे देण्यात आलेल्या म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावर चर्चा सुरु करु.

--------

असुधारित प्रत

**काँग्रेस पक्षाचा गटनेता व मुख्य प्रतोद जाहीर करण्याबाबत**

श्री.बाळासोब थोरात : सभापती महोदय, मी काँग्रेस पक्षाचा विधिमंडळ नेता म्हणून काम करीत आहे. काँग्रेस पक्षाचा गटनेता व मुख्य प्रतोद जाहीर करण्यात यावा, असे पत्र मी आपल्याकडे पत्र दिलेले आहे.

**सभापती :** आज दुपारी ३.०० वाजता या संदर्भात घोषणा करण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**गौण खनिज व वाळू उपसा याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून महत्वाच्या विषयाबाबत सभागृहाला माहिती देऊ इच्छितो. कडेगांव तहसीलदार श्रीमती शैलजा पाटील कामावर रुजू झाल्यापासून कडेगांव तहसीलमध्ये अनेक अनधिकृत कामांना चालना मिळालेली आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रात गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन व वाळूचा उपसा होत आहे. सभागृहात अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाळूचा उपसा या संदर्भात वेळोवेळी चर्चा झालेली आहे. या संदर्भात कडक कारवाई होणे गरजेचे आहे. अशा प्रकारे बेजबाबदार अधिकाऱ्याचे ताबडतोब निलंबन होणे गरजेचे आहे. एका पत्रकाराने वाळू उत्खननाबाबत तक्रार दिली होती. त्या पत्रकाराने श्रीमती शैलजा पाटील यांना व्हॉट्सॲप देखील केला होता. त्यानंतर तक्रारदारावर १२.०० ते १२.१५ वाजता हल्ला होतो आणि हल्लेखोर त्याला सांगतात की, तू तहसीलदारांकडे आमची तक्रार का करतो ? माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, श्रीमती शैलजा पाटील, तहसीलदार यांच्यावर ताबडतोब कारवाई होणे गरजेचे आहे.

**सभापती :** चौकशी करुन कारवाई करण्यात यावी.

--------

असुधारित

**पुणे व आजुबाजूच्या परिसरातील अनधिकृत बांधकामांच्या रजिस्ट्रेशनबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, सभागृहात काल पुणे जिल्ह्यातील हवेली येथील खोटे दस्तावेज नोंदविण्याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. मंत्री महोदयांनी सांगितले होते की, माझ्याकडे आता या संदर्भात माहिती नाही, मी माहिती घेऊन सभागृहाला कळवितो. माझ्याकडे या संदर्भातील कागदपत्रे आहेत. फेक एनए ऑर्डर रजिस्ट्रेशन करणे, पुणे व पुण्याच्या आजुबाजूच्या परिसरात दोन वर्षांपासून अनधिकृत बांधकामाचे रजिस्ट्रेशन पूर्णपणे बंद होते. परंतु मागील एका वर्षापासून तेथे किमान शंभर फ्लॅटचे रजिस्ट्रेशन झालेले आहे. एका आयपीएस अधिकाऱ्याच्या नावाने जवळपास ६३ डॉक्युमेंट आणि उर्वरित ३७ डॉक्युमेंट महानगरपालिकेच्या नावाने रजिस्टर केले गेले आहेत. विभागीय आयुक्त, श्री.सौरभ राव आणि तत्कालीन नोंदणी महानिरीक्षक श्री.चोकलिंगम साहेबांच्या प्रांत अधिकारी म्हणून सह्या करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. मी हा मुद्दा काल सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला होता. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून ती कागदपत्रे मंत्री महोदयांकडे देऊ इच्छितो. शासनाने तत्काळ चौकशी करुन गुन्हा रजिस्टर करावा, अशी माझी मागणी आहे.

**सभापती :** शासनाने उचित कार्यवाही करावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काल सभागृहात हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर मी लगेच सूचना दिलेल्या आहेत. या संदर्भात कार्यवाही सुरु आहे.

---------

असुधारित प्रत

## काँग्रेस पक्षाचे गटनेता व मुख्य प्रतोद पदाबाबत घोषणा

**सभापती :** माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी सूचना केल्याप्रमाणे मी काँग्रेस पक्षाचे गटनेता व मुख्य प्रतोद पदाबाबत पुढील घोषणा करीत आहे.

महाराष्ट्र विधानमंडळ काँग्रेस पक्षाचे विधान परिषद गटनेते पद व मुख्य प्रतोद पद रिक्त असून त्या जागेवर गटनेता (विधान परिषद) श्री.अमरनाथ राजूरकर व मुख्य प्रतोद (विधान परिषद) श्री.अभिजीत वंजारी यांची नियुक्ती केल्याचे मी घोषित करीत आहे.

--------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.** : बीडीडी चाळीतील रहिवाशांना न्याय मिळवून देण्याबाबत सर्वश्री प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाभाऊ खोत, विनायक मेटे, गोपिचंद पडळकर, ॲड.निरंजन डावखरे, निलय नाईक, सर्वश्री प्रवीण दटके, नागोराव गाणार, चंदूभाई पटेल, वि.प.स. यांनी नियम ९३ अन्वये दिलेली सूचना.

डॉ.जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री ) : सभापती महोदय, नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी आपल्या अनुमतीने सूचना क्रमांक १२ चे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, बीडीडी चाळ महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी मे.करिश्मा इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला सन २००४ मध्ये २२५ कोटी रुपयांना विकल्याचा आरोप अखिल बीडीडी चाळ भाडेकरु हक्क संरक्षण समितीने केला आहे. महासंघाचे पदाधिकारी सातत्याने सरकारी कामात अडथळे आणत असून त्यामुळे पुनर्विकास रखडत आहे. त्यामुळे संबंधित पदाधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांची ईडी मार्फत चौकशी करण्यात यावी, अशा प्रकारची मागणी भाडेकरु हक्क संरक्षण समितीने केलेली आहे. काही रक्कम चेकद्वारे श्री.अरविंद वाघमारे यांच्या बँक ऑफ बडोदा येथील खात्यात जमा झाल्याची माहिती त्यांनी तपास यंत्रणांना दिलेली आहे. माझे स्पेसिफिक प्रश्न असे आहेत की, अखिल बीडीडी चाळ भाडेकरु हक्क संरक्षण समितीची तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली आहे काय, असल्यास या प्रकरणी चौकशी करण्यात येणार आहे काय आणि संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत काय ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, वरळीतील नायगाव, ना.म.जोशी येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प दिनांक ३०.३.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आला असून म्हाडाची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. आपण स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी नेमून ३३ (९)(B) या नवीन कलमान्वये विकास करीत आहोत. मे.करिश्मा इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनी वगैरे असे आपले म्हणणे आहे. परंतु त्याचा हाऊसिंगशी काहीही संबंध नाही. बीडीडी पुनर्विकास चाळीच्या शिष्टमंडळाने योग्य त्या खात्याला पुराव्यासह पत्र दिले तर संबंधित खाते चौकशी करील. चौकशी करण्याचे काम देखील माझ्या विभागाचे नाही. सन २००२ किंवा २००३ मध्ये काही झाले असेल, त्यांच्याकडे बँक प्रुफ असतील आणि माझ्याकडे तशा प्रकारचे पत्र आले तर मी ते ईओडब्ल्यू किंवा सीपी यांच्याकडे पाठवून देईन. मी या प्रकरणी चौकशी करु शकत नाही.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आम्ही शासनाला प्रश्न विचारलेला आहे. सदर प्रकल्प गृहनिर्माण विभागाच्या नेतृत्वाखाली सुरु आहे. आम्ही संबंधित बाब

असुधारित प्रत

सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. गृह विभागाच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात येतो याची आम्हाला कल्पना आहे. परंतु संबंधित विभागाने गृह विभागाला सूचना दिल्या पाहिजेत. आपण तक्रारीची दखल घेऊन....

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी स्पष्ट शब्दात सांगितले की, माझ्याकडे तक्रार आली तर मी ती सीपी, ईओडब्ल्यू यांच्याकडे पाठवून देईन.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांकडे तक्रार प्राप्त झालेली नाही काय ?

डॉ.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझ्याकडे तक्रार प्राप्त झालेली नाही. माझ्याकडे तक्रार पाठविण्यात यावी. मी त्यावर रिमार्क देऊन ती पुढे पाठवितो.

--------

असुधारित प्रत

**सभापती :** सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

( दुपारी २.४८ ते ३.०० वाजेपर्यंत मध्यंतर )

--------

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.:** राज्याच्या विकासात निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल

**मु.शी.:** राज्याच्या विकासात निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल या विषयासंबंधी सर्वश्र्‍ी प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, सदाशिव खोत, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील सर्वश्री प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, ॲड. निलय नाईक सर्वश्री चंदुभाई पटेल, प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, नागोराव गाणार, राजहंस सिंह, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, रामराव पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.प्रवीण दरेकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय्‍ा, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्याच्या विकासात निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल, विदर्भ, मराठवाडा, कोकणात व खानदेशासाठी स्वतंत्र उद्योग धोरण जाहीर करण्यात येईल, अशी निवडणूकपूर्व घोषणा करुनही उद्योग उभारण्यात सरकारला आलेले अपयश, नागपूर कराराचे पालन करण्याबाबत शासनाने दाखविलेली उदासिनता, मागील सरकारने सुरु केलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड, वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, कोकणातील १६७ टीएमसी पाणी मराठवाडा व खानदेशाकडे वळवण्याचा प्रकल्प, अशासारख्या प्रकल्पांची थांबलेली अंमलबजावणी, शासकीय योजनात मागास भागाला मिळणारा अल्प निधी, सिंचन, शिक्षण, उद्योग, व्यवसाय, सहकारी संस्था अशा क्षेत्रात या चारही क्षेत्रावर निधी वितरणात होणारा अन्याय, मागास भागाचा

श्री.प्रवीण दरेकर...

असुधारित प्रत

अनुशेष दूर करण्यास वैधानिक विकास मंडळाचा वाटा मोठा असताना दिनांक ३० एप्रिल, २०२० नंतर मुदत संपल्यानंतर सुध्दा सरकारने वैधानिक विकास मंडळांना मुदत वाढ दिलेली नसणे, परिणामी या भागांचा खुंटलेला विकास व शिल्लक अनुशेषात वाढ झालेली असणे, सरकारने तातडीने वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याची आवश्यकता, सिंचन, पर्यटन, उद्योग, रस्ते, प्रक्रिया उद्योग याबाबतीत सर्वच विभागांचा अनुशेष मोठया प्रमाणावर असणे, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाकडूनही कोकणावर अन्याय झाला असणे, त्यामुळे कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, तसेच, कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी रुपये २५,०००/- व बागायतीसाठी हेक्टरी रुपये ५०,०००/-ची मदत देण्याची निवडणुकीपूर्वी केलेली घोषणा, सरकारने सन २०२० व २०२१ मध्ये आलेल्या चक्रीवादळ, अतिवृष्टी, पूर, गारपीट, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत करुन पूर्णपणे भ्रमनिरास केलेला असणे, महात्मा फुले कर्जमाफी योजनेत अनेक पात्र शेतकरी अद्याप वंचित असणे, प्रोत्साहनपर अनुदान देण्याची तसेच एकवेळ समझोता योजनेची २ वर्षपुर्ती घोषणेची सरकारने अद्याप अंमलबजावणी केलेली नसणे, शेतकऱ्यांना दिलेल्या वचनाची पुर्तता न करता, भ्रष्ट जिल्हा सहकारी बँकांच्या व्यवस्थापनांना शासनाकडून संरक्षण मिळणे, अन्य राज्यांनी शेतकऱ्यांना पॅकेजेस दिलेले असताना महाराष्ट्रात सरकारने कोणतेही पॅकेज दिलेले नसणे, शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत नसणे, चक्रीवादळ व अतिवृष्टीग्रस्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या दोन्ही वर्षाच्या पॅकेजचा लाभ बहुतांश शेतकऱ्यांना झालेला नसणे, निवडणूकपूर्व जाहीरनाम्यामध्ये शेतकरीहिताच्या अनेक योजना जाहीर करणे, परंतु गत २ वर्षात कोणत्याही घोषणेची अंमलबजावणी झालेली नसणे, शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे, अतिरिक्त ऊसाचा प्रश्न निर्माण होणे, तसेच द्राक्ष, डाळींब व कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आलेला असणे, ऐन हंगामात कृषि पंपाच्या वीज जोडण्या तोडण्यात आल्या असणे, शेती पंपांसाठी पैसे भरुन लाखो शेतकऱ्यांना विद्युत जोडणी मिळालेली नसणे, कृषि क्षेत्रासाठी सुरु असलेल्या योजनांची ठप्प

श्री.प्रवीण दरेकर...

असुधारित प्रत

झालेली वा संथ गतीने सुरु असलेली अंमलबजावणी, परिणामी कृषी क्षेत्राची पूर्ण वाताहत झाली असणे, परिणामी शेतकरी बांधवामध्ये नैराश्य येऊन हजारो शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, परिणामी संपुर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण तसेच विदर्भ, मराठवाडा, कोकण व खानदेशातील जनतेमध्ये भेदभावपूर्ण वागणुक दिल्यामुळे पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपयायोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदया, या प्रस्तावामध्ये विविध विभागांमधील प्रादेशिक असमतोल असो, उद्योग, व्यवसाय, शिक्षण, सहकार क्षेत्रामधील असमतोल या विषयांवर सर्वंकष चर्चा व्हावी या उद्देशाने आम्ही सदरहू प्रस्ताव सदनासमोर आणला आहे. या प्रस्तावर बोलत असताना महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये सहकार क्षेत्राच्या असलेल्या योगदानासंबंधी मी काही गोष्टी आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणणार आहे.

सभापती महोदया, भारतामध्ये १९०४ साली सहकाराची मुहूर्तमेढ झाली. राज्यात १९५१-५२ मध्ये पद्मश्री विखे पाटील यांनी पहिला साखर कारखाना स्थापन केला. राज्यातील सहकार चळवळीच्या संदर्भात स्वर्गीय यशवंतराव चव्हाण तसेच स्वर्गीय वसंतदादा पाटील यांनी सहकार क्षेत्रामध्ये मुहूर्तमेढच रोवली नाही तर संपूर्ण देशात त्यांच्यामुळे सहकार ओळखले गेले. त्या काळात महाराष्ट्राकडे सहकार क्षेत्रातील आदर्श राज्य म्हणून पाहिले जात होते. साधारणत: १९६० ते १९८५ हा सहकार चळवळीसाठी सुवर्णकाळ होता. त्याकरिता तत्कालीन नेतृत्वांना त्याचे सर्व श्रेय जाते. सन १९८० पर्यंत १०० पेक्षा जास्त सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, कुक्कुटपालन सहकारी दूध प्रक्रिया संस्था, शेतीवर प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्थांचे जाळे राज्यामध्ये पसरलेले होते. त्यातून प्रवरा नगर, वारणा नगर, कोपरगाव, कऱ्हाड तसेच सांगली येथे शेती शिक्षण व वैद्यकीय शिक्षण संस्था असल्यामुळे त्यातून वैद्यकीय रोजगार निर्माण झाला. देशातील ४० ते ५० टक्के सहकार संस्थांचे जाळे आपल्या राज्यात आहे. सभापती महोदया, सदनाला

श्री.प्रवीण दरेकर ....

सहकाराची महती सांगत असताना मला आवर्जून सांगावेसे वाटते की, राज्यात १९८५ नंतर सहकारातून स्वाहाकारास सुरुवात झाली. तेथून सहकाराची अधोगती सुरु झाली. १९८५ नंतर राज्यात सहकार नेतृत्वाने सहकार संस्थांची प्रगती न करता स्वाहाकारातून स्वत:ची प्रगती केल्यामुळे परिणामी सहकाराचा ऱ्हास होत असल्याचे आपल्याला दिसून येत आहे. सहकाराचे अनेक क्षेत्र आहेत. सभापती महोदया, आज या प्रस्तावाच्या माध्यमातून सहकाराला ऊर्जितावस्था देण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. सरकार कोणाचेही असो, शासनाकडून सहकार चळवळीचा सूड पद्धतीने वापर केला जातो. मी एका जिल्हा बँकेचे २०-२५ वर्षांपासून नेतृत्व करीत आहे व तेथे संचालक म्हणून काम करीत आहे. आता सरकारने तेथे मॅनीप्युलेशन करुन सहकार मंत्री असतील, त्यांनी स्वत: डीडीआर, जॉईंट रजिस्ट्रारांना आदेश दिले. तसेच सीएमओ कार्यालयातून सर्व रजिस्ट्रारांना विविध पद्धतीने विविध कारवाई करण्यास सांगितले. मी आता मजूर नाही. मी जेव्हा संस्थेची नोंदणी केली तेव्हा मी मजूर होतो. माझ्याकडे त्याबाबत तलाठयाचा दाखला होता. मजुराने नंतर प्रगती करु नये का ? त त्यांच्याकडून यासंबंधी मोठया प्रमाणावर प्रेशर टाकण्यात आले. त्यांनी माझे मजूर संस्थेचे सभासदत्व रद्द करण्यास सांगितले. त्यानंतर माझे सभासदत्व रद्द केले. मी मजूर संस्थांतून संचालक पदी निवडून आलो होतो. मी त्याचा राजीनामा पण दिला. तरी सुद्धा त्यांचे पोट भरले नाही. विरोधी पक्षनेत्याला चेपून टाकायचे, चिरडून टाकायचे. मी या संदर्भात माननीय केंद्रीय मंत्री श्री.अमित शहा यांच्याकडे निवेदन देणारच आहे. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष महाजन यांच्याबद्दल असलेले षडयंत्र सीडीच्या माध्यमातून उघड झाले. परंतु माझ्याकडे सर्वांकडील असलेले निरोप, एसएमएस, बैठका याबाबतची माहिती आहे. सहकार खात्यामधील अधिकाऱ्यांनी असे सांगितले होते की, सदर प्रकरणी एफआयआर होत नाही. परंतु ते पुढे आले नाहीत. तसेच पोलीस अधिकाऱ्यांनी देखील सांगितले होत की, याबाबत एफआयआर होत नाही. मी मजूर झाल्यानंतर २२ हजार रुपये भत्ता घेतला आहे का ? अशाप्रकारे सदर प्रकरणी माझ्यावर गुन्हा दाखल केला जातो. या संदर्भात तुम्ही कायदेशीर कारवाई करा. मला कायदेशीर कारवाईबाबत काही म्हणायचे नाही. मी

श्री.प्रवीण दरेकर ....

असुधारित प्रत

महाराष्ट्राचा सर्व उतारा येथे आणला आहे. महाराष्ट्रात जवळपास १५ हजार मजूर संस्था आहेत. त्यात आयकर भरणारे तसेच वाहने असलेले अनेक कंत्राटदार लोक आहेत. आपण त्या संदर्भात किती जणांवर कारवाई करणार आहात ? सभापती महोदया, माझ्यावर कारवाई केल्याचे दु:ख नाही. महाराष्ट्रातील १५ हजार मजूर संस्थांपैकी एका संस्थेमधील १० संचालक गृहीत धरल्यास त्यांची संख्या दीड ते दोन लाख इतकी होते. तसेच एका मजूर संस्थेवर अवलंबून असलेली १० ते १५ लोक गृहीत धरल्यास मजूर संस्थांच्या माध्यमातून ३ ते ४ लाख लोकांचा उदरनिर्वाह सुरु आहे. त्यात कोणी धनाढय, मध्यमवर्गीय असतील. अशा प्रकारे ते मजूर संस्थांच्या माध्यमातून कामे करीत आहेत. मी सहकार क्षेत्रामध्ये काम करणारा कार्यकर्ता असल्यामुळे सहकार उद्ध्वस्त व्हावे अशी माझी भावना नाही. परंतु आमच्याकडे एक बोट दाखवत असताना राज्यातील १५ ते २० हजार मजूर संस्थांच्या संदर्भात शासन त्या संस्था रद्द करणार आहेत का, त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करणार आहेत का ? किंवा त्यांच्यामधील दोष दूर करुन सहकार चळवळ सुदृढ करणार आहे. सभापती महोदया, सहकार चळवळ सुदृढ करावी अशी माझी भावना आहे. आपण नेहमी म्हणत असतो की, सहकारमध्ये १० टक्के चुका असतील म्हणून संपूर्ण सहकार क्षेत्र वाईट आहे का ? आपण चुका दुरुस्त करीत असतो. मी सहकार चळवळीमध्ये १०-१५ वर्षांपासून सातत्याने सांगत आहे की, सहकारातील चुका दुरुस्त कराव्यात. बदलत्या प्रवाहाबरोबर आपल्याला सहकार क्षेत्राला पुढे नेले पाहिजे. परंतु कोणतेही कारण नसताना सेक्शन ८३ अन्वये चौकशी करण्यासंबंधी सहकार मंत्र्यांनी आदेश दिले. तसेच सहकार आयुक्तांनी पत्र दिले. अशा प्रकारे सहकार आयुक्त हे पोलीस आयुक्त झाले आहेत. त्यांनी असे सांगितले की, चौकशी करण्यापूर्वी गुन्हा दाखल करावा. तसेच याबाबत ते असे सांगतात की, सदर गुन्हा रद्द झाल्यास तो कोर्टात होईन. सभापती महोदया, कोर्टात जो निर्णय होईल तो नंतर होईल. उद्या तुम्हाला मला अटक करायची असल्यास तुम्ही मला अटक करावी. आम्ही त्याकरिता घाबरत नाही. परंतु या निमित्ताने मजूर चळवळीचे काय होणार आहे ? सभापती महोदया, मी जिल्हा

श्री.प्रवीण दरेकर ....

बँकेत केलेल्या कामाचा इतिहास सदनाला सांगणार नाही. मी २० वर्षांच्या काळात सदर जिल्हा बँक १२०० कोटी रुपयांवरुन १० हजार कोटी रुपयांपर्यंत नेली. हा माझा गुन्हा आहे का ? याउलट राज्यातील ३०–३५ बँकापैकी ४-५ बँका वगळयास उर्वरित सर्व बँका पुढाऱ्यांनी खाऊन टाकल्या आहेत.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

ते पुढारी भारतीय जनता पार्टीचे नाहीत. त्यांची जंत्री यादी मी येथे मांडणार आहे. सहकार मंत्री महोदयांना आपल्या एका सहकाऱ्याचे निवेदन वाचताना आनंद झाला. प्रवीण दरेकर यांच्यावर दाखल झालेल्या गुन्हयांची कलमे वाचून दाखविली. काही अडचण नाही. जसे सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी दाखवले ते देखील रेकॉर्डवर आणावे, सत्य समोर येईल. कायद्याचा किती वापर करायचा तो करावा. जसा आमचा गुन्हा तुम्ही रेकॉर्डवर आणता व निवेदन करता. संभाजीनगरचा मेहबुब शेखचा गुन्हा देखील वाचून दाखववावा. रघुनाथ कुचीत याच्यावर बलात्काराचा आहे, कोणती कलमे लावली आहे, काय आरोप आहेत पहावे त्याबाबत निवेदन करावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, श्री.रमेश बोरनारे, वि.प.स. यांच्याबाबत माननीय गृहराज्यमंत्री यांनी निवेदन करावे, मी गुन्हेगार असल्याचे गुन्हा वाचून दाखविता. काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्याच्या घरावर दगड मारण्याचा प्रयत्न करु नये. सत्तेचा वापर असा करणार असाल तर मी सीबीआयकडे तक्रार करणार आहे. मी जिल्हा बँक व बाकीच्या संस्थांची माहिती आणली आहे. सहकार मंत्री महोदयांनी चौकशी केली नाही तर माननीय केंद्रीय मंत्री श्री.अमित शहा व सीबीआय यांचेकडे चौकशीची मी मागणी करणार आहे. माझ्याकडे राज्यातील मजूर फेडरेशनच्या अध्यक्षांची यादी आहे. किती आमदार व मंत्री मजूर सहकारी संस्थेवर आहेत, तुम्ही या सर्वांवर गुन्हे दाखल करणार का, ती हिंमत आहे का, माननीय श्री.गुलाबराव देवकर माजी मंत्री हे सध्या जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आहेत. ते जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष होते, राज्य फेडरेशनवर संचालक होते. आज ते जिल्हा बँकेचे अध्यक्ष आहेत. निवडणूक लढवली नाही पण ते १५-२० वर्षे तेथे आहेत. सहकार मंत्री महोदय त्यांच्यावर कारवाई करणार आहेत का. प्रवीण दरेकर वेगळया पक्षाचा विरोधी पक्ष नेता असल्याने जबरदस्तीने कारवाई करीत आहात. काळच या सर्व गोष्टींचे उत्तर दिल्याशिवाय राहणार नाही. माझ्यावर द्वेष भावनेतून गुन्हा दाखल केला असला तरी मी सहकार मंत्री महोदयांना विनंती करणार आहे. तुम्ही

श्री.प्रवीण दरेकर .....

असुधारित प्रत

माझ्यावरील कारवाईची प्रक्रिया ताकदीने करा, आणखी जोर लावा परंतु या मजूर संस्थांच्या भविष्याविषयी सरकारची काय भूमिका आहे. या संस्था रद्द करणार आहात. ते १०० टक्के आयकर भरणारे आहेत. हा रोजगार टिकला पाहिजे. त्यांच्यातील दोष काढून पुन्हा ही चळवळ जिवंत करुन चांगल्या पध्दतीने चालवली पाहिजे की त्याला टाळे लावायचे आहे हे एकदा ठरवावे. मी मजूर संस्थांच्या फेडरेशनच्या अध्यक्षांची व त्यांच्या पक्षाची यादी वाचतो. श्री.सय्यद अकबर, जालना जिल्हा काँग्रेस, श्री.वारे, परभणी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस फेडरेशन अध्यक्ष, श्री.वामनराव देशमुख, वाशिम, काँग्रेस पक्ष, श्री.नंदकुमार पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस, बुलढाणा मजूर संघाचे अध्यक्ष, श्री.दिनकर उबाळे, नाशिक, श्री.स्वान हे काँग्रेस पक्षाचे असून चंद्रपूर जिल्हा मजूर संघाचे अध्यक्ष आहेत. श्री.अंकुश पाटील, काँग्रेस पक्ष, नंदूरबार अध्यक्ष, हे गरीब मजूर आहेत का, त्यांच्या मालमत्ता व वाहने पहावीत. त्यानंतर श्री.कैलास नगीने, राष्ट्रवादी काँग्रेस, भंडारा, यांच्यावर कारवाई व गुन्हा नाही. श्री.कुसाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस, पुणे, श्री.भोयर, कॉग्रेस, गडचिरोली, श्री.साठे, सांगली, राष्ट्रवादी काँग्रेस, श्री.प्रमोद झांबरे, राष्ट्रवादी काँग्रेस सातारा, श्री.नारायण नन्नावरे, काँग्रेस पक्ष, उस्मानाबाद, श्री.मोरेश्वर मंतारे, काँग्रेस पक्ष, वर्धा, श्री.दिलीप पाटील नागरकर, राष्ट्रवादी काँग्रेस लातूर, श्री.तनवीर, काँग्रेस पक्ष, अमरावती, श्री.बंटी शिरसाठ, राष्ट्रवादी काँग्रेस हे देखील गरीब मजूर आहेत का. माझ्यावर ज्या पध्दतीने गुन्हा दाखल करुन कारवाई सुरु आहे. ते कोण आहेत हे मी आपल्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेसमोर आणत आहे. श्री.स्वप्नील निखार, काँग्रेस पक्ष, नागपूर, श्री.लिलाधर तायडे, राष्ट्रवादी काँगेस, जळगाव, श्री.ज्ञानेश्वर जाधव, हिंगोली ही नावे आहेत. या शिवाय १०३ आजी माजी आमदार मंत्री यांची यादी आहे. परंतु मी सर्व यादी वाचत नाही. पण या सर्व प्रकरणाच्या चौकशीची मी मागणी करणार आहे.

सभापती महोदय, माझ्यावरील कारवाईचा प्रश्न नाही. मी २०-२५ वर्षे या सहकार चळवळीत काम करीत आहे. मजूर चळवळीच्या माध्यमातून बेरोजगार

श्री.प्रवीण दरेकर .....

तरुणांना काम मिळावे यासाठी प्रयत्न केला आहे. शिवशाहीचे सरकार असताना सहकार मंत्री श्री.जयप्रकाश मुंदडा होते. त्यावेळी त्यांना विनंती करुन मुंबईतील अनेक बेरोजगार तरुणांनासुध्दा मजूर संस्थांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध व्हावा या भूमिकेतून काम केले आहे. आज मंत्री महोदयांनी मजूराची व्याख्या स्पष्ट करावी जेणेकरुन तीन चार लाख लोकांचे भविष्य प्रश्नांकित आहे. माझ्यावर कारवाई होईल तशी मी एक पत्र दिले तर त्यांच्यावरही कारवाई होणार. ही कारवाई फक्त माझ्यापुरती होती असे सांगून टाकावे, मी तुम्हाला सोडून देतो. सहकार चळवळीवर यांनी दरोडे टाकायचे, यांनी चोऱ्या करायच्या, मजूर संस्थांच्या माध्यमातून माझ्यावर २५७०० रुपये भत्ता घेतल्याचा आरोप केला आहे. भत्ता घेतला म्हणून मी मोठा दरोडेखोर, फसवणूक झाली का, फळे येणाऱ्या झाडालाच लोक दगड मारत असतात. त्यामुळे अशा दगड व संकटांची पर्वा करीत मी काम करणारा कार्यकर्ता नाही. साखर कारखानदारी हे या महाराष्ट्राचे वैभव होते. या पुढाऱ्यांनी याचे कसे वाटोळे केले हे मी मुद्दयासहीत मांडणार आहे. ही खाण्याची कुरण आहेत का, मजूर संस्थांच्या लोकांनी चोरी केली का. आपल्याकडे म्हणे आहे की, राज्याने बिडी प्यायली तर ती स्टाईल व गरीबाने प्यायली तर तो भिकारी. अशा प्रकारच्या मनोवृत्तीतून सरकार काम करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचा घोटाळा मी पुन्हा एकदा अधोरेखीत करीत आहे. देशात आतापर्यतचा सर्वात सुनियोजित घोटाळा महाराष्ट्र राज्य सहकारी शिखर बँकेचा आहे. न्यायालयाच्या आदेशाने या बँकेची चौकशी झाली, सुरींदर अरोरा यांनी या प्रकरणी २०१५ मध्ये उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर निकाल देताना न्यायालयाने संबंधितांवर एफआयआर दाखल करण्याचे आर्थिक गुन्हे शाखेला आदेश दिले. २०१३ मध्ये तत्कालीन सहकारी आयुक्तंनी शिखर व राज्य बँकेच्या चौकशीचे आदेश दिले. या आदेशाबरोबर त्यांनी स्वतंत्र परिशिष्ट जोडत या चौकशीसाठी १० विविध मुद्दे दिले.

श्री.प्रवीण दरेकर .....

असुधारित प्रत

आम्ही २५ हजार भत्ता घेतला म्हणजे आम्ही बोगस. पण त्यांच्या चौकशीमध्ये करोडो रुपयांचे डल्ले मारले आहेत, मी आकडे सांगितले तर सर्वांना आश्चर्य वाटेल.

सभापती महोदय, बँकेने नाबार्डकडील क्रेडीट मॉनीटरींग ॲरेजमेंटचे सीएमएचे उल्लंघन करुन संचित तोटा उणे नक्त मुल्य अपुरा दुरावा.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

आणि अपुरे तारण मुल्य असलेल्या संस्थांना कर्ज पुरवठा केला. आम्ही सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांना तारण घेऊन कर्ज दिले, त्याची नियमित परतफेड होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस तीन नगरपालिकांवर झेंडा फडकवित आहेत म्हणून त्यांच्यावर गुन्हे दाखल होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी तिप्पट तारण दिलेले आहे. राज्य बँकेत जागा, शेड, स्टॉक, तारण देखील नाही, तेथे कोटयवधी रुपयांची कर्जे दिली जात आहेत. भारतरत्न बाबासाहेबांचे नाव सांगून समानतेचे कायद्याचे राज्य आहे, असे सांगायचे आणि अशा प्रकारे कायदा वाकवायचा !

सभापती महोदय, संजय सहकारी साखर कारखाना विजय नगर, जिल्हा सांगली, गिरनार सहकारी साखर कारखाना, मालेगाव, जि.नाशिक, सिंदखेडा सहकारी साखर कारखाना, जि.धुळे, डोंगराळी सहकारी साखर कारखाना, जि.सांगली, अशा अनेक कारखान्यांना कर्ज पुरवठा केला गेलेला आहे. परंतु या कर्जाच्या सुरक्षेसाठी संस्थांची मालमत्ता तारण, गहाण ठेवून घेतली नसल्याने ही कर्ज असुरक्षित झालेली आहेत. असे त्या चौकशीत म्हटलेले आहे. दुसऱ्या मुद्दयात साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जावरील अपुऱ्या दुराव्याचे खेळते भांडवली कर्जामध्ये रुपांतर, खेळते भांडवली कर्जाचे पुर्नरचित मुदती कर्जामध्ये रुपांतर, पुर्नरचित मुदतीचे पुन्हा रुपांतर, त्यामुळे बँकेची साखर कारखान्यांकडून असलेली कर्जाची येणी ४५०० कोटी रुपये इतकी ३१ मार्च,२०११ पर्यंत अपेक्षित होती. ही रक्कम राज्य बँकेच्या प्रमाणात एकूण कर्जाच्या ४० टक्के इतकी होती. या दहा मुद्दयांपैकी सहाव्या मुद्दयात राज्य बँकेने कर्जदार संस्थांकडील थकित कर्जवसुलीसाठी केंद्र शासनाच्या सिपिटरायजेशन किंवा सरफेसी कायद्यांतर्गत सहकारी साखर कारखान्यांची मालमत्ता ताब्यात घेऊन त्या मालमत्तांची विक्री केली. या मालमत्तेत एकूण २२ कारखाने असल्याचे सांगितले जात आहे, परंतु प्रत्यक्षात मात्र या ठिकाणी हे एकूण ४० कारखाने आहेत. या तीन मुद्दयांच्या आधारावर रिझर्व्ह बँकेने तत्कालीन संचालक मंडळ बरखास्त करुन तेथे प्रशासक नेमले.

श्री.प्रवीण दरेकर......

असुधारित प्रत

सभापती महोदय, या सरफेसी ॲक्टचा दुरुपयोग केला गेलेला आहे. या कारखान्यांची काय परिस्थिती आहे ? कारखान्यांना कशा पध्दतीने सरकार मदत करत आहे ? राज्यात एकूण २०२ सहकारी साखर कारखान्यांची उभारणी झाली. त्यापैकी १०१ सहकारी साखर कारखाने सुरु आहेत. या कारखान्यांना दिलेल्या मदतीपैकी आजपर्यंत जवळपास ४१०० कोटी रुपये वसुलीस पात्र आहेत, त्याचा गोषवारा मी आता देत आहे. या करिता सरकारने कशी मदत केलेली आहे ? शासकीय भाग भांडवल शासनाने साधारणत: ९९६ कोटी रुपयांचे दिलेले आहे. शासकीय कर्ज साधारणत: शासनाने १२६७ कोटी रुपयांचे दिलेले आहे. शासनाची थकहमी ती ११११ कोटी रुपये इतकी आहे. एकूण ४०७६ कोटी रुपये सरकारने कष्टकऱ्यांनी भरलेल्या करातून कारखान्यांना दिलेले आहेत. हे शासनाने मोठया लोकांसाठी केलेले आहे.

सभापती महोदय, आज यामध्ये तब्बल कष्टकऱ्यांच्या घामाच्या पैशातून भरलेल्या करातून ३८६८ कोटी रुपये थकित आहेत. जी शासकीय मदतीच्या ९५ टक्के एवढी रक्कम ती आहे. १०० पैकी ९५ रुपये थकविले गेलेले आहेत. ही सहकार चळवळीची फसवणूक नाही का ? प्रवीण दरेकर मजूर दाखवितो, तो फसवणूक करतो, तो दरोडेखोर आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल करावा, असे म्हटले जाते. या संदर्भात ५०-५० अधिकारी सर्च घेण्याकरिता येतात. वसंतदादा पाटील यांच्या नावाने सुरु झालेल्या सहकारी कारखान्यांची परिस्थिती काय आहे, ती देखील पाहावी. ती कारखान्याची स्थिती शासन दुरुस्त करु शकलेले नाही. सहकार चळवळ दुरुस्त करण्याच्या ऐवजी पुनरुज्जिवित करण्याच्या ऐवजी संबंधितांना आरोपी करायचे आणि राजकीय सुड घ्यायचे, हे योग्य नाही. वसंतदादा पाटील, कळवण यांच्या नावाने देखील कारखाने आहेत. वसंतदादा पाटील, कळवण येथील कारखान्याचे ३.७१ कोटी रुपये थकित आहेत. वसंतदादा पाटील कारखाना पुसद यांचे १३.२१ कोटी रुपये थकित आहेत. वसंतदादा पाटील, एरंडोल या कारखान्याचे ८.२१ कोटी रुपये थकित आहेत.

श्री.प्रवीण दरेकर......

आदरणीय कै.वसंतदादा पाटील यांच्या जिल्हयातील काही कारखान्यांची परिस्थिती सांगतो. तासंगाव सहकारी साखर कारखान्याचे २२.९२ कोटी रुपये थकित आहेत. सर्वोदय कारखान्याचे १६ कोटी थकित आहेत. निनाईदेवी, शिराळा या कारखान्याचे १९ कोटी रुपये थकित आहेत. वसंतदादा पाटील शेतकरी सहकारी बँक, सांगली ही ६०० कोटी रुपयांची ठेव असणारी बँक २००९ मध्ये अवसायनात गेली. सर्वसामान्य ठेवीदारांचे कोटयवधी रुपये बुडाले. थोर धुरीणांनी सहकार चळवळ उभी केली. ज्यांनी सहकार चळवळ उभी केली, त्यांच्या नावाने सुरु केलेल्या सहकारी संस्था देखील आज थकित आहेत. त्यांचे नाव केवळ भाषणात घेतले जाते. स्व. यशवंत चव्हाण यांचे नाव भाषणात घेतले जाते. परंतु त्यांच्या नावाने काढलेल्या संस्था मात्र डबाघाईस आलेल्या आहेत, त्या पुनरुज्जीवित केल्या जात नाहीत. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने सुरु झालेल्या कारखान्यांची मी परिस्थिती सांगतो. यशवंत खानापूर कारखान्याची ८३ कोटींची थकबाकी आहे. यशवंत कारखाना, थेऊर यांचे २४.२९ कोटी रुपये थकित आहेत. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नावाने जरण्डेश्वर, कोरेंगाव येथील कारखान्याचे ६६ कोटी रुपये थकित आहेत. रयत, कराड या कारखान्याचे २० कोटी रुपये थकित आहेत. प्रतापगड जावळी या कारखान्याचे १२ कोटी रुपये थकित आहेत. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या आत्म्यास हे पाहून वाईट वाटत असेल. ज्या थोर नेत्यांनी सहकाराला एक मोठी उंची दिली, आज त्यांच्या नावाने सुरु करण्यात आलेल्या सहकारी संस्था गैरव्यवस्थापन, भ्रष्टाचार, मनमानी कारभारामुळे अवसायनाकडे वाटचाल करत आहेत, अशा प्रकारची दुर्दैवी परिस्थिती सहकारावर आलेली आहे.

सभापती महोदय, सहकारी सुतगिरण्यांनाही तशाच प्रकारे सरकारने मदत केलेली आहे. त्यांनाही सरकारने भाग-भांडवल, कर्ज, थकहमी दिलेली आहे. तरी देखील या कारखान्यांची स्थिती वाईटच आहे. दिलेल्या रकमेच्या ८८ टक्के थकित रक्कम यंत्रमाग सहकारी संस्थांची आहे. काही संस्थांची थकित तर केलेल्या

श्री.प्रवीण दरेकर......

असुधारित प्रत

मदतीच्या ९५ टक्के इतकी आहे. कृषी सहकारी संस्थांचे देखील अशाच प्रकारे २५०-३०० कोटी रुपये थकित आहेत.

सभापती महोदय, ज्या सहकार क्षेत्रातील संस्था बुडायला निघायला आहेत, त्यांच्याकडे बघायला आम्हाला वेळ नाही, परंतु राजकीय सुडाने विरोधक कोण ? सत्ता येते आणि जाते, परंतु सुडाने वागून चालत नाही. जे नियम आहेत, ते केवळ एका संस्थेला लावले जात आहेत, ते सर्वांनाच लागू होणार आहेत. मी आपल्याकडे मागणी केल्यानंतर न्यायालयातही ही मागणी करणार आहे. राज्यातील जिल्हा बँकांची मी परिस्थिती सांगतो. राज्यातील चार-पाच जिल्हा बँका केवळ चांगल्या चालू आहेत. पुणे जिल्हा बँक, कोल्हापूर जिल्हा बँक, सांगली-सातारा जिल्हा बँक, मुंबई जिल्हा-मध्यवर्ती बँक या जिल्हा बँका केवळ आजच्या घडीला चांगल्या चालू आहेत. इतर सर्व जिल्हा बँका वाईट अवस्थेत आहेत. बुलढाणा, गोंदिया जिल्हा बॅकाची काय स्थिती आहे, याचे वर्णन मी करतो. यामध्ये नागपूर जिल्हा बँकेचे देखील नाव आहे.

सभापती महोदय, विदर्भातील बुलढाणा, वर्धा, नागपूर जिल्हा बँक कधी सुरु करण्यात येणार आहे, मजूर संस्था बंद करा, फेडरेशन बंद करा, सर्व बंद करा पण शेतकऱ्यांसाठी कर्ज देणाऱ्या ज्या जिल्हा बँका आहेत, त्यांच्यासाठी शासन काय करणार आहे, त्या बँका सुरु करण्याकरिता शासन काय करणार आहे ? माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस सरकारच्या काळात या बँकांना २००-२५० कोटी रुपये दिले गेले होते.

सभापती महोदय, आज शेतकऱ्यांना कर्ज मिळत नाही. काही प्रमुख कर्जदार जे आहेत, त्यांच्याकडील थकित रक्कम मी आपल्याला सांगतो. कारण शेवटी या चर्चेच्या निमित्ताने राज्यामध्ये सहकारी संस्थांमध्ये नेमके काय चालू आहे, याची सहकार मंत्रीमहोदयांना माहिती करुन देणे अर्थात त्यांच्याकडे यंत्रणा आहे, त्यांच्याकडे विभाग आहे त्यांना माहिती असतेच ! परंतु त्याची आठवण देखील आम्ही करुन देत आहोत.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.......

सभापती महोदय, सहकार महर्षी स्व.बापुराव देशमुख सहकारी साखर कारखाना, वर्धा कोणाचा आहे ? या कारखान्याकडे ८१ कोटी रुपये थकित आहेत. स्व.बापुराव देशमुख सहकारी सुतगिरणी, वर्धा कोणाची आहे, ती देखील पूर्णपणे डुबलेली आहे. या सुतगिरणीचे २० कोटी रुपये थकित आहेत. मुंगसाजी महाराज सहकारी सुतगिरणी, बुलढाणा यांचे देखील २२ कोटी रुपये थकित आहेत. ही संस्था पूर्णपणे बुडलेली आहे. अनुराधा शुगर मिल्स, बुलढाणा या संस्थेचे देखील २४ कोटी रुपये थकित आहेत.

सभापती महोदय, ही रक्कम वसूल करण्याची शासन हिम्मत दाखविणार आहे का ? यातून शेतकऱ्यांचे हित साधण्यात येणार आहे का ? आज या ठिकाणी जिल्हा बँकांच्या माध्यमातून कर्ज वाटप होत नाही.

यानंतर श्री.सोनावणे...

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरकेर..........

बुलडाणा जिल्हा बँकेला शासनाने कर्जमुक्ती योजनेचे १२८ कोटी रुपये दिले. परंतु, वाटप केवळ ६४ कोटी रुपयांचे झाले. उर्वरित रक्कम डिपॉझिटरला परत केली काय ? थकबाकीदारांची रक्कम वसुल केली नाही. ज्यांनी बँका डबघाईला आणलेल्या आहेत, त्यासाठी आपण काहीच करायचे नाही काय ? ज्या बँका चांगल्या चालत आहेत, अशा बँकाना राजकीय द्वेष भावनेतून छळण्याचे काम केले जात आहे. मी सहकार चळवळीत काम केलेले आहे. मी मुंबै जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना कर्ज दिलेले आहे. माझे मुंबई शहर हे कार्यक्षेत्र असताना शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य बँकेला पैसे दिले आहेत. कारखाने बंद पडू नयेत म्हणून पैसे दिलेले आहेत. जे कारखाने बंद पडलेले आहेत, अशा कारखान्यात शेतकऱ्यांचा ऊस कोणामार्फत देणार असा माझा प्रश्न आहे. त्यांना मदत करण्याच्या भावनेतून कर्ज दिलेले आहे. कर्ज द्या म्हणून आम्हाला सांगितल्यामुळे आम्ही कर्ज दिलेले आहे. त्यानंतर आमच्या विरोधात मुंबई शहराच्या बाहेर कर्ज कसे दिले म्हणून चौकशी सुरु केली. अशा प्रकारची दुटप्पी भूमिका केलेली आहे. कर्ज द्यायला सांगणारे आपणच आणि बाहेर कर्ज का दिले म्हणून विचारणा करणारे देखील आपणच, अशा प्रकारची दुटप्पी भूमिका ही फार काळ जनतेला गुमराह करता येत नाही. राज्यात अनेक अर्बन बँका आहेत. त्या डबघाईला आल्या म्हणून त्यांना मदत केलेली आहे. साहेबराव देशमुख श्रमीक बँक, रायगड सहकारी बँकातील दोष काढून त्या कशा पुनरुज्जीवीत होतील यासाठी आम्ही प्रयत्न केलेला आहे. आम्ही सहकार बुडविण्याचे काम केलेले नाही. सहकार वाढविण्याचे, जपण्याचे आणि टिकविण्याचे काम केलेले आहे. त्याची शिक्षा म्हणून आमच्या विरोधात गुन्हा दाखल केलेला आहे. हे कमी की काय म्हणून त्यासंदर्भातील गुन्हे हे सभागृहात वाचून दाखविलेले आहेत. सन गिरणा सहकारी साखर कारखाना १९५५ साली स्थापन झाला आणि तो सन १९९७ मध्ये अवसायानात गेला. सन २०१० पर्यंत तो साखर कारखाना अवसायानात होता. सरफेसी कायद्यांतर्गत राज्य बँकेने नोटीस किंवा मालमत्ता जप्त केली नाही. मी तो कारखाना कोणाचा आहे हे सांगणार नाही. सर्व सन्माननीय

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरकेर..........

सदस्यांना गिरणा सहकारी कारखाना कोणाचा आहे याची माहिती आहे. गिरणा सहकारी साखर कारखाना हा नाशिक जिल्ह्यातील आहे. नाशिकचे नेते कोण आहेत ? दिनांक ३० नोव्हेंबर, २०१० रोजी या कारखान्याची आर्मस्ट्राँग इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड ही मंत्रिमंडळातील एका सदस्याच्या कंपनीला विकण्यात आली. हे केवळ विकले नाही. आर्मस्ट्राँगचा मराठी अर्थ भूजबळ असा आहे. नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आर्मस्ट्राँग इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला ३० कोटी रुपयांचे कर्ज दिले. मी चुकीचे बोलत असतील तर मंत्री महोदय त्यांच्या उत्तरातून मला खोडून काढतील. ३० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आणि १५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार हा शेवटी भ्रष्टाचारच आहे. सत्येचा किती दुरुपयोग केला जात आहे त्यासाठी मी एक-एक उदाहरण देणार आहे. कन्नड सहकारी कारखाना, नावे घेतले तर अनेक मोठ्या पुढाऱ्यांची मला नावे घेता येतील. सत्ताधारी पक्षातील एका प्रभावी आमदाराने कन्नड सहकारी साखर कारखाना खरेदी करण्याच्या व्यवहारामध्ये घोटाळा केल्याचा आरोप आहे. ज्येष्ठ नेत्या माननीय श्रीमती शालिनीताई पाटील यांनीसुध्दा त्या आरोपांना दुजोरा दिला होता. कन्नड सहकारी कारखानाच्या विक्री दरम्यान किंमत कमी केल्याच्या घोटाळयाचा आरोप आहे. संबंधित सदस्यांने कन्नड सहकारी कारखाना ज्या पध्दतीने राज्य बँकेच्या लिलावामध्ये मॅन्युपिलेशन करीत ५० कोटी रुपयांना विकत घेतला होता. त्यांची प्रॉपर्टी ही ४०० ते ५०० कोटी रुपयांच्या आसपास आहे. बारामती ॲग्रोने हे साखर कारखाना विकत घेतला. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखान्याचा त्यामध्ये मोठा तोटा झालेला आहे. त्यानंतर शिखर बँकेने ताबडतोब १४० कोटी रुपयांचे कर्ज मंजुर केले होते. आता जरंडेश्वर कारखान्याची सत्य माहिती देणार आहे. सहकार चळवळीतील माझे खरे मारेकरु कोण हे मी सांगणार आहे. थोर समाजसुधारक माननीय श्री. अण्णा हजारे यांना सोबत घेऊन कॉम्रेड माणिक जाधव यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर बँकेचा घोटाळा आणि कमी दरात कारखान्यांच्या विक्रीच्या विरोधात गेली १० वर्षे सातत्याने लढा देत आहेत. शेतकऱ्यांचे साखर कारखाने खाजगी मालकीचे करण्याचा

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरकेर..........

घाट अनेक पुढाऱ्यांनी केलेला आहे. त्यामुळे सहकार चळवळ अडचणीत आली. मागच्या ४० वर्षापासून सहकारी चळवळीच्या मारेकऱ्याची हिंमत वाढत आहे. कशा पध्दतीने भ्रष्टाचारा करायचा ती कार्यपध्दती सांगणार आहे. पहिल्यांदा सहकारी बँकेतून अव्वाच्या सव्वा कर्ज घ्यायचे. राज्य आणि जिल्हा बँका आपल्याच आहेत. त्यावर चुकून विरोधी पक्षातील सन्मानीय सदस्य अध्यक्ष असला तर सरकारकडून सांगितले जाते की, कर्ज द्या. त्यावेळी अव्वाच्या सव्वा कर्ज काढले जाते. कर्ज एनपीएत घालायचे. अनुउत्पादक कर्ज करायचे आणि कारखाना अवसायानात काढायचा. बँकेने अवसायनात आलेला कारखाना ताब्यात घ्यायचा. स्वत: अल्प किंमतीमध्ये कारखाना खरेदी करायचा आणि तो खरेदी करत असताना त्याच बँकेला लुटण्याचे काम केलेले आहे. राज्यातील ५५ सहकारी साखर कारखाने अशाच पध्दतीने बेकायदेशीर विक्री करुन एक मोठा संघटित दरोडा सहकार क्षेत्रावर घालण्याचे काम केले जाते. म्हणजे दरोडेखोर आपण आणि सांगायचे की प्रवीण दरेकरांचे नाव दरोडेखोर ठेवा. महाविकास आघाडी सरकारला महादरोडेखोर म्हणायचे काय ? जरंडेश्वर साखर कारखाना सहकारीचा खाजगी कसा झाला याचा अभ्यास करण्याची गरज आहे. त्यावर सिनेमा काढला जाऊ शकतो. हा कारखाना राष्ट्रवादीच्या आमदार माननीय श्रीमती शालिनीताई पाटील यांच्या ताब्यात होता. कारखाना सन २००८ साली बँकेने जप्त केला होता. मी कार्यपध्दती सांगितली आहे. त्यावेळी फक्त १९ कोटी रुपयांचे कर्ज होते. त्यांच्या ८ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या आणि ३३ कोटी रुपयांची थकहमी होती. एवढीच त्या कारखान्याची लायबिलीटी होती. इतके सर्व असताना हा कारखाना राज्य सहकारी बँकेला सांगून ताब्यात घेण्यात आला. कारखान्याला मदत केली असती तर जरंडेश्वर कारखाना हो लोकांचा, सभासदांचा आणि सहकारी संस्थाचा राहिला असता. त्यानंतर तो कारखाना हडप करायचा होता त्यामुळे विक्रीला काढलेला आहे. सन २००५ पासून शालिनी बँकेने पैसे देण्याचे बंद केले. सन २००५ मध्ये सरकार आपले असताना त्यांनी सर्व कारखाने आणि बँकांचे खाजगीकरण करण्याचा ठराव केला होता. इस्ट इंडिया कंपनी भारतात

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरकेर..........

आली. त्यावेळी कंपनीने सर्व साखर कारखाने आणि बँका खाजगी करण्याचा ठराव केला असल्याचे पुरावे प्राप्त झाले. हे कॉम्रेड माणिक जगताप यांच्या याचिकेच्या माध्यमातून पुढाकाराने हे झालेले आहे. २५ हजार सभासद आणि ४० कोटी रुपयांचे मूल्यांकन असताना या कारखान्यास केवळ खाजगीकरणासाठी घाट घातला गेला आणि शालिनीताई यांना नेस्तनाबूत करुन त्या कारखान्याची विक्री करण्याचे कट कारस्थान शिजले होते. काही दिवस तो कारखाना सन्माननीय सदस्य श्री. विनय कोरे यांनी चालविला होता. त्यांना नंतर मंत्रिमंडळात काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे कारखाना त्यांना सोडावा लागला होता. पुन्हा तो उत्तर प्रदेशमधील स्नेहा शुगर कंपनीला दिला. निविदेत कशा पध्दतीने घोटाळा झालेला आहे, ते मी सांगणार आहे. दिनांक २७ सप्टेंबर, २०१० रोजी एक निविदा प्रसिध्द करण्यात आली. यामध्ये १२ जणांनी निविदा भरली होती. यामध्ये सध्याच्या गुरु कमोडिटी प्रायव्हेट लिमिटेड यांची निविदा नव्हती हे विशेष. १२ जणाच्या निविदेमध्ये त्यांचे नाव नव्हते.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामदास आंबटकर)**

श्री.प्रवीण दरेकर.....

एकूण १२ जणांनी निवदा भरल्यानंतर पुन्हा निविदा काढण्याची काहीच आवश्यकता नव्हती. परंतु तरी सुद्धा दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा निविदा काढण्यात आली. बंगलोरच्या एस.एल.शुगरने सर्वाधिक ६५ कोटी रुपये भरलेले असताना सुद्धा दिनांक १२ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या बोर्ड बैठकीमध्ये त्यांना बाद करण्यात आले आणि गुरु कमोडिटीज या कंपनीचे भाग भांडवल नगन्य असताना, त्यांचा टर्नओव्हर अत्यल्प असताना त्यांच्या हातात हा कारखाना देण्याचे पाप कोणी केले, हा खरा प्रश्न आहे. त्यांची सर्व कागदपत्रे ई.डी.च्या ताब्यात आहेत. सभापती महोदय, या प्रकरणी खरा घाट हा दि.०७/०५/२०११ रोजी घालण्यात आला. तेथील बोर्ड बरखास्त झाल्यानंतर त्या ठिकाणी श्री.गोयल नावाच्या प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. परंतु त्यांचे कोणीही न ऐकता हा कारखाना खाजगी करण्याची बिजे रोवली गेली. राज्य बँकेचे सात प्रादेशिक कार्यालये असून त्यातील एक कार्यालय पुणे येथे आहे. सभापती महोदय, यात किती मॅनीप्युलेटेड कार्यक्रम असतो ते मी सांगतो. २०० रुपयांच्या बाँडवर सेल डीड बनविण्याचा प्रकार केला गेला. तालुका निबंधक कार्यालयात २०० रुपयांच्या बाँडवर १८ कोटी ८९ लाख रुपयांचे सेल डीड करण्यात आले. परंतु श्री.गोयल नावाच्या प्रशासकांना या बाबत काहीही थांगपत्ता नव्हता. तसेच हे पैसे सुद्दा बँकेत जमा केले नाहीत, ही बाब विशेष आहे. या दरम्यान श्रीमती शालिनीताई पाटील यांच्या याचिकेप्रकरणी कॉ.माणक जाधव, श्री.अण्णा हजारे आणि श्री.अरोरा यांची उच्च न्यायालयात सुनावणी झाली. तद्नंतर दि.२२/०८/२०१९ रोजी उच्च न्यायालयाने संबंधितांवर पाच दिवसांच्या आत गुन्हे दाखल करावेत, असे आदेश दिले. त्यानुसार दि.२६/०८/२०१९ रोजी एफ.आय.आर.दाखल झाला. त्यात बड्या ७६ संचालकांची नावे आहेत. मी या बड्या लोकांची नावे घेत नाही. आर्थिक गुन्हे शाखेने सर्वांवर गुन्हे दाखल केले. परंतु सरकार बदलल्यानंतर सत्तेचा गैरवापर सुरु झाला. श्री.श्रीकांत परोपकारी या पोलीस उपायुक्तांनी कोणताही तपास न करता या प्रकरणातील सर्वांना क्लिनचीट दिली. परंतु आमच्या बाबतीत जो गुन्हा

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

सी-समरी झाला, न्यायालयाने जे पीटीशन डिसमीस केले त्या प्रकरणी पुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला. ई.डी.च्या १० हजार पानांच्या अहवालामध्ये गुन्हा सिद्ध झालेला असताना, पोलीस उपायुक्तांनी संबंधितांना क्लिनचीट दिली. ही किमया केवळ सत्ताधारी मंडळीच करु शकते. त्यानंतर कॉ.माणक जाधव, श्री.अण्णा हजारे साहेब, श्री.अरोरा यांनी क्लिनचीटच्या विरोधात आमची याचिका फेटाळली असा दावा केला आणि या प्रकरणी हा तपास पुन्हा ई.डी., सी.बी.आय.कडे देण्याची मागणी केली.

सभापती महोदय, मुंबै जिल्हा बँकेने जिल्ह्याच्या बाहेर कर्ज दिले तर कार्यक्षेत्राच्या बाहेर कर्ज दिल्यामुळे बँकेच्या कारभारात अनियमितता झाली, गैरव्यवहार झाला असे सांगितले जाते. परंतु पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्ह्याबाहेर जाऊन जरंडेश्वर साखर कारखान्याला १० वर्षात तब्बल ७०० कोटी रुपयांचे कर्ज दिले. मुळात तो कारखना केवळ ४० कोटी रुपयांत घेण्यात आला होता. हा काय प्रकार सुरु आहे ? साप म्हणत भुई थोपटण्याचा हा प्रकार आहे. सभापती महोदय, त्या ठिकाणी एक-एक जादुई प्रयोग करण्यात आले. हा कारखाना ज्या दिवशी विकत घेतला त्याच दिवशी चालविण्यास देण्यात आला. अशा प्रकारचा विक्रम या महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात नोंदविला गेला. २०१०-११ चा हंगाम बीव्हीजी ग्रुपने चालविला. त्यानंतर जरंडेश्वरने गुरु कमोडिटीजकडून तो कारखाना भाड्याने घेतल्याचे दाखविले गेले आणि फायनान्स मात्र जय ॲग्रोने केल्याचे दाखविण्यात आले. जय ॲग्रो कोणाची आहे, गुरु कमोडिटीज कोणाची आहे, हे सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांना चांगले माहीत आहे. या कंपनीत शेअर्स कोणाचे आहे हे सर्वांना माहीत आहे. मी विचारु इच्छितो की, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक साताऱ्यात जाऊन ७०० कोटी रुपये कोणाच्या आदेशाने देते, त्यांचा बोलविता धनी कोण आहे ?

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

सभापती महोदय, राम गणेश सहकारी साखर कारखान्याकडे १११ एकर जमीन होती. या सरकारकडून लुटायचे, दरोडा टाकायचे काम केले जाते आणि दुसऱ्याला चोर म्हणून संबोधले जाते. या कारखान्यासाठी शासनाने १२ कोटी रुपयांचे भाग भांडवल दिले. तसेच २ कोटी ५१ लाख रुपयांचे शासकीय कर्ज दिले. एवढेच नव्हे तर २२ काटी ९३ लाख रुपयांची शासकीय हमी देखील देण्यात आली. तसेच शेतकरी बांधवांकडून १२ कोटी रुपयांचे शेअर्स गोळा करण्यात आले. अशाप्रकारे एकूण ५० कोटी रुपये या कारखान्याला विविध मार्गांतून मिळाले. हा कारखाना प्रसाद शुगर लि., अहमदनगर यांना १२ कोटी ५० लाख रुपयांत विकण्यात आला. सभापती महोदय, ५० कोटी रुपये किंमतीचा कारखाना केवळ १२ कोटी ५० लाख रुपयांत विकण्यात आला. प्रत्यक्षात या कारखान्याची बाजार भावानुसार किंमत ८० कोटी रुपये इतकी होती. मी अशी किती उदाहरणे सांगू ?

सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील दौंड सहकारी साखर कारखाना सहकारी तत्त्वावर उभा करण्यासाठी राज्य सरकारने त्यावेळी साधारणपणे १६५ एकरच्या आसपास शासकीय जमीन दिली होती. ही जमीन चांगल्या उद्देशाने दिली होती. १०-१२ हजार शेतकऱ्यांनी प्रत्येकी १५ हजार रुपयांचे शेअर्स खरेदी केले. परंतु दुसरीकडे नव्याने नोंद झालेले कारखाने भविष्यात सक्षमपणे चालणार नाहीत आणि त्या भागात पाण्याची व ऊसाची टंचाई जाणवेल या सबबीखाली अशा कारखान्यांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. या धोरणानुसार दि.२५ नाव्हेंबर, २००३ रोजी अशा १० कारखान्यांची नोंदणी रद्द करण्यात आली. त्यामध्ये दौंड सहकारी साखर कारखान्याची नोंदणी सुद्धा रद्द करण्यात आली. परंतु या कारखान्याचे दौंड शुगर प्रा.लि. असे नामांतर करण्यात आले. एका बाजूला त्या कारखान्याची नोंदणी रद्द करण्यात आली आणि दुसऱ्या बाजूला दुसरे नाव देऊन तो कारखाना सुरु ठेवण्यात आला. २०१४-१५ च्या गळीत हंगामात या कारखान्याने साधारणत: सहा-सात लाख टन ऊसाचे गाळप केले. हा सर्व प्रकार कोण करीत आहे ? शेतकऱ्यांकडून भाग भांडवल जमा करण्यात आले. एवढेच नव्हे तर सत्तेचा

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

दुरुपयोग करुन एका रात्रीत त्या कारखान्याचे खाजगीकरण करण्यात आले. शेतकऱ्यांची अशा पद्धतीने घोर फसवणूक सुरु आहे.

सभापती महोदय, राज्य सहकारी बँकेच्या वतीने अधिकाराचा दुरुपयोग करुन विक्री करण्यात आलेल्या ४० कारखान्यांपैकी जरंडेश्वर, पुष्पदंतेश्वर, जगदंबा आणि कन्नड हे कारखाने कोणी विकत घेतले हे आपल्या सर्वांना आणि महाराष्ट्रातील जनतेला माहीत आहे. उर्वरित कारखाने हे सहकार क्षेत्रातील मंत्री, नेते, हितचिंतकांना वाटण्यात आले, अशी चर्चा आहे.

सभापती महोदय, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावता कामा नये. या कारखान्यांच्या बाबतीत उपाययोजना करण्यासाठी काही जण पुढे आले. आजारी कारखान्यांवर उपाययोजना करण्यासाठी समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने काही शिफारशी सुद्धा केल्या होत्या. १९८१-२००० या कालावधीत आजारी वा बंद सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत अभ्यास करण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी गुलाबराव पाटील समिती, शिवाजीराव पाटील समिती, प्रेम कुमार उच्चाधिकार समिती व माधवराव गोडबोले समिती अशा चार समित्या घटीत करण्यात आल्या. परंतु या चारपैकी एकाही समितीची शिफारस राज्य सरकारने का स्वीकारली नाही याचे उत्तर माननीय सहकार मंत्र्यांनी दिले पाहिजे. केंद्र सरकार आर्थिक बोजा उचलून सहकारी साखर कारखानदारी वाचविण्यासाठी प्रयत्न करीत असताना, राज्य सरकार आणि राज्य सहकारी बँकेने संगनमताने सहकारी साखर कारखानदारी मोडीत काढण्याच्या दृष्टीने पावले उचलल्याचे दिसते. सभापती महोदय, मी विचारु इच्छितो की, या लोकांना सत्ता कशासाठी हवी आहे, सत्तेच्या माध्यमातून पैसा आणि पैशाच्या माध्यमातून सत्ता मिळविण्यासाठी का प्रयत्न केले जात आहेत, सत्ता नसताना सहकाराचे मारेकारी का अस्वस्थ होतात ? सत्तेच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न न सोडविता, स्वत:ला समृदध होण्यासाठी हा सर्व खटाटोप केला जात आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या मालकीचे असलेले ५५ सहकारी साखर कारखाने हे कशाप्रकारे खाजगी झाले आहेत याच्या सुरस कथा हळूहळू बाहेर यावयास लागल्या तर शेतकऱ्यांचे खरे मारेकरी कोण आहेत हे समोर येईल. जरंडेश्वर कारखाना हे तर केवळ एक उदाहरण आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारच्या माध्यमातून मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर कारवाई केली जात आहे. आमची त्याला काही हरकत नाही. राज्य सरकारच्या वतीने मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची १० मुद्याच्या आधारे चौकशी करण्यात आली.

नंतर श्री.कांबळे......

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

मी सांगितले की, होय, कारवाई चांगली आहे. सर्व स्वच्छ झाले पाहिजे. मी म्हणालो की, या १० मुद्यांप्रमाणे पुणे, सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेची चौकशी लावा. अनेक वेळा तक्रारी करुनही मला शासनाने साधे उतर दिले नाही, साधी दखल घेतली नाही. एका जिल्हा बँकेला एक न्याय, आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे कार्टे सुरु आहे. मी काय भ्रष्टाचार आहेत ते उदाहरणासहित सांगणार आहे. राज्य सरकारने त्या भ्रष्टाचारामध्ये लक्ष घातले नाही. मी माननीय केंद्रीय सहकार मंत्री, गृहमंत्री श्री. अमित शहा यांना तक्रार करणार आहे की, विरोधी पक्षनेत्यांनी १० वेळा माहिती मागवून सहकार खात्याने दिली नाही, कारवाई केली नाही. उलट आमच्यावर आकसाने कारवाई होते.

सभापती महोदय, मी अशा अनियमितता लक्षात आल्यावर आयुक्त, सहकार यांना सर्व अनियमिततांची चौकशी करण्याबाबत विरोधी पक्षनेता म्हणून पत्र लिहिले. सदर पत्र दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ ला दिले, त्यानंतर दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१, दिनांक १ नोव्हेंबर, २०२१, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी मी स्मरणपत्रे पाठविली. अद्याप देखील कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. असे का, तर त्या बँका सत्ताधारी पक्षाच्या आहेत. मुंबई बँकेची चौकशी करीत असताना एकदा, दोनदा नव्हे तर एकाच विषयाच्या ८ वेळा चौकशी केली. कलम ८३, कलम ८८, ईओडब्ल्यू, स्थानिक पोलीस स्टेशन .... ते समाधान झाले की, पुन्हा पत्र, पुन्हा कोणी तरी कार्यकर्ता उभा करायचा, कोणा एखाद्या पत्रकाराला हाताशी धरायचे, पुन्हा बातम्या छापून आणायच्या. हे कुभांड रचतात. आपण असे केले, ज्याची न्यायालयाने सी समरी केली होती. त्यांना त्रास देत आहेत. परंतु पुणे जिल्हा बँकेच्या गैरव्यवहाराकडे मात्र सोयीस्करपणे कानाडोळा केला जात आहे.

सभापती महोदय, मला पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या कामकाजासंदर्भात एक तक्रार प्राप्त झाली. खरे तर राज्यातील ही अग्रणी संस्था आहे. चांगली संस्था आहे. मुंबई जिल्हा बँक आर्थिकदृष्ट्या संपन्न, ताकदवान आहे तशी पुणे जिल्हा बँक आहे आणि याही बँकेत गोरगरिबांच्या ठेवी आहेत. परंतु गतवर्षांत पुणे जिल्हा सहकारी

श्री. प्रवीण दरेकर ....

असुधारित प्रत

बँकेच्या व्यवस्थापनाने बँकेचा आर्थिक लाभ स्वत:चा कुटुंबियांना मिळविण्याचा प्रयत्न केला, त्याकरिता बँकेचे हित न जपता, कंत्राटदारांचे हित जपण्यात आले हा माझा आरोप आहे.

सभापती महोदय, पुणे जिल्हा बँकेने शेतकऱ्यांच्या कर्जाची कशी लूट केली याबाबत मला जी माहिती मिळाली ती मी सरकारच्या निदर्शनास आणतो. बँकेतील कॉम्प्युटर तसेच बँकिंग सॉफ्टवेअर, हार्डवेअर हे सर्व उपलब्ध, अद्ययावत व चांगले असताना सुध्दा दाऊस नावाच्या कंपनीने राज्यातील प्रमुख पुढाऱ्याच्या दबावापोटी बँकेला १४० ते १६० कोटी रुपये गतवर्षात खर्च करायला लावला. सॉफ्टवेअर हार्डवेअर सर्व होते. पण माझ्या कोणाला तरी काम द्यायचे आहे म्हणून १६० कोटी रुपये खर्च करायला लावले. थोडक्यात असे की, ज्या गोष्टीची गरज नव्हती त्यावर खर्च करण्यात आला. येथे अनियमितता झाली की नाही ? माहीत नाही. सदर रक्कम खर्च करताना स्पर्धात्मक दराने निविदाप्रक्रिया राबविण्यात आली नाही. मी माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणत आहे की, येथे निविदाप्रक्रिया स्पर्धात्मक दराने राबवली नाही. दाऊस कंपनीकडून खरेदी करण्यात आली, त्या कंपनीची निर्मिती नुकतीच झाली असताना, १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त मुल्यांच्या वस्तू पुरविण्याचा शासकीय अनुभव नसताना, काम दिले. त्यांना अनुभवच नाही. नवीनच कंपनी आहे. १०० कोटी रुपयांच्या वरील काम दिले. दाऊस कंपनीमध्ये कंपनीच्या स्थापनेपासून जे संचालक होते, ते एका प्रमुख नेत्याशी संबंधित आहेत. दाऊस कंपनीच्या खात्यातून या पुढाऱ्याच्या संबंधित खात्यात काही रक्कम वळती झाली का याची चौकशी करावी.

सभापती महोदय, आमच्या, बँकेच्या, संस्थेच्या बँक स्टेटमेंट मागविता, मग याही स्टेटमेंट मागवा. त्या खात्यातून कोणत्या पुढाऱ्याच्या खात्यामध्ये पैसे गेले का ? महाराष्ट्रातील जनतेला खरे दरोडेखोर कोण आहेत ते कळू द्यावे. दाऊस कंपनीकडून ज्या वस्तुंची खरेदी करण्यात आली, त्या वस्तुंचे बाजारमूल्य २० कोटी

श्री. प्रवीण दरेकर ....

रुपये आहे. आम्ही ज्या गोष्टीची २० कोटी रुपये मार्केट व्हॅल्यू आहे ती गोष्ट १४० कोटी रुपयांना खरेदी केली आहे. मी एक भयंकर गोष्ट सांगतो. किती चांगल्या, सुरस कथा आहेत ते आपण पहावे.

सभापती महोदय, बँकेच्या सुरक्षेकरिता सिक्युरिटी एजन्सी लावली आहे. ती २ शिफ्टमध्ये काम करते. पण पगार ३ शिफ्टचा दिला जातो. थोडक्यात एका शिफ्टचे पेमेंट कारण नसताना वसूल केले जाते. ही एजन्सी देखील बँकेच्या व्यवस्थापनाच्या नातेवाईकाशी संबंधित आहे. राजगड वाहतूक संस्था नावाची एक संस्था आहे. या संस्थेला गेल्या १० वर्षांपासून संस्थेचे कोणतेही कार्य चालू नसताना कर्ज देण्यात आले. गेल्या १० वर्षांपासून आतापर्यंत जे कर्ज दिले, त्यापोटी आजपर्यंत बँकेला या संस्थेकडून २० ते २५ कोटी रुपये कर्ज येणे बाकी आहे, एवढी थकबाकी असताना बँकेने कोणतीही कार्यवाही केली नाही. मात्र सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस यांची थकबाकी नाही तरी त्यांच्यावर एफआयआर, चौकशी.

सभापती महोदय, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये दररोज किमान १०० रुपये कॅश इन हॅण्ड दाखविली जाते अशी माझ्याकडे तक्रार आहे. एवढ्या प्रमाणात कॅश इन हॅण्ड करण्याची काय आवश्यकता आहे ? गत दोन वर्षांमध्ये पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेने फर्निचरच्या नूतनीकरणासाठी ८० कोटी रुपये खर्च केल्याची माझी माहिती आहे. सदर नूतनीकरणाचे कामही राज्यातील प्रमुख पुढाऱ्यांच्या कार्यकर्त्यांना देण्यात आले आणि नूतनीकरण करताना अव्वाच्या सव्वा देयके काढण्यात आली. नूतनीकरण्ण न करता नवीन फर्निचर खरेदी केले असते तरी ते स्वस्त मिळाले असते. पुणे जिल्हा बँकेचे कार्यक्षेत्र पुण्यापुरते सीमित असताना जिल्ह्याबाहेर कर्ज वाटले गेले आणि सदर कर्ज वाटप करताना कारखान्याचे मुख्यालय नावापुरते पुणे जिल्ह्यामध्ये दाखविण्यात आले आणि कार्यक्षेत्राबाहेर कोट्यवधी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. कार्यक्षेत्राबाहेर कर्ज वाटप केल्याची मी अनेक उदाहरणे सांगतो. मात्र सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस यांना कर्ज देत असताना मुंबई जिल्हा बँकेचे

कार्यालय, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस यांचे कार्यालय मुंबईत आहे, तो गुन्हा आहे. मात्र यांनी राज्यभर कर्जे दिली, त्यांची तात्पुरती कार्यालये पुण्यात दाखविली, तो गुन्हा नाही. सरकारचे खूप चांगले चालले आहे.

सभापती महोदय, जरंडेश्वर शुगर, सातारा, अंबालिका शुगर, अहमदनगर, आयर्न शुगर, नंदुरबार, आयर्न मल्टीट्रेड, एडेश्वर सहकारी साखर कारखाना, बीड, फिनर्जी शुगर इत्यादी कार्यक्षेत्राबाहेर जाऊन कर्ज वाटप करण्यात आले. आपण हे कारखाने कोणाचे आहेत याची माहिती घ्यावी. हे सर्व कारखाने सगळ्या पुढाऱ्यांचेच आहेत. ....(अडथळा).... भाजपचे असले तरी चूक आहे. खेड राजपुरी नगर येथील शाखेमध्ये बोगस सोने तारण ठेवून कर्ज वाटप करण्यात आले. परंतु ही बाब लक्षात येऊनही वसुली न करता हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करण्यात आला. नोटबंदीच्या काळात जवळपास ५००-६०० कोटी रुपये बँकेकडे जमा झाले. १००-१५० कोटी रुपये अजुनही आरबीआयने स्वीकारले नाहीत. मग ही रक्कम ऐन वेळी कोणी आणली, काय झाले ? १००-१५० कोटी रुपये शेवटच्या क्षणी आले. त्याचे काय झाले ?

सभापती महोदय, आपण करीत आहोत तो स्वच्छ कारभार आणि दुसरे करीत आहेत ते चोर, गुन्हेगार, दरोडेखोर, असे यांचे काम सुरु आहे. कोल्हापूर, सातारा व सांगली या जिल्हा बँकांची सुध्दा मी माहिती मागितली आहे. आयुक्त, सहकार यांच्याकडे मी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार कायद्यांतर्गत अर्ज करुनही माहिती मागितली आहे. पण आयुक्त, सहकार यांनी सदर माहिती आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे. वास्तविक पाहता, आयुक्त, सहकार यांनी जिल्हा बँकेच्या व्यवस्थापनाकडून ही माहिती मागणे अपेक्षित होते. परंतु ती कशी मिळणार नाही हे नीट, कायद्याच्या चौकीटीत सांगितले. आज नाबार्ड, आरबीआय, केंद्रीय सहकार मंत्रालय ही माहिती मागवू शकते, याची आपल्याला कल्पना नाही. मी अमरावती जिल्हा सहकारी बँकेतील, कराड जनता सहकारी बँकेतील, सांगली जिल्हा बँकेतील व इतर जिल्हा बँकांतील माहिती आपल्या

श्री. प्रवीण दरेकर ....

असुधारित प्रत

माध्यमातून राज्यातील जनतेला देत आहे. अमरावती जिल्हा सहकारी बँकेने सन २०१७ ते सन २०२० या काळात निप्पॉन कंपनीच्या म्युच्युअल फंडमध्ये तब्बल ७०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर...

ही गुंतवणूक करताना बँक व गुंतवणुकीची रक्कम घेणारी कंपनी यांच्यामध्ये थेट व्यवहार करताना ३ कोटी ३९ लाख रुपयांची दलाली देण्यात आली. हे दिनांक १२ एप्रिल, २०२१ च्या बँकेच्या लेखापरीक्षण अहवालातून उघड झाले आहे. यासाठी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तत्कालीन मुख्याधिकारी जे.सी.राठोड, कर्मचारी निळकंठ जगताप, सुधीर चांदूरकर, राजेश कडू, रोहिणी चौधरी यांच्यासह शेअर्स व म्युचअल फंडचे अजितपाल मोगा, निता गांधी, पुरुषोत्तम रेड्डी, शोभा शर्मा, शिवकुमार गट्टानी व राजेंद्र गांधी यांच्या विरोधात अमरावती कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा उपनिबंधक संदीप जाधव यांच्या तक्रारीवरुन बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह ११ जणांविरोधात गुन्हे नोंदविले गेले. आरबीआयच्या १४ जुलै २०१६ च्या परिपत्रकाप्रमाणे बँकेच्या दैनंदिन व्यवहारातील अतिरिक्त निधी नॉन एसएलआरमध्ये आर्थिक वर्षातील एकूण ठेवीच्या १० टक्क्यांपर्यंत गुंतविता येते. मात्र बँकेने आरबीआयच्या नियमाचे उल्लंघन करुन ३४ टक्क्यांपर्यंत गुंतवणूक केली. या व्यवहारात बँकेचे अधिकारी, कर्मचारी व ब्रोकर यांनी संगनमत करुन नावाचा बनावट शिक्का तयार करुन संबंधितांच्या खोट्या सह्या करुन बँकेची ३ कोटी ३९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे बँकेचे अधिकारी व निबंधक जाधव यांनी त्यांच्या तक्रारीत नमूद केले आहे. फसवणुक करतात, खोटे शिक्के तयार करतात त्यांच्याकडे लक्ष देण्यास सहकार विभागाला वेळ नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी तेथील भारतील जनता पक्षाचे आमदार व पदाधिकारी यांनी केल्यानंतर काही शेतकऱ्यांनी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिल्यानंतर शासनावर दबाव येऊन या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. या प्रकरणातील तपासी अधिकारी यांनी पोलिसांकडे अर्थतज्ज्ञ नसल्याने सदरच्या प्रकरणात मायक्रो ऑडीट मागितले होते. त्यानुसार नागपूर येथील सीए फर्मला मायक्रो ऑडीटसाठी हे प्रकरण देण्यात आले. सहा महिने उलटून गेल्यावर अजूनही मायक्रो ऑडीटचा अहवाल आला नाही. या प्रकरणी ईडीकडून बँकेला नोटीस गेल्याची माहिती आहे.

श्री.प्रवीण दरेकर....

या प्रकरणात गुन्हा सिध्द होऊन कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. सरकार भ्रष्टाचार करणाऱ्याला संरक्षण देते व चांगल्या लोकांच्या पाठीशी लागते असा प्रकार सुरु झालेला आहे.

सभापती महोदय, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे महत्वाचे थकबाकीदार आहेत. त्यामध्ये आयर्न शुगर प्रायव्हेट लिमिटेड, बार्शी यांच्याकडे १९३ कोटी रुपयांचे कर्ज थकीत आहे. सांगोला तालुका सहकारी साखर कारखान्याकडे ८१ कोटी रुपयांची थकबाकी आहे. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ६७ कोटी रुपये थकीत आहेत. नाशिक जिल्हा बँकेचे निफाड सहकारी साखर कारखान्याकडे १४७ कोटी रुपये थकीत आहेत. बुलढाणा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अनुराधा शुगरकडे ४१ कोटी रुपये थकीत आहेत. अशा प्रकारे थकीत पैसे असताना त्यांची काळजी सरकार करीत नाही. फक्त राजकीय अभिनिवेषातून या ठिकाणी कारवाई सुरु आहे. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भात गेल्या दोन तीन दिवसापासून टीव्हीमधून बातम्या येत आहेत की, आपल्या जवळच्या बगल बच्च्यांच्या संस्थांना कर्ज दिले. त्यामध्ये अनेक पुढारी आहेत. एखादे दोन पुढारी त्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण मी आपणास सांगतो इतर किती लोक आहे ते आपण पहावे. नियम २६० च्या प्रस्तावात सहकार, जिल्हा बँकेचा भ्रष्टाचार आहे, सन्माननीय सदस्य माझे देखील थोडे केस आता पिकले आहेत. आपण जरा सहन करायला शिका, आम्ही किती सहन करतो त्याचा विचार करा.

सभापती महोदय, यांना सहनही होत नाही व सांगताही येत नाही. अशी सन्माननीय सदस्यांची अवस्था झाली आहे. जिल्हा बँकेचा वापर स्वत:च्या अडचणीतील संस्थांना बाहेर काढण्यासाठी करण्यात आला आहे. वास्तविक पाहता जिल्हा बँकेच्या स्थापनेचा उद्देश शेतकरी बांधवांना सहज कर्ज उपलब्ध व्हावे असा होता. परंतु जिल्हा बँकेचे व्यवस्थापन हातात हात घालून त्याचा उपयोग स्वत:च्या संस्थांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सुरु केला आहे. सांगली जिल्हा मध्यवर्ती

श्री.प्रवीण दरेकर...

अस्वाक्षरित

सहकारी बँकेत १९ मार्च रोजी होणाऱ्या सभेत स्वत:च्या संस्थांचे कोट्यवधी रुपयांचे कर्ज व व्याज माफ करण्याचा निर्णय घेण्यात येणार होता. हा विषय तेथील एमडींना पटला नाही. सर्वसामान्य लोकांचे व शेतकऱ्यांचे १४० कोटी रुपये आमच्या पुढाऱ्यांच्या १० ते १५ संस्थांना सूट देण्यात यावे असे एमडी यांना सांगण्यात आले. एमडीने सांगितले की हे मला पटत नाही व मी तसे करणार नाही म्हणून त्या एमडींनी राजीनामा दिला. एमडींना चॅनेलवाल्यांनी प्रतिक्रीया विचारली तेव्हा ते म्हणाले की, ते मोठे लोक आहेत. मी कशासाठी राजीनामा दिला हे मला सांगणे परवडणार नाही. अशा प्रकारची कामे सहकार विभागाअंतर्गत सुरु आहेत. त्या एमडीवर दबाव आणण्यात आला त्या बँकेचे कडू पाटील हे सीईओ आहेत त्यांनी राजीनामा दिला. यामध्ये राष्ट्रवादी पक्षाचे दोन बडे नेते आहेत. काँग्रेसचे पदाधिकारी आहेत. आमच्या पक्षाचे फक्त एक दोन पदाधिकारी त्यामध्ये घेण्यात आले. फार अडचण होऊ नये म्हणून सर्वपक्षीय हित साधण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय सहकारला किती पटणारा आहे हे सांगण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कराड जनता बँक या परिसरातून सहकार मंत्री महोदय निवडून येतात. कलम ८८ अन्वये बँकेची तपासणी होऊन अफरातफरीची रक्कम निश्चित झाली. कलम ९८ ब नुसार वसूली दाखला दिला आहे. मात्र सहकार मंत्री महोदयांनी वसुलीला स्थगिती दिली.माझी माहिती असत्य असेल तर आपण सांगावे. या बँकेत ३१० कोटी रुपयांची अफरातफर झाली आहे. दिनांक १६ ऑगस्ट २०१९ रोजी बडतर्फ चेअरमन व सर्व संचालक अधिकारी वर्ग, सरकारी लेखा तपासणीस व कर्जदार अशा ३७ जणांविरुध्द कराड पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड विधान कलम ४०९, कलम ४२०, जो माझ्यावर टाकण्यात आला आहे. कलम ४६५, कलम ४६७, कलम ४६८, कलम ४७७ सह प्रोहीबीशन ऑफ बेनामी ट्रॅन्झेक्शन ॲक्ट १९८८ च्या कलम ३ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली. माननीय न्यायालयाने तपासाचे आदेश दिले आहेत. गेल्या दीड वर्षापासून चालढकल व दिरंगाई होत आहे. आम्ही सहकार मंत्री महोदयांकडे स्टे मागायला गेलो की, राजकारण आडवे येते.

श्री.प्रवीण दरेकर...

असुधारित प्रत

थकबाकीदारांवर व व्यवस्थापनावर दोष येऊन कारवाई करण्यात आली नाही. मी नावे सांगतो हे पवित्र सभागृह आहे, शकील अब्दुल शकुर बिजापुरे गृप यांच्यावर निर्बंध घातले त्यावेळी त्यांच्याकडून ९८ कोटी रुपये येणे बाकी होते. सध्याची येणे रक्कम १०५ कोटी रुपये आहे. महपतराव रामचंद्र फडतरे गृप यांच्यावर निर्बंध घातले त्यावेळी ११२ कोटी रुपये येणे बाकी होते. आता २०० कोटी रुपये येणे बाकी आहेत. जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना चिमणगांव गृप ४५ कोटी रुपये अर्बन बँकेने दिले होते. आता ५५ ते ६० कोटी रुपये त्यांच्याकडून येणे बाकी आहे. एकूण ३०० कोटी रुपयांची थकबाकी ४०० कोटी रुपये झाली आहे. यांच्यावर विशेष मेहरनजर का दाखविण्यात आली. यांच्यावर मेहरनजर दाखविल्यामुळे सन २०११ दरम्यान नफ्यात असलेली कराड जनता सहकारी बँक १५४ कोटी रुपयांच्या तोट्यात गेली.नफ्यात असलेली बँक आपल्या बगल बच्च्यांना सांभाळण्यासाठी तोट्यात घालविली. मुबैं जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आज नफ्यात आहे १२०० कोटी रुपयांवरुन ती १० हजार कोटी रुपयांवर गेली ती नफ्यातून खाली कशी येईल व बंद कशी होईल याची काळजी सरकार घेत आहे. आपण सहकाराचे पालकत्व स्वीकारणारे आहात. मुलाचे चुकले असेल तर दुरुस्ती करायची असते. मुलाच्या मानेच्या नरडीचा घोट आपण घेत नाही. हे पाप या सरकारच्या माध्यमातून येथे होत आहे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर........

तरीही बँकेच्या व्यवस्थापनावर कारवाई करण्यात आली नाही. याचाच अर्थ ज्यांनी सहकार बुडविला त्यांना संरक्षण व ज्यांनी सहकार वाढविला त्यांच्यावर कारवाई अशा प्रकारचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाने सहकार खात्याची निर्मिती केल्यानंतर गत दोन वर्षात सहकार वाढविण्यासाठीच प्रयत्न केले. ज्यावेळी माननीय श्री.अमित शहा केंद्रीय सहकार मंत्री झाले त्यावेळी आता राज्यातील सहकाराला बुडविणार, सहकाराला दाबणार अशी बोंबाबोंब करण्यात आली. केंद्रातील सहकार खात्याने राज्यातील सहकार कारखानदारीला ऊर्जीतावस्था मिळवून देण्याच्या दृष्टीने अनेक निर्णय घेतलेले आहेत. मग इथेनॉल सारखा निर्णय असेल किंवा निर्यातीसंदर्भात घेलतेला निर्णय असेल. केंद्र शासनाने ऊस उत्पादक शेतकरी व साखर कारखाना नजरेसमोर ठेऊन नेहमीच साखर उद्योगासाठी सकारात्मक भूमिका घेतली. शेतकऱ्यांना ऊसासाठी मोठ्या प्रमाणावर खते लागतात. गत वर्षी सन २०२० मध्ये खत उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी ७५ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले आणि त्यासाठी मोठ्या  प्रमाणावर अनुदान देण्याचाही निर्णय घेण्यात आला. हा निर्णय घेतल्यानंतर लगेच पुढील महिन्यात केवळ साखर उद्योगासाठी ५३६१ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले. केंद्र शासनाच्या कॅबिनेट ऑन इकॉनॉमिक अफेअर्स कमिटीने मागील वर्षी साखरेच्या निर्यातीसाठी प्रती क्विंटल ६०० रुपये प्रोत्साहनपर देण्याचे मान्य केले. सन २०२१ या आर्थिक वर्षात देखील केंद्र शासनाने साखर उद्योगासाठी सकारात्मक भूमिका घेतली. केंद्र शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नजरेसमोर ठेऊन अतिरिक्त साखरेची निर्यात कशी होईल व उर्वरित साखरेचे इथेनॉलमध्ये कन्व्हर्जन कसे होईल यासाठी सुद्धा प्रयत्न केले. त्यासाठी दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजी केंद्र शासनाने ६० लाख मेट्रीक टन निर्यातीचे उद्दिष्ट असताना १० लाख एक्स्ट्रा म्हणजे ७० लाख मेट्री टनाचे कॉन्ट्रॅक्ट केले. या निर्णयामुळे साखर कारखान्यांना, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर ऊसाचा

श्री.प्रवीण दरेकर........

असुधारित प्रत

परतावा देणे शक्य झाले. अतिरिक्त साखरेजे कन्व्हर्जन करण्याच्या धोरणामुळे इथेनॉल पासून साखर कारखान्यांना चांगला महसूल मिळत आहे. सन २०२०-२१ मध्ये जवळपास १५ हजार कोटी रुपयांचा महसूल साखर कारखान्यांना केवळ इथेनॉलच्या विक्रीतून मिळालेला आहे. केंद्र शासनान साखर कारखान्यांबाबत व ऊस उत्पादकांबाबत किती सकारात्मक आहे हे यातून दिसून येते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नजरेसमोर ठेऊन केंद्र शासनाने एफआरपीमध्ये सुद्धा वाढ केलेली आहे. सन २०२१-२२ मध्ये १० टक्के रिकव्हरी लक्षात घेऊन २९० रुपये प्रती क्विंटल एवढी रक्कम ठरविलेली आहे. १० टक्क्यापेक्षा अधिक रिकव्हरी झाल्यास शेतकरी बांधवांना त्या पद्धतीने अतिरिक्त रक्कम देण्याबाबत केंद्र शासनाने सूचना केली. केंद्र शासन आर्थिक बोजा उचलून सहकार कारखानदारी वाचविण्यासाठी प्रयत्न करीत असताना राज्य सरकार व राज्य बँकेने संगनमताने राज्यातील साखर कारखानदारी मोडीत काढण्याचे काम केले आहे. माझी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती आहे की, मी सभागृहात काही गोष्टी मांडलेल्या आहेत. किंबहुना मी पत्राच्या स्वरुपात आपल्याकडे व मुख्यमंत्री महोदयांकडे आणखी काही गोष्टी देणार आहे. समन्यायी पद्धतीने सर्वांवर कारवाई होण्याची अपेक्षा आहे. केंद्रात सहकार खाते आहे, केंद्र शासनाच्या तपास यंत्रणा आहेत. आम्ही त्यांच्याकडे या गोष्टींची तक्रार करु, न्यायालयात जाऊ, वेगवेगळ्या प्रकारच्या चौकशीची मागणी सुद्धा केली जाईल.

सभापती महोदय, राज्य शासन कशा प्रकारे प्रादेशिक असमतोल निर्माण करीत आहे यावर मी भाष्य करणार आहे. विदर्भ, मराठवाडा, कोकण विभागाला या शासनाने सातत्याने सातप्नभावाची वागणूक दिलेली आहे. खरे म्हणजे नागपूर येथे अधिवेशन होणे अपेक्षित आहे. परंतु राज्य शासन नागपूर येथे अधिवेशन घेऊ शकले नाही. मराठवाडा, विदर्भाचा असमतोल दूर करणे तर सोडाच राज्य शासनाने तेथील विकास साधण्यासाठी तेथे अधिवेशन सुद्धा घेतले नाही. राज्य शासनाने नागपूर येथे अधिवेशन घेतले असते तर विदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी निश्चितपणे मदत झाली

श्री.प्रवीण दरेकर........

असती. सत्तेत नसताना माननीय महिला व बाल विकास मंत्री ॲड.यशोमती ठाकूर, माननीय मदत व पुनर्वसन मंत्री श्री.विजय वडेट्टीवार हे विदर्भावर अन्याय होत असल्याच्या वल्गना करीत होते. मराठवाडा वॉटर ग्रीड हा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. मराठवाड्यातील सर्व धरणे एकत्रित करुन मराठवाड्यातील सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी निकाली काढणारा प्रकल्प केवळ राजकीय सुडबुद्धीमुळे रखडलेला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प आणला. परंतु तो प्रकल्प बसासनात गुंडाळून ठेवण्याचे काम या सरकारच्या माध्यमातून झाले आहे. मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प झाला असता तर मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी निकाली निघाला असता. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस, तत्कालीन पाणी पुरवठा मंत्री श्री.बबनराव लोणीकर यांनी मराठवाडा वॉटर ग्रीडची संकल्पना मांडली. एवढेच नाही तर प्रशासकीय मान्यता व इतर तांत्रिक बाबींचीही पूर्तता केली. २० हजार कोटी रुपयांचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प होता. औरंगाबादसाठी २७६४ कोटी रुपये, जालन्यासाठी १५२९ कोटी रुपये, बीडसाठी ४८०१ कोटी रुपये, लातूरसाठी १७१२ कोटी रुपये, उस्मानाबादसाठी १४१० कोटी रुपये व उर्वरित ३ जिल्ह्यांसाठी ६ हजार कोटी रुपये असा एकंदरित २० हजार कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला. परंतु या प्रकल्पासाठी गत २ वर्षापूर्वीच्या अर्थसंकल्पामध्ये केवळ २०० कोटी रुपयांची तरतूद करण्याची घोषणा करण्यात आली. सन २०२० मध्ये घोषणा झाल्यानंतर संपूर्ण २०२० या कॅलेंडर वर्षात मराठवाडा वॉटर ग्रीड संदर्भात निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळासमोर हा विषय आलेला नाही. सन २०२० या कॅलेंडर वर्षात एक रुपयाही या प्रकल्पावर खर्च झाला नाही. सन २०२१ या कॅलेंडर वर्षातही मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे दुर्लक्ष करण्यात आले. मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली याबाबत माहिती मागितली असता ती माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्यात आली. मी अनेक वेळा स्मरणपत्र पत्रे दिली. परंतु अद्याप माहिती अप्राप्त आहे. माझ्या माहिती प्रमाणे सन २०२१ मध्ये या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामावर एक रुपयाही खर्च झालेला नाही.

श्री.प्रवीण दरेकर........

असुधारित प्रत

सभापती महोदय, समुद्रात वाहून जाणारे १६७ टीएमसी पाणी मराठवाडा व खान्देशात आणण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडेही महाविकास आधाडी सरकारचे दुर्लक्ष झालेले आहे. पिण्याच्या पाण्याबरोबर सिंचनाचा अनुशेष हा मराठवाड्यावर झालेला मोठा अन्याय आहे. मराठवाड्यावरील अन्याय दूर व्हावा व मराठवाड्यातील दुष्काळ कायमचा मिटून शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी समुद्रात वाहून जाणारे १६७ टीएसी पाणी मराठवाड्यात आणण्याचा संकल्प तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी केला होता. त्यासाठी दिनांक ३० जुलै, २०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी पुढील प्रकल्पांना मान्यता दिली. आंतरराज्यीय दमणगंगा पिंजाळ नदीजोड प्रकल्प व राज्यांतर्गत नार-पार-गिरणा पार गोदावरी, दमणगंगा वैतरणा गोदावरी व दमणगंगा एकदरे गोदावरी हे नदी जोड प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून न घेता राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राज्याच्या निधीतून त्वरित हाती घेण्यात यावेत.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

सदर नदीजोड प्रकल्पांमुळे मुंबई शहरासाठी ३१.६० अब्ज घनफुट, गोदावरी खोऱ्यातील मराठवाडा भागात २५ अब्ज घनफुट तसेच तापी खोऱ्यासाठी १० अब्ज घनफुट पाणी कोकणातून उपलब्ध होईल. पश्चिमी वाहिनी नदी खोऱ्यातील कोकणामध्ये उल्हास, वैतरणा, नारपार व दमणगंगा खोऱ्यात एकूण ३६०अब्ज घनफुट अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे. ते गोदावरी खोऱ्यामध्ये वळविणे शक्य आहे. याकरिता नवीन नदीजोड नद्यांचे सर्वेक्षण त्वरित हाती घेऊन व्यवहार्य योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावेत. अशा प्रकारे एकूण १४० अब्ज घनफुट पाणी वळविण्यासंबंधी मान्यता देण्यात आली. मराठवाडा व खानदेशमधील जनतेला समृद्ध करणाऱ्या अशा प्रकल्पांकडे महाविकास आघाडीकडून सपशेल दुर्लक्ष केले जात आहे. विदर्भातील वैनगंगा, पैनगंगा नदीजोड प्रकल्पाकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. विदर्भ, मराठवाडयातील पायाभूत सुविधांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. मागील २ वर्षांमध्ये शासनाने विदर्भ, मराठवाडा, खानदेश व कोकणसाठी एकही नवीन प्रकल्प सुरु केला नाही. तसेच यापूर्वी सुरु असलेल्या प्रकल्पांची कामे संथ गतीने कशी सुरु राहतील याबाबत प्रयत्न केले जात आहेत. याचे कारण सदरहू प्रकल्प माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात सुरु झालेले असल्यामुळे सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास त्यांचे श्रेय माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांना मिळू शकेल. अशा प्रकारे चांगली कामे सुरु असताना त्यात अडथळे निर्माण करण्याचे काम शासनाकडून करण्यात आले. विदर्भ, मराठवाडा व खानदेशकरिता वरदान ठरणाऱ्या माननीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे काम देखील २ वर्षांच्या काळात संथ गतीने सुरु आहे. अशा प्रकारे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे सदर महामार्गाला नाव असताना देखील सरकार बदलल्यामुळे त्या कामाची गती थंडावली आहे. यावरुन विदर्भ, मराठवाडा व खानदेशातील पायाभूत सुविधांकडे शासन कशाप्रकारे दुर्लक्ष करीत आहे ? ही बाब या निमित्ताने दिसून येत आहे.

सभापती महोदय, मॅग्नेटकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. अशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क म्हणजे मॅग्नेट या प्रकल्पांना

श्री.प्रवीण दरेकर.....

असुधारित प्रत

मान्यता देण्यात आली. दिनांक २९ जुलै, २०२० रोजी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या असलेल्या सदर प्रकल्पाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. परंतु ७ महिने उलटून देखील सदर प्रकल्पाच्या कामाकरिता अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. अशियाई विकास बँकेकडून सदर प्रकल्पाला अर्थसहाय्य मिळणार असल्यामुळे निधीची कमतरता नाही. परंतु शासनाकडे प्रशासकीय व राजकीय इच्छाशक्ती नसल्यामुळे या प्रकल्पामध्ये एकही नवीन कृषी प्रक्रिया उद्योग अद्याप सुरु होऊ शकला नाही. सुरुवातीच्या काळात फक्त २५ प्रकल्पांची निवड करण्यात आली. सदर प्रकल्प निवडत असताना विदर्भातील अर्वषणप्रवण असलेल्या ११ जिल्हयांतील फक्त २ प्रकल्प, मराठवाडयातील ९ जिल्हयांतील फक्त ५ प्रकल्प, याउलट पश्चिम महाराष्ट्रात ६ जिल्हयांतील १० प्रकल्पांची निवड करण्यात आली. तेथील विकास होऊ नये असे आमचे म्हणणे नाही. परंतु आपले पोट भरत असताना ज्यांचे पोट रिकामे आहे त्यांना २ घास देण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. या संदर्भात कोकणची अतिशय दयनीय अवस्था आहे. कोकणने शिवसेनेला भरभरुन दिले असतानाही शासनाचे कोकणकडे लक्ष नाही. कोकणमधील फक्त २ प्रकल्पांची निवड करण्यात आली. अशाप्रकारे विदर्भ, मराठवाडा तसेच कोकणवर आपण कशा प्रकारे नांगर फिरवत आहात हे दिसून येत आहे. विदर्भ, मराठवाडयात होत असलेल्या समृद्धी व संस्कृतीवर नांगर फिरवण्याचे पाप महाविकास आघाडी शासनाकडून केले जात आहे. शासनाने समृद्धी महामार्गाकरिता शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करीत असताना त्यासाठी असलेला रेडीरेकनरचा दर ४ टक्क्यांनी कमी केला. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात वस्त्रोद्योग व्यावसायिकांकरिता विजेच्या दराचे अनुदान प्रती युनिट ३ रुपयांनी कमी करण्यात आले होते. परंतु महाविकास आघाडी शासनाने सदर दरांमध्ये पुन्हा वाढ केली. शासनाने धार्मिक तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी फक्त घोषणा केल्या. परंतु प्रत्यक्षात एक रुपयाचे काम झाले नाही. महाराष्ट्रात जागतिक वारसा लाभलेली अनेक अध्यात्मिक स्थळे आहेत. अष्टविनायकाच्या दर्शनासाठी असंख्य भाविक जात असतात. परंतु तेथे सुविधांचा मोठा अभाव आहे. पाली येथील प्रसिध्द असलेल्या गणेश मंदिराकडे जाणारा अरुंद

श्री.प्रवीण दरेकर.....

रस्ता असेल, त्या संदर्भात शासन कार्यवाही करु शकले नाही. याउलट बारकडे जाणारे रस्ते गुळगुळीत करुन बार, वाईनवाल्यांची शासनाकडून काळजी घेतली जात आहे. विदर्भ, मराठवाडयातील संतांच्या भूमीचा तसेच तीर्थक्षेत्रांचा शासनाला कोणताही विकास करता आला नाही. महाविकास आघाडी शासनाने विदर्भ, मराठवाडा व कोकण विभागाकरिता रोहित्रांकरिता खरेदी केलेल्या ऑईलच्या वाटपामध्ये दुजाभाव करण्यात आला. रोहित्रांकरिता ऑईल वाटप करीत असताना धुळे व नंदुरबारकरिता १८४ किलो लिटर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग १६२ किलो लिटर, वर्धा व गोंदिया तसेच ६ जिल्हे मिळून १४७ किलो लिटर अशाप्रकारे एकूण ४३३ किलो लिटर ऑईलचे वाटप करण्यात आले. याउलट बारामतीसारख्या तालुक्याला २९५ किलो लिटर ऑईलचे वाटप करण्यात आले.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते आपले भाषण आणखी किती वेळ सुरु राहणार आहे ? आपण आपले भाषण लवकर पूर्ण करावे. सदर प्रस्तावावर आणखी २६ सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करायचे आहेत.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी १० मिनिटांमध्ये माझे भाषण पूर्ण करतो. तसेच मी महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करीत आहे. तसेच आपण मला सांगितल्यास मी माझे भाषण थांबवून खाली बसतो. मी अतिशय पोटतिडिकीने मुद्दे मांडत आहे.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते आपल्या बोलण्यामुळे काही अडचण नाही. परंतु आपण थोडक्यात आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी या प्रस्तावावर आणखी १० ते १५ मिनिटे भाषण केल्यास काय होणार आहे ? मी महाराष्ट्रातील जनतेच्या हिताचे मुद्दे मांडत आहे. आपण सदनाची वेळ वाढवावी. सभापती महोदय, मी येथे बोलत आहे, ही बाब आपल्याला सहन होत नाही का ? सभापती महोदय, मी सदनाचा जास्त वेळ घेणार नाही.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रासाठी १०३० किलो लिटर ऑईल पुरविण्यात आले. वैधानिक विकास महामंडळांना शासनाने अद्याप मुदतवाढ दिलेली नाही. सभापती महोदय, आपण विदर्भातील आहात. मी विदर्भाची काळजी करीत आहे. त्यामुळे किमान विदर्भाकरिता आपण मला जास्त वेळ बोलण्यासाठी दिला पाहिजे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात वैधानिक विकास महामंडळांना मुदतवाढ देण्यात आली होती. आता वैधानिक विकास महामंडळाची मुदत संपल्यानंतरही महाविकास आघाडी शासनाला वैधानिक विकास महामंडळांना मुदतवाढ देता आली नाही. त्यामुळे विकास दूर राहिला. शासनाचे या संदर्भात असलेले प्राधान्यक्रम चुकले आहेत. शासनाच्या प्राधान्यक्रमावर शेतकरी, सामान्य व्यक्ती तसेच दस्तुरखुद्द छत्रपती शिवाजी महाराज देखील नाहीत. माननीय मुख्यमंत्री यांना शिवनेरी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य उत्सवाला जाण्यासाठी वेळ नाही. याउलट माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या विरोधात माननीय मुख्यमंत्र्यांना तेलंगणाचे मुख्यमंत्री श्री.चंद्रशेखर राव यांना भेटण्यासाठी वेळ होता.

सभापती महोदय, मानव विकास निर्देशांकामध्ये विदर्भ, मराठवाडा पिछाडीवर आहेत. त्यामुळे शासनाने त्यांचा विकास करणे गरजेचे आहे. मानव विकास निर्देशांकामध्ये गडचिरोलीचा क्रमांक खालून दुसरा आहे. त्यापाठोपाठ जालना, वाशिम, नांदेड, हिंगोली, बुलडाणा, परभणी यांचा क्रमांक आहे. तसेच उस्मानाबाद, यवतमाळ, लातूर, बीड व गोंदिया यांचा क्रमांक अनुक्रमे १०, ११, १२, १३ व १४ असा आहे. याउलट मानव विकास निर्देशांकामध्ये सांगली, सातारा, कोल्हापूर व पुणे वरच्या क्रमांकावर आहेत. मानव विकास निर्देशांक हा त्या भागातील आर्युमान, शिक्षण, उत्पन्न यांच्या निर्देशांकावर आधारित असतो. सभापती महोदय, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष ५२ वर्षे सत्तेवर राहिल्यामुळे विदर्भ व मराठवाडयातील विकासाची मोठी दयनीय अवस्था झाली आहे. ही अवस्था केवळ काँग्रेस पक्षाने विदर्भावर केलेल्या अन्यायामुळे निर्माण झालेली आहे. विदर्भ व मराठवाडयाच्या आजच्या दुरावस्थेला

श्री.प्रवीण दरेकर....

असुधारित प्रत

राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्णपणे जबाबदार आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

सभापती महोदय, जलजीवन मिशन योजनेच्या निधी वितरणामध्येही विदर्भ, मराठवाडा व कोकणवर अन्याय झाला आहे. मी प्रादेशिक असमतोल यासाठी मांडत आहे की, कुटुंब प्रमुख प्रमुखाचे आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांकडे समान लक्ष असले पाहिजे. अन्यथा एका मुलाला जास्त खाऊ घालायचे आणि दुसरा मुलगा उपासमारीने मरत आहे, असे कुटुंब प्रमुखाचे काम नसते.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

काही मुठभर लोकांना सत्तेचा वापर करुन निधी देत आहे. परंतु जलजीवन मिशन योजनेच्या निधीचा तपशील मी आपल्यासमोर मांडत आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून राज्याला किमान ६० टक्के निधी येतो. वित्तीय वर्ष २०२१-२२ साठी केंद्राचा हिस्सा सुमारे ३८०० कोटी, राज्याचा ३२०० कोटी होता. मात्र या निधीचे जिल्हानिहाय वितरण पाहता मराठवाडा, विदर्भ व कोकण यांच्यावर अन्याय झाल्याचे दिसून येत आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून २८ फेब्रुवारी २०२२ रोजी मला प्राप्त झालेल्या माहितीनुसार जिल्हा परिषद कव्हरेज फंडाचे वितरण अन्यायकारक कसे आहे ते सांगतो. कोल्हापूरला १०० कोटी व पुण्याला १२० कोटी निधी देण्यात आला. विदर्भात अमरावतीला १३ कोटी, अकोला १६ कोटी, वाशिम ११ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला. मराठवाडयात बीड १६ कोटी, धुळे ५ कोटी, उस्मानाबाद १४ कोटी, परभणी १५ कोटी इतका निधी देण्यात आला. कोकणात सिंधुदुर्गला केवळ ६ कोटी निधी मिळाला आहे. थोडक्यात कोल्हापूर जेवढा १०० कोटीचा निधी मिळाला तेवढा विदर्भातील सात जिल्हयांनाही मिळाला नाही. एकटया पुण्याला १२६ कोटी निधी मिळाला, मराठवाडयातील वर नमूद केलेल्या चार जिल्हयांना ५० कोटी निधी मिळाला आहे. सरकारचे विदर्भ व मराठवाडयावर पुतना मावशीचे प्रेम आहे. जिल्हा वार्षिक योजनांचे सन २०२०-२१ चे नियोजन बघता एक गोष्ट लक्षात येते की, राज्यात पुणे, सोलापूर, अहमदनगर या तीन जिल्हयात राज्यातील ९० टक्के जनता राहते. बाकीच्या जिल्हयात कोणी राहतच नाही. पुणे जिल्हयाला उपरोक्त कालावधीत ५१८ कोटी एवढा निधी जिल्हा वार्षिक योजनेतून वितरीत करण्यात आला. मी जिल्हे व अर्थसंकल्पीय तरतूद सांगतो. पुण्याला ५१८ कोटी, सोलापूरला ३४४ कोटी, नाशिक ३३३ कोटी, अहमदनगर ३२६ कोटी, या चार जिल्हयांना दीड हजार कोटीच्या आसपास निधी मिळाला आहे. दुसरीकडे पालघर १०० कोटी, वाशिम १२७ कोटी, धुळे १४३, भंडारा ११७, नंदूरबार ९८, असे पाच जिल्हयांत ६०८ कोटी रुपये होतात. एवढी रक्कम अर्थसंकल्पात जिल्हा नियोजनासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. या सरकारचे पुतना मावशीचे प्रेम नाही तर काय म्हणायचे. विभागाचा हा असमतोल दूर व्हावा अशी या

अमुद्रित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

प्रस्तावाच्या निमित्ताने माझी इच्छा आहे. मुख्यमंत्री महोदय शिवसेनेचे असले तरी सरकार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष चालवत आहे, मी आकडेवारी देतो. मराठीत म्हण आहे की, जो तळे राखेल तो पाणी चाखेल. पण महाराष्ट्राचे पाणीपुरवठा व स्वच्छता हे खाते खान्देशचे नेतृत्व करणारे आमचे मित्र श्री.गुलाबराव पाटील यांच्याकडे आहेत, तसेच ते जळगावचे पालकमंत्री देखील आहेत. परंतु जळगाव जिल्हयाला केवळ ३८ कोटी निधी मिळाला असताना पुणे व कोल्हापूर या आधीच समृध्द असलेल्या जिल्हयांना १२६ व १०० कोटीचा निधी दिला. महाराष्ट्र समृध्द झाला पाहिजे, केवळ एक जिल्हा समृध्द होऊन राज्य समृध्द होणार नाही. पाणीपुरवठा मंत्री महोदयांना कसा चुना लावला हे येथे दिसत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कव्हरेज फंडचे वितरण प्रादेशिक असमतोल दर्शवित आहे. जीवन प्राधिकरणामार्फत राज्य शासनाच्या योजना राबविल्या जातात. या अंतर्गत कोल्हापूर १५ कोटी, नाशिकला १६ कोटी, पुणे ३० कोटी इतका निधी वितरीत झाला. मात्र विदर्भात अकोला ३ कोटी, गोंदिया ९१ लाख, वर्धा १ कोटी, वाशिम १ कोटी निधी देण्यात आला. मराठवाडयात एमजेपी कव्हरेज फंड औरंगाबाद ९ कोटी, लातूर ३ कोटी, उस्मानाबाद १ कोटी, नांदेड २ कोटी, सिंधुदुर्गला ६४ लाख मिळणार आहे. याचा अर्थ या निधीच्या वितरणातही राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. जेथे काँग्रेस व सेनेचे पालकमंत्री आहेत तेथे निधीच्या वितरणात निश्चितपणे अन्याय झाला आहे. विदर्भात् राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तेवढे अस्तित्व नाही. मात्र विदर्भ व मराठवाडयातून येणारे पाच मंत्री काँग्रेसचे असताना विदर्भाला न्याय देता आला नाही, त्यांना या सरकारने खिजगणतीमध्येही पकडले नाही. राजय सरकार केंद्राकडे ज्या प्राधान्यक्रमाने प्रस्ताव पाठवत असते त्यानुसार केंद्र सरकार निधीचे वितरण करीत असते. महाविकास आघाडी सरकारने प्रस्तावही पाठविताना जाणीवपूर्वक मराठवाडा, विदर्भ व कोकण याची उपेक्षा केली आहे. परिणामी यांना निधीमध्ये फार नगण्य वाटा मिळाला आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

सभापती महोदय, कोकणाशिवाय माझे भाषण पूर्ण होऊ शकत नाही. या राज्याचे मुख्यमंत्री शिवसेना पक्ष प्रमुख आहेत. सर्व जण मान्य करतील की, शिवसेना पक्ष उभारणीमध्ये कोकणचा सिंहाचा वाटा आहे. मी मागे सांगितले होते की, कोकणाकरीता स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ देण्यात यावे. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळही बंद केले. मुख्यमंत्री असताना श्री.शरद पवार साहेबांनी कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची निर्मिती करण्याचा महाराष्ट्र विधिमंडळाचा ठराव केंद्र सरकारकडे पाठविण्याचे मान्य केले होते. भाजपाच्या निवडणूक जाहीरनाम्यामध्येही कोकणच्या स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाचे आश्वासन दिलेले आहे. शिवसेनेचा सुध्दा कोकण विकास मंडळाला पाठिंबा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विधिमंडळात या प्रस्तावाला पाठींबा दिलेला आहे. सर्वच पक्षाचा पाठींबा असेल तर निर्णय घेण्यास विलंब का होत आहे. या वैधानिक विकास महामंडळांना मुदतवाढ देण्यात यावी व कोकण स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, याचा ठराव करावा अशी या चर्चेतून माझी मागणी आहे. मागील दोन्ही अर्थसंकल्पात या सरकारने कोकणची उपेक्षा केलेली आहे. मी याकरीता शिवसेनेला जबाबदार धरणार आहे. कोकणातील सावंतवाडीपासून मुंबईपर्यंत मोठया प्रमाणावर कोकणच्या जनतेवर शिवसेनेचे आमदार निवडून दिले आहेत. ते आमदार नसते तर आज सत्तेमध्ये शिवसेना नसती. कोकणची अर्थव्यवस्था ही मुख्यत्वे पर्यटन, मत्स्यव्यवसाय व फळबागांवर मोठया प्रमाणावर अवलंबून आहे. परंतु या तीन क्षेत्रात मोठा निधी देण्याची आवश्यकता असताना वाटाण्याच्या अक्षता दाखविल्या आहेत. सन २०२० च्या अधिवेशनात बंदरे विकास कार्यक्रमासाठी केवळ २७६ कोटी एवढा नियतव्यय प्रस्तावित केला होता व तो अतिशय तुटपुंजा होता. कोकणाला आज प्रचंड व उपयोगी असा सागरी किनारा लाभला आहे. या किनाऱ्यावर उच्च दर्जाची आंतरराष्ट्रीय बंदरे उभारणे महत्वाचे असतान अधिक निधीची आवश्यकता होती. हा निधी देण्याकरीता मी सरकारकडे मागणी करीत आहे, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्याचा पाठपुरावा करावा. कोकणाची सिंचनामध्ये देखील उपेक्षा आहे. विदर्भात ९ टक्के, मराठवाडा ९ टक्के, पश्चिम

श्री.प्रवीण दरेकर .....

महाराष्ट्रात १४ टक्के, कोकणात दीड टक्का सिंचन आहे. सिंचन प्रकल्पाच्या बाबतीतही कोकणावर अन्याय होत आहे. अंबोली घाटाच्या वर कोल्हापूर जिल्हा आहे. खाली सिंधुदुर्ग जिल्हा आहे. कोल्हापूर जिल्हयापेक्षा कितीतरी अधिक पाऊस खाली कोकणात पडतो. पण पाटबंधारे प्रकल्पाच्या बाबतीत मात्र कोल्हापूर जिल्हयावर सरकारची मोठया प्रमाणावर कृपा होत आहे. ती होण्याबद्दल दुमत नाही पण कोकणच्या बाबतीत दुजाभाव का आहे हा माझा प्रश्न आहे. कोकणात मुबलक पाऊस पडत असूनही कोकण पाटबंधारे विकास महामंडळातून क्षमता व सिंचन क्षमतेतील तफावत मी आपणास दाखवतो.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

आणि कृष्णा खोरे विकास महामंडळाद्वारे तयार केलेल्या प्रकल्पांची साठवणूक क्षमता मी टीएमसी आणि हेक्टर या प्रमाणात सांगत आहे. कोल्हापूर येथील धरणांची साठवूणक क्षमता २२७ टीएमसी इतकी असून सिंचन क्षमता १,७६,४१३ हेक्टर इतकी आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात २.१४ टीएमसी इतकी धरणांची साठवणूक क्षमता असून ३,५९१ हेक्टर इतकी सिंचन क्षमता आहे. पश्चिम महाराष्ट्रात धरणांची साठवणूक क्षमता २४४ टीएमसी इतकी असून सिंचन क्षमता २,६९,६१८ हेक्टर इतकी आहे. कोकणात २४ टीएमसी इतकी धरणांची साठवणूक क्षमता असून सिंचन क्षमता २७०२ हेक्टर इतकी आहे. कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या स्थापनेनंतर ८९ प्रकल्प या मंडळाकडे आहेत, यातील चार मोठे, अकरा मध्यम प्रकल्प, उर्वरित ७५ लघु प्रकल्प आहेत. मात्र सतरा वर्षात यातील ७७ प्रकल्प आजही प्रलंबित आहेत. एवढया वर्षात आता या प्रकल्पांची मूळ किंमतीपेक्षा किंमत जवळपास शंभर टक्के इतकी वाढलेली आहे. ११ मध्यम प्रकल्पांपैकी एकही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. ७५ लघु प्रकल्पांपैकी केवळ १२ प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. ६३ लघु प्रकल्प अद्यापहि अपूर्ण आहेत. भूसंपादनाचे, पुनर्वसनाचे प्रश्न आजही तसेच आहेत. मोबदला कमी मिळतो. असे अनेक प्रश्न आहेत. परंतु दुर्दैवाने ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला नाही. या मंडळाकडे असणारे चारही मोठे प्रकल्प ठाणे आणि रायगडमध्ये आहेत. मध्यम आणि लघु प्रकल्प रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग येथे आहेत. गढ नदी, अर्जूना, हेटवणे, नार्डवे- जामदा, धेरजा, देवगड, अरुणा, सातंडी, कोले, सरांबळा, सांबरकोण या अकरा मध्यम प्रकल्पांपैकी एकही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हेच आपले कोकणावरील प्रेम आहे का ? शिवडावा, मोरवणे, शीळ, वैतरणेश्वर, वावी-हर्ष, दाभाडीवाडी, तुळयाचा पाडा, पन्हळघर, तांगर, क्वाडीवली, साखरपा, शिरसाडी, रोषणी, भोलवली, वाघ, आवशी, रांगाव, शिरमंत, पाली-पुतवली, पिंपळवाडी, आंबई, काचुर्ली, पवाळे, नामपाडा, शिराळे, भिरवाडी, काल्हेरे, चिंचवाडी, तळवले, पन्हाळे, वडशेतवावे, देंदोणवाडी, वटाव, कळवली,धाडवली, करंदळे, शेलारवाडी, गरगाळी, डोमी-इरा, निरुऊके, तिडे, ओझर, हलोल, मुचकंडी, नांदवडे, काकेवाडी, येलोणवाडी, तेंडी,

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

पडाळे, विर्डी, कुशीवली, बेर्डेवाडी, शिरसिंगे, तळवळ, चव्हाणवाडी, आंबोली, नवे-मांडवे, नागेश्वरी, होल-सापडा, कोठिवली,कुडुप, पोयनाड, तिल्हेरे असे एकूण ६२ लघु-प्रकल्प जे आहेत, ते आजही अपूर्ण अवस्थेतच आहेत.

सभापती महोदय, शासनाने श्वेत-पत्रिका काढून दिलेल्या उद्दिष्टांपैकी किती उद्दिष्टे पूर्ण झाली, याची माहिती कोकणवासियांना दिली पाहिजे. वीज निर्मिती केल्यानंतर कोयना धरणातील प्रचंड पाणी समुद्रात वाहून जाते, हे पाणी अडविण्याकरिता सरकार पुढाकार घेत नाही. महाराष्ट्रात ऊस लागवड क्षेत्र केवळ साडे-पाच लाख हेक्टरवर आहे. एकूण महाराष्ट्राच्या सिंचन क्षेत्राच्या तुलनेत हे क्षेत्र केवळ ३ टक्के इतके आहे. मात्र त्याकरिता सिंचनाच्या ६० टक्के पाण्याचा वापर ऊसासाठी केला जातो. या उलट काही कोटी लिटर कोयनेचे पाणी वसिष्टी नदीमधून वाहत जाऊन अरबी समुद्राला मिळते. वसिष्टी, सावित्री, शास्त्री, जगबुडी, मुचकुंडी, गांधारी, वैतरणा, अलकनंदा या कोकणातील प्रमुख नद्यांचा उगमही सहयाद्रीच्या खोऱ्यात आहे. एकटया रत्नागिरी जिल्हयातील नद्यांमधील पाण्याची क्षमता ६१२ टीएमसी इतकी आहे. ही क्षमता कोयना धरणाच्या सहापट आहे. हे सर्व पाणी समुद्रात वाहून जाते. कोकणात राज्यातील ४६ टक्के पाणी उपलब्ध आहे. हे पाणी न अडविल्यामुळे त्या ठिकाणी याचा काही उपयोग होत नाही. कोयना धरणाचे पाणी हेळवागेतून वसिष्ठी नदीत वाहून जाते. हे पाणी १९०० दशलक्ष घनमीटर इतके असावे, असा अंदाज आहे. असा या क्षेत्रातील तज्ज्ञांचा दावाही आहे. त्यामधील केवळ लोटे-परशुराम एमआयडीसी, एन्रॉन वगळता सर्व कोयनेचे पाणी वसिष्ठीमार्गे दाभोळ समुद्राला मिळते. वसिष्ठीचे पाणी पिण्याकरिता व सिंचनाकरिता रत्नागिरी तसेच सिंधुदूर्ग जिल्हयाला पुरविण्याचा विचार होऊ शकतो. सहयाद्रीच्या एका बाजूला कोकण आहे, दुसऱ्या बाजूला पश्चिम महाराष्ट्र आहे. दोन्ही भागात साधारणपणे सारखा पाऊस पडून देखील कोकणातील बहुतांश पाणी हे समुद्राला जाऊन मिळते. पश्चिम महाराष्ट्रातील पाणी मात्र साठवून सिंचनाकरिता वापरले जाते. कोकणातील सर्वसाधारणपणे.....(अडथळा) ....

श्री.प्रवीण दरेकर....

असुधारित प्रत

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपण मला सपोर्ट करत आहात, हे मला माहिती आहे. आपली कामाची तळमळ मला माहिती आहे. आपण याबाबत काही करत नाही म्हणून मला हे सर्व आता बोलावे लागत आहे.

सभापती महोदय, कोकणात सर्वसाधारणपणे अडीच हजार ते तीन हजार मि.मि. पाऊस पडतो. देशाच्या सरासरी पावसापेक्षा हा पाऊस साधारणत: अडीच ते तीन पटीने जास्त आहे. एका बाजूला पूर येतो, जीवितहानी होते, इतरही नुकसान होते. दुसऱ्या बाजूला उन्हाळयात कोकणातील महिलांना डोक्यावर हंडा घेऊन पाण्यासाठी वणवण मैलोन्मैल पायपीट करावी लागते. कोकणातील सर्व प्रकल्प रखडलेले आहेत. कोकणातील जमीन सिंचनाखाली यावी म्हणून कोकण पाटबंधारे मंडळाची स्थापना झाली. या महामंडळाच्या अखत्यारितील अद्याप १४७ प्रकल्प अपूर्ण आहेत. हजारो कोटी रुपये खर्च करुन देखील अनेक वर्षे कोकणातील सिंचनाचा अनुशेष भरुन निघालेला नाही. प्रादेशिक मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांनी दिलेल्या माहितीनुसार शासन व महामंडळांतर्गत ०-२०-५० सिंचन क्षेत्रापर्यंत केवळ २८ योजना पूर्ण झाल्या. उर्वरित १५० सिंचन योजना अपूर्ण आहेत. कोकण विकासाचा अनुशेष वि.म.दांडेकर आणि विजय केळकर समितीच्या अहवालानुसार ४१ वर्षापूर्वी कोकणाच्या विकासाचा अनुशेष अडीच ते तीन हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचला होता. महाराष्ट्रातील रोजगाराच्या स्थितीबाबत अभ्यास करण्यासाठी मंत्रीमंडळाची उप समिती नेमण्यात आली होती. या समितीने कोकणात रोजगाराचा अनुशेष इतर भागांपेक्षा सर्वात जास्त आहे, असा निष्कर्ष काढलेला आहे, दांडेकर समितीने निर्धारित केलेल्या निर्देशांकानुसार कोकणात रस्ते पाटबंधारे प्रकल्प, औद्योगिक विकास, रोजगार या सर्व बाबतीत मोठा अनुशेष आहे. गाव, रस्ते, डांबरी सडक आणि जिल्हा मार्गाशी गाव जोडण्याकरिता रस्ते, पाणी पुरवठा योजना, टाक्या उभारणी हाही अनुशेष आहे. यामुळे कोकणाकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

श्री.प्रवीण दरेकर......

असुधारित प्रत

सभापती महोदय, आज या ठिकाणी ग्रीन बॉल म्हणून कोकणचा काजू प्रसिध्द आहे. त्याचे सर्वात जास्त उत्पादन कोकणात होते. हापूस आंब्याला जगभरातून मागणी आहे. काजू कोकणातून येतो. परंतु या ठिकाणी काजू बोर्ड कोल्हापूरला नेलेले आहे. काजू प्रक्रियेबाबतचे अनेक प्रश्न आहेत. काजू बी खरेदी करण्यात स्थानिक प्रक्रिया उद्योजकांना पर राज्यातील उद्योजकांसमवेत स्पर्धा करावी लागते. यामुळे काजू-प्रक्रियेला दहा-पंधरा कोटी रुपये दिले होते. त्यापैकी एक नवी दमडी देखील प्रत्यक्ष खालच्या स्तरापर्यंत गेलेली नाही. काजू लागवड, फळ-प्रक्रिया, मत्स्योद्योग यांना चालना देण्याची आवश्यकता आहे. याकडे या शासनाने लक्ष नाही.

आमची खासकरुन शिवसेना पक्षाकडून अपेक्षा होती. मी देखील एकेकाळी शिवसेनेचा कार्यकर्ता म्हणून काम केलेले आहे. कोकणातील शिवसैनिकांनी, जनतेने या शिवसेनेसाठी खूप भरभरुन आशिर्वाद दिलेले आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंचापासून, राज्याचा मुख्यमंत्री, देशाच्या लोकसभेच्या अध्यक्षपदापर्यंत शिवसेनेला जो बहुमान मिळालेला आहे, त्यामध्ये कोकणातील जनतेचा खूप मोठा वाटा आहे. परंतु अडीच वर्षांमध्ये शासनाने कोकणातील या जनतेकरिता काहीही केलेले नाही. माझी हात जोडून विनंती आहे की, कोकणातील सर्व अनुशेष भरण्याकरिता ५००० कोटी रुपयांचे पॅकेज द्यावे. कोकणाला यातून शासनाने एक प्रकारचा दिलासा द्यावा. अन्यथा कोकणातील जनता आपल्याला माफ करणार नाही.

सभापती महोदय, तांडयांसाठी आमचे सन्माननीय सदस्य ॲड निलय नाईक सातत्याने मागणी करत असतात. आमचे सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर, वाडया, वस्त्या, तांडयांना विशेष निधी मिळावा, याकरिता सातत्याने आग्रह करत असतात.

यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री. प्रवीण दरेकर...........

व्हीजेएनटीसाठी विशेष विहीर मिळावी म्हणून सन्माननीय सदस्य श्री. निलय नाईक सातत्याने मागणी करीत असतात. तांडे, वाडे आणि वस्त्यांसाठी एक विशेष निधी किंवा विशेष कृती आराखडा शासनाने तयार करावा अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. गोपिचंद पडळकर यांनी नाम संस्थेचा उल्लेख केलेला आहे. ती संस्था पोकलेन देते. त्यामुळे त्यांना ऑईल पाहिजे असेल आणि सीएसारच्या माध्यमातून विकासाला हातभार लागत असेल तर तशा प्रकारचे नियोजन शासनाने करावे, अशी विनंती करतो.

माननीय सभापती महोदयांनी मला बोलण्यासाठी पुरेसा वेळ दिल्याबद्दल त्यांच्याप्रती आणि सभागृहाप्रती आभार व्यक्त करतो. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र. भारत माता की जय.

-------

असुधारित प्रत

श्री. अभिजीत वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदया, विरोधी पक्षातर्फे म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी वेगवेगळया गोष्टींचा उहापोह केलेला आहे. राज्यात कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. राज्यात शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळाला नाही. राज्यात मागासलेपणा अजूनही कायम आहे. राज्याला चक्रीवादळ, अतिवृष्टी, पूर, गारपीट, अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान आणि महापूर यासंदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्याने सुंदर वर्णन केलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी एक तास पन्नास मिनिटे भाषण केलेले आहे. सुरुवातीला पश्चिम महाराष्ट्र कसा धुऊन निघाला त्याची माहिती दिलेली आहे. त्यामुळे माझ्या ज्ञानात भर पडली. कोकण पाण्याने किती ओसरला आहे त्याची माहिती देखील दिलेली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील अनुशेष धुळीला मिळाला आहे. हे काही दोन दिवसात होत नाही. हे सर्व ५० ते ६० वर्षात झालेले आहे. गेल्या दोन वर्षात कोरोना महामारीच्या काळात सरकार अडकलेले असताना माननीय विरोधी पक्षनेते अशी अपेक्षा करीत आहे. हे सर्व सरकारला करण्यासाठी विरोधी पक्षनेत्याने आणखी १५ ते २५ वर्षे विरोधी पक्षात काम करावे आणि आम्ही सत्ताधारी पक्षात काम करतो. म्हणजे आम्हाला हे काम करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल एवढेच मी सांगत आहे.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे सभागृहाशी संबंधित नियम आणि नियमावलीचा पाढा वाचून दाखवितात. आता माझे भाषण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांचे भाषण सुरु होते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची अस्वस्था मी समजू शकतो. त्यांची मंत्रिमंडळात आवश्यकता होती. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हा काम करणारा वक्ता आहे. ते आघाडीचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी परिवहन विभागात अतिशय चांगली कामे केलेली आहेत आणि त्यांची अस्वस्थता अधुनमधून बाहेर उफाळून येत आहे. त्यामुळे त्यांना राग कोणावर काढता येत नसल्यामुळे ते माझ्यावर

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर....

राग काढतात. आम्हाला त्यांच्याविषयी आदर आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे लवकर मंत्रिमंडळात येतील आणि त्यावेळी त्यांनी सत्तेत ५० वर्षे कामे करावीत अशी मी त्यांना शुभेच्छा देत आहे. आमचे काहीच म्हणणे नाही. त्यांनी केवळ कोकणाची काळजी घ्यावी आणि विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशमधील अनुशेष.... ते उर्वरित महाराष्ट्रात मराठवाडा वैधानिक महामंडळावर अध्यक्ष होते. त्यांनी काम केलेले आहे. आता त्यांना काम होत नाही. म्हणून आमची व्यथा आहे.

**उप सभापती** : दोन्ही मान्यवर महोदयांनी शांत बसावे. आता सन्माननीय सदस्य अभिजीत वंजारी यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जवळ जवळ दोन तास भाषण केलेले आहे. माझे भाषण सुरु असताना मला संरक्षण देण्याची गरज आहे. आपण ज्यावेळी सभागृहात आला त्यावेळी माझे भाषण नुकतेच सुरु होते. परंतु, मधल्या अडथळयामुळे ते पूर्ण होऊ शकले नाही. आता मी चार वाजून पंच्चावन्न मिनिटांनी माझ्या भाषणास सुरुवात करीत आहे. कृपया मला संरक्षण द्यावे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांना आणखी किती वेळ संरक्षण हवे आहे.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, मला एक तास तरी संरक्षण द्यावे.

**उप सभापती** : इतर सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यायची नाही काय ? दोन तास चाळीस मिनिटांमध्ये माननीय मंत्री महोदयांचे उत्तर असते. हा आपला नियम आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांचा वेळ मोजत नाही. त्यानंतर म्हणजे दोन तास चाळीस मिनिटांपैकी एक तास वीस मिनिटे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य आणि माननीय मंत्री महोदयांना उत्तर देण्यासाठीचा वेळ असतो. त्यामुळे सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी साठ ते सत्तर मिनिटांचा अवधी मिळतो. इतर सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना वेळेचे भान ठेवलेच पाहिजे. इतरांना नियम नाही असे नाही. इतर सन्माननीय सदस्य माझ्यावर रागवतात

हे माहीत आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांनी पंधरा मिनिटांमध्ये त्यांचे भाषण पूर्ण करावे, अशी माझी सूचना आहे.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, माझे भाषण पंधरा मिनिटात पूर्ण होणार नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अभिजीत वंजारी यांना सांगू इच्छिते की, नवीन सदस्यांना पाच मिनिटे देखील भाषण करण्यासाठी मिळत नाही.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी म.वि.प. नियम २६० अन्वये वेगळ्या प्रकारे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी त्यांच्या भाषणात राज्यात सुव्यवस्था नाही हे दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेतकऱ्यांवर कशा पध्दतीने हाल होत आहेत हे दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अतिवृष्टी, पूर, गारपीट आणि चक्रीवादळाच्या संकटामुळे राज्यात कोणत्या प्रकारचे वातावरण आहे याचे चित्र रंगविण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे चित्र रंगविताना किंवा राज्य शासनावर टिका करताना केंद्र शासनाच्या माध्यमातून राज्य शासनाला कशा प्रकारे मदत मिळायला हवी होती त्याचा देखील त्यांनी उल्लेख करायला हवा होता. भारत हे एक सार्वभौम राष्ट्र आहे. आपले फेडरेल स्टेट असल्यामुळे कॉन्स्टीटूयुशनच्या आधारे केंद्र आणि राज्य शासनाची जोपर्यंत एकत्रित मदत मिळत नाही तोपर्यंत कोणतेही राज्य विकासाच्या समोर जाऊ शकत नाही. ज्यावेळी राज्यावर वेगवेगळी संकटे येतात त्यावेळी केंद्र शासनाकडून राज्य शासनाला मदत केली पाहिजे. परंतु, गेल्या दोन वर्षात महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यापासून केंद्र शासनाने राज्याला मदत देण्यासाठी आडमुठी धोरण घेतलेले आहे. गेल्या दोन वर्षाच्या काळात राज्याच्या तिजोरीवर कोरोना महामारीमुळे मोठा आर्थिक भार पडलेला होता. त्यावेळी शासनाच्यावतीने आरोग्य व्यवस्थेवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. त्यावेळी केंद्र शासनाने कोरोना महामारीच्या काळात राज्य शासनाला मदत केलेली नाही. केंद्राने वेळोवेळी राज्यात अस्थिरता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. महामहिम राज्यपाल महोदयांची भूमिका राज्य शासनाच्या प्रती हवी होती. पण ती नाही हे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते. गेल्या एक वर्षापासून विधानसभेचे अध्यक्ष पद रिक्त आहे.

अप्रकाशित प्रत

महाविकास आघाडी सरकारने विधानसभेचे अध्यक्ष पद भरण्यासाठी वेळोवेळी निवेदने आणि विनंत्या केलेल्या आहेत. परंतु, महामहिम राज्यपाल महोदयांची

श्री. अभिजीत वंजारी.....

भूमिका काय आहे हे अजून तरी स्पष्ट झालेले नाही. एक वर्षापूर्वी महामहिम राज्यपाल महोदयांमार्फत १२ सन्माननीय सदस्यांची नियुक्ती विधानपरिषदेत केली जाणार होती. ही प्रक्रिया महाविकास आघाडी सरकारने पूर्ण केलेली आहे. यासंदर्भात मंत्रिमंडळात निर्णय झालेला आहे. हा प्रस्ताव महामहिम राज्यपाल महोदयांकडे पाठविण्यात आलेला आहे. एक वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा त्यांच्याकडून कोणतेही उत्तर आले नाही. त्यांची भूमिका कशी आहे हे सुध्दा सर्वांनी तपासून घेण्याची गरज आहे. विदर्भ वैधानिक विकास महामंडळ, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ आणि उर्वरित वैधानिक विकास महामंडळांच्या संदर्भात मी काही अंशी माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांच्या मताशी सहमत आहे. विदर्भ वैधानिक विकास महामंडळ किंवा उर्वरित वैधानिक विकास महामंडळाची नियुक्ती करताना त्यांना मुदतवाढ देताना, अर्थसहाय्य देताना महामहिम राज्यपाल महोदयांची भूमिका स्पष्ट राहिली तर निश्चितपणे महाविकास आघाडी सरकारला विदर्भ वैधानिक विकास महामंडळाला मुदतवाढ देता आली असती.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित

श्री.अभिजीत वंजारी.....

त्यांना अर्थ पुरवठा केला असता, तेथे तज्ज्ञ समितीची नियुक्ती केली असती. परंतु विधानसभा अध्यक्ष पदाच्या बाबतीत आणि राज्यपालांनी नामनियुक्त करावयाच्या १२ आमदारांच्या बाबतीत राज्यपाल भवनकडून आडमुठेपणाचे धोरण अवलंबिले गेल्यामुळे आता वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देऊन काय उपयोग आहे, असा प्रश्न आमच्या महाविकास आघाडी सरकारला नक्कीच पडला असेल. माझे स्पष्ट मत आहे की, वैधानिक विकास मंडळांच्या मुदतवाढीसाठी आमच्या सरकारने नव्हे तर विरोधी पक्षाने आडमुठेपणाचे धोरण अवलंबिले आहे.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक आरोप असा केला की, विदर्भ आणि मराठवाड्याला झुकते माप न देता पश्चिम महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी माननीय अर्थमंत्र्यांनी पश्चिम महाराष्ट्राला जास्त निधी दिला आहे. मी सांगू इच्छितो की, वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ न दिल्यामुळे मराठवाडा व विदर्भाच्या अनुशेषाची गणना करण्याचे काम थांबले असले तरी महाविकास आघाडी सरकारने २०२१-२०२२ आणि २०२२-२०२३ या वर्षात विदर्भ व मराठवाडा विभागाला दिलेल्या निधीची टक्केवारी ही निश्चितपणे समाधानकारक आहे. माननीय राज्यपालांनी ठरवून दिलेल्या सूत्रानुसार विदर्भाला २३.३ टक्के निधी देणे अपेक्षित आहे. परंतु २०२१-२०२२ मध्ये २६ टक्के आणि २०२२-२०२३ मध्ये २६.४ टक्के निधी विदर्भाला देण्यात आलेला आहे. विदर्भ वैधानिक विकास मंडळ तात्पुरते बंद असले तरी विदर्भाला त्यांच्या वाट्याचा अर्थ पुरवठा करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारने केलेला आहे, ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. माननीय राज्यपालांनी ठरवून दिलेल्या सूत्रानुसार मराठवाड्याला १८.७५ टक्के निधी देणे अपेक्षित होते. परंतु २०२१-२२ मध्ये १८.६२ टक्के आणि २०२२-२०२३ मध्ये १८.६६ टक्के निधी देण्यात आलेला आहे. केवळ टीका करुन सरकारला अडचणीत आणण्याचे आणि सरकारच्या बाबतीत वेगळ्या प्रकारची भूमिका वर्तमानपत्रात रंगविण्याचे काम विरोधी पक्षाकडून केले जात असून, ते आम्हाला कदापि मान्य नाही.

श्री.अभिजीत वंजारी.....

असुधारित प्रत

सभापती महोदया, विदर्भात किंवा संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळया प्रकारच्या कर्जमाफी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कसा दिलासा देता येईल यासाठी महाविकास आघाडी सरकारने प्रयत्न केला आहे. आपल्या राज्यात ज्या शेतकऱ्यांची खाती एनपीएमध्ये गेली होती त्यांना मदत करुन त्यांना कशाप्रकारे कर्जमाफी देता येईल यासाठी राज्य सरकारने प्रयत्न केले आहेत. तसेच जे नियमितपणे कर्ज भरतात त्यांना बाजूला न ठेवता, त्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये अनुदान देऊन त्यांना सुद्धा दिलासा देण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केले आहे. याचा जवळपास २० लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. अशा प्रकारच्या अनेक चांगल्या योजना महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत.

सभापती महोदया, या सरकारने राज्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी गेल्या दोन वर्षात रोजगार हमी योजना असेल, फलोत्पादन विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना असतील, या सर्व योजना राबविण्याचा प्रयत्न केला. मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ता योजना असेल, नवीन सिंचन विहिरी असतील, फळबाग पुन:लागवड असेल, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटीका योजना असेल किंवा शरद पवार ग्रामसमृद्धी योजना असेल, या सर्व योजनांच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना कसा लाभ देता येईल, कृषी विभागाला कशा पद्धतीने चालना देता येईल, आपल्या शेतकऱ्याला कशा पद्धतीने सुजलाम् सुफलाम् करता येईल याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारने केलेला आहे. त्यामुळे मी महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, सरकारने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ता योजना राबविण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांचे सरकार असताना पाणंद रस्त्याच्या योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. त्यांच्या सरकारच्या पाच वर्षांच्या काळात ज्या ज्या ठिकाणी पाणंद रस्त्यासाठी निधी देण्यात आला त्यात मोठ्या प्रमाणात अपहार झाल्यामुळे ती योजना

श्री.अभिजीत वंजारी.....

असुधारित प्रत

काही काळ बंद करावी लागली होती. आता मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ता योजनेच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सरकारच्या वतीने अत्यंत चांगले काम सुरु आहे. या योजनेच्या माध्यमातून त्या ठिकाणी पाणंद रस्ते कसे करता येतील, शेतकऱ्यांना आपल्या शेतीवर जाण्यासाठी कशी मदत होईल याचा प्रयत्न करण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरीची मर्यादा ५ वरुन २० पर्यंत वाढविण्यात आली आहे. ग्रामपंचायतीची लोकसंख्या १५०० असेल किंवा १५०० ते ३००० पर्यंत असेल, या सर्व बाबींचा विचार करुन त्या ठिकाणी योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा विविध योजनांच्या माध्यमातून अत्यंत चांगली कामगिरी महाविकास आघाडी सरकारने केलेली आहे, त्यामुळे मी पुन्हा एकदा सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत १ जानेवारी, २०२० ते २७ सप्टेंबर, २०२१ पर्यंत एकूण ३१.१६ लाख कुटुंबातील ५६ लाख मजुरांना मजुरी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून शासनाने सर्वसमावेशक असा निर्णय घेतला आहे. सर्वसामान्य कामगारांना रोजगार मिळावा, शेतकऱ्यांना रोजगार मिळावा, गरिबांना रोजगार मिळावा याकरिता मोठ्या प्रमाणात व्यवस्था उभी करण्यात आली आहे.

सभापती महोदया, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाशी कृत्रिम संगम साधून १० लाख १५ हजार ७३० घरकुलांना शौचालयाचा लाभ देण्यात आला आहे. या योजनेतून ७ लाख ३१ हजार गॅस जोडण्या देण्यात आल्या आहेत. सौभाग्यवती योजनेतून ७ लाख ५१ हजार १४० वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. गेल्या दोन वर्षांच्या काळात आलेल्या अस्मानी आणि सुलतानी संकटावर मात करुन अत्यंत चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारने केला आहे.

श्री.अभिजीत वंजारी.....

असुधारित प्रत

सभापती महोदया, पशुसंवर्धन विभाग असेल, क्रीडा विभाग असेल, त्यांच्या माध्यमातून अनेक चांगल्या योजना राबविण्यात आल्या आहेत. क्रीडा विभागाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, माननीय क्रीडा मंत्र्यांनी अत्यंत चांगली कामगिरी केली आहे. आपल्या राज्यात, देशात जी बेरोजगारी वाढत आहे त्यावर आळा बसला पाहिजे, आपले सर्व विद्यार्थी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रात सुद्धा प्राविण्यप्राप्त झाले पाहिजे या उद्देशाने मंत्री महोदयांचा प्रत्येक तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर क्रीडांगण बांधून तेथे युवक-युवतींसाठी खेळाची सोय करण्याचा मानस आहे. अशा वेगवेगळ्या योजना महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून सुरु आहेत. परंतु विरोधी पक्षाकडून केवळ महाविकास आघाडी सरकारला बदनाम केले जात आहे. मी तर म्हणेन की, २६० चा प्रस्ताव हा महाविकास आघाडी सरकारला बदनाम करण्याचे एक षडयंत्र आहे आणि ते षडयंत्र कुठे तरी थांबले पाहिजे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदया, या प्रस्तावावरील चर्चेचा समारोप करताना मी पुन्हा एकदा महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो. या सरकारने राज्यातील शेतकरी असतील, सर्वसामान्य कामगार असतील, गोरगरीब जनता असेल या सर्वांना सांभाळण्याचे काम केलेले आहे. आपण हे काम अशाचप्रकारे पुढे सुरु ठेवावे. या सरकारच्या माध्यमातून येणाऱ्या पाच वर्षात आपला महाराष्ट्र आणखी पुढे नेण्यासाठी, महाराष्ट्राची आणखी समृद्धी करण्यासाठी, सिंचनाच्या बाबतीत समृद्ध होण्यासाठी महाविकास आघाडी सरकारकडून प्रयत्न होतील, असा मला विश्वास आहे. विरोधी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावाचा मी निषेध करतो व येथेच थांबतो.

धन्यवाद.

----------

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांनी विरोधी पक्षाकडून मांडण्यात आलेला प्रस्ताव हा महाविकास आघाडी सरकारला बदनाम करण्याचे षडयंत्र आहे, असे मत व्यक्त केले असून मी त्यांच्या मताशी १०० टक्के सहमत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी १ तास ५१ मिनिटे भाषण केले. यातील १ तास महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र कसे पुढे गेले होते आणि महाविकास आघाडी सरकारने ते सहकार क्षेत्र कसे डबघाईस आणले यावर ते बोलले. त्यांच्यावर अन्याय झाला असे त्यांचे मत आहे आणि त्या बाबतीत त्यांनी या प्रस्तावावर बोलत असताना एकप्रकारे स्पष्टीकरण देण्याचे काम केले. माननीय सहकार मंत्री सभागृहात आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सहकारी कारखान्यांचा पाढा वाचत असताना काँग्रेस पक्षातील मंडळीचे किती साखर कारखाने आहेत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील मंडळीचे किती साखर कारखाने आहेत, कोणी किती थकबाकी बुडविली, कोणी एफआरपी दिली नाही हे सांगितले. भारतीय जनता पक्षाकडे साखर कारखानेच नाहीत आणि त्यांनी फार चांगल्या प्रकारे काम केले अशा आवेषात एकप्रकारे त्यांनी भाषण केले. एवढेच नव्हे तर महाविकास आघाडीचे सरकार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून चालविले जाते असा देखील त्यांनी आरोप केला. साखर कारखान्याच्या बाबतीत बोलताना माननीय विरोधी पक्षनेते अप्रत्यक्षरित्या असेही बोलले की, आता सहकार क्षेत्र हे माननीय केंद्रीय मंत्री श्री.अमितजी शहा यांच्याकडे आहे आणि आमच्याकडे सुद्धा केंद्रीय तपासाच्या यंत्रणा आहेत. विरोधी पक्ष सातत्याने आम्हाला धाक दाखवित आहेत. अशाप्रकारे बोलून ते महाराष्ट्रातील जनतेला काय संदेश देत आहेत, हे महत्त्वाचे आहे.

श्री.अमोल मिटकरी....

सभापती महोदया, वास्तविक पाहता २६० च्या प्रस्तावात समाविष्ट करण्यात आलेल्या विषयांवर त्यांनी मत मांडणे अपेक्षित होते. मी विरोधी पक्षाला विचारु इच्छितो की, महाविकास आघाडी सरकारने काहीच चांगले काम केले नाही काय ? ज्या अटलजींचे तुम्ही नाव घेता त्यांच्या कविता आम्ही रोज वाचतो.

नंतर श्री.कांबळे......

असुधारित प्रत

श्री. अमोल मिटकरी ....

तुम्ही स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांचा आदर्श सांगता की, त्यांनी विरोधी पक्षांबद्दल कधी मनामध्ये आकस ठेवला नाही. महाविकास आघाडी सरकारने मोठे निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे साहेब आहेत. पहिले कोरोनाचे संकट झाले, दुसरे कोरोनाचे संकट झाले, तौक्ते वादळ आले, आणखी अनेक वादळे आली, राज्यावर अस्मानी संकटे आली, मात्र अशाही वेळी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आदरणीय श्री. अजितदादा पवार उप मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांनी चांगली सांभाळली. मीच नव्हे तर विरोधी पक्षाने देखील प्रामाणिकपणे कबूल केले पाहिजे की, केंद्र सरकारकडून खासदारांना त्या काळात एक रुपयाचा निधी नसताना देखील महाराष्ट्र महाविकास आघाडी सरकारमधील माननीय अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी ४ कोटी रुपयांचा भरभक्कम निधी स्थानिक आमदार विकास निधीमध्ये दिला आणि यावेळी आणखी १ कोटी रुपये वाढवून दिले आहेत आणि सांगितले आहे की, तुमच्या स्थानिक आमदार विकास निधीतून तुमच्या मतदारसंघातील चांगली कामे करावेत. संकटे नव्हती का ? अजुनही संकटे सुरुच आहेत. कोरोनाचे संकट अजुनही संपलेले नाही. फक्त राजकारण करायचे आणि आपले ठेवायचे झाकून असा वेगळा सूर नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावातून येत आहे.

सभापती महोदय, विदर्भाच्या मुद्यावर सन्माननीय विरोधी पक्षनेते फार पोटतिडकीने बोलत होते. मी बाकीच्या विदर्भाचे अवलोकन करीत नाही. मी अकोला जिल्ह्यातून येतो, त्याबाबत बोलत आहे. आमच्या अकोला जिल्ह्यात ५ विधानसभा मतदारसंघातील ४ विधानसभा मतदारसंघ भारतीय जनता पक्षाकडे आहेत. अकोट-तेल्हारा, अकोला पूर्व, अकोला पश्चिम, मुर्तिजापूर अशी ४ ठिकाणे आहेत. गेल्या १० वर्षांपासून जनता यांना निवडून देऊन कंटाळली आहे. मागच्या काळात राज्यात तुमचे सरकार होते. केंद्रामध्ये तुमचे सरकार होते. तुम्हाला अकोला जिल्ह्याचा विकास का करता आला नाही ? आजही तेल्हारा व अकोट येथील रस्ते पहावेत. सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांना माहीत आहे की, मी जे बोलत

श्री. अमोल मिटकरी ....

आहे ते खरे बोलत आहे. पाठीच्या मणक्याचा त्रास असेल तर डॉक्टरच आम्हाला सल्ला देतात की, तेल्हारा, अकोट रस्त्याने एकदा-दोनदा प्रवास करावा, मणका व्यवस्थित होईल. असे तेथील रस्ते आहेत.

सभापती महोदय, माझ्या अकोल्याची दुरवस्था आहे. मी बाकीच्या जिल्ह्याचे सांगत नाही. मी अमरावती, वाशिम, बुलढाणा, नागपूर याबाबत सांगणार नाही. फक्त अकोला जिल्ह्याचे सांगत आहे. महानगरपालिकेध्ये सत्ता भारतीय जनता पक्षाची आहे. मग अकोला शहराच्या विकासाची काय व्यवस्था आहे ? १०० टक्के कॉटन उत्पादक शेतकरी आहे. भाऊसाहेब फुंडकर यांचे स्वप्न होते की, अकोला जिल्ह्यामध्ये टेक्सटाईल पार्क उभे झाले पाहिजे. बोरगाव मंजुचा, वणीरंभापूरचा अपवाद सोडला तर एकही टेक्सटाईल पार्क झाले नाही. मागच्या काळात विदर्भाचेच मुख्यमंत्री होते. मागच्या काळात सर्वात जास्त आमदार विदर्भातच भाजपमध्ये होते. मागच्या आणि आताच्या काळात भाजपचेच सरकार आमच्या जिल्ह्यात आहे. एक टेक्सटाईल पार्क उभा होऊ शकला नाही. मग शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार ? शेतीला जोडधंदा नाही. सातत्याने एवढे चांगले निर्णय घेतल्यावर देखील केंद्र सरकाचा दबाव आणायचा. आता एफआरपीकरिता आंदोलने सुरु झाली. मला सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ खोत आंदोलन करताना दिसले. मला इंग्रजी बोलण्यास सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब मनाई करतात. एकाने ट्विट केले होते, फेसबुकवर पोस्ट केली होती की, "Shri. Sadabhau Khot is speaking". "Khot" शब्दाचे स्पेलिंग वाचताना मला "खोटे" असे वाटले. सदाभाऊ खोटे स्पिकिंग तर चालू नाही ना असे मला वाटले.

सभापती महोदय, एफआरपीच्या मुद्यावर, केंद्रीय यंत्रणेच्या तपासाच्या मुद्यावर, सहकार क्षेत्र आता आमच्या श्री. अमित शहा यांच्याकडे आहे या मुद्यावर नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावाच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला बदनाम करण्याचे काम होत असेल तर मी सांगू इच्छितो की, सहकार क्षेत्र स्व. यशवंतराव चव्हाण

श्री. अमोल मिटकरी ....

साहेब, वसंतदादा पाटील, आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्यासारख्या सहकाराचा अभ्यास असणाऱ्या लोकांनी प्रगल्भ केले आहे. मी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती करतो की, यांचे अनेक साखर कारखाने आहेत, तुम्ही उत्तरामध्ये त्यांचाही इतिहास महाराष्ट्रासमोर मांडावा. हे ज्यावेळी एक बोट आपल्याकडे दाखवितात त्यावेळी चार बोटे त्यांच्याकडे असतात.

सभापती महोदय, आज त्यांनी मोठी यादीच काढून आणली म्हणून मी सांगत आहे. आज यांना वाटत असेल की, विदर्भ वैधानिक विकास महामंडळ आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केली आहे की, कोकणाला ५ हजार कोटी रुपयांचे जर पॅकेज दिले नाही तर तुम्हाला पाप लागेल किंवा जनता माफ करणार नाही. ५ हजार कोटी रुपये कोकणाला द्या. ५ हजार कोटी रुपये विदर्भाला द्या. आणखी आर्थिक विकास महामंडळाला द्या. तुमचे केंद्रीय मंत्री श्री. अमित शहा यांच्याकडे वजन आहे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना खूप चिंता आहे. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी म्हटले की, ते आजकाल दोन तासच झोपतात. आता ते नवीन साधना करीत आहेत की, झोपणार नाही. आमच्या देशात इतका मोठा नेता आहे. तुमचे जर वजन असेल तर केंद्र सरकारने आमचा जीएसटीच्या थकबाकीचा ४० हजार कोटी रुपयांचा परतावा जो थांबवला आहे तो परत आणण्याकरिता महाराष्ट्रासाठी काय प्रयत्न करणार आहात याचे उत्तर भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी महाराष्ट्राला द्यावे. ४० हजार कोटी रुपयांचा जीएसटीचा परतावा महाराष्ट्राला कधी देणार आहात ? माननीय प्रधानमंत्री दोन तास झोपतात.

सभापती महोदय, महाविकास आघाडी सरकारने आदरणीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात, आदरणीय श्री. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखली जे काम राज्यात केले आहे त्याला महाराष्ट्र कधी विसरणार नाही. मघाशी सन्माननीय विरोधी पक्षनेते

असुधारित प्रत

श्री. अमोल मिटकरी ....

प्रादेशिक असमतोलाबाबत बोलत होते. मला बोलण्यासारखे अनेक मुद्दे आहेत. मात्र मला सभागृहाचा वेळ घ्यायचा नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते २ तास सातत्याने बोलत आहेत, सरकारवर टीका करीत आहेत. नियम २६० च्या प्रस्तावावर बोलत आहेत. सभागृहाला या संदर्भात उत्तर दिले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रवीण दरेकर मुंबई बँकेच्या बाबतीत बोलले. सन्माननीय सदस्य ॲड आशिष शेलार व माजी शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांनी गुन्हे दाखल केले होते अशी माहिती मिळाली आहे. ती चुकीची असेल तर खोडून दाखववी. तुमच्यावर जर अन्याय, अत्याचार झाला असेल तर न्यायालयातून सिध्द होणार आहे. पण नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर सरकारला बदनाम करण्याचे षडयंत्र करायचे चालले आहे. महाराष्ट्र हे सर्व पाहत आहे. महाविकास आघाडी सरकारने अनेक योजना आणल्या आहेत. राज्याच्या केंद्रस्थानी शेती विषय असताना बळीराजाला दिलासा देणाऱ्या अनेक योजना सरकारने अर्थसंकल्पात मांडल्या आहेत. भूविकास बँकेच्या ९६४ थकबाकीदार शेतकऱ्यांना ९३४ कोटी रुपयांचे कर्जमार्फ केले हा निर्णय स्वागतार्ह नव्हता का ? विरोधकांनी कितीही टीका केली तरी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने २० लाख शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा हा धडाकेबाज निर्णय याच महाविकास आघाडी सरकाने अर्थसंकल्पात आणाला आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांची उत्पादकता प्रगतीशील शेतकऱ्यांच्या बरोबरीने आणण्यासाठी येत्या ३ वर्षांत १ हजार कोटी रुपये निधी देण्यात आला. मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना माध्यमातून शेतकऱ्यांकरिता राखीव ३० टक्के तरतूद वाढवून ५० टक्के करण्यात आली आहे. अनेक निर्णय आहेत. संतांच्या भूमीचा उल्लेख केला आहे. मघाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले आहे. माननीय राज्यपालांचा उल्लेख झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीमाई फुले, क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्याबाबत वादग्रस्त विधान केल्यानंतरही एकाही

श्री. अमोल मिटकरी ....

सन्माननीय सदस्यांना असे वाटू नये की, त्यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. एकीकडे महापुरुषांचा अवमान करायचा आणि आपण मूग गिळून बसायचे, मूक समर्थन द्यायचे याचा देखील महाराष्ट्राने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, सरकारने संतांच्या स्थळांच्या बाबतीत कार्य केले. संतश्रेष्ठ जगनाडे महाराजांचे सदुंबरेला समाधी स्थळ आहे. तेथे देखील भरीव आर्थिक निधीची तरतूद केली आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे वडुबुद्रुक तुळापूर या ठिकाणी समाधीस्थळ असून याकरिता शासनाने घेतलेला निर्णय नक्कीच स्वागतार्ह आहे. मराठी भाषेचा विकास व संवर्धन याकरिता मुंबईत १०० कोटी रुपयांचे मराठी भाषा भवन उभारण्याचा निर्णय आपल्या महाविकास आघाडी सरकारने घेतला आहे. महाराष्ट्राच्या हिताचे निर्णय आहेत. मातोश्री पाणंद रस्ते योजना ही सुंदर योजना आहे. शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. शेतकऱ्यांना वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य याबरोबर पाणंद रस्ते देखील महत्त्वाचे वाटतात. मातोश्री पाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यापर्यंत, शेवटच्या घटकापर्यंत पोहाचण्याकरिता, बळीराजाला दिलासा देण्याकरिता महाविकास आघाडी सरकानने निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, शेततळयाच्या अनुदानाच्या रकमेत ५० टक्के वाढ करुन ७५ टक्के करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. महिला शेतकऱ्यांकरिता कृषी योजनेमध्ये राखीव असलेली ३० टक्के तरतूद वाढवून ५० टक्के करण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतला आहे. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांना ५० वर्षे पूण झाल्याबाबत प्रत्येकी ५० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतमालासाठी किमान आधारभूत किंमत, अपूर्ण सिंचन प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याचा घेतलेला निर्णय, कृषी पंपांना वीज जोडणीचा निर्णय सरकारने घेतला आहे. सरकाने असे अनेक धडाकेबाज निर्णय घेतलेले आहेत. शिवाजी महाराजांचे नाव घ्यायचे, संतांचे नाव घ्यायचे, विदर्भ, मराठवाडा, कोकण याबाबत आम्हाला कळवळा आहे असे एकीकडे दाखवितात.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी.....

दुसरीकडे सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सरकारला टार्गेट करुन बदनाम करण्याकरिता नियम २६० चा प्रस्ताव आणला काय असा प्रश्न आम्हाला विचारावासा वाटतो. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. वित्तमंत्री श्री.अजित पवार यांनी या वर्षाच्या बजेटमधून राज्यातील सर्व घटकांना न्याय दिला, बळीराजाला दिलासा दिला. सहकार क्षेत्रात महाराष्ट्राने प्रगती करावी या करिता वेगवेगळ्या योजना सरकारने जाहीर केल्या आहेत. त्यासाठी वित्तमंत्री व माननीय मुख्यमंत्री यांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. राजकारण हे राजकारणाच्या जागी ठीक असते. काश्मीर फाईल्स वरुन आता राजकारण सुरु आहे. तो चित्रपट कोणी पाहत नव्हता. तो टॅक्स फ्री करा अशी मागणी करण्यात आली. टॅक्स फ्री केल्यावर लोक चित्रपट पाहायला लागले नाहीत. काही आमदारांनी त्या चित्रपटाचे मोफत शो लावले. तरी देखील लोक चित्रपट पाहण्यास तयार नाही. आगामी काळात आम्ही गुजरात फाईल्स काढू. महाविकास आघाडी शासनाला बदनाम करण्यासाठी नियम २६० चा प्रस्ताव आणला आहे. महाराष्ट्रातील जनता हे पाहत आहे, महाराष्ट्र कधी झुकला नाही, महाराष्ट्र कधी झुकणार नाही, महाराष्ट्रातील जनता पाहत आहे की,

"तुम लाख कोशिश करो मुझे बदनाम करने की,

लेकिन जब भी उठा हूं दुगुनी रफ्तार से उठा हूं"

कबीराचा एक दोहा आहे. मी संत साहित्याचा अभ्यासक आहे, त्यामुळे मला थोडे मांडावेसे वाटते.

"बुरा जो देखन मैं चला,

बुरा न मिलिया कोय,

जो दिल खोजा आपना,

मुझसे बुरा न होय."

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी....

स्वत:चे अंतकरण एकदा तपासून पहावे. महाराष्ट्र पाहत आहे. महाराष्ट्रात आर्थिक संकटात जी कामे झाली ती इतर कोणत्याही राज्यात झाली नाहीत म्हणून मुख्यमंत्री महोदयांचे सिंधुताई सकपाळ यांनी भरभरुन कौतुक केले होते. महाराष्ट्र हे कधीही विसरणार नाही. महाविकास आघाडी शासनाला मी सलाम करतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

-----------

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, नियम २६० च्या प्रस्तावावर मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार मानतो. विरोधी पक्ष नेत्यांनी आता नियम २६० च्या प्रस्तावावर भाषण करताना सहकारी साखर कारखान्यावर जे विचार मांडले त्याबाबत मी त्यांचा निषेध व्यक्त करतो. महाराष्ट्रात महाविकास आघाडी शासन अतिशय उत्कृष्ट काम करीत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून अनेक योजना राबविण्यात येत आहेत. सहकारातून आताही कारखाने सुरु आहेत. विरोधी पक्ष नेत्यांनी बँकेबाबत ज्या पध्दतीने उल्लेख केला तो सर्व चुकीचा आहे. त्यांचा वैयक्तीक राग ते सरकार वर काढीत आहेत. त्यांच्यावर काही गुन्हे दाखल झाले असतील ते सांगण्यापेक्षा त्यांनी सहकार, पतसंस्था व बँकावर त्यांच्या राग काढला. सहकाराबाबत आपल्या शासनाने कोअर बँकींग सुविधा सुरु केली आहे. राज्यातील ३०६ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बळकटी करणासाठी २००० कोटी रुपयांच्या योजनांची घोषणा करण्यात आली आहे. माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांनी पुणे शहरात शेती संशोधन केंद्राची स्थापना केली आहे. तेथे देशी गायींचा उपक्रम राबविला आहे. ही बाब कौतुकास्पद आहे. महाराष्ट्रात अतिशय चांगला प्रोजेक्ट करण्यात आला. देशी गायींचे दूध अतिशय चांगले व पौष्टीक असते. सईवाल गाय, थारपार गाय, राठी गाय, रेडसिंधी गाय व गिरगाय असेल या पाच गायींसाठी महाराष्ट्रात संशोधन केंद्र उभारले आहे. यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद बजेटमध्ये करण्यात आली. यासंदर्भातील काम पुणे शहरात चांगल्या पध्दतीने सुरु आहे.

सभापती महोदया, नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना महाविकास आघाडी शासनाने ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली आहे. हा निधी देण्यात येईल कारण महाविकास आघाडी शासन असत्य कधी बोलत नाही.भूविकास बँकेतील ३४८७८ शेतकऱ्यांचे ९६४ कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे. असे अनेक जनहिताची कामे हे सरकार करीत आहे. विरोधी पक्षाला आक्षेप घ्यावयाचा आहे म्हणून ते घेत असतात. १ कोटी २५ लाख क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आली. पाच लाख शेतकऱ्यांना ७०९७ कोटी रुपयांचे प्रदान करण्यात आले. १ लाख ३४ हजार शेतकऱ्यांकडून १४८ कोटी रुपये किंमतीचा माल खरेदी करण्यात आला. २३ लाख

श्री.नरेंद्र दराडे....

५२ हजार किंमतीचा कापूस, हरभरा असा माल खरेदी केला असून ४४५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम प्रदान केली. मुख्यमंत्री महोदयांनी कोरोना काळात मुंबईसाठी काही योजना आखल्या होत्या. माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांनी कोस्टल रोड करण्यासाठी पुढाकार घेतला. स्व.बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग मुंबई ते नागपूर असा आहे. हा मार्ग अतिशय सुंदर आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी चांगले रस्ते केले आहेत. युतीच्या काळातील रस्ते पहा व आताच्या सरकारच्या काळातील रस्ते पहावे. नागपूरला जाण्यासाठी साडेपाच तास लागतात. मागील आठवड्यात मी वैजापूर येथून नागपूरला गेलो होतो. तो रस्ता मी पाहिला आहे. जालना,नांडेद हा रस्ता महाविकास आघाडी शासनाने केला आहे. मला खेद वाटतो की, विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, तापी नर्मदा नदी जोड प्रकल्पाच्या नारपार खोऱ्यातील १५ टीसीएम पाणी गुजरातकडे १२० किलोमीटर अंतरावर उत्तरेकडे वळविण्याचा प्रयत्न आहे. तापी खोऱ्यातील मालेगाव, कळवण,जळगांव,येवला या ठिकाणी नारपारचे पाणी ठेवले तर बरे होईल. हे पाणी आम्ही पुढे जाऊ देणार नाही. अशी मी सरकारला विनंती करतो.

सभापती महोदया, या सरकारने आसनगांव येथील दहा हजार उद्योग गुजरात मध्ये नेले. महाराष्ट्राची प्रगती करण्यासाठी मुख्यमंत्री, उद्योग मंत्री व महाविकास आघाडी शासन आटोकाट प्रयत्न करीत आहे. एअर इंडियाचे कार्यालय मुंबईतून दिल्ली येथे हलविण्याचा घाट घातला आहे. विरोधी पक्षातील लोकांनी जे सांगितले ते खरे नाही. मंत्री महोदय श्री.आदित्य ठाकरे यांनी १०० मेगावॅटचा प्रोजेक्ट वैतरणा येथे सुरु केला आहे.. महाविकास आघाडी शासन चांगले काम करीत असताना सरकारला बदनाम करण्याचे काम विरोधी पक्ष करीत आहे. त्याबाबत मी निषेध व्यक्त करतो. या शासनाने महाराष्ट्रात अनेक चांगले प्रोजेक्ट सुरु केले आहेत. त्याबाबत मी सरकारचे व मंत्री महोदयांचे आभार मानतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो. जय महाराष्ट्र.

-------

असुधारित प्रत

**उप सभापती** : पुढील सन्माननीय सदस्य बोलण्या अगोदर मघाशी अशी विचारणा झाली होती की, कोणत्या पक्षाला किती वेळ आहे. सभागृहाच्या माहितीसाठी मी सांगते की, शिवसेना पक्षाचे १३ सदस्य बोलणार आहेत त्यांच्यासाठी २५ मिनिटे वेळ आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे १० सदस्य बोलणार असून सर्वांसाठी १८ मिनिटांचा वेळ आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ९ सदस्य बोलणार असून त्यांच्यासाठी १७ मिनिटांचा वेळ आहे. भारतीय जनता पक्ष व त्यांना पाठींबा देणारे सदस्य अशा प्रकारे २० सदस्य बोलणार असून त्यांच्यासाठी ५० मिनिटांचा वेळ आहे. विरोधी पक्ष नेते १ तास ५० मिनिटे बोलले आहेत. तरी देखील ५० मिनिटे आहेत. पुरोगामी गटाला ६ मिनिटे आहे. अपक्षांना ४ मिनिटे आहेत. मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी ४० मिनिटांचा वेळ आहे. असे हे गणित आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी वेळेचे नियोजन करुन बोलावे.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प.नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, नियम २६० अन्वये प्रस्तावात विदर्भ, मराठवाडा, कोकण व उत्तर महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल या संदर्भात उल्लेख करण्यात आलेला आहे. सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मी स्वत: विदर्भातील आहे. त्यामुळे मी विदर्भाविषयी जास्त भाष्य करणार आहे. आपण सन १९६० मध्ये झालेल्या नागपूर करारामुळे संयुक्त महाराष्ट्रात सामील झालो. मराठी भाषा हा समान दुवा धरुन आपण संयुक्त महाराष्ट्रात सामील झालो. आता महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन ६२ वर्षे झालेली आहेत. नागपूर सीपी अँड बेरार राज्याची राजधानी होती. त्यावेळी ते देशातील सर्वात मोठे राज्य होते आणि नागपूर शंभर वर्षे त्या राज्याची राजधानी होती. महाविदर्भ तयार करण्यात यावा असा देखील विचार सुरु होता. त्यावेळी स्व.यशवंतराव चव्हाण साहेब मुख्यमंत्री होते. विदर्भातील खेडकर साहेब, रामकृष्ण पाटील यांनी एकत्र येऊन मराठी भाषा हा दुवा धरुन नागपूर करार केला व आपण संयुक्त महाराष्ट्रात सामील झालो. परंतु आज काय परिस्थिती आहे ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते नेहमी सांगतात की, मुंबई महाराष्ट्र राज्यात सामील झाली पाहिजे यासाठी १०५ हुतात्म्यांनी बलिदान दिले. आमच्यावर अशी परिस्थिती नव्हती. आम्ही मराठी भाषिक राज्य म्हणून महाराष्ट्रात सामील होण्यासाठी करार केला होता. आमच्या कराराच्या काही शर्ती होत्या. आम्ही त्या शर्तींच्या आधारे महाराष्ट्रात सामील झालो. आमच्यावर कोणाचे बंधन नव्हते. उलट आता असे लक्षात येते की, नागपूर करारातील शर्तीला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात येत आहेत. वाटाण्याच्या अक्षता हा शब्द खूप साधा होईल. नागपूर करारामध्ये दोन प्रमुख गोष्टींचा समावेश होता. वर्षातील एक अधिवेशन नागपूर येथे होईल आणि ते अधिवेशन किमान ६ आठवड्यांचे असेल अशी पहिली मागणी होती. परंतु काय परिस्थिती आहे ? मागील दोन वर्षात नागपूर येथे एकही अधिवेशन झाले नाही. आजारपण वगैरे गोष्टींबद्दल माझे काहीही म्हणणे नाही. मला यामध्ये राजकारण

डॉ.रणजित पाटील........

करावयाचे नाही. परंतु नागपूर येथे दोन वर्षे अधिवेशन झालेले नाही. नागपूर विभागातील सर्व सामान्य लोकांमध्ये मुंबईतील आझाद मैदानापर्यंत येण्याची ताकद नसते. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याला शासनाकडे एखादी मागणी करावयाची असेल तर ते आझाद मैदानापर्यंत येऊ शकत नाहीत. भंडारा किंवा गोंदिया जिल्ह्यातील माणसाला मुंबई येथे यायचे असेल तर ८०० ते ९०० किलो मीटर प्रवास करावा लागतो. म्हणून वर्षातील किमान एक अधिवेशन नागपूर येथे झाले पाहिजे. जेणे करुन गोरगरीब लोक तेथे जाऊन शासनाकडे आपले म्हणणे मांडू शकतात. परंतु मागील दोन वर्षात नागपूर येथे अधिवेशन झाले नाही. विदर्भातील लोकप्रतिनिधींचे याबाबत एकमत असावे की, कोणत्याही परिस्थितीत वर्षातील किमान एक अधिवेशन.....

**उप सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, आपण या संदर्भात आपले म्हणणे जरूर मांडावे. आपल्या मताशी मी व सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य सहमत आहेत. परंतु विदर्भातील लोकांचे असे आपण म्हणत आहात ते आम्हाला मान्य नाही. राज्यातील सर्व लोकप्रतिनिधींची तशी इच्छा आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदया, मी सभागृहाला आकडेवारी सांगू इच्छितो. इतिहासात देव आणि दानव एकदाच एकत्र आले होते. कारण त्यांना समुद्र मंथन करुन अमृत प्राप्त करुन अमरत्व प्राप्त करावयाचे होते. आज संपूर्ण जग आयुष्य वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. विदर्भातील शेतकरी वयाच्या ४०-४५ वर्षात आई-वडील, मुलांना उघड्यावर सोडून आत्महत्या करीत आहेत. मी सभागृहाला मागील दोन वर्षातील सांख्यिकीय माहिती देतो. सन २०२० मध्ये २५४७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी मराठवाड्यातील ८०४, नागपूर विभागातील ३०९, उत्तर महाराष्ट्रातील ३५१, पुण्यातील २६ व विदर्भातील ११२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. एकूण आत्महत्यांपैकी विदर्भातील ४० ते ४५ टक्के शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. तसेच नोव्हेंबर, २०२१ पर्यंत २४८९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी मराठवाड्यातील ७७३, नागपूर

डॉ.रणजित पाटील........

विभागातील २६९, उत्तर महाराष्ट्रातील ३०७, पुण्यातील १३ व विदर्भातील १०५६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. एकूण आत्महत्यांपैकी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण ४० टक्के आहे. यापैकी ५० ते ६० टक्के आत्महत्याग्रस्त शेतकरी शासनाच्या मदतीसाठी पात्र आहेत. म्हणजे शेतकऱ्यांवर ताण होता हे सिद्ध झालेले आहे. शेतकऱ्यांवर कर्ज असल्यामुळे ते शासकीय मदतीसाठी पात्र ठरलेले आहेत, हे विसरुन चालणार नाही. परंतु ही परिस्थिती का निर्माण झाली ? ती परिस्थिती आजही आहे. आपल्याला या संदर्भात विचार करावा लागेल.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या भाषणात विदर्भातील दरडोई उत्पन्नाची आकडेवारी सांगितली. मानव विकास निर्देशांकाच्या निकषाची जी मानके आहेत त्यामध्ये एका बाजूला विदर्भातील सर्व जिल्ह्ये आणि दुसऱ्या बाजूला कोल्हापूर, सोलापूर, सातारा जिल्ह्यांचा विचार करावा, मला भेदभाव करावयाचा नाही. कुटुंबात अपंग मुल जन्माला आले तर आई-वडील त्या मुलाकडे जास्त लक्ष देतात. आपण सर्वांना समान तराजूत मोजत असाल तर मानव विकास निर्देशांकाच्या प्रत्येक मानकामध्ये विदर्भातील कोणताही जिल्हा बसत नाही. मी सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांनी दोन वर्षापूर्वी विशेषाधिकाराचा वापर करुन ३७१ (२) कल्मान्वये अमरावती, अकोला, बुलडाणा व वाशिम जिल्ह्यांसाठी १६०० कोटी रुपये राखीव ठेवण्याबाबत निर्देश दिले होते. सिंचनाच्या १० हजार कोटी रुपयांच्या बजेटमधील १५०० कोटी रुपये उपरोक्त ४ जिल्ह्यांमध्ये खर्च करावेत आणि मराठवाड्यामध्ये १६०० कोटी रुपये खर्च करावेत असे निर्देश माननीय राज्यपालांनी दिले होते. तसेच विदर्भात होणारी अतिवृष्टी, गारपीट, अवर्षण, दुष्काळ, पूर अशा नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाण्यासाठी माननीय राज्यपालांनी ८०० कोटी रुपये राखीव ठेवण्याचे निर्देश दिले होते. परंतु माननीय राज्यपालांच्या निर्देशाचे पालन होताना दिसत नाही. मागील दोन वर्षात विदर्भातील उपरोक्त ४ जिल्ह्यांना

डॉ.रणजित पाटील........

असुधारित प्रत

सिंचनासाठी १६०० कोटी रुपये मिळालेले नाहीत. ही परिस्थिती आज निर्माण झालेली नाही. सन १९६० पासून १९८० पर्यंत राज्यात इरिगेशनचे प्रमाण सारखे होते. परंतु १९८० नंतर अमरावती विभागातील सिंचन केवळ १२ टक्क्यांवर आले. राज्यातील एकूण इरिगेशनपैकी पश्चिम महाराष्ट्रात ४० ते ४५ टक्के इरिगेशन होते. आपण हवाई मार्गाने प्रवास केला तर कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यातील जमीन भर उन्हाळ्यात हिरवीगार दिसते. त्या जिल्ह्यांमध्ये बारमाही इरिगेशन सुरु असते. तेथे जमिनीचा एकही पॅच कोरडा दिसत नाही. विदर्भात फेब्रुवारी, मार्च महिन्यात हरभऱ्याचा हंगाम असतो. खारपणपट्टयात कोरडवाहू पीक घेतले जाते. आपल्याला केवळ तेवढाच भाग हिरवा दिसतो. उर्वरित भागात कोठेही हिरवा पट्टा दिसत नाही. अमरावती विभाग किंवा आश्वासित वाशिम जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न राज्याच्या सरासरीपेक्षा २५ टक्के कमी असेल तर त्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे.

सभापती महोदया, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मी मघाशी नागपूर कराराविषयी बोललो. शेतकऱ्यांना सिंचनासाठी विजेची आवश्यकता असते. तत्कालीन ऊर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी वेळोवेळी ऊर्जा विभागाविषयी आपले म्हणणे मांडले आहे. मागील ५ वर्षात १०-१५ टक्के लोकांची डिमांड क्रिएट केली जात होती, तेवढीच पेडपेंडिंग दाखविली जात होती आणि तेवढ्याच वीज जोडण्या होत होत्या.

यानंतर श्री.सांगळे.......

अस्सुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील....

त्यावेळी ५ वर्षांच्या काळात साडेसात लाख कृषी पंपावरील वीज जोडण्या देण्यात आल्या होत्या. विदर्भामध्ये ऊर्जा विभागाकरिता साधारणत: १० हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. शासनाने याच गतीने कामे सुरु ठेवली असती तर कदाचित आज आपल्याकडे पेड पेंडिग राहिले नसते. १५ दिवसांपूर्वी अशी परिस्थिती होती की, शेतात रब्बीचे पीक आहे. एका पाण्याअभावी पीक जाईल अशी परिस्थिती आहे. परंतु कृषी पंपावरील वीज जोडण्या कट करण्याची कारवाई सुरु आहे. अशा प्रकारे हाता तोंडाशी आलेला घास कोणी ओढत असल्यास ही बाब योग्य नाही. शेतकऱ्यांचा असा शिरस्ता असतो की, नक्षत्र असेल व त्यादिवशी पेरणी झाली नाही तर... त्या दिवशी त्याच्या घरी एखाद्या व्यक्तीचे प्रेत असले तरी ते झाकून शेतकरी प्रथम शेतामध्ये पेरणी करतो व त्यानंतर आपल्या घरात असलेल्या प्रेताची विल्हेवाट लावत असतो. पिकाला वेळेवर एक पाणी मिळाले नाही तर त्याच्या उताऱ्यामधील सरासरीमध्ये ४ क्विंटलचा फरक पडत असतो. त्यामुळे आम्ही विदर्भासाठी फक्त संरक्षित सिंचनाची मागणी करीत आहोत. शेतकरी मरायला लागल्यामुळे त्यांच्या पिकाला पाणी मिळावे एवढीच आमची मागणी आहे. परंतु ही मागणी शासनाकडून पूर्ण होताना दिसत नाही. ही अत्यंत खेदाची बाब आहे.

सभापती महोदय, एरिगेशन प्रोजेक्टसंबंधी सांगायचे झाल्यास जोपर्यंत शासन जमिनीवर जाऊन काम करणार नाही तोपर्यंत तुम्हाला तेथील परिस्थितीची माहिती मिळू शकणार नाही. मला अत्यंत आनंद वाटतो की, माननीय श्री.नितीन गडकरी साहेब ५ वर्षे केंद्रीय जलसंपदा मंत्री होते. तसेच राज्यात माननीय श्री.देवेंद्र फडणवीस तत्कालीन मुख्यमंत्री होते. बळीराजा संजीवनी योजनेच्या माध्यमातून राज्याला जेवढा निधी आला होता.. सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी यांनी सांगितले होते की, आपण अकोल्याबद्दल बोलावे. सभापती महोदया, पूर्णा नदी ही अकोल्याची लाईफ लाईन आहे. पूर्णा नदीवर ५ बॅरेजेस संकल्पीत होते. २० वर्षांपासून ते बॅरेजेस तयार होत असल्याचे आपण सर्वांनी पाहिलेले आहे. मागील ५ वर्षांपूर्वी त्या बॅरेजेसचे काम ४५ ते ५० टक्क्यांपर्यंत झाले होते. परंतु त्यानंतर माननीय

डॉ.रणजित पाटील....

श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या ५ वर्षांच्या काळात ५ बॅरेजेसची कामे ९५ टक्क्यांपर्यंत पूर्ण झाल्याची बाब आपल्याला विसरुन चालणार नाही. घुंगशी बॅरेजला फक्त पाईपलाईन टाकणे बाकी आहे. त्याकरिता टेंडर प्रक्रिया झाली आहे. निरधामणा बॅरेजला गेट लावण्यात आले असून बंद पाईपलाईनच्या माध्यमातून पाण्याचे वितरण करण्याचे काम शिल्लक राहिलेले आहे. परंतु त्या बॅरेजेसच्या कामांकरिता २ वर्षांच्या काळात आपण निधी मिळवू शकला नाहीत. ५ वर्षांमध्ये ५ बॅरेजेसची कामे ५५ ते ६० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाली असताना उर्वरित ५ टक्के कामे करण्यासाठी आपण सोबत येऊन सांगणे अत्यावश्यक आहे की, आपल्याला ही कामे आता करावी लागतील. यात कशाकरिता राजकारण आले ? आपण श्रेय घ्यावयाचे नाही. या संदर्भात व्हर्टीकल पंप लावायचा, तसेच पाणी कशा प्रकारे लिफ्ट करायचे याबाबत २-२ वर्षे निर्णय होणार नसल्यास तुम्ही शेतकऱ्यांसोबत कशा प्रकारे न्याय करणार आहात ? कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतीला तुम्ही एक पाणी देखील देऊ शकत नाही. सभापती महोदया, सदर बॅरेजेसला गेट लावण्यात आले होते, परंतु ते बंद असल्यामुळे तेथील पाण्याची पातळी वाढली होती. यापूर्वी गुलाबी अळीचा प्रार्दुभाव झाला होता त्यावर्षी शेतकऱ्यांचे कापूस पीक पूर्णत: उद्धस्त झाले होते. बॅरेजेसचे गेट बंद असल्यामुळे तेथील पाण्याची पातळी वाढली होती. तसेच ५-६ कि.मी. पर्यंत बॅक वॉटर गेले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठया हिंमतीने आपल्या शेतामधील संपूर्ण कापूस काढून टाकला व हरबऱ्याची पेरणी केली. अशा प्रकारे सिंचन क्षमतेमध्ये मोठी ताकद असते.

**उप सभापती** : आपले भाषण सुरु होऊन १३ मिनिटे झाली आहेत. मी पक्षनिहाय वेळेबाबत सदनाला थोडया वेळापूर्वीच माहिती दिली आहे. सदर प्रस्तावावर आणखी ८ ते ९ सदस्य बोलणार आहेत.

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदया, हा विदर्भातील महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले विचार व्यक्त करायचे आहेत. आम्ही सर्व जण उशिरापर्यंत सदनामध्ये थांबण्यास तयार आहोत. आपण सांगितल्याप्रमाणे मी माझे भाषण थोडयाच वेळात सपंवितो.

सभापती महोदया, शेती, सिंचन किंवा आरोग्य असो, विदर्भातील आरोग्याची सध्या काय परिस्थिती आहे ? विदर्भात ५ जिल्हयांच्या पूर्ण विभागामध्ये गरीब रुग्णांना एमआरआय काढण्याकरिता कोणतीही व्यवस्था नाही. तसेच तेथे कॅन्सरच्या रुग्णाला आंतररुग्ण करण्याची कोणतीही व्यवस्था नाही. राज्यात त्या व्यतिरिक्त असा एकही विभाग नसावा. एमआरआय काढण्यासाठी ५ ते ६ हजार रुपये लागतात. सर्व रुग्ण टाटा रुग्णालय किंवा नागपूरला जाऊ शकत नाहीत. आपल्या सर्वांना या गोष्टीसाठी प्रयत्न करावा लागणार आहे. आमच्या ५ वर्षांच्या काळात आम्ही अकोल्यामध्ये १२० कोटी रुपये खर्च करुन रुग्णालय तयार केले. तसेच तेथे एमआरआय व सीटीस्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्यात आले. त्या संदर्भात असलेला रोडमॅप वेळेवर पूर्ण करण्यात आला. त्यामुळे ३ वर्षांमध्ये सदर रुग्णालय तयार झाले. तसेच सन २०२० मध्ये सदर रुग्णालय लोकांकरिता उपयोगी पडेल अशी परिस्थिती होती. परंतु सरकार बदलले. त्याकरिता फक्त आकृतीबंध करायचा बाकी होता. कर्मचाऱ्यांना पगार द्यावा लागत असल्यामुळे ही बाब वित्त विभागाकडे जात असते. ९ सुपर स्पेशालिटी दवाखान्यांकरिता आवश्यक असलेली सर्व यंत्रसामुग्री तेथे उपलब्ध असताना देखील त्याचा लोकांना उपयोग होऊ शकला नाही. करोना काळात एक सीटी स्कॅन काढण्यासाठी तीन ते साडेतीन हजार रुपयांचा खर्च येत होता. २ वर्षे उलटून गेली आहेत. डिफेक्ट लायबिलिटीच्या पिरीयडमधून त्या मशीन्स निघून गेल्यास तसेच उंदरांनी त्यांच्या वायर खाल्ल्यास ही सर्वस्वी जबाबदारी कोणावर टाकायची ? हा मूळ प्रश्न आहे. त्या व्यतिरिक्त यवतमाळमध्ये १५० कोटी रुपये खर्च करुन सुपर स्पेशालिटी रुग्णालय तयार केले आहे. तसेच लातूर व औरंगाबाद येथे सुपर स्पेशालिटी रुग्णालये आहेत. मराठवाडयातील दोन्ही सुपर स्पेशालिटी रुग्णालये अद्याप सुरु का होऊ शकली नाहीत ? आपल्या आमदारांना मतदान केले नाही म्हणून तेथील जनतेने ही शिक्षा भोगायची का ? सभापती महोदय, मी या संदर्भात जवळपास

डॉ.रणजित पाटील....

१५ वेळा मंत्री महोदयांची भेट घेतली होती. तसेच त्याकरिता सदनामध्ये सर्व आयुधांचा वापर केला. त्यानंतर मी तेथे आत्मक्लेश आंदोलनाकरिता देखील बसलो होतो. आपण तेथे १५० कोटी रुपये खर्च करुन इंफ्रास्ट्रक्चर उभे केले असताना तुमची पगार द्यावयाची ताकद नाही. त्यामुळे या सर्व गोष्टी जाणीवपूर्वक केल्या जात नाही ना ? असा माझ्यासारख्या माणसाच्या मनात विचार येतो.

सभापती महोदय, गावामध्ये एखादा उद्योग येण्यासाठी तेथे पाणी, वीज आणि चांगल्या दळणवळणाची साधने आवश्यक असतात. अमरावती विभागामध्ये अमरावती आणि अकोल्यामध्ये विमानतळ आहे. अकोल्यामधील विमानतळ ब्रिटिशकालीन आहे. ते विमानतळ एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या अधिपत्याखाली आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस तत्कालीन मुख्यमंत्री असताना ५ वर्षांच्या काळात ते स्वत: प्रत्यक्षात जाऊन उद्योगांसाठी जमीन संपादित झाली आहे किंवा नाही, याची पाहणी करीत होते. अमरावती व अकोला येथे विमानतळांकरिता जमीन संपादन करण्यात आली होती. परंतु वाढलेली धावपट्टी तयार करण्यासाठी आणखी जमीन संपादित करणे गरजेचे आहे. जेणेकरुन तेथे उद्योग येऊ शकतील. याकरिता आपल्याला सदरहु विमानतळांची गरज आहे. परंतु शासनाकडून अमरावती व अकोला विमानतळासंबंधी कोणत्याही प्रकारची कार्यवाही होताना दिसत नाही. अकोला विमानतळासाठी आवश्यक असलेली जागा संपादित करण्यासाठी राज्य शासनाने निधी दिला होता. केंद्राचे विमानतळ असताना राज्य शासनाने त्याकरिता निधी कसा दिला ? त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस स्वत: तेथे आले होते. जोपर्यंत शासन खाली येऊन प्रत्यक्ष परिस्थिती बघत नाही तोपर्यंत कोणतीही माहिती मिळू शकत नाही असे मी दाव्याने सांगतो. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांची अशी दिनचर्या असायची की, सकाळी ८.०० वाजता उठून ते कोणत्या तरी जिल्हयाचा आढावा घेण्यासाठी जायचे. त्यानंतर तेथील सर्व शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल विचारणा करायचे. त्यावेळी त्यांच्यासोबत २० ते २५ आयएएस अधिकारी तसेच विभागांचे प्रधान सचिव असायचे. तसेच जिल्हयातील

डॉ.रणजित पाटील....

असुधारित प्रत

कन्व्हीक्शन रेट जास्त का आहे ? अशा प्रकारे त्यांच्याकडून विचारणा केली जात होती. तसेच सरकारी वकिलांना समोर बसवून आपल्या केसेसमधील साक्षीदार होस्टाईल का होत आहेत ? अशी विचारणा करणारे मुख्यमंत्री होते. तसेच करोना काळात ते स्वत: किट घालून मेडीकल कॉलेजमधील वार्डचा राऊंड घेत होते. शासन जोपर्यंत जमिनीवर जाऊन काम करीत नाही तोपर्यंत तुम्हाला कसे समजणार की, १५० कोटी रुपयांचे रुग्णालय, व्हेंटीलेटर मशीन्स, एमआरआय, सीटी स्कॅन मशीन्स उभ्या आहेत. तरी देखील आपण त्याकरिता २ वर्षांपासून मनुष्यबळ उपलब्ध करुन दिलेले नाही. मुख्यमंत्री प्रत्यक्षात जिल्हयाच्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांना या सर्व गोष्टी समजू शकतात. शासनाने विदर्भातील प्रत्येक जिल्हयांमध्ये कॅम्प लावावा. तसेच त्या कॅम्पमध्ये कोणत्या इंडीकेटरमध्ये आपण त्या जिल्हयाचे काम पुढे नेऊ शकतो याबाबत शासनाने विचार करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

डॉ.रणजित पाटील .....

छोटया छोटया गोष्टीसुध्दा पाठपुरावा केल्याशिवाय होणार नाही. तेव्हा तुम्ही आम्ही सर्व जण मिळून विदर्भासाठी निश्चितप्रकारे पाठपुरावा करुया. या कामाला पुढे नेऊ. मी राजकीय बोलणार नव्हतो. पण पक्षाच्या जाहीरनाम्याबाबत येथे चर्चा झाली.

श्री.दिवाकर रावते (बसून) : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, महाविकास आघाडीचा सध्या कॉमन मिनिमम प्रोग्राम सुरु आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ठीक आहे. त्यांचा वेगवेगळा जाहिरनामा होता. शिवसेनेचा वचननामा होता.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, यांचा कॉमन मॅक्सीमम प्रोगाम आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, दोन अडीच वर्षे या सरकारलासुध्दा झालेली आहेत. या अडीच वर्षात सात बारा कोरा करणे, सरसकट कर्जमाफीची घोषणा शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेसची होती. केजी टू पदवीपर्यत मोफत शिक्षण देण्याचीही आपण घोषणा केली होती. त्यातील एक पाऊलसुध्दा पुढे पडले नाही. बेरोजगारांना पाच हजार रुपये बेकारी भत्ता देण्याची आपली घोषणा होती. कौशल्य विकास विभागाकडेही निधी नाही. मी त्या दिवशी मंत्री महोदयांना विचारले, सर्व ऑनलाईन चालू असल्याचे त्यांनी सांगितले. जोपर्यत व्हीटीपीला एखाद्या बेरोजगाराला शिकविण्यासाठी पैसे देणार नाही तोपर्यत त्याचे कौशल्य वाढेल अशी कशी अपेक्षा करता. दोन्ही बाजूने ठरवावे की, सर्व प्रोफेशनल लोकांना त्यांच्या आस्थापनेवर त्यांनाच व्हीटीपीची परवानगी देऊन त्यांनाच कौशल्य विकासाची परवानगी दिली पाहिजे. नव्या उद्योगात ८० टक्के भूमिपुत्रांना नोकरी देण्याबाबत आपण लिहिले होते. पदव्युत्तर शिक्षणाकरीता शुन्य टक्के व्याजदराने कर्ज देण्याबाबत आपल्या घोषणेत नमूद होते. आतापर्यत कोणाला हे मिळाले आहे ते सांगावे. त्याला तर काहीच लागत नाही. यासाठी शासनाला केवळ धोरण करायचे आहे, कर्ज बॅंक देणार आहे. शासनाल केवळ व्याज द्यावे लागेल. जसे अण्णासाहेब पाटील विकास महामंडळामध्ये आदरणीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी तसे केले होते. लोकांना उद्योग

डॉ.रणजित पाटील .....

असुधारित प्रत

चालू करुन द्यायचे असतील तर व्याजाचा भार आपण झेलला पाहिजे व आम्ही तो झेलला होता. त्याच्यावर किती निधी मागील चार वर्षात खर्च झाला हे मी तुम्हाला सांगू शकतो, त्यावेळी अणाणासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे सर्व व्याज आम्ही भरले होते. यांच्या वचननाम्यात लिहिले होते की, मुलींसाठी मोफत शिक्षण राहिल. गाव ते शाळा अडीच हजार बसेस आपण विद्यार्थी एक्सप्रेस म्हणून काढणार होता, असा शिवसेनेच्या वचननाम्यात होते. सध्या एकाही विद्यार्थ्याला शासकीय बस मिळत नाही असे मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो. शेतकऱ्यांच्या खात्यात प्रतीवर्षी १० हजार रुपये जमा करणार होता. माननीय पंतप्रधान श्री.मोदी साहेबांनी कोरोना काळात ६ हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा केले आहेत. १०० विचारापेक्षा एक आचार श्रेष्ठ असतो. तुम्ही एक तरी करुन दाखवा.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील हे राज्यमंत्री असताना फार सहकार्य केलेले आहे. त्यामुळे तुम्हाला थांबवणे माझ्या जीवावर येत आहे. पण तुम्ही २३ मिनिटांपासून बोलत आहात. मला माझे काम करणे भाग आहे. आपण एक दोन मिनिटात भाषण आटोपते घ्यावेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, तेव्हाचे मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी समृध्दी महामार्गासाठी मॅरेथॉन बैठका रोज घेतल्या, ती साधी गोष्ट नाही. ते ब्रेन चाईल्ड होते. ज्या लोकांनी हे पाहिलेले आहे, रात्री दोन दोन वाजेपर्यंत बैठका चालायच्या. हे त्यांचे ब्रेन चाईल्ड आहे. त्यांच्या डोक्यातून निघालेला विचार व त्यातून आचरणात आलेला समृध्दी महामार्ग आहे. हा ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट आहे. नांगरलेल्या शेतातून रस्ता तयार करण्याचा विचार पुढे आला व तो प्रकल्प साकार झाला. यासाठी सर्व निधी राज्य सरकारने दिलेले आहेत. पैसे उभे केले आहेत. त्याशिवाय हे झाले नाही.

सभापती महोदय, आपणा सर्वांना माहिती आहे की, सर्व भागातील एरिगेशन पोटेंशिएल संपलेले आहे. नदीवर बॅरेजदेखील होऊ शकत नाहीत. ज्या पध्दतीने

डॉ.रणजित पाटील .....

असुधारित प्रत

महाराष्ट्राचे शहरीकरण चाललेले आहे तेथे प्रत्येक धरणावर पिण्याच्या पाण्याचे आरक्षण रोज वाढत चालले आहे. भांडणे होतील अशी परिस्थिती प्रत्येक शहरात निर्माण झालेली आहे. पाण्याचे आरक्षण झाले पाहिजे, तालुक्याची नळाची योजना अमुक या धरणावर झाली पाहिजे यासाठी धरणे व आंदोलने होत आहेत. अशा परिस्थितीत आपले गाव पाणी स्वयंपूर्ण करण्यासाठी जलयुक्त शिवार योजनेशिवाय दुसरा मार्ग नाही. आपण गाव तेथे व मागेल त्याला शेततळे देण्याची घोषणा केली. आपण ५० वरुन ७५ हजार रुपये अनुदान देण्याचेही मान्य केले, हे चांगले केले म्हणून तुमचे स्वागत करतो. आपल्याकडील खारपाणपट्ट्यात जेवढी शेततळी झाली आहेत तेवढी तुम्हाला करायची असतील तर केवळ पैसे वाढवून देऊन होणार नाही तर शासन जमिनीवर आले पाहिजे. तेव्हा मुख्यमंत्री महोदयांनी प्रत्येक जिल्हयात जाऊन शेततळे टारगेट पूर्ण का झाले नाही व ते पूर्ण करण्यासाठी अर्धा अर्धा तास बैठका घेतल्या होत्या. ५० हजारात आम्ही शेततळे केले ते तुम्ही ७५ हजार रुपयात करुन दाखवा, मी काहीही हरायला तयार आहे. यासाठी प्रशासनाला जमिनीवर जावे लागेल, त्यासाठी इच्छा असली पाहिजे, मी स्वागत करतो की, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी सांगितले की, कोणत्या योजनेवर किती पैसे खर्च होतात यावरुन ती यशस्वी होत नाही. जोपर्यंत लोकसहभाग योजनेत लाभत नाही, जोपर्यंत चार एनजीओ त्यासोबत येत नाही तोपर्यंत त्याला यश मिळत नाही. या क्षेत्रात नाम फाऊंडेशनप्रमाणे जैन फाऊंडेशनसुध्दा आहे. त्यांनी १०० पोकलँड जलयुक्त शिवार योजनेकरीता दिले होते. सरपंच व गावकऱ्यांनी पैसे जमा केले होते. अवर्षणग्रस्त गावात त्या काळात १००-१०० कोटी रुपये प्रतयेक जिल्हयाने जमा केले होते. केवळ एखादा संकल्प किंवा हेतू स्पष्ट असेल तर सर्वजण ईश्वरी रुप घेऊन त्याच्या पाठीशी उभे राहतात. म्हणून जलयुक्त शिवार योजना यशस्वी झाली तेव्हा तिला नाव ठेवण्यात आले. आपणास विनंती विनंती करतो की, अनेक अशा गोष्टी सांगता येतील. आपण चांगल्या कामासाठी सर्वजण एकत्र येऊया. या असमतोलाला हद्दपार करुया. राज्यात एखादा असा जिल्हा असावा की, जेथे दरडोई उत्पन्न एवढे कमी का असावे, एखाद्या जिल्हयाची सिंचन क्षमता १० टक्क्याने कमी का असावी,

डॉ.रणजित पाटील .....

असुधारित प्रत

सरासरी पेक्षा २५ ते ४० टक्के सिंचन क्षमता कमी का असावी, असे का व्हावे यासाठी आपण सर्व जण एकत्र येऊया. मला यावर राजकीय बोलायचे नाही.

सभापती महोदय, दिवंगत यशवंतराव चव्हाण यांनी अमृतकलश आणला होता. जेथे त्यातील थेंब पडले आहेत तेथे महाकुंभ होतो. या राज्यात हे थेंब फक्त काही जिल्हयातच पडले आहेत. कोल्हापूर, सातारा, सोलापूर, सांगली यापुढे राज्य नाही का, तेथेच कुंभ व्हावा. या अमृतकलशातील थेंब राज्यातील प्रत्येक जिल्हयात पडावेत एवढीच अपेक्षा करतो व थांबतो.

-------

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्था.प्रा.सं. ) : सभापती महोदय, नियम २६० अन्वये प्रस्तावावर मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद. आज सकाळी मी सत्ताधारी पक्षाच्या नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोललो आहे. आता विरोधी पक्षाच्या नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलण्याची संधी मला मिळाली आहे. सत्ताधारी पक्षाने कसे चांगले काम केले आहे हे सांगण्याचा सकाळी प्रयत्न करीत होतो. आता विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर सरकार किती नाकर्ते आहे, महाराष्ट्रातील जनतेची कशी फसवणूक करीत आहे हे दाखविण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष नेते यांनी केला आहे. माझ्यासारख्या तरुण प्रतिनिधीला या सर्व गोष्टीचे अप्रूफ निश्चित वाटते. संगणकाच्या कलयुगामध्ये जे दिसेल ते विकले जाते, बऱ्याचदा ब्रँडींग, मार्केटींग कशा प्रकारे केले जाते, यावर ग्राहक आकर्षीत होत असतो. देशातील नागरिकांची ही नस आदरणीय मोदी साहेबांनी निश्चितच ओळखली असल्याने ब्रँडींग व मार्केटींग कशी करावी हे आपणास माहिती आहे. महाविकास आघाडी सरकार व सत्ताधारी पक्ष अशा प्रकारच्या ब्रँडींगमध्ये किंवा मार्केटींगमध्ये महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेपर्यत माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री व श्री.बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात वैशिष्ट्यपूर्ण कामे केलेली आहेत. ती लोकापर्यत पोहचविण्यात आपण कमी पडतो असे मला बोलावेसे वाटते. माननीय विरोधी पक्ष नेते १ तास ४९ मिनिटे व ३६ सेकंद बोलले आहेत.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे.........

प्रस्ताव पाहिला तर त्यात बरेच विषय होते, मात्र जवळपास ८०-८५ टक्के वेळ माननीय विरोधी नेत्यांनी सहकार या विषयावर बोलण्यात घालविलेला आहे. त्यांनी कशावर बोलावे, हा त्यांचा अधिकार आहे. त्यावर मी माझे मत व्यक्त करु इच्छित नाही. त्याच्या पाठीमागचे कारण काय होते, त्याबाबत माननीय मंत्रीमहोदय उत्तरात सांगतील. सन्माननीय विखे-पाटील साहेब, स्व.वसंतदादा पाटील, स्व.यशवंतराव चव्हाण, आदरणीय नेते श्री.शरदचंद्रजी पवार यांनी सहकार चळवळ घडविली. त्या चळवळीला मजबुती आणलेली आहे. दुर्दैवी रित्या यापूर्वीच्या सरकारने ही सहकार चळवळ कशा पध्दतीने मोडली जाईल, त्या सहकार चळवळीचा पाठीचा कणा कसा मोडता येईल, हा प्रयत्न केलेला आहे.

माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे यावरील आजचे भाषण जर आपण ऐकले असेल तर त्यात त्यांनी अनेक पुरावे आणि दाखले याबाबत दिलेले आहेत. मात्र ज्या सहकार संस्थांनी महाराष्ट्र घडविला, ज्यांच्यामुळे आज कृषी क्षेत्र, शेतकरी, बँका असतील या गेल्या ७०-७५ वर्षांमध्ये उभ्या राहिलेल्या आहेत. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला आणि त्यातून महाराष्ट्र सुजलाम्-सुफलाम् केलेला आहे, या संदर्भात दुर्दैवीरित्या विरोधी पक्ष नेत्यांना सहज विसर पडलेला आहे. ही सहकार चळवळ उभी करणे आणि टिकविणे आज महत्त्वाचे आहे. सहकार चळवळ टिकविण्याकरिता आपल्या सर्वांच्या सामुहिक सहकार्याची गरज आहे. किंबहुना आपले सर्वांचे ते सामुहिक कर्तव्य आहे. आज कोकणावर बोलत असताना आपण आंबा-काजू या संदर्भात ओझरता उल्लेख केलेला आहे. मात्र तौक्ते चक्रीवादळ, निसर्ग चक्रीवादळ आले त्यावेळी केंद्राकडून फारशी मदत आली नाही. राज्य शासनाने मात्र एनडीआरएफ आणि एसडीआरएफचे निकष बाजूला सारत दीड पटीने पैसे उपलब्ध करुन दिले. या वादळातून कोकणवासियांना दिलासा देण्याचे काम माननीय श्री.अजित पवार यांच्या माध्यमातून झालेले आहे. एकीकडे गुजराथला न मागता १००० कोटी रुपये....अडथळा.....

श्री.सुरेश धस (माईक बंद): सभापती महोदया, सन्माननीय सदस्य अतिशय चांगल्या पध्दतीने भाषण करीत आहेत. सन्माननीय सदस्य नवीन असले तरीही

असुधारित प्रत

त्यांनी डायरेक्ट अशा प्रकारे मंत्रीमहोदयांप्रमाणे उत्तर देण्याच्या अविर्भावात प्रस्तावावर आपले मत मांडू नये.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, नवीन सन्माननीय सदस्य बोलत आहेत, त्यांच्या बोलण्यामध्ये अशा प्रकारे अडथळा आणणे योग्य नाही.

श्री.प्रवीण दरेकर (खाली बसून ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी जरुर बोलावे, परंतु त्यांनी मंत्रीमहोदयांप्रमाणे उत्तर देऊ नये.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, मी उत्तर देण्याचा प्रयत्न करत नाही, माझा तो अधिकार नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पर्यटनावर असेल....अडथळा....

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना निवडून येऊन चार वर्षांपेक्षा अधिक काळ झालेला आहे. आपले राजकारणातील नेतृत्त्व वा प्रतिनिधीत्त्व खानदानी आहे. जिल्हापरिषदेमध्ये देखील आपण काम केलेले आहे. आपण नवीन सन्माननीय सदस्य नसून देखील आपल्यावर खरेतर अन्याय केला जात आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अमरनाथ राजुरकर )**

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी माझी बाजू मांडली याबाबत मी त्यांचे आभार मानतो. कोकणावर खरे तर जास्त बोलले गेले नाही. आंबा, काजू, नारळ, सुपारी, या फळबागा पूर्णपणाने उध्वस्त झालेल्या आहेत, त्या बागांना कशा पध्दतीने पुन्हा उभे करता येईल, याकरिता विषय मांडले गेले पाहिजेत. यापूर्वी बोलत असताना राष्ट्रवादीचे सरकार आहे, असेही आपण म्हणाले होते, सन्माननीय श्री.अजित पवार, सन्माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नेतृत्त्व करीत आहेत. परंतु मला नक्की कळत नाही की, सकाळी सहा ते रात्री एक वाजेपर्यंत माननीय श्री.अजित पवार काम करत आहेत, म्हणून की काय, विरोधी पक्षाला त्या ठिकाणी थोडेसे....अडथळा....जसे पंतप्रधान साहेब काम करतात,

श्री.अनिकेत तटकरे......

असुधारित प्रत

तसेच, आमचा अजितदादा सुध्दा काम करतो, याचा आनंद आणि अभिमान आमच्यासारख्या कार्यकर्त्याला निश्चितच आहे. माननीय श्री.अजितदादांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. सकाळी साडे पाच वाजता कोणत्याही प्रकल्पाला भेट देणारा एकमेव नेता देशभरात जर कोणता असेल ते आपले माननीय श्री.अजितदादा पवार असतील, याबाबतीत त्यांचे मला मनापासून कौतुक करावेसे वाटत आहे.

सभापती महोदय, कालच छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती साजरी झाली. मला हा विषय खरेतर कालच मांडायचा होता. आपण जर पाहिले तर महात्मा फुले साहेबांनी सव्वाशे वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यास सुरुवात केली. आज तिथीनुसार की तारखेनुसार जयंती साजरी करायची किंवा कसे या वादात मला जायचे नाही. शासनाला माझी अशी विनंती करायची आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने जसे महात्मा गांधींच्या जयंतीनिमित्ताने आणि महाराष्ट्र दिनाच्या दिवशी ड्राय डे म्हणून साजरा केला जातो. तसेच,छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीदिनी देखील शासनाने निर्णय घ्यावा की, राज्यभरात दारुबंदी करावी आणि या योगे एक चांगला ऐतिहासिक निर्णय या शासनाने करावा.

सभापती महोदय, वाईन आणि दारु विक्री कशा पध्दतीने करण्यात यावी, यावर बोलले जाते. यातून राज्य शासनावर टीका देखील केली जाते. मात्र मध्य प्रदेशमध्ये घरटी विक्री करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मला त्याच्या खोलात जायचे नाही. माझी शिवभक्त म्हणून राज्य शासनाकडे प्रामाणिकपणे अशी विनंती राहील की, शासनाने याबाबत धोरण अवलंबवावे. पर्यटनाच्या संदर्भात कोकण निश्चितच प्रगतीपथावर आहे.

श्री.प्रसाद लाड (खाली बसून): सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना ड्राय डे नेमक्या कोणत्या जयंतीनिमित्त अपेक्षित आहे, हे त्यांनी स्पष्ट करावे.

श्री.प्रवीण दरेकर ( खाली बसून ): सभापती महोदय, ड्राय डे घोषित करण्याबाबत....अडथळा....

असुधारित प्रत

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या दिवशी ड्राय डे म्हणून शासनाने घोषित करावा, अशी मागणी मी केलली आहे. तिथीप्रमाणे आणि तारखेप्रमाणे अशा दोन्ही दिवशी ड्राय डे घोषित केली तरीही हरकत नाही. दोन्ही दिवशी ड्राय डे घोषित केला तरी आनंदच आहे. कारण काही शिवभक्त असतात....अडथळा......

श्री.प्रसाद लाड ( खाली बसून ): छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त ड्राय डे घोषित केला तर महसूल बुडेल म्हणून सन्माननीय श्री.अजित पवार ओरडतील.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, माझी याकरिता मागणी दोन्ही तारखेकरिता राहील. याबाबत शासन उचित निर्णय घेईल, अशी मी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, पर्यटन संदर्भातील विकासाकरिता देखील आज कोकणात मोठया प्रमाणात स्कोप आहे. राज्य शासनाचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. दिवेआगार, हरिहरेश्वर, श्रीवर्धन या ठिकाणांसाठी १२ कोटी रुपयांहून अधिक निधी शासनाने दिलेला आहे. त्याच बरोबर गुहागर, आरेवरे, कुणकवली, तारकर्ली, बोर्डी या सर्व समुद्र किनाऱ्यावर बीच ॲक्ट पॉलिसी आज राज्य शासनाने अवलंबविलेली आहे. याला आता गती राज्य शासनाकडून दिली जाईल, अशी मी कोकणवासियांच्या वतीने अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, खरेतर इंधन दरवाढीच्या संदर्भात देखील विरोधी पक्षाकडून काहीतरी बोलले जाईल. काल-परवा घरगुती सिलेंडरच्या दरामध्ये ८० रुपयांची वाढ केंद्र शासनाने केलेली आहे. हा अतिरिक्त बोजा गृहिणींवर टाकलेला आहे. हा अतिरिक्त बोजा राज्य शासनाने नव्हे तर केंद्र शासनाने माझ्या माता-भगिनींवर टाकलेला आहे. दिनांक १० मार्च पर्यंत पेट्रोल-डिझेल भाववाढीसंदर्भात थांबण्यास सांगितले होते. आता पाच राज्यांपैकी चार राज्यांचे निकाल केंद्र शासनाच्या बाजूने

श्री.अनिकेत तटकरे......

लागलेले असल्यामुळे काही दिवस थोडीशी उसंत निश्चितच भारतातील नागरिकांना मिळालेली आहे. मात्र पुढील काही दिवसांमध्ये काल-परवापासूनच पेट्रोल आणि

डिझेलमध्ये ६०-८० पैशांची अनुक्रमे वाढ झालेली दिसून आलेली आहे. या इंधनवाढीच्या संदर्भात देखील विरोधी पक्ष का बोलत नाही, हा प्रश्न माझ्यासारख्या कार्यकर्त्याला निश्चितच पडतो. आज मी माझ्या सर्व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त करु इच्छितो.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर आपण मुंबई-गोवा महामार्गाबाबत वारंवार चर्चा करत असत. आपल्या या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने खरे तर याबाबत आपण बोलणार, अशी माझी अपेक्षा होती. कोस्टल हाय वे च्या संदर्भात काल-परवा टेंडर झाले, आता ते काम देखील गतीने सुरु होईल, असे मला वाटत आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे हे अतिशय चांगले भाषण करत आहेत. परंतु त्यांचा आक्षेप असा आहे की, विरोधी पक्ष नेते तौक्ते वादळ, मुंबई-गोवा महामार्गावर बोलले नाहीत.

यानंतर श्री.सोनावणे.......

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर.....

मी एक तास पन्नास मिनिटे भाषण केले म्हणून अनेक वक्त्यांनी सांगितले आहे. मला तर वाटते की, आणखी चार ते पाच तास मला भाषण करण्यासाठी परवानगी दिली जाईल काय ? अन्यथा आपल्याला अर्थसंकल्पाचे पार्ट-१ आणि पार्ट-२ असे भाग करावे लागतील. कोकणाचा राहिलेला विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड हे कोकणातील आहे, ते त्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. अनिकेत तटकरे यांना मदत करतील.

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, बाहुबली पार्ट-१ आला आणि बाहुबली पार्ट-२ आलेला आहे. त्यावरील समारोप बाकी आहे. आपण सर्वजण कोकणवासीय आहोत. आपण सर्वांनी एकत्रितपणे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचा प्रश्न सोडविला पाहिजे. काल परवा कोकणात शिमग्यासाठी जात असताना सर्वपक्षीय नेत्यांच्या नावाने कोकणवासीयांनी शिमगा केला होता. कारण हा नॅशनल हायवेच्या अखत्यारीत येतो. मी माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांकडे या विषयासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. मी माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांचे आभार व्यक्त करतो. काल माननीय खासदार श्री. तटकरे यांनी मागणी केल्यानुसार मुंबई गोवा महामार्गासाठी ४०० कोटी रुपयांचा निधी देण्याचे मान्य केल्याबद्दल कौतूक आणि आभार व्यक्त करतो. लवकरात लवकर मुंबई गोवा महामार्ग मार्गी लागावा अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

-----

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विरोधी पक्षातर्फे म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, आमच्या कोकणी भाषेत एक म्हण आहे. "नाचू गेना अंगण वाकडे" याचा अर्थ असा आहे की, नाचता येत नाही. पण अंगण वाकडे आहे असे म्हणायचे. राज्याच्या विकासात निर्माण झालेला प्रादेशिक असमतोला बाबतीत माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेब आणि सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील साहेब यांनी मते व्यक्त केलेली आहेत. सरकार कशा पध्दतीने असमतोल ठेवत आहे आणि त्यामुळे राजकीय असमतोल कशा पध्दतीने होत आहे हे देखील सदनासमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेबांनी सदरहू प्रस्तावात राज्यातील सहकारासंदर्भातील किती मोठा घोटाळा झालेला आहे, त्याबाबत त्यांनी एक तास वीस मिनिटांमध्ये माहिती दिलेली आहे. महाविकास आघाडी सरकार पक्ष बघून कारवाई करण्याचे काम करते. माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांच्यावर केलेली कारवाई असेल किंवा मुंबै जिल्हा बँकेवर केलेली कारवाई असेल. ही बँक भारतीय जनता पार्टीची बँके आहे काय ? नेहमी वसंतदादा पाटील आणि यशवंतराव चव्हाण म्हणायचे आणि स्वत: माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेब असे म्हणतात की, राजकारणाचे जोडे बाहेर काढून आपण सहकारात काम केले पाहिजे. मला असे वाटते की, मुंबै जिल्हा बँक त्यासाठी अपवाद नाही. मुंबै जिल्हा बँकेत एकमेव जिल्हा बँक अशी होती की, त्यामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेब हे ९ वर्षे अध्यक्ष होते आणि राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसमधील सदस्यांची संख्या जास्त होती. मुंबै जिल्हा बँकेत काम करताना माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेबांनी अतिशय प्रामाणिक पणे राजकारणाचे जोडे बाहेर ठेऊन चालविली आहे. सन २०११ मध्ये मी निवडणुकीला उभे राहणार होतो. पण मी मुंबई म्हाडाचा अध्यक्ष असल्यामुळे मला निवडणुकीला उभे राहता आले नाही. त्यानंतर सन २०१५ मध्ये मला ती संधी मिळाली होती. सन २०१३ साली मुंबै जिल्हा बँकेचे अध्यक्ष हे माननीय विरोधी

श्री. प्रसाद लाड.....

पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेब झाले होते. त्यावेळी त्या बँकेची उलाढाल १२ हजार ५०० कोटी रुपये इतकी होती. सन २०२१ च्या निवडणुकीत १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मोठी बँक करण्याचे काम माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेबांनी केलेले आहे. यामध्ये भ्रष्टाचार कसा काय होऊ शकतो. काल एक सन्माननीय सदस्य मीडियासमोर असे म्हणाले होते की..... पेपरमध्ये आल्यामुळे हातवारे दिसले नाही. परंतु ते बोलले आहे. मला ही गोष्ट माननीय सहकार मंत्री महोदयांना सांगावयाची आहे. त्यांचा सहकारामध्ये दांडगा अनुभव आहे. त्यांच्या कुटुंबामध्ये सहकाराचे बीज पेरलेले आहे. त्यांना देखील माहीत आहे. एखादी बँक किंवा संस्था चालविताना त्या संस्थेमध्ये अध्यक्ष आणि संचालक कोण आहेत यापेक्षा सभासद किती चिरडला जातो हे देखील महत्वाचे आहे. आज मुंबै जिल्हा बँकेत १९ हजार पेक्षा जास्त सभासद आहेत. त्या बँकेची उलाढाल ही १० हजार ५०० कोटी रुपये इतकी आहे. त्या बँकेचे सभासद हे जिल्हा बँकेकडे बघून गुंतवणूक करीत असतात. १० वर्षात जर ८ हजार कोटी रुपयांची बँक वाढू शकते तर त्या बँकेत आमचे रक्त, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेबांनी आपला घाम ओतला असेल तर हे सरकारला विसरता येणार नाही. ते मजूर आहेत. कोणत्या तरी एक वर्तमानपत्रातून छापून येते की, मजूर कसा निवडून येऊ शकतो आणि त्यावर १ हजार कोटी रुपयांचा दावा टाकला म्हणून त्या पत्रकाराला किंवा वृत्तसंस्थेला मदत केलेली आहे. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेबांवर गुन्हा दाखल केलेला आहे. हे महाराष्ट्राला मान्य नाही आणि हे या सदनाला देखील मान्य नसले पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. आज एखाद्या व्यक्तीला खूष करण्यासाठी.... ती संस्था १९ ते २० हजार लोकांची संस्था आहे. त्यावर लोकांची घरे चालत आहे. त्यावर ७०० लोकांचा स्टाफ काम करीत आहे. ५६ शाखा आहेत. अशा बँकेवर आरोप केले जात आहे. ज्या बँकेत आज तुमच्याच पक्षाचा अध्यक्ष विराजमान झालेला आहे. एक मोठी संस्था बुडाली. व्यक्ती बुडत नसून, त्यामध्ये संस्था बुडत असते हे माननीय मंत्री महोदयांनी लक्षात घेतले पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेते

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड.....

श्री. प्रवीण दरेकर साहेबांवर मजूर कसे झाले हा आरोप आहे. त्यांनी मजूर संस्थेतून २५ हजार रुपयांचा पगार घेतलेला आहे. हा पगार घेतलेला आहे. त्याच धर्तीवर भाऊंनी जी नावे सांगितली तसे अनेक सभासद आपल्याकडे आहेत. बेरोजगार संस्थांची चौकशी करण्याची गरज आहे. त्यांच्याकडून उत्पन्नाचे दाखले मागविण्याची गरज आहे. बेरोजगारांमध्ये काम करणारे करोडो लोक हे मर्सिडीज, बीएमडब्ल्यू आणि ऑडीमधून फिरत आहेत. दोन्ही सभागृहात माथाडी सभासद म्हणून काम करणारे सन्माननीय सदस्य आहेत. काही बेरोजगारातून काम करीत आहेत. त्यांच्याकडे माथाडींचे बिल्ले आहेत. हे हमाली करायला जातात काय ? तसे नाही. शिक्षक मतदारसंघातून शिक्षक निवडून येतात. ते शिक्षक असतात काय ? मी माननीय श्री. अजितदादा पवार यांना सांगणार आहे आणि माननीय मंत्री महोदयांना देखील विनंती करणार आहे. याचे निवेदन माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी करावे, अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. कारण सहकारातील कार्यकर्ता हा राष्ट्रवादीने जीवंत केलेला आहे. हे सांगताना मला दु:ख अजिबात वाटत नाही. माननीय श्री. शरदचंद्र पवार किंवा माननीय श्री. अजितदादा पवार यांनी सहकारात काम कसे केले जाते, सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रगती कशी होते, ग्रामीण भागातील माणसाला रोजगार कसा मिळतो, त्यामधून साखर कारखाने किंवा इतर उद्योग निर्माण झालेले आहेत हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे सहकारातून कसे मोठे होतात हे मी तुम्हाला सांगण्याची गरज नाही. ४ लाख मजूर संस्थांना आणि त्यांच्यावर उपजीविका करणाऱ्या ४ लाख कुटुंबीयांना शासनाला उत्तर द्यावे लागणार असल्यामुळे याचे उत्तर माननीय श्री. अजितदादा पवारानी करावे, अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. शासन जर सहकाराला खड्डयात नेण्याचे किंवा डुबविण्याचे काम करीत असेल तर ते बरोबर नाही. यामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर ही एकमेव व्यक्ती नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी उभी केलेली एक संस्था आहे. शेतकऱ्यांना आणि ऊस कामगारांना मदत करण्यासाठी जिल्हा बँकेची घटना लिहलेली आहे. मुंबईत शेतकरी जीवंत राहिला नाही. पण

असुधारित प्रत

श्री. प्रसाद लाड.....

मुंबईतील जमिनीवर अनेक टोलेजंग इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. मग अशा वेळी शेतकऱ्यांना कर्ज कसे देणार त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर साहेबांसारख्या मुस्सदी नेत्याने, त्यांचे वडील एसटीमध्ये कामगार होते, एका कामगाराचा मुलगा बँकेत अध्यक्ष होतो, एका कामगाराचा मुलगा आमदार आणि राज्याचा विरोधी पक्षनेता होतो आणि तो मुलगा स्वत:च्या बुध्दीने मुंबै जिल्हा बँकेत परिवर्तन करतो. ते परिवर्तन कसे करतो तर या जिल्हा बँकेचे पैसे इतर लोकांना कसे देता येतील. मला आठवते की, माननीय श्री. अजितदादा पवार हे ज्यावेळी मुख्यमंत्री होते त्यावेळी गिरणी कामगारांचा प्रश्न चव्हाट्यावर आलेला होता. त्यावेळी गिरणी कामगारांना घरे द्यायची होती आणि गिरणी कामगारांना घरे देत असताना कोणतीही बँक त्यांना कर्ज देत नव्हती.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड ......

२०१३-१४ मध्ये गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सुटला त्यावेळी गिरणी कामगारांचे वय ६०-७० च्या घरात गेले होते. बँकेच्या अटीनुसार १० वर्षात कर्ज फेडू शकत नसाल आणि तुमचे वय ५० पेक्षा जास्त असेल तर गृह कर्ज मिळत नव्हते. अशा परिस्थितीत माननीय श्री.प्रवीण दरेकर साहेबांनी माननीय श्री.अजितदादा पवार यांची भेट घेतली. त्यावेळी राष्ट्रवादीच्या सहकार सेलचे अध्यक्ष श्री.नंदकुमार काटकर हे आमच्यासोबत होते. मी त्यावेळी म्हाडाचा सभापती होतो. त्यावेळी मुंबै जिल्हा बँकेने या सर्व गिरणी कामगारांना घरासाठी कर्ज देण्याचे धोरण आखले. मी माननीय श्री.अजितदादा पवार यांचे देखील आभार मानतो. मुंबै बँकेच्या तत्कालीन अध्यक्षांनी आणि आम्ही माननीय श्री.अजितदादा पवार यांना विनंती केली की, गिरणी कामगारांच्या वारसदारांना आपण सह-अर्जदार करावे आणि त्या माध्यमातून त्यांना ते घर भाड्याने देण्याची मुभा द्यावी. तशा प्रकारची परवानगी मिळाल्यानंतर त्या भाड्याच्या रकमेतून कर्जाची रक्कम फेडली जाऊ लागली. अशा प्रकारे ७ हजार गिरणी कामगारांना मुंबै जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज दिले गेले. आज गृह कर्ज देण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका पुढे येतात. परंतु सर्वात पहिले माननीय श्री.प्रवीण दरेकर साहेबांच्या नेतृत्वात मुंबै जिल्हा बँकेने अशाप्रकारे कर्ज देण्याचे काम केले.

सभापती महोदय, पूर्वी शिक्षकांचे पगार वेळेवर होत नव्हते. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील सभागृहात प्रत्येक वेळी शिक्षकांच्या विलंबाने होणाऱ्या पगाराबाबतचा प्रश्न उपस्थित करीत होते. शिक्षकांचे पगार दोन-तीन महिने उशिराने होत होते. त्यावेळी माननीय श्री.विनोद तावडे हे शालेय शिक्षण मंत्री होते. माननीय श्री.प्रवीण दरेकर साहेबांच्या नेतृत्वात मंत्री महोदयांना सांगण्यात आले की, शासकीय शिक्षण संस्थांतील शिक्षकांचे पगार मुंबै जिल्हा बँकेतून केले जातील. त्यानुसार प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला पगार देण्याचे काम मुंबै जिल्हा बँकेने केले. सरकार आम्हाला पगाराचे पैसे १५-२० दिवसांनी द्यायचे. ज्या शिक्षकांना आम्ही गुरुजन

श्री.प्रसाद लाड ......

असुधारित प्रत

मानतो, ज्यांच्यामुळे आज सभागृहात उभे राहून बोलू शकतो, त्या शिक्षकांना वेळेत पगार देण्याचे नवीन धोरण माननीय श्री.प्रवीण दरेकर यांनी आणले.

सभापती महोदय, या व्यतिरिक्त स्वयं पुनर्विकासाचा महत्त्वाचा निर्णय मुंबै जिल्हा बँकेच्या माध्यमातून घेण्यात आला. मी सातत्याने गेली साडेचार वर्षे मुंबईतील इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मांडत आहे. मुंबईच्या इमारतींच्या पुनर्विकासाचे काम करीत असताना बिल्डरधार्जिणे धोरण आखले गेले. मग सरकार कोणाचेही असो. परंतु जी धोरणे आखली गेली त्यामुळे मुंबईतील चाळीतील माणूस हा चाळीतच राहत होता. अशा वेळी माननीय श्री.प्रवीण दरेकर यांनी एक प्रस्ताव पुढे आणला. तो प्रस्ताव असा होता की, रहिवाशांनी स्वयं पुनर्विकासासाठी पुढे यावे. त्यावेळी आम्ही म्हाडाचे एक खिडकी धोरण आखले. त्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानतो. त्या वेळी म्हाडामध्ये श्री.म्हैसकर नावाचे अधिकारी होते. त्यांनी एक खिडकी धोरण आणले. जे स्वयं पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडाकडे सादर करतील त्यांना एक खिडकी धोरणाच्या माध्यमातून सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन देण्यात आली. आपल्याला सुद्धा माहीत आहे की, म्हाडामध्ये कारभार कसा चालतो. काय दिल्यानंतर, कोणता कागद बाहेर पडतो इत्यादी सर्व प्रकार बंद झाले. सभापती महोदय, ज्यांना ३०० चौ.फुटाचे घर मिळणार होते त्यांना स्वयं पुनर्विकासाच्या माध्यमातून ८००-१००० चौ.फुटाची घरे मिळायला लागली. ऐकप्रकारे मुंबईतील गरीब माणसांच्या कल्याणाचा माननीय श्री.प्रवीण दरेकरांनी ठेका घेतला होता. मुंबईतील मराठी माणूस हा आमचा आहे, परंतु त्याच्यासाठी आम्ही काही करणार नाही, आम्ही केवळ भाषणे करणार, वडा-पावच्या गाडीच्या पलीकडे आम्ही त्याला काही देणार नाही, असे न करता, मुंबईतील सर्वसामान्य मराठी माणसाला मुंबईत ८००-१००० चौ.फुटाचे घर देण्याचे काम माननीय श्री.प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वात मुंबै जिल्हा बँकेने केले. असे असताना मुंबै जिल्हा बँकेने भ्रष्टाचार केला असे कसे म्हणता येईल ? २ हजार कोटी रुपयांचा

श्री.प्रसाद लाड ......

अप्रकाशित प्रत

भ्रष्टाचार, १५ कोटी रुपयांचा फायदा झाला, हे कसे शक्य आहे ? या प्रकरणी नियमानुसार जी काही कारवाई व्हायची आहे ती होत राहील. त्या कारवाईचे आम्ही स्वागत करतो. आम्ही त्या कारवाईला घाबरतही नाही आणि भीकही घालत नाही. परंतु आम्ही सांगू इच्छितो की, आमचा कायद्यावर पूर्ण विश्वास आहे, न्याय देवतेवर पूर्ण विश्वास आहे. न्याय देवतेच्या माध्यमातून ही लढाई आम्ही तुमच्या सरकारसोबत लढत राहू. माननीय श्री.प्रवीण दरेकर यांच्या पाठीमागे केवळ मी एकटा नाही तर, संपूर्ण भारतीय जनता पार्टी आणि भारतीय जनता पार्टीचे राज्यातील आणि केंद्रातील नेतृत्व खंबीरपणे उभे आहे. भविष्यात केवळ संस्था डुबविण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया होत राहिल्या तर राज्यातील बऱ्याचशा संस्था डबघाईला आल्याशिवाय राहणार नाहीत. या राज्यातील सहकार क्षेत्र डबघाईला गेले तर हे राज्य सुद्धा डबघाईला जाण्यापासून कोणी वाचवू शकणार नाही, हे मी सांगतो.

सभापती महोदय, या सरकारने प्रादेशिक समतोल बिघडविला आहे. या सरकारने राजकीय समतोल कसा बिघडविला याचे उदाहरण मी सांगितले आहे. माझी सरकारकडे मागणी आहे की, ज्यांना हा समतोल राखता येत नाही त्यांनी तत्काळ खुर्च्या खाली कराव्यात. महाराष्ट्रातील जनता यासाठी सक्षम आहे. महाराष्ट्रातील जनतेमध्ये तेवढी ताकद आहे, महाराष्ट्रातील जनता सक्षमपणे हे काम करण्यास तयार आहे.

सभापती महोदय, विदर्भाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मराठवाड्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस आणि इतर विभागाच्या बाबतीत इतर सन्माननीय सदस्य बोलतील. त्यामुळे मी प्रामुख्याने कोकण विभागाच्या बाबतीत बोलणार आहे. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे यांनी मिळमिळीने कोकणाचा मुद्दा मांडला. कोकणाचा मुद्दा मांडत असताना प्रादेशिक असमतोल निर्माण करुन, कोकणाचा विकास कसा खुंटविला गेला, कशाप्रकारे तेथे चिंतेची बाब निर्माण झाली हे सांगताना मला खेद

श्री.प्रसाद लाड ......

होतो. कोकणाला नंदनवनापासून पोरके करण्याचे पाप या महाविकास आघाडी सरकारने केले. आम्हाला अपेक्षा होती की, माननीय पर्यटन मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांच्या माध्यमातून पर्यटनाला चालना मिळेल. पर्यटनाच्या माध्यमातून किमान ५ हजार कोटी रुपयांचा निधी महाराष्ट्रातील पर्यटनाला मिळेल आणि त्यातील किमान २ हजार कोटी रुपये कोकणातील पर्यटनाला मिळतील. कारण माननीय श्री.आदित्यजी ठाकरे यांची शिवसेना ही कोकणाच्या नेतृत्वावर उभी आहे. माननीय श्री.आदित्य ठाकरे साहेबांनी घोषणा केली होती की, कोकणात फॉरेन सिस्टीम टाईप सॅग बिझनेस आणू, कोकणामध्ये फाईव्ह स्टार हॉटेल्स आणू, सी-ब्रीज रोड तयार करु, रो-रो च्या माध्यमातून कोकणाला जोडू, कोकणाला पर्यटनाचा दर्जा देऊ, ७२० कि.मी. लांबीच्या समुद्रात अनेक समुद्री खेळ सुरु करण्यात येतील. परंतु या सर्व गोष्टी करीत असताना या वर्षीच्या अर्थसंकल्पात पर्यटन विभागाला केवळ १४०० कोटी रुपये देऊन त्या विभागाच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. मी मागील एका भाषणात सुद्धा उल्लेख केला होता. या १४०० कोटी रुपयांतील ८०० कोटी रुपये बारामती येथील बिबट्याच्या पार्कसाठी दिले गेले. मुळात बिबट्या हे विदर्भात असल्यामुळे त्या ठिकाणी हा निधी देण्याची आवश्यकता होता. बारामतीला निधी दिल्याबद्दल आम्हाला दु:ख नाही. परंतु पर्यटनासाठी आपण कोकणाला जादा निधी देणे आवश्यक होते. उरलेल्या ६०० कोटी रुपयांत संपूर्ण राज्यातील पर्यटनावर खर्च करावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे साहेब, आपण खाली बसून बोलू नये. मला वाटते आपली ऐकण्यात काही तरी चूक होत आहे. मी माननीय मंत्री श्री.आदित्यजी ठाकरे यांचा सन्मान करीत आहे की, ते पर्यटनासाठी ५ हजार कोटी रुपये आणतील. सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र दराडे यांच्यापासून संरक्षण द्यावे.

सभापती महोदय, मी एवढेच सांगू इच्छितो की, पर्यटन विभागाला अधिकचा निधी मिळाला असता तर पर्यटनाच्या माध्यमातून कोकणाचे नंदनवन झाले असते.

श्री.प्रसाद लाड ......

अशुद्धित प्रत

आज कोकणातील सर्वसामान्य तरुण रोजगारासाठी मुंबईमध्ये येतो. तो मुंबईत येऊन नोकरी करतो, त्याची मुंबईत राहण्याची व्यवस्था नसते, तो कसा तरी गुजारा करतो. महिन्याकाठी तो गावाकडील आई-वडिलांना पैसे पाठवितो. गावातील आई-वडिलांची मुलाच्या पैशावर गुजराण होते. परंतु कोकणातील माझा तरुण कोकणात राहिला, तेथे छोटे-मोठे व्यवसाय करु लागला आणि त्यातून त्याची प्रगती झाली तर निश्चितपणे कोकणाचे नंदनवन झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, कोकणातील रिफायनरी प्रकल्पाला विरोध करण्यात आला. मी सभागृहात नाव घेत नाही, परंतु राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या दोन वरिष्ठ नेत्यांची कोकणात ट्रेनने जात असताना माझी चर्चा झाली. मंत्री महोदय, मी खाजगीत त्या नेत्यांची नावे आपल्याला सांगेन. त्या नेत्यांनी आम्हाला सांगितले की, या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी आम्हाला वरुन आदेश आहेत. मी त्यांना सांगितले की, तुम्ही एवढे उच्चशिक्षित आहात. तुम्हाला या रिफायनरी प्रकल्पाला विरोध करणे योग्य वाटते काय ? सभापती महोदय, रिफायनरी प्रकल्पाच्या बाबतीत माझा लेख लोकमत वर्तमानपत्रात छापून आला होता. मी त्यात नमूद केले होते की, या रिफायनरी प्रकल्पाच्या माध्यमातून कोकणात ३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येणार होती. त्या गुंतवणुकीच्या माध्यमातून माननीय मंत्री श्री.नितीन गडकरी आणि माननीय मंत्री श्री.प्रधान साहेबांनी कोकणात एम्सचे हॉस्पीटल देण्याचे मान्य केले होते. त्या रिफायनरीच्या माध्यमातून आज १ लाख लोकांना रोजगार मिळाला असता. छोटेमोठे ॲन्सीलरी बिझनेस सुरु झाले असते, लॉजिंग बिझनेस वाढला असता, ट्रान्सपोर्ट बिझनेस वाढला असता, टुरीस्ट बिझनेस वाढला असता, हॉटेल बिझनेस वाढला असता, खानावळी बिझनेस वाढला असता,......

नंतर श्री.कांबळे....

श्री. प्रसाद लाड ....

लोक येऊ लागली असती. आंतरराष्ट्रीय लोक आले असते तर तेथे विमानतळ देखील झाले असते. पण त्याला देखील विरोध. विरोध कशाकशासाठी करायचा ? समृध्दी महामार्गाला विरोध. पण नंतर काही तरी पडद्याआड ठरले जाते. समृध्दी महामार्ग आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य ....

श्री. प्रसाद लाड : सभापती महोदय, मला ऑन लेग ठेवावे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी १०.०० ते ११.४५ या वेळेत भरेल. सदर बैठकीत आजच्या कामकाजातील प्रलंबित नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी, बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत